दो०— दीनबंधु, निजबंधुचें; ऐकुनि वच छलहीन ।
देश काल अवसर उचित; बदले प्रभू प्रवीण ॥३१४॥

तुमची अमुची सर्व जनांची । गुरु भूपां, चिंता घर-वनिंची ।
शिरावरी गुरु, मुनि, मिथिलेश । तुम्हां अम्हां; स्वप्नीं ना क्लेश ॥१॥
तुम्हा अम्हां हा; बहु पुरुषार्थ । स्वार्थ, धर्म, सयश, परमार्थ ।
पित्राज्ञा, पाळूंचि उभयतां । लोक-वेद-हित, पितृवच करितां ॥२॥
पितर-धनी-गुरु-वचना पाळिति । जाता कुपथिंहि; पतन न पावति ।
अशा विचारें; शंका सोडुनि । अवधिवरी पुरि; पाळा जाउनि ॥३॥
देश कोश, परिजन परिवार । गुरुपद-रज, धरिती हा भार ।
तुम्हि,मुनि-मातृ-सचिव-वच पाळा। मही, प्रजा; नगरी सांभाळा ॥४॥

दो०— मुख्यहि मुखसा पाहिजे; खाण्या पिण्यासि एक ।
पाळि पोषि अंगें सकल तुलसी ! सहित विवेक ॥३१५॥

राजधर्म सारांच हें इतुकें । मनी मनोरथ; दुसरे तितुके ।
भरता बोध, दिला बहु रीती । आधाराविण, तोष न शाती ॥१॥
भरतशील, गुरु-सचिव, समाज । नीती-प्रीति-विवश रघुराज ।
स्वपद-पादुका, दयाळु देती । सादर शिरीं; भरत निज घेती ॥२॥
चरण-पादुका; करुणा-निधिच्या । जणुं युग यामिक; जन-प्राणांच्या ।
संपुट भरत रतीं-रत्नासी । अक्षर-युग जणुं; जिव-यत्नासी ॥३॥
कुल-कपाट; करें शुभ कर्मासी । विमल नयन, सेवा धर्मासी ।
भरत मुदित; अवलंब पावतां । सुख जैसें श्रीराम राहतां ॥४॥

दो०— मागे आज्ञा नमुनि पदीं राम धरिति हृदयासि ।
जन उच्चाटी अमरपती, कुटिल साधि समयासि ॥३१६॥

ती कुचाळि अति;जन-हितकर कीं । अवधि-आस सम संजीवन कीं ।
न तरि अनुज-श्री-राम वियोगें । हा ! हा ! मरते; सकल कुरंगें ॥१॥
राम—कृपेनें, अरिष्ट टळलीं । विबुध-धाड, हित-रक्षक ठरली ।
आलिंगुनि मग, भेटति भरता । प्रभू-प्रेम-रस, सरे न वदतां ॥२॥
तनु-मन-वचन, पूर्ण अनुरागी । धीर-धुरंधर; धीरा त्यागी ।
वारिज-लोचन; मोचति वारी । बघुनि दशा, सुर,दुःखी भारी ॥३॥
मुनिगण, गुरु, धुरधीर जनकने । ज्ञानानलिं मन कसित कनकसे ।
विरंचिनें निर्लेपचि सर्जिले । पद्म-पत्र जणुं जल-जळिं जगलें ॥४॥

१ पाहरेकरी. २ पेटी. ३ प्रेम, स्नेह. ४ दार. ५ हात. ६ ढाळतात.

दो०— ते गणुनि रघुवर-भरत-अनुपम-प्रीति अपार ।
होति मग्न तनु मन वचनें; सहित विराग, विचार ॥३१७॥

जिथें जनक गुरु मति-गति कुंठित । प्रीती प्राकृत वदणें अनुचित ।
रघुवर भरत विरह वदतां हा । लोक म्हणति कीं; कठोर कवि हा ! ॥१॥
तो लज्जा-रस; अवर्णनीय । स्नेह बघुनि मति सलज्ज होय ।
भेटुनि समजाविति भरतासी । रिपुदमना; धरिती हृदयासी ॥ २ ॥
सेवक, सचिव; भरत-मत बघुनि । निज-निज कार्या; जाति निघोनी ।
ऐकुनि, दुःखित उभय समाज । गमनाचा; सजिती जन साज ॥ ३ ॥
युग बंधू; प्रभुचरण वंदुनी । जाति, शिरीं रामाज्ञा धरुनी ।
मुनि तापस; वन;-देव विनवुनी । पुनः पुन्हां; संमान देउनी ॥ ४ ॥
दो०— लक्ष्मणासि भेटुनि नमुनी; शिरिं सीतापद धूळ ।
--प्रेमाशीर्वच घेउनी; निघति, सुमंगल-मूळ ॥ ३१८ ॥

सानुज राम, नृपा शिर नमिती । स्तुति नानाविध करुनी विनती ।
देव ! दयावश; दुःख पावलां । सहित समाजहि वनीं पातला ॥ १ ॥
नगरीं पद, द्या, मज आशीस । धीर धरुनि करि; गमन महीश ।
मुनि महिदेव, साधु संमानुनि । बोळविले हरि;-हरसम जाणुनि ॥२॥
सासु-समीप; उभय मग गेले । नमुनी, आशिस घेउनि वळले ।
वामदेव कौशिक जावाली । परिजन पुरजन, सचिव सुचाली ॥३॥
विनति यथाविधि; करी प्रणाम । बोळविती मग सानुज राम ।
उच्च, लघू, मध्यम, नरनारी । बोळविती सन्मानें सारीं ॥ ४ ॥
दो०— प्रभु नमिती कैकयीपदा, स्नेहें शुचि भेटून ।
पालखि सजवुनि बोळविली; चिंतादिक निरसून ॥ ३१९ ॥

परिजन, पितरां; भेटुनि सीता । फिरे प्राण-प्रिय; प्रेम पुनीता ।
सासूनां; नमुनी, ती भेटे । प्रीति वदाया; गिरा न उमटे ॥ १ ॥
शिकवण अभिमत आशिस घेई । स्नेहीं उभय; मग्न ती होई ।
सुरम्य शिबिका; मग आणविल्या । शान्तवुनी सब; जननि चढविल्या ॥२॥
वारंवार उभय, त्यां मिळुनी । स्नेहें सम पोंचविल्या जननी ।
सजुनि वाजि-गज; वाहन नाना । भरत;-भूप-दल करी प्रयाणा ॥३॥
मनीं राम-सीता-सौमित्री । जन जणुं जाति असुं विण गात्रीं ।
वृषभ वाजि गज, पशु-मति-मग्न । चालति परवश अति मन-भग्न ॥४॥

---

१ शत्रुघ्नाला.

दो०— गुरु गुरु पत्नी नमुनि प्रभू; लक्ष्मण सीते साथ ।
फिरुनि हर्ष-विस्मय सहित; पर्णकुटी येतात ॥३२०॥

बहुमानें धाडिलें निषादा । जाई घेउनि, विरह विषादा ।
कोळि किरात, भिल्ल वनजाती । बोळवित; जोहारुनि जाती ॥१॥
श्री-प्रभु-लक्ष्मण; छाये बसती । परिजन-विरहें; बहु व्याकुळती ।
भरत,-भ्रात्र सुप्रेम, सुवाणी । सीते, अनुजा, वदत वानी ॥२॥
प्रीति प्रतीति; वचन मन करणी । स्वमुखें प्रभू प्रेमवश वर्णी ।
त्या समयीं खग, मृग, जळिंमीन । चित्रकूटचर; अंतरहि म्लान ॥३॥
विबुध बघूनि, दशा गामाची । वर्षुनि सुम, वदती स्थिति घरची ।
प्रभुनीं वंदुनि दिला भरवसा । जाति मुदित मन; डर न जरासा ॥४॥

दो०— सानुज सीते सहित प्रभू राजति पर्णकुटीरिं ।
ज्ञान भक्ति वैराग्य जणूं; शोभति तिथें शरीरिं ॥ ३२१ ॥

मुनि, महिसुर, गुरु, भरत, नृपाल । प्रभु-विरहें जन; सर्वहि विव्हळ ।
मनीं प्रभू-गुण-गणासि गणिती । जन, चुपचाप; पथीं सब जाती ॥१॥
उतरुनि यमुने पारहि गेले । त्या दिनिं भोजन; कोणि न केलें ।
गंगा उतरुनि; दुसरा वास । रामसखा करि; सेवा खास ॥ २ ॥
सई उतरुनी, स्नान गोमतीं । चौथे दिनीं; अयोध्ये येती ।
जनक चार दिन; नगरिं राहिले । राज-कांज, सब, साज पाहिले ॥३॥
राज्य, सचिव,-गुरु,-भरतां सोंपुनि । मिथिले जाती; समाज घेउनि ।
नगर-नारि-नर; गुरु-आज्ञेनें । अयोध्येंत, बसताति सुखानें ॥ ४ ॥

दो०— राम-दर्शना लोक सब; करिति नेम उपवास ।
त्यागुनि भूषण-भोग-सुख; जगती अवधी आसें ॥ ३२२ ॥

भरतें सेवक, सचिव बोधिले । -आज्ञा घेउनि; कांर्यि लागले ।
शत्रुघ्ना बोलाउनि शिकवी । जननी सेवा, तया सोंपवी ॥ १ ॥
द्विज बोलाउनि; करां जोडुनी । करी विनति; अधिकार पाहुनी ।
कार्य करें हीं; उच्च किं नीच । आज्ञा द्यावि; विना संकोच ॥ २ ॥
परिजन पुरजन; प्रजे आणवी । समाधान; करुनी सुखं बसवी ।
सानुज मग; गुरु;-गेहा जाउनि । करुनि दंडवत; करयुग जोडुनि ॥३॥

---

१ शरीरवान. २ गूहक. ३ राजकार्य. ४ चीजवस्तु. ५ आशेनें. ७ नदीचें नांव.

जरि आज्ञा राहील सुनेमें । मुनि, तनु-पुलकित वदले प्रेमें ॥
समजां, वदां; करां, तुम्हि जेंहीं । धर्मसार जगिं; होइल तेंही ॥५॥

दो०— शिकवण आशिस घेउनी; गणक अणुनि दिन सोधि ।
सिंहासनिं प्रभुपादुका; बैसविल्या निरुपाधि ॥ ३२३ ॥

रामजननि-गुरुपदिं, शिर वंदुनि । प्रभुचरणांची, आज्ञा घेउनि ।
नंदीग्रामीं पर्ण कुटीर । करी निवास, धर्म-धुर-धीर ॥१॥
जटाजूट शिरिं; मुनिपट-धारी । भूमी खणुनि; कुशासन पसरी ।
अशन, वसन, पात्रें, व्रत नेमां । प्रेमें करी कठिण ऋषिधर्मा ॥२॥
भूषण वस्त्र, भोग, सुख भूरी । त्रिविधां त्यजी, तृणासम सूरी ।
नरेन्द्र-राज्या, सुरेन्द्र वानी । धनेश लाजे; विभव ऐकुनी ॥ ३ ॥
वसे भरत त्या; नगरिं विरागें । चंचरीकं जणुं चंपक—बागे ।
रमा-विलास; राम-अनुरागी । त्याजिति वमन सम; लोक सु-भागी ॥४॥

दो०— प्रभू-प्रेम भाजन भरत ही न महा कर्तूति ।
चातक-हंसां, वानिती; नेम-विवेक-विभूति ॥ ३२४

देहें, दिन-दिन दुबळे दिसती । घटे मेद बल; नच मुखकान्ती ।
प्रभू-प्रेम-पण, नव नव पीन । वृद्धि धर्मदल; मनीं प्रसन्न ॥ १ ॥
जरि जल आटे; शारदीं तेजें । विलसति वेतस; विकसित वनजें ।
शम दम संयम; नियम उपास ।-भगणें; भरत-मन; विमल अकाश ॥२॥
ध्रुव विश्वास; अवधि राकी-से । स्वामि--स्मृती; सुरवीथि विकासे ।
प्रभू--प्रेम--विधु; अचल अदोष । सह समाज, शोभे नितें चोख ॥ ३ ॥
भरत-विचाराचारं सत्कृती । भक्ति-विरति गुण-विमल-विभूती ।
वर्णनि संकोचती सुकविही । शेष--गणेश--गिरा--गति नाहीं ॥४॥

दो०— पूजि सदा प्रभु पादुका, प्रीती हृदयिं अपार ।
आज्ञा बहु परि घेउनी; चालवि सुराज्यभार ॥

तनु पुलकित मनिं; श्री रघुवीर । मुखीं राम-जप, नयनीं नीर ।
सिताराम; लक्ष्मण वनिं वसती । भरत भुवनिं तनु, तपें सुकविती ॥

---

२ ज्योतिषी. ३ अन्न ४ मन, तनु, वाणीनें, ५ सुज्ञ. ६ नरश्रेष्ठ दशरथाच्या ७ भुंगा, मधुकर. ८ लक्ष्मीचे भोग विलास. ९ रामप्रेमी. १० कमळें ११ धर्माचें सैन्य. १२ नक्षत्रें. १३ पूर्ण चंद्र. १४ आकाशगंगा. १५ नित्य. १६ विचार व आचार.

वधुनि उभय; म्हणती जन-नायक। भरतचि खरा, स्तुतीतें लायक।
वधुनि, साधु व्रत नेम, वंदिती। वधुनि दशा, मुनिराज लाजती॥
भरताचार, सु-पावन भारी। मधुर मंजु मुद—मंगलकारी।
क्लेश कठिण, कलि कलुष, निवारक। महामोह दारुणतम हारक॥
पापपुंज-कुंजर-मृगराजा। शमन सकल;-संताप-समाजा।
जन-रंजन, भंजन-भवभार। रघुवर-स्नेह-सुधाकर-सार॥

छं०— श्रीराम प्रेम; पियूष पूरित; भरत जन्म न होत कीं।
मुनि-मन अगम यम, नियम शम दम; कठिण व्रत आचरति कीं॥
दारिद्र्य दुःखें, दंभ दूषण, यशमिसें अपहरति कीं।
तुलसी समान, शठासि हठवश, रामसन्मुख करित कीं॥

सो०— भरत चरित दृढ नेम; तुलसी जे सादर वदति।
रामचंद्र-पदिं-प्रेम; खास होइ भवरस-विरति॥

इति श्री अयोध्याकाण्डे, श्रीराम भरत संवादादि-भरत-
स्यायोध्यागमन वर्णनं नामैकोनत्रिंशोऽध्यायः
मास पारायणैकविंशो विश्रामः॥

इति श्रीमद्रामचरित मानसे सकल कलि कलुष
विध्वंसने द्वितीयः सोपानः॥

— अयोध्या काण्डं समाप्तम् —

जय जय रघुवीर समर्थ

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥
॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

॥ श्री राम चरित मानस ॥

॥ तृतीयः सोपानः ॥

॥ अरण्य—काण्डम् ॥

अध्याय १ ला

*शा. वि०— वामे यस्य शरासनं सुरुचिरं, बाणः करे दक्षिणे ।
पृष्ठे यस्य विभाति भूमितनया, तत्पृष्ठतो लक्ष्मणः ॥
वृक्षत्वक्कृतनिर्मलाम्बरधरो यो वै जटाकीरिटी ।
भक्तानामभयप्रदो रघुवरो नः पातु कान्तारगः ॥१॥*

*पृ०— गुरोश्चरण-मानसं सुविमलं सु-मुक्तप्रदं ।
पदं परमहंसगं परमपावनं, पूरितम् ॥
निजात्मसुख-वारिणा, भवभयाग्नि-निःसारिणा ।
त्रिताप-दव-हारिणा जनि-निवारिणा, पातु माम् ॥२॥*

शा. वि०— मूलं धर्मतरोर्विवेकजलधेः पूर्णेन्दुमानन्ददं
वैराग्याम्बुजभास्करं ह्यघघनध्वान्तापहं तापहम् ।
मोहाम्भोधर-पूग-पाटन-विधौ स्वःसम्भवं शंकरं
वन्दे ब्रह्म-कुलं कलङ्क-शमनं श्रीरामभूप-प्रियम् ॥१॥

,, सान्द्रानन्द-पयोद-सौभग-तनुं पीताम्बरं सुन्दरं
पाणौ बाणशरासनं कटिलसत्तूणीरभारं वरम्
राजीवायतलोचनं धृतजटाजूटेन संशोभितं
सीता-लक्ष्मण-संयुतं पथिगतं रामाभिरामं भजे ॥२॥

---

* अशी खूण असलेले श्लोक अनुवादकाचे स्वकृत आहेत.

रामा तव नामाचा, महिमा तुज मधुरिमा नसे ठावा ।
ठावा तव पदिं देई; विपदांतें मारुनीहि पद ठावा ॥ १ ॥

सो— उभे राम-गुण गूढ; पंडित मुनि पावति विरति ।
पावति मोह विमूढ; जे हरि-विमुख न धर्म-रति ॥अ॥

पुर-नर-भरत; प्रीतिचें वर्णन । अनुपम, मति अनुरूप सुशोभन ।
आतां राम चरित वर्नि पावन । ऐका, जें सुर-नर-मुनि-भावन ॥१॥
एक वेळ; शोधुनि शुभ कुसुमें । केलिं भूषणें; स्वकरें रामें ।
सीतेसी प्रभु; घालिति सादर । बसुनी स्फटिक-शिळेवरि सुंदर ॥२॥
काकवेष सुर-पति-सुत धरतो । रघुपति-बल, शठ पाहूं बघतो ।
पिपीलिका जशि, सागर-ठावा । महामंदमति, म्हणते घ्यावा ॥३॥
सीतापद; चोचुनी पळे तो । मूढ मंदमति काकचि कीं तो ।
वाहे रुधिर; बघुनि रघुनायक । संधानिति कार्मुकिं कुश सायक ॥४॥

दो०— अति कृपालु रघुनायक; दीनावरती स्नेह ।
येउनि त्यांसी करी छल; मूर्खचि, अवगुणगेह ॥१॥

प्रेरित मंत्र; ब्रह्मशर धावे । पळत सुटे, वायस भय पावे ।
जाइ धरुनि; निजरूप पित्यासी । राखि न रामविमुख तनयासी ॥१॥
सभय मनीं, अति, होय निराशा । यथा चक्रभयिं; ऋषि दुर्वासा ।
ब्रह्मलोक, शिवपुर सब लोकां । फिरे श्रमित; व्याकुळ भय शोकां ॥२॥
कोणीही त्या; बैस म्हणेना । प्रभु-द्रोह्या कुणि रक्षुं शकेना ।
पितृ यम; माता मृत्यु समाना । सुधा होइ विष; बघ्र हरि-याना[1] ॥ ३ ॥
मित्र करिति, शत-रिपुसम करणी । त्यातें विबुध-नदी[2] वैतरणी ।
तया विश्व, अनला-सम, दाहक । विमुख होति जे; श्रीरघुनायक ॥ ४ ॥
बघतां नारद;, विकल जयंत । येइ दया कोमल-मन-संत ।
म्हणे, प्रभू;-पाशीं त्वां जावें । शरणागत-हित; रक्ष म्हणावें ॥ ५ ॥
आतुर सभय जाइ धरि पाया । पाहि ! पाहि ! मज; प्रभु रघुराया ।
अतुलित बल; अतुलितही प्रभुता । मज मतिमंदा न कळे नाथा ॥ ६ ॥
निजकृत-कर्म-जनित फल ल्यालों । प्रभो, पाहि मी; शरणचि आलों ।
कृपाळु ऐकुनि सुदीन वाणी । एक-नयन त्या, करिति, भवानी ! ॥७॥

---

१ विष्णूचे वाहना, गरुडा. २ गंगा.

सो०— करितां मोहें द्रोह; यद्यपि त्याचा वध उचित ।
सोडुनि दावी स्नेह; प्रभु सम कृपालु नच क्वचित ! ॥ २ ॥

चित्रकूटिं वसतां प्रभु नाना ।–चरित करी, श्रुति-सुधाचि जाणा ।
पुढें राम निज, मनिं अनुमानिति । गर्दी होय, सर्व मज जाणिति ॥ १ ॥
सकल मुनींची, आज्ञा घेती । उभय वीर सह सीते निघती ।
अत्रि आश्रमा; यदा पावले । ऐकुनि, हर्षित; मुनी जाहले ॥ २ ॥
अत्री पुलकित; उठुनि धावले ।–बघुनी सत्वर; राम पावले ।
करिति दंडवत; मुनि आलिंगिति । स्नेह जळें त्यां; स्नाना घालिति ॥३॥
बघुनि राम-छवि; नयन तोषले । सादर निज; आश्रमा आणिले ।
पूजा करुनि, रम्य बहु वदलें । दिलें मूळ; फळ प्रभु-मनिं रुचलें ॥४॥

सो०— प्रभु आसनिं आसीन; नेत्र भरुनि शोभा बघति ॥
मुनिवर परम प्रवीण; कर जुळुनी स्तवना करिति ॥ ३ ॥

प्रमाणिकाः– नमामि भक्त वत्सलं । कृपालु–शील कोमलं ।
भजामि ते पदाम्बुजं । अकामिनां स्वधामदम् ॥ १ ॥
निकाम–शाम-सुन्दरं । भवाम्बु-नाथ-मन्दरं ।
प्रफुल्ल-कंज-लोचनं । मदादि-दोष-मोचनम् ॥ २ ॥
प्रलंब--बाहु--विक्रमं । प्रभोऽप्रमेय--वैभवं ।
निषंग--चाप--सायकं ।-धरं, त्रिलोक नायकम् ॥ ३ ॥
दिनेश--वंश--मंडनं । महेश--चाप--खंडनं ।
मुनींद्र--संत--रंजनं । मुरारि--वृन्द--भंजनम् ॥ ४ ॥
मनोज--वैरि--वंदितं । अजादि--देव--सेवितं ।
विशुद्ध-बोध--विग्रहं । समस्त दूषणापहम् ॥ ५ ॥
नमामि सिंधुजा-पतिं । सुखाकरं सतां गतिं ।
भजे सशक्ति-सानुजं । शची-पति-प्रियानुजम् ॥ ६ ॥

छं०— त्वदंघ्रि*मूल ये नरा । भजन्ति हीन–मत्सराः ।
पतन्ति नो भवार्णवे । वितर्क–वीचि–संकुले ॥ ७ ॥
विविक्त-वासिनः सदा । भजन्ति मुक्तये मुदा ।
निरस्य चेन्द्रिया-दिकं । प्रयान्ति ते गतिं स्वकाम् ॥ ८ ॥

१ मूळात. "इंदिरापति" आहे. लक्ष्मीपति २ इंद्राचा धाकटा भाऊ–वामन ४ नाही. ५ एकान्त.

* 'मूलं' असे वास्तविक हवें. पण तुलसीदासांनीं तसाच प्रयोग केला आहे.

तमेकमद्भुतं प्रभुं । निरीहमीश्वरं विभुं ।
जगद्गुरुंच शाश्वतं । तुरीयमेव केवलम् ॥ ९ ॥
भजामि भाव-वल्लभं । कुयोगिनां सुदुर्लभं ।
स्वभक्त-कल्प-पादपं । समं सुसेव्यमन्वहम् ॥ १० ॥
अनूप-रूप भूपतिं । नतोऽहमुर्विजापतिं ।
प्रसीद मे, नमामि ते । पदाब्ज-भक्ति देहि मे ॥ ११ ॥
पठन्ति ये स्तवं इदं । नरादरेण ते पदं ।
व्रजन्ति नात्र संशयं । त्वदीय-भक्ति-संयुताः ॥ १२ ॥

दो०— विनति करुनि, मुनि, शिर नमुनी; वदले कर जोडून ।
चरण सरोरुह नाथ नच, जावी मति सोडून ॥ ४ ॥

अनसूया-पद, धरुनी सीता । भेटे पुन्हां, सुशील विनीता ।
ऋषिपत्नी-मनिं, सुख बहु भरलें । आशिस देउनि, निकट बसविलें ॥१॥
लेववि दिव्य, वसन, बहु भूषण । सुंदर नित्य विमल जीं नूतन ।
मग ती वदे; सरस मृदुवाणी । मिसें करुनी, स्त्री-धर्मा वानी ॥ २ ॥
माय पिता, भ्राता हितकारी । हे अल्पद बघ राजकुमारी ।
अमित-दानि भर्ता, वैदेही ! । अधम नारि, जी; सेवित नाहीं ॥३॥
धीर धर्म अणि सुमित्र नारी । आपत्काळिं परीक्षित चारी ।
वृद्ध रोगवश, जड धन-हीन । अंध वधिर कोपिष्ट हि दीन ॥४॥
अशा हि पतिच्या करि अपमाना । ती पावे यमपुरिं दुख नाना ।
एकचि धर्म, एक व्रत नेम । पतिपदिं तनुमन, वचनें प्रेम ॥ ५ ॥
पतिव्रता जगिं; चार नांदती । वेद पुराण; संत ही म्हणती ।
मनीं उत्तमे, भाव असा ही । स्वप्निंहि अन्य;पुरुष जगिं नाहीं ॥ ६ ॥
मध्यम पर-पतिः बघती कैसे । भ्राता पिता, पुत्र निज जैसे ।
कुल-धर्मादि; विचारें राहे । निकृष्ट तिजला श्रुति वदताहे ॥७॥
अवसर-विना; भयें जी राहे । अधम नारि ती, जगांत; पाहें ।
पतिवंचक परः-पति-रति करिती । रौरव-नर्कि; कल्प शत पडती ॥ ८ ॥
क्षणिक सुखार्थ; जन्मशत कोटी ।-दुःख दिसेना ती अति खोटी ।
श्रमविण नारि; परम गति पावे । पातिव्रत्य पाळि जी भावें ॥ ९ ॥
पतीविरोधक, जिथें जन्मते । तरुण-पणीं वैधव्य पावते ॥ १० ॥

सो०— सहज अपावन नारि; पतिसेवें पावे गतिसि
यश गाती श्रुति चारि; तुलसी असुनी प्रिय हरिसि ॥५(क)॥

३ निमित्त करून. ४ अल्प देणारे. ५ उत्तम पतिव्रतेच्या.

सो०— शृणु सीते तवनाम; स्मरुनि नारि पति-व्रत करिति ।
तुला प्राण प्रिय राम; कथा सांगु संसार-हित ॥ ५ (ख)॥

ऐकुनि सीता; अति सुख पावे । तिज चरणीं, नमवी शिर भावें ।
वदति मुनिसि मग, कृपा निधान । जरि आज्ञा, वनिं; जाऊं आन ॥ १ ॥
संतत मजवरि; कृपा असावी । माना दास, न; प्रीति त्यजावी ।
धर्मधुरंधर; प्रभुची वाणी । प्रेमें श्रवुनि वदति; मुनि ज्ञानी ॥ २ ॥
ज्या कृपेसि अज; शिव सनकादी । वांछिति सकलहि; परार्थ-वादी ।
ते तुम्हि रघुवर; अकाम-प्रेमी । दीन-बंधु मृदु; वदलां नामी ॥ ३ ॥
अतां समजलो; श्री-चातुर्य । भजे तुम्हां सब; देव विहाय ।
ज्यां सम अधिक हि, कोणी नाहीं । तया शील कां; असें न राही ॥ ४ ॥
कसें म्हणूं तरि; 'जावें स्वामी' । वदा नाथ! तुम्हि अंतर्यामी ।
वदे प्रभूसी मुनिवर धीर । शरीर पुलकित; नयनीं नीर ॥ ५॥

छ०— तनु-पुलक-निर्भर; प्रेम पूरित, नयन मुख-कंजीं वसे ।
मन-बुद्धि-गुण,-गोतीत प्रभु मज, दृश्य! जप तप कायसें! ॥
जपयोग धर्म; समूह युत नर, भक्ति अनुपम पावती ।
रघुवीर-चरित, पुनीत निशि-दिन, स्वामि प्रज्ञा वर्णिती ॥१॥

दो०— कलिमलशमन दमन मना, राम-सुयश सुखमूल ।
सादर ऐकति त्यावरती, राहो प्रभु अनुकूल ॥ ६ ॥ (क)

सो०— कठिण काल-मल-कोश; ज्ञान धर्म ना योग तप ।
सांडुनि सर्वेहि सोसें; भजति राम ते चतुर नर ॥ ६ ॥ (ख)

मुनि-पद-कमळिं;नमुनि निज शीस । वनीं निघति, सुर--नर--मुनि--ईश ।
पुढें राम लक्ष्मण तो मागें । मुनिवर--वेश रम्य अति लागे ॥१॥
श्री उभयामधिं शोभे कैसी । ब्रह्म--जिवांमधिं माया जैसी ।
सरिता वन गिरि; अवघड घाट । पति जाणोनि; देति वर वाट ॥ २ ॥
जिथें जिथें; जाती रघुराया । तिथें तिथें घन; करिती छाया ।
असुर विराध, दिसे पथिं जातां । निपातिला त्या रामें येतां ॥ ३ ॥
त्वरित रुचिर; रूपासि पावला । दुःखि बघुनि निज--धामिं धाडिला ।
आले संनिध; मुनि--शरभंगा । सुंदर अनुज—जानकी--संगां ॥ ४ ॥

दो०— बघुनि राममुख पंकज मुनिवर-लोचन भृंग ।
सादर पाना करिति अती; धन्य जन्म शरभंग ॥ ७ ॥

---

१ परमार्थ. २ लक्ष्मी. ३ सोडून. ४ तृष्णा, आशा, ५ इंद्रियातीत.

बदले, शृणु; रघुवीर कृपाला। शंकर––मानस;––राज––मराला।
जातचि होतों; विरंचि सदना। कळलें प्रभु; येतील कानना ॥१॥
होतों वाट; बघत दिन राती। बघुनी शीतल; झाली छाती।
नाथ सकल; साधन मी हीन। कृपा केलि; जाणुनि जन दीन ॥२॥
मजवरि केले; नच उपकारां। राखां निजपण; जनमनचोरा।
तोंवरि दीन,–हितार्थ रहावें। जों तनु–त्यागें; तुज न मिळावें ॥३॥
योग याग व्रत; जप तप केलीं। समर्पुनी, वर भक्ति घेतली।
शर रचुनी मग; मुनि शरभंग। –बसले, त्यजुनि; हृदयिंचा संग ॥४॥

दो०— सीता अनुज समेत प्रभू, नील––जलज––तनु शाम।
हृदयिं वसा मम निरंतर; सगुणरूप श्री–राम ॥ ८ ॥

मग योगानळि, देह जाळिला। रामकृपें; वैकुंठ पावला।
कारण, मुनि हरि-लीन न झाला। भेद-भक्तिवर; आधिं घेतला ॥ १ ॥
ऋषिगण बहु मुनि;-वर-गति बघती। विशेष सौख्या, हृदयिं पावती।
करिती स्तुती; सकल मुनि वृंद। जयति प्रणत हित; करुणाकंद ॥ २ ॥
मग रघुवर, वनिं; चालूं लागे। विपुल वृंद मुनि; आले मागें।
अस्थि समूह; दिसे रघुराया। दयार्द्र पुसती, मुनी-निकाया ॥ ३ ॥
जाणुनि कां; पुसतां जी स्वामी। सर्वदर्शि तुम्हि; अंतर्यामी।
असुरवृंदिं, मुनि;––वृंद भाक्षिले। परिसुनि राम-नयनिं जळ भरलें ॥४॥

दो०— 'राक्षस हीन करीन मही,' पण करि भुज उचलून।
सकल मुनींचे आश्रमीं; सुख दिधलें जाऊन ॥ ९ ॥

इति श्री अरण्यकाण्डे मंगलाचरणादि–शरभंगकथावर्णनं
नाम प्रथमोऽध्यायः ॥

अध्याय

अगस्ति--मुनिचा; शिष्य सुजाण। प्रभाव रति; नाम सुतीक्ष्ण।
प्रभु-पद-सेवक; तनु-मन-वचनें। स्वप्नि ान्य–भरोसा नसणें ॥ १ ॥

---

१ बाण, दर्भ.

अरण्यकाण्ड, अध्याय २ रा. पृ. ६ पुरवणी

रामागमन वृत्त तो पावे। करित मनोरथ आतुर धावे।
हे विधि! दीनबंधु रघुराज। दया करिति कीं मजवरि आज ॥ २ ॥
सहित अनुज मज राम रमापति। सेवक समजुनि काधि कीं भेटति
दृढ विश्वास मला मनिं नाहीं। ज्ञान विरक्ती भक्ति न कांहीं ॥ ३ ॥
ना सत्संग योग जप यज्ञ। ना दृढ चरण कमलिं अनुराग।
करुणानिधिचा एकचि बाणा। तो प्रिय, ज्या गति अन्य असेना॥४॥
होती सुफल आज मम लोचन। बघुनि वदन-पंकज भवमोचन।
निर्भर प्रेम मग्न मुनि ज्ञानी। अशक्य वदणें दशा भवानी! ॥ ५ ॥

पंथ दिशा विदिशाहि न समजे। कोण कुठें मी जातो तुमजे।
मागें फिरे पुन्हा कधि वळतो। गुण गातो वा नृत्यचि करतो ॥६॥
प्रेमभक्ति मुनि अगाध लाहे। राम लपुनि तरुमागुनि पाहे।
प्रेम बघुनि अतिशय, रघुवीर। प्रगटति मनिं भवभयहर धीर ॥ ७॥
मुनि मार्गींच अचलसा बैसे। पुलकित वपू पनसफळ जैसें।
मग रघुनाथ निकट अति आले। दशा बघुनि मनिं प्रसन्न झाले ॥८॥
राम मुनिस जागवि बहु रीती। ध्यानसुखें ना जागृत होती।
भूपरूप मग रघुवर लपवी। हृदयिं चतुर्भुज रूप दाखवी ॥ ९ ॥

जागति मुनि मग; विव्हळ केले । फणिवर मणि-विण; व्याकुळ जैसे ।
पाहुनि पुढें; राम-तनु श्यामा । सहित अनुज; सीता सुख-धामा ॥१०॥
भाग्यवन्त मुनि; प्रेमीं मग्न । पडे दंड—सम; पायीं लग्न[1] ।
भुजा-विशालें; तया उचलिलें । परा-प्रीतिनें; हृदयीं धरिलें ॥ ११ ॥
शोभे भेटत; मुनिसि कृपाल । कनक तरुसि; भेटेचि तमाल ।
उठे, प्रभु-मुखा; बघत राहिला । भासे जणुं; चित्रींचा लिहिला ॥ १२ ॥

दो०— धीर धरुनि मुनि हृदयिं मग धरि पद वारंवार ।

प्रभु निज आश्रमिं आणुनी; पूजी विविध प्रकार ॥ १० ॥

ऐका राम; विनंती माझी । करूं स्तुती; कैशी प्रभु तूझी ।
महिमा अमित; माझि मति थोडी । रवि सन्मुख; खद्योत उजेडी[2] ॥ १ ॥
श्याम-तामरस;-दाम[3]—शरीरं । जटामुकुट परिधन[4] मुनिचीरं[5] ।
करीं चापशर; कटिं तूणीरं । नौमि निरंतर; श्री रघुवीरं ॥ २ ॥
मोह-विपिन—घन-दहन कृशानुः । संत-सरोरुह-कानन-भानुः ।
निशिचर-करि-वरूथ—मृगराजः । त्रातु सदा नो भवखग—बाज[7]ः ॥३॥
अरुण-नयन, राजीव, सुवेशं । सीता—नयन—चकोर—निशेशं[6] ।
हर-हृदि मानस;—बाल-मरालं । नौमि राम उर;-बाहु—विशालं ॥४॥
संशय-सर्प; ग्रसन उरगादः । शमन सुकर्कश;-तर्क—विषादः ।
भव-भंजन रंजन-सुरयूथः । त्रातु सदा नो; कृपावरूथः ॥ ५ ॥
निर्गुण सगुण विषम समरूपं । ज्ञान-गिरा-गोतीतमनूपं ।
अमलमखिलमनवद्यमपारं । नौमि राम; भंजन-महिभारं ॥ ६ ॥
भक्त—कल्प—पादप—आरामः । तर्जन-कोप;—लोभ-मद-कामः ।
अति नागर, भवसागर—सेतुः । त्रातु सदा; दिनकर-कुल-केतुः ॥ ७ ॥
अतुलित बलः प्रताप-बल-धामः । कलिमल-विपुल-विभंजन-नामः ।
धर्म-वर्म-नर्मद गुण—ग्रामः । संतत शं; तनोतु मम रामः ॥ ८ ॥
यदपि विरज; व्यापक अविनाशी । सर्वां हृदयिं; निरंतर वासी ।
तदपि अनुज;-श्री-सहित खरारी । वसो हृदयिं मम; काननचारी ॥ ९ ॥

१ चिकटून. २ प्रकाश. ३ नीळ–कमळांची माळ. ४ घातलेली. ५ वल्कलें. ६ चंद्र. ७ ससाणा.

जाणति जाणोतचि ते स्वामी । सगुण अगुण मनिं; अंतर्यामी ।
जे कोसलपति; राजिव-नयन । करोत ते मम; हृदयीं अयंन ॥१०॥
चुकुनि सुटो ना; हा अभिमान । मी सेवक; रघुपति यजमान ।
ऐकुनि मुनि-वच; प्रभुमनिं रुचलें । हर्षं पुन्हां; हृदयिं मुनि धरिलें ॥११॥
अती प्रसन्न; जाण मुनि मजला । मागसि तो वर; देइन तुजला ।
मुनी म्हणे; केलि न वर याञ्चा । समजेना मज; मृषा किं साचा ॥१२॥
तुम्हां ठीक; वाटे, रघुनायक । द्या तें मज; दासा सुखदायक ।
अविरल भक्ति; विरति विज्ञान । होशि सकल गुण;-ज्ञान-निधान ॥१३॥
प्रभुनीं जो वर दिला, पावला । आतां द्या जो, मला भावला ॥१४॥

दो०— साहित अनुज जानकी प्रभू; चाप-बाण-धर राम ।
हृदय-नभीं मम इंदु इव; वसा सदा निष्काम ॥ ११ ॥

एवमस्तु; म्हणुनी हृद्वासी, । हर्षे जाति, घटज-ऋषिपासी ।
बहुत दिवस गुरु; दृष्टि न पडले । या आश्रमिं दिन; कितेक गेले ॥ १ ॥
प्रभूसवें गुरु;-पाशीं येतो । यांत प्रभू; उपकार नसे तो ।
वघुनि कृपानिधि; मुनि-चतुराई । सवें घेति; हसुनी युग भाई ॥ २ ॥
पथीं वदत निज;-भक्ति अनूप । मुनि-आश्रमिं; आले सुरभूप ।
त्वरित सुतीक्ष्ण गुरूप्रति गेले । प्रणाम करुनी; वदूं लागले ॥ ३ ॥
नाथ ! कोसलाधीश कुमार । आले; भेटी जगदाधार ।
लक्ष्मण सहित राम वैदेही । निशि दिनिं; जपतां प्रभु ज्यांतेंही ॥४॥
अगस्ति ऐकुनि; उठुनि धावले । राम वघुनि; लोचनिं जल भरलें ।
मुनिं-पद्-कमलिं; पडति युगभाई । प्रेमें अति, ऋषिहृदयीं घेई ॥ ५ ॥
सादर कुशल पुसे मुनि ज्ञानी । शुभासनीं; वसवी आणोनी ।
केली मग; नाना-विध पूजा । मजसम भाग्यवंत नच दूजा ॥६॥
जे होते; दुसरे मुनि—वृंद । ते हर्षित; वघुनी सुख-कंद ॥७॥

दो०— मुनि मण्डलांत प्रभु वसती; सर्व जनांस समोर ।
शारद-इन्दु-तनु पाहती; जाणों निकर चकोर ॥१२॥

मग रघुवीर म्हणति मुनि पाही । अल्पहि गुप्त, तुम्हांसी नाहीं ।
कारण मम, येण्यासि जाणतां । म्हणुनि न वदतों; मी मुनि-नाथा ॥१॥
मंत्र मला, असला सांगाही । जेणें वधूं; सकल मुनि—द्रोही ।
सस्मित मुनि; ऐकुनिया वाणी । पुसा नाथ हें; काय जाणुनी ! ॥ २ ॥

---

१ स्थान, निवास

भजन प्रतापें, तुझ्या अघारी । महिमा विदित, अल्प, नच सारी ।
औदुंबर-तरु; विशाल माया । अनंत ब्रह्मांडेंचि फळें या ॥ ३ ॥
जीव चराचर, जंतु समान । आंत वसति, ना जाणति आन ।
तयां भक्षिता कठिण कराल ।-तुझ्या भयें, डरतो तो काळ ॥ ४॥
ते तुम्हि सकल-लोकपति स्वामी । नर-सम पुसतां; मजला नामी ! ।
हा वर मागूं; कृपानिकेत । हृदयिं वसा श्री-अनुज-समेत ॥ ५॥
अविरल-भक्ति, विरति सत्संग । चरण-सरोजीं, प्रीति अभंग ।
यद्यपि ब्रह्म, अखंड अनंत । अनुभव-गम्य; भजति ज्या संत ॥६॥
असें रूप तव; वर्णू जाणूं । सगुणरूपिं तव परि रति मानूं ।
संतत देतां; जनां महत्ता । म्हणुनी मजः पुसतां रघुनाथा ॥ ७ ॥
हे प्रभु ! परम मनोहर ठाव । पावन पंचवटी त्या नांव ।
पुनीत दंडक-वना करावें ।मुनिवर-शापाः उग्र हरावें ॥ ८ ॥
तिथें रघुवराः वस्ति करावी । दया-दृष्टिः मुनि-वरिं ठेवावी ।
मुनि-आज्ञेनें: राम निघाले । निकट पंचवटि; सत्वर आले ॥ ९ ॥

दो०— झाली भेट जटायुची; त्यावरि प्रेम करून ।
समीप गोदावरी प्रभू; राहति कुटी रचून ॥ १३ ॥

तिथें प्रभूचा झाला वास । मुनींस बहु सुख; गेला त्रास ।
गिरि-वन-सर-सरिता छवि-पूर्ण । अनुदिन दिसती; अधिक सुशोभन ॥१॥
खगमृग-वृंद; अनंदित वसती । मधुप मधुर मृदुः मंजु गुंजती ।
वर्णु शकेना; वन अहि-राजा । जिथें प्रगट; वसतां रघुराजा ॥ २ ॥
प्रभु एकदा; सुखें आसीन । लक्ष्मण वदले. वच छलहीन ।
सुर,-नर,-मुनि-सचराचर-स्वामी । प्रभु ! दासा सम, पुसतो हा मी ॥ ३ ॥
मज समजावुनि; सांगा देवा । सोडुनि सर्व; करिन पद-सेवा ।
सांगा मायाः ज्ञान, विरक्ती । जिनें द्रवित. होतां, तो भक्ती ॥ ४ ॥

दो०— ईश्वर जीवां भेद प्रभू ! करा निरूपण सांग ।
जेणें होइल चरणिं रती; जाइ शोक भ्रम राग ॥ १४ ॥

थोड्यांतचि; सांगतो वर्णुनी । ऐक तात ! मन. चित्त लावुनी ।
'मी माझें:' 'तूं तुमचें' माया । वश जी करिते; जीव-निकाया ॥१॥
गो-गोचर, जोंवरि मन जाई । माया जाणः सर्व ती भाई ।
तिचे भेद; वदतों, ते कोण । विद्या आणिः अविद्या दोन ॥ २ ॥
एक दुष्ट; अतिशय दुखरूपी । जी-वश, जीव पडे भवकूपीं ।
एक रची जग; गुण वश जीला । प्रभु-आधीन; न निज-बल तीला ॥३॥

ज्ञान, जिथें मानादिक नाहीं। ब्रह्म समान, सर्व जगिं पाही।
तात समज, तो परम विरागी। तृणसम सिद्धि, तीन गुण त्यागी ॥४॥
दो०— माये ईशा आपणा, जो नेणे तो जीव।
बंध-मोक्ष-कर सर्व-पर, माया-प्रेरक शीव ॥ १५ ॥
विरंति-द[1] धर्म, योग तो ज्ञानद। वेद वदे कीं ज्ञान मोक्ष-प्रद।
जेणें मी, द्रवतो बहु भाई। ती मम भक्ति; भक्त-सुखदाई ॥ १ ॥
ती स्वतंत्र, अवलंब न आन। ती-आधीन, ज्ञान विज्ञान।
भक्ति तात, अनुपम-सुखमूल। मिळते संत यदा अनुकूल ॥२॥
भक्तिसाधनां; सांगुं वर्णुनी। सुगम-पथें मज, पावे प्राणी।
प्रथम हि विप्र-चरणिं कीं प्रीती। निज-निज-कर्म-रती श्रुति रीतीं ॥३॥
यात्रें फळ तें; विषय-विराग। मग मम धर्मिं; होइ अनुराग।
श्रवणादिक नव; भक्ति दृढावति। मम लीलारति; मनिं अति,पावति ॥४॥
संत-चरण-पंकजिं तें प्रेमा। तनु-मन-वाणिं भजति दृढ नेमां।
गुरु, पितृ-बंधु, जननि, पति देवां। मलाचि मानुनि; करि दृढ सेवा ॥५॥
पुलके मम गुण;-गानिं शरीर। गद्‌गद गिरा; नयनिं बहु नीर।
कामादिक मद; दंभ न ज्यासी। तात निरंतर; वश मी त्यासी ॥ ६ ॥
दो०— तनु मन वचनें मीच गती, भजन करिति निष्काम।
त्यांचे हृदयीं नित्य तरी; करितों मी विश्राम ॥ १६ ॥
इति श्री अरण्यकाण्डे सुतीक्ष्ण-प्रेमादि-रामगीता-वर्णनं
द्वितीयोऽध्यायः ॥

अध्याय ३ रा

भक्तियोग, ऐकुनि सुख पावे। प्रभु-चरणीं शिर; ठेवी भावें।
कांहीं दिन; गेले या रीतीं। ज्ञान विरति, वदतां गुण नीती ॥ १ ॥
शूर्पणखा जी; दशमुख-भगिनी। दुष्ट हृदयः दारुण जशि अहिनी[2]।
पंचवटीस; एकदां आली। बघुनि कुमारां; व्याकुळ झाली ॥ २ ॥
भ्राता पिता; पुत्र उरगारी ! । पुरुष मनोहर; बघतां नारी।
होति विकल, मन; अवरुं न शकती। जसे बघुनि रवि; रविमणि द्रवती ॥३॥

१ वैराग्य देणारा. २ नागीण.

रुचिर रूप, प्रभुपासी आली । हसत हसत ती; तदा म्हणाली ।
पुरुष तुम्हांसम, मजसम नारी । संयोगा रचि, विधी विचारी[१] ॥ ४ ॥
मम अनुरूप; पुरुष जगिं कांहीं । त्रिलोक शोधुन; बघतां नाहीं ।
म्हणुनि कुमारी; असें अजवरि । बघुनि तुम्हां; सुख गमे जरा तरि ॥५॥
सीते बघुनि; वदे प्रभु बाई ! । कुमार आहे; मम लघु भाई ।
जातां; जाणे[२] 'रावण भगिनी' । प्रभुसि बघुनि; वदले मृदुवाणी ॥६॥
सुंदरि बघ मीं, यांचा दास । पराधीन तव; योग्य न खास ।
प्रभु समर्थ; कोसल-पुर राजे । जें करिती तें; सर्वहि साजे ॥ ७ ॥
सेवक सुख; सन्मान भिकारी । व्यसनी धन; शुभगति व्यभिचारी ।
लोभी यश; यश चारें,[३]हि मानी[४] । नभा दुहुनि पय; वांछिति प्राणी ॥ ८ ॥
रामनिकट ती; पुनरपि गेली । लक्ष्मण-संनिध; त्यांनि धाडिली ।
लक्ष्मण म्हणे; वरिल तुज तोही । तृणवत लज्जा; त्यागिल जोही ॥९॥
रामनिकट; संतप्तचि गेली । रूप भयंकर; धरिती झाली ।
सीता सभय; दिसलि रघुराया । केली खूण; सुमित्रा-तनया ॥ १० ॥

दो०— लक्ष्मण लाघव करुनि अती; कापी नासा कान ।
तिचे करीं रावणा जणूं, दिलें बघा आव्हान ॥ १७ ॥

नाक-कान-विण दिसे कराला । गैरिकें-धार[५] स्रवे जणुं शैला ।
दूर्ष-खर-दूषण, व्याकुळ वळली । धिग् धिक् पौरुष, बल तव वदली ॥१॥
पुसतां सर्व; निवेदन केलें । तदा राक्षसें; सैन्य जमविलें ।
धावति निशिचर;-निकर वरूथ । सपक्ष जणुं; कज्जलगिरि यूथ ॥ २ ॥
नाना वाहन; नानाकार । नानायुधधर; घोर अपार ।
पुढें दलाच्या[७] जाइ एकटी । अशुभरूप श्रुति-विहीन नकटी ॥ ३ ॥
अशकुन अमित; होति भयकारी । गणिति न, मृत्युविवश ते भारी ।
गर्जति तर्जति; गगनीं उडती । बघुनि कटक; भट[८] अती हर्षती ॥४॥
म्हणती "उभयां, जीत धरावें । धरुनि, मारुनी स्त्रीस हरावें" ।
धूलीमय नभ-मंडळ झालें । बोलावुनि, प्रभु; अनुजा वदले ॥ ५ ॥
घेउनि सीते, जा गिरिकंदर । आले निशिचर;—कटक भयंकर ।
सावध रहा;' ऐकुनी वाणी । गेले श्रीसह; शर-धनु-पाणी ॥ ६ ॥
राम बघति बहु; रिपु-दल आलें । हसुनि कठिण कोदंड चढविलें ॥ ७ ॥

१ विचारवंत. २ लक्ष्मण म्हणाले. ३ दूत, हेर. ५ गेरूची धार. ६ समीप.
६ लक्ष्मणाने ओळखलें. ४ अभिमानी. ७ सैन्याच्या. ८ खर, दूषण.

छं०— कोदंड चढवुनि, बांधितां शिरिं जूट[१]-शोभति हरि कसे।
कीं नीलगिरिवरि लढति दामिनि-कोटि-द्युति युग भुजगसे ॥
कटिं कसुनि तूण; विशाल निजकरिं; चापबाणां धरुनियां।
बघती जणूं मृगराज प्रभु, गजराज-वृंद वधावया ॥ १ ॥
सो०— आले त्वरा करून; धरा धरा धावत सुभट।
यथा एक पाहून, बाल रविसि घेरिति दनुज ॥ १८ ॥
राम बघुनि, शर, सोडुं न शकती। रजनीचर-भट; चकितचि होती।
सचिवांनां; वदले खर दूषण। हे कुणि, नृपबालक नर-भूषण ॥ १ ॥
नाग, असुर, सुर, नर, मुनि, जितुके। दृष्ट[२], विजित[३] बहुहत[४] वा कितुके।
एका जन्मामधेंहि कांहीं। नाहिं पाहिली, सुंदरता ही ॥ २ ॥
यद्यपि भगिनी, केलि कुरूप। नहि वधलायक, रूप अमूप!।
"गुप्त ठेविल्या; नारिस द्यावें। सजीव मग निजभुवना जावें" ॥ ३ ॥
माझें वचन, तयां सांगावें। उत्तर घेउनि; सत्वर यावें।
दूत येउनी; प्रभुला वदले। एकुनि, सस्मित; राम म्हणाले ॥ ४ ॥
क्षात्रिय अम्हि, मृगया वनि करतों। खल-मृग, तुजसम, शोधित फिरतों।
रिपु बलवंत; बघुनि ना डरतों। काळाशीही; करूं समर तो ॥ ५ ॥
यद्यपि मनुज, दनुजकुल-क्षालक। मुनिपालक, खलशालक[५] बालक।
बळ न होय तरि; घरासि जानां। समरविमुख, अम्हिः वधूं न जाणां ॥६॥
रणीं येउनीः कपट-चतुरता। रिपुवरि कृपा, परम कातरता!।
दूत जाउनीः सर्वहि वदले। एकुनि खर, दूषण, मनिं जळले ॥७॥
छंद०— मनिं जळत वदतीः धरा! धावतिः विकटभट निशिचर तदा।
शर-चाप-तोमर,-शक्तिशूल,-कृपाण-परशू-धर-गदा ॥
अति थोर धनु, टंकार करि प्रभु, प्रथम घोर भयं-कर।
किति बधिर व्याकुळ, यातुधानः न,ज्ञान राहे तिळभर ॥१॥
दो०— सावधान मग धावले; बघुनि सबल आराति।
वर्षु लागले प्रभूवरी; अस्त्र शस्त्र बहु जाति ॥ १९ (क) ॥
दो०— त्यांचि आयुधें तिलासमः करुनि टाकि रघुवीर।
ओढुनि चापा कर्णवरी मग सोडिति निज तीर ॥ १९ (ख) ॥

१ जटाजूट, २ पाहिले, ३ जिंकले, ४ मारले, ५ दुष्ट-विनाश करणारे. ६ भ्याडपणा. ७ राक्षस. ८ शत्रु.

छं०— मग सुटति; बाण कराल । फुं-करिति; जणुं बहु व्याल ।
संक्रुद्ध; समरीं राम । शर जाति, निशित निकाम ॥१॥
पाहोनि खरतर तीर । पळ काढि, निशिचर वीर ।
मग वदति ते कोपून । "जो जाइ समरिं पळून ॥ २ ॥
त्या मारुं, या निज पाणि" । सोडिति तनूवरि पाणि ।
आयुध, अनेक प्रकार । सन्मुखचि, करिति प्रहार ॥ ३ ॥
रिपु परम कुपित बघून । प्रभु धनुषिं, शर लावून ।
सोडी, विपुल नाराच । छेदीति, विकट पिशाच ॥ ४ ॥
कर पाद, उर भुज शीस । पडुं लागली धरणीस ।
चिक्कू करति, बसतां बाण । धड पडति कुधंर समान ॥ ५ ॥
तनु तुटति; भट शतखंड । करिती उठुनि पाषंड ।
नभिं उडति,बहु भुज मुंड । विगमौलि; धावति रुंड ॥ ६ ॥
खग; कंक काक शृगाल । कट-कटति कठिन कराल ॥ ७ ॥

छं०— कट कटति जंबुक, भूतप्रेत, पिशाच खर्पर सांचती ।
वेताल-वीर, कपाल-ताल;-धरुनि योगिणि नाचती ॥
रघुवीर बाणहि चंड खंडिति; वीर-उर-भुज,-बहु शिरां ।
धड, पडति जेथें,तेथ उठुनी; लढति; धर धर भय-गिरा ॥१॥

छं— अंत्रांसि घेउनि, उडति गीध, पिशाच कर ही पळविती ।
संग्राम-पुर-वासी जणूं बहु, शिशु पतंगां उडविती ॥
मारूनि पडले; वक्ष फुटलें; विपुलभट कण्हती खरे ।
पाहोनि निजदल, विकल; भट त्रिशिरादि खरदूषण फिरे ॥२॥
शरशक्ति तोमर, परशु शूल, कृपाण वेळे एक तीं ।
सक्रोध ते, रामावरी, बहु दुष्ट निशिचर फेकती ॥
प्रभु एक निमिषें शर निवारुनि; सोडि अगणित सायकां ।
उरिं विशिख दश दश,राम मारी, सकल निशिचर-नायकां ॥३॥
महिं पडति, उठुनी लढति, मरति न; करिति माया अति घनीं ।
सुर सभय; चौदा असुर दशशत; एकची कोसल-धनी ॥
मुनि सभय सुर प्रभु बघुनि, माया,-नाथ कौतुक करितसे ।
समजुनि परस्पर, राम, करुनी; समर, रिपुदल मरतसे ॥४॥

१ पर्वत. २ मस्तकहीन. ३ कपाल. ४ आंतडीं. ५ बाण. ६ सहस्र.

दो०— राम राम म्हणतां मरती; पावति पद निर्वाण ।
उपाय करुनी वधिति रिपू; क्षणमार्धि कृपानिधान ॥ २०(क)॥
हर्षित वर्षति सुमन सुर; वाजति गर्गनिं निशाण ।
स्तुती करुनि सब जाति मग; बसुनी दिव्य विमान ॥ २० (ख)
इति श्री अरण्य काण्डे शूर्पणखागमनादि खरदूषण-
युद्धवर्णनं नाम तृतीयोऽध्यायः ॥

अध्याय ४ था

रामें समरीं, रिपू मारिले । सुर-नर-मुनिभय, महा वारिले ।
लक्ष्मण, सीते घेउनि आले । पदीं लागतां; हृदयीं धरिलें ॥ १ ॥
सीता, बंधे; श्याम मृदु कान्ता ।-प्रेमें परमः न नयनिं तृप्तता ।
पंचवटीं; वसुनी रघुनायक । करिति चरित, सुर;-मुनि-सुखदायक ॥२॥
खर-दूषण-धुव्वाचि उडविला । रावण जाउनिः तिनें चिडविला ।
क्रोधें अति बोले वचनासी । देश कोशः शुद्धी भुल्लासी ॥ ३ ॥
पान करुनि; निजसी दिनराती । शुद्धि नाहिं तव शिरिं आराती ।
राज्य नीति-विण; धन धर्माविण । सत्कर्महि जें नहि रामार्पण ॥ ४ ॥
विवेकविण जें विद्या शिकणें । श्रम फळ, पढणें, करणें, मिळणें ।
संगें यती; कुमंत्रें राजा; । मानें ज्ञान; हि पानें लज्जा ॥ ५ ॥
प्रीति प्रणयविण; मदें गुणाढ्य; । मत्वर नाश, नीति-प्रतिपाद्य ॥ ६ ॥
सो०— रिपु, रुज, पावक पाप; प्रभु अहि म्हणां न सान तरि ।
वदुनी, विविध विलाप; करुनी बहु रोदना करि ॥ २१ (क)
दो०— सभ माजि व्याकुळ पडुनी; वदे करुनि दुःखास ।
तूं असतां दशकंधरा, माझी हा गति खास ! ॥ २१ (ख)
सकल सभासद, व्याकुळ उठले । शान्तवुनी तिज, धरुनि उठविलें ।
रावण म्हणे, ' काय वद घडलें । नाक कान तव; कोणि कापले ' ॥ १ ॥
कोसलपति-दशरथ-सुत राया ! । पुरुष-सिंह वनिं; करिती मृगया ।
मला समजली; त्यांची करणी । रहित निशाचर, करिती धरणी ॥ २ ॥

१ दारू पिऊन. २ शूर्पणखेने.

ज्यांच्या बाहुबळें चि दशानन। मुनिगण निर्भय; विचरति कानन।
बघतां बालक; कालवि मानां। परम धीर; धन्वी गुण नाना ॥ ३ ॥
अतुल-प्रताप;—तेज, ते भ्राते। खलवधरत, सुर-मुनि-सुख-दाते।
शोभाधाम; राम ज्या नाम। संगें श्यामा; नारि-ललाम ॥ ४ ॥
रूपराशि विधि; बनवी बाला। रति-शत-कोटी; वरी ओवाळा।
त्याचा अनुजचि; कापी नासा। बघुनि भगिनि तव; करि उपहासा ॥५॥
खर-दूषण, साह्यास धावले। क्षणांत सकैलहि कटक मारिलें।
खरदूषण,-त्रिशिरांचा घात। ऐकुनि रावण जळे मनांत ॥ ६ ॥

दो०— शूर्पणखे समजावुनी, प्रौढी मिरवुनि फार।
जाइ सदनिं चिंतावश; झोंप नये तिळभार ॥ २२ ॥

सुर, नर, असुर नाग खग पाहीं। मम अनुचरसम; कोणी नाहीं।
खर दूषण मज-सम बलवन्त। कोण मारि त्यां; विण भगवन्त ॥ १ ॥
सुर-रंजन; भंजन-महिभारा। जरि भगवंत; धरी अवतारा।
बळें जाउनी; वैर करीनचि। प्राण त्यजुनि प्रभुशरें, तरेनचि ॥ २ ॥
भजन न होई, तामस देहें। तनुमन—वचनें, निश्चित तरि हें।
जरि नररूप; भूपसुत कोणी। नारि हरिन, रणिं; जिंकुनि दोनी ॥३॥
एकटाचि रथिं; जाई तेथें। मारिच, सागर;-तीरीं जेथें।
इकडे राम; युक्ति मग करिती। ऐक उमे अति; रम्य कथा ती ॥४॥

दो०— लक्ष्मण गेले वनी जंव, घेण्या फळमूळ कंद
जनक सुतेसी, वदति तंव; हसुनि कृपा-सुख-वृंद ॥ २३ ॥

पतिव्रता तूं; रुचिर सुशीला। कांहीं करूं; ललित नर-लीला।
पावकांत तूं; करी निवासा। जोंवरि करूं; निशाचर-नाशा ॥ १ ॥
रामें कथा; यदा सव कथिली। प्रभुपद मनिं धरि; अनलिं राहिली।
राखी निज प्रति-बिंबा-सीता। तैशी शील; रूप सुविनीता ॥ २ ॥
लक्ष्मण ही, हें मर्म न जाणे। जें कांहीं, रचिलें रामानें।
दशमुख येइ; जिथें मारीच। मस्तक नमी; स्वार्थ-रत नीच ॥ ३ ॥
नीच नमन दुखदाई फार। सम उरगांकुश, धनु, मार्जार।
भयदायक; दुर्जन-मृदु वाणी। अकाळ-कुसुमें जशीं भवानी ॥ ४ ॥

दो०— करि पूजा मारीच मग; सादर विचारि मात।
कवण हेतु मन व्यग्र अती; एकट आलां तात ॥ २४ ॥

सकल कथा त्या, दशमुख सांगे । अति अभिमानी; बहुत अभाग्यें ।
तुम्हीं कपट-मृग; व्हा छलकारी । जेणें आणुं; हरुनि नृप-नारी ॥ १ ॥
तो मग म्हणे; ऐक दशशीस । ते नररूपः चराचर-ईश ।
त्यांसीं तात ! न; वैर करावें । मारि मरावें; जगवि जगावें ॥ २ ॥
गेले मख;-रक्षणा कुमार । फल-विण शर मज; मारिति मार ।
क्षणि शतयोजन; आलों पाहीं । त्यांशीं वैर, बरें कधि नाहीं ॥ ३ ॥
कीट-भृंगसम; मग गतिः मातें । जिथें तिथें; दिसती ते भ्राते ।
जरी नर तरी; सुवीर भाई । त्यांशी सफलः विरोध न होई ॥ ४ ॥

दो०— सुभुज ताडका मारुनी; खंडी हर-धनु आढय ।
खर दूषण त्रिशिरा वधिले, मनुज किं असे बलाढ्य ? ॥२५॥

जा भुवनीं कुल-कुशल विचारी । ऐकुनि जळे गाळि दे भारी॥
गुरु जणुं, मूढ करिसि मज बोधा । सांग कवण जगिं, मजसम योधा ॥ १ ॥
करि मारीच हृदयिं अनुमान । नवा-विरोधं[२]; नहि कल्याण॥
शस्त्री, मर्मी, प्रभु, शठ, धनी । भिषज[३] वंदि[४] कवि, पाचक[५] गुणी ॥२॥
दोन्हींकडे; बधे निज मरणा । चिंत्तिं शरण मग, श्री-प्रभुचरण
उत्तर देतां, मारिल दुर्जन । कां न मरूं, रघुपति शर लागुन ॥३॥
चिंतुनि मनीं; दशानन-संगा । -जाइ; रामपदिं; प्रीति अभंगा ।
अती प्रेम; मनिं दावि न त्यासी । पाहिन आज, परम स्नेह्यासी ४॥ ।

छं०— निज परम प्रियतम; बघुनि लोचन; सुफल,सुख पावेन मी ।
श्री सहित लक्ष्मण-रामसुखकर;-चरण मनिं ठवीन मी ॥
निर्वाण दायक, कोप ज्याचा; भक्ति ज्यासचि वश करी ।
निज हातिं शर मज;मारुनी प्रभु;वधिल सुख-सागर हरी ॥१॥

दो०— मज मागें प्रभु धावती, धरुनि शरासन बाण ।
पुनःपुन्हां त्यां बघेन मी; धन्य न मज सम आन ॥ २६ ॥

त्या वन-निकट; दशानन गेला । तंव मारीच; कपट-मृग झाला ।
विचित्र अति, नच जाइ वर्णिला । कनक-कांय,मणि,-खचित बनविला॥१॥
परम रुचिर मृग, सीता पाहे । अंग अंग, चेतोहर आहे ।
'ऐका कृपालु; देवा ! रघुवर । चर्म मृगाचें; या अति सुंदर ॥ २ ॥

---

१ सुबाहु. २ नऊ जणांच्या विरोधानें. ३ वैद्य. ४ भाट. ५ कुशल स्वयंपाकी. ६ देह.

सत्य-संध; मारुनि यातें ही। आणा चर्म'—म्हणे वैदेही।
तंव रघुपति, जाणुनि सब कारण। उठति मुदें, सुर-दुःख-निवारण ॥३॥
मृगा बघुनि; कटि परिकर बांधी। कर-तळिं चाप; रुचिर शर साधी।
प्रभू लक्ष्मणा तदा सांगती। विपिनिं,निशाचर, अनेक फिरती ॥४॥
सीतेची बहु; रक्षा करणें। विवेक, मति, बल, समयिं योजणें।
राम बघुनि मृग जाइ पळोनी। राम धावती, चाप चढवुनी ॥५॥
निगम नेति, शिव अंत न पावे। माया—मृग—मागें तो धावे।
कधीं निकट कधिं; सुदूर पळतो। कधीं प्रकट,कधिं;लपतो खळ तो ॥६॥
प्रगटत, लपत, करत, छल भूरी। घेउनि गेला; प्रभूसि दूरीं।
लक्षुनि राम; कठिन शर मारी। करुनि घोर रव; पडे भूवरी ॥७॥
'हा लक्ष्मणा'; प्रथम घे नामा। मनांत मग निज; स्मरला रामा।
प्राण त्यजत; प्रगटी निज देहा। स्मरुनी रामा; समेत स्नेहा ॥८॥
त्याचें आंतर-प्रेम जाणुनी। मुनि-दुर्लभ-गति; दिली प्रभूनीं ॥९॥

दो०— विपुल सुमन सुर वर्षती; गाती प्रभुगुण-गाथ।
निज-पद असुरा दिले किती; दीनबंधु रघुनाथ ! ॥ २७ ॥

खळा वधुनि; फिरले रघुवीर। शोभे धनु करिं; कटिं तूणीर।
आर्त गिरा जैं ऐके सीता। लक्ष्मणासि, वदली अति भीता ॥ १ ॥
जा सत्वर; संकट अति ताता !। लक्ष्मण हसुनि; म्हणे श्रुणु माता।
भृकुटि-विलासें; लयादि करिती। ते स्वप्नीं कधिं;संकटिं पडती ? ॥ २ ॥
मर्म वचन जैं; सीता बोले। प्रभु-इच्छें; लक्ष्मण-मति डोले।
वन-दिग्देवां; तिज सोपविलें[1]। रावण-शशि-राहु-प्रति गेले ॥ ३ ॥
शून्य, संधि; दशकंधर पाहे। यति-वेषें; सन्निध येताहे।
जया भयें हि सुरासुर डरती। निशिं न झोप दिनिं अन्न न खाती ॥४॥
दशमुख तो श्वानासम भुरटा। जाई शंकित, जसा भामटा।
कुपथीं पद; देतांचि खगेश !। राहि न तेज; बुद्धि बल लेश ॥ ५ ॥
सांगे नाना; कथा सुशोभन। राजनीति, भय; दावि प्रलोभन।
सीता वदे; तुम्हीं यति असतां। वचनें दुर्जन-समान वदतां ॥ ६ ॥
रावण मग निज; रूप दाखवी। सभय होइ, जैं नाम ऐकवी।
वदली धरुनि; धीर अतिगाढा। थांब ! प्रभू, आले खल मूढा ॥
क्षुद्र शशक; वांछी हरि[2]-वधुसी। निशिचर-पते ! कालवश होसी
वचन ऐकुनी, सकोप झाला। पद वंदुनि मनिं; सौख्य पावला ॥८॥

१ रक्षण. २ सिंहाची स्त्री, सिंहीण.

दो० — क्रोधवंत तो दशानन, रथीं उचलुनी घेइ ।
निघे सभय नभिं, उतावीळ; रथ न हाकिला जाइ ॥ २८ ॥

हा ! जगिं एक; वीर रघुराया । कवण्या दोषें; विसरां सदया ! ।
संकट-हरण, शरणसुखदायक । हा ! रघुकुल-सरोज-दिननायक ॥१॥
हा ! लक्ष्मण नव; नाहीं दोष । आलें फळ, जो; केला रोष ।
विविध विलापां करि वैदेही । भूरि--कृपा--प्रभु; दूरीं स्नेही ॥ २ ॥
कोण विपत्ती प्रभुसि सांगतो । पुरोडाश[१] हा रासभ खातो ।
सीता-विलापः ऐकुनि भारी । तिथें चराचर; दुःखित सारीं ॥ ३ ॥
जटायु ऐकुनि; विलाप-वाणी । रघुकुल-तिलक;-नारि जाणोनी— ।
—अधम निशाचर; घेउनि जातो । कपिला गाय; यवन जणुं नेतो ॥ ४ ॥
सीते पुत्रि ! नको करूं चिंता । मी करितों वध; निशिचर-घाता ।
क्रोधवंत खग, धावे कैसा । वज्रपात, शैलावरि जैसा ॥ ५ ॥
रे ! रे ! दुष्टा; कां न थांबसी । जासी निर्भय, मज न जाणसी ।
येतां बघुनि; कृतांत-समान । फिरुनि दशानन करि अनुमान ॥६॥
कीं मैनाक किं खगपति हा ही । मम बल जाणे, पतिसह तोही ।
जाणुनि म्हणे; जटायू ना हा ? । मम कर-तीर्थीं; सोडिल देहा ॥ ७ ॥
गृध्र ऐकुनी; सकोप धावे । दशानना ! वदनों; ऐकावें ।
जानकि त्यजुनि, कुशल जा पाहूं । ना तरि असें, होय बहु बाहू[२] ! ॥ ८ ॥
रामरोष, अति; दुर्धर पावक । शलभ सकलकुल; होइल तावक ।
देइ न उत्तर, रावण योधा । धांवे गृध्र, करुनि अति क्रोधा ॥९॥
धरि कच[४],विरथ करी,महिं पडला । सीते ठेउनि; जटायु फिरला ।
चोंच मारुनीः देह विदारी । मूर्छित घटिका; एक सुरारी[५] ॥ १० ॥
क्रोधें रावण; अतीव चिडला । काढी परम; घोर खड्गाला ।
छेदी पंख, पडे खग, धरणीं । स्मरे राम करि अद्भुत करणी ॥११॥
पुन्हां रथावरि; ठेवुनि सीते । निघे उतावीळ, बहु भय त्यांतें ।
करित विलाप; जाइ नभिं सीता । व्याध-विवश जणुं;मृगी सुभीता ॥१२॥
गिरिवरि बसले; कपी पाहिले । हरि ! हरि ! म्हणुनी; वस्त्र टाकिलें ।
असा, जानकिस घेउनि गेला । अशोक-वनिकें; ठेवी तिजला ॥१३॥

दो०— हरला तो खळ, बहु विधा; प्रीती भय दावून ।
अशोक-वृक्षा-खालिं मग; ठेवी यत्न करून ॥ २९ (क) ॥

१ इष्टीचे वेळचा एक हविर्भाग. २ तुझे. ४ केश. ५ रावणाला.

इति श्री अरण्य-काण्डे सीताया अग्निप्रवेशादि सीताहरणंनाम
चतुर्थोऽध्याय :॥ नवाह पारायणे षष्ठो विश्रामः॥

अध्याय ५ वा

दो०— कपट-कुरंगा-पाठिं जसें; धावत गेले राम।
स्वरूप सीता ठेवि मनीं; जपत असे प्रभुनाम॥ २९ (ख)॥

रघुपति अनुजा; येत पाहुनी। विशेष चिंता बाह्य दावुनी।
एकलि सोडुनि; वनांत सीता। मोडुनि आज्ञा; अलासि ताता॥ १॥
निशिचर निकर, फिरति वनिं पाहीं। मम मत, आश्रमिं सीता नाहीं।
अनुज धरुनि पद; मग कर जोडी। म्हणे नाथ, माझी नच खोडी॥ २॥
प्रभु गेले अनुजासह तेथें। गोदावरि-तटिं; आश्रम जेथें।
आश्रम बघुनि; जानकी-हीन। विकल बने; प्राकृत-सम दीन॥३॥
हा! गुण-खाणि; जानकी सीते। रूप-शील—व्रत,—नेम—पुनीते।
लक्ष्मण समजावी, बहु रीतीं। लता तरूंसि; विचारित जाती॥ ४॥
हे खग मृग हे; मधुकर-गण हो। दिसली सीता मृग-नयनी हो?।
खंजन[1], शुक, कपोत, मृग मीन। मधुप-निकर, कोकिला प्रवीण॥ ५॥
कुंद-कळी, दाडिंब दामिनी। कमल, शरद-शशि, भुजग-भामिनी।
वरुण-पाश, मनोज, धनु, हंस। गज, हरि, निज, ऐकती प्रशंस[2]॥ ६॥
श्रीफल[3], हाटक कदलि हर्षती। शंका, लाज, न; अल्पहि धरिती।
जानकि ऐक, तुझ्याविण आज। मुदित सकल जणुं, मिळे स्वराज्य॥७॥
स्पर्धा सोसे, कशी तुला ही। प्रिये आशु[4] कां; प्रगटत नाहीं।
ऐसा शोधी, विलपे स्वामी। जसे महा, विरही अति कामी॥ ८॥
राम, अवाप्त;-काम सुखराशी। मनुज-चरित करि; अज अविनाशी।
पडला पुढें, 'गृध्रपति दिसला। प्रभुपद-अंकां; स्मरत राहिला॥ ९॥

दो०— कर सरोज शिरिं ठेविती; कृपासिंधु रघुवीर।
बघुनि राम छवि-धाम-मुख; विसरे कष्ट सुधीर॥ ३

---

१ एक प्रकारचा लाल डोळयाचा पक्षी. २ प्रशंसा. ३ नारळ. ४ सत्वर.

गृध्र वदे धरुनी बहु धीरा । ऐक राम भव-भंजन वीरा ।
नाथ ! रावणें, ही गति केली । खळें जानकी; हरुनी नेली ॥ १ ॥
दक्षिण दिशेसि; घेउनि गेला । विलाप, टिटवी समान केला ।
दर्शनार्थ मी; ठेवीं प्राणां । जाउं पाहती; कृपानिधाना ॥ २ ॥
राम म्हणति, तनुः ठेवी ताता । हसुनी तो मग वदला वार्ता ।
ज्याचें नाम, मरत मुखि घेती । अधम हि मुक्त; हें।ति श्रुति वदती ॥३॥
ते मज लोचन;-गोचर असतां । देह ठेवण्या; हेतु कोणता ? ।
नेत्रिं भरुनि जळ; वदले श्रीपति । तुम्हीं स्वकर्मे; पावलाति गति ॥ ४ ॥
पर-हित वसतें; मनि ज्यांच्या ही । तयां कांहिं जगिं; दुर्लभ नाहीं ।
तात ! त्यजुनि तनु; जा मम धामा । काय देउं तुज, अवाप्त-कामा ॥ ५ ॥

दो०— सीता-हरणा, तात नच; वदसि पित्या जाऊन ।
राम जरी मी; दशानन; वदे सकुल येऊन ॥ ३१ ॥

गृध्र त्यजुनि तनु; धरि हरिरूपा । बहु भूषण, पट-पीत सुरूपा ।
श्याम शरीर, दीर्घभुज चारी । स्तुती करी; लोचनिं बहु वारी ॥ १ ॥

छं०— जय राम रूप, अरूप निर्गुण, सगुण गुण-प्रेरक किती ।
दशशीस-बाहु,-प्रचंड खंडन; चंडशर मंडन क्षिती ॥
पाथोद गात्र, सरोज-मुख; राजीव-आयत-लोचनं ।
नितें नौमि राम; कृपाल बाहु-विशाल भवभय मोचनम् ॥१॥
बलमप्रमेयमनादिमजमव्यक्तमेकमगोचरं ।
गोविंद, गोपर; द्वंद्व-हर, विज्ञानघन धरणीधरं ॥
जे राममंत्र, जपति संत; अनंत-जनमन रंजनं ।
नितें नौमि राम; अकाम-प्रिय, कामादि-खल-दल-गंजनं ॥ २ ॥
ज्या श्रुति निरंजन; ब्रह्म व्यापक; विरज, अज, वाखाणिती ।
बहु ध्यान ज्ञान; विराग योगें; नैक मुनि ज्या पावती ॥
ते प्रगट करुणा,-कंद शोभा,-वृंद अग जग मोहिती ।
मम हृदय-पंकज-भृंग अंगिं, अनंग-बहु-छवि शोभती ॥ ३ ॥
जे सुगम अगम, स्वभाव निर्मल; विषम सम शीतल सदा ।
बघती जया; योगी सुयत्नें करिति मन गो वश यदा ॥
तो राम, रामा-वास संतत दासवश त्रिभुवन धनी ।
मम वसतु हृदयीं; शमन संसृतिः कीर्ति ज्याची पावनी ॥४॥

१ नित्य.

दो०— मागुनि अविरल भक्ति वरा, गृध्र जाइ हरिधाम ।
त्याची क्रिया यथोचित; स्वकरें करिती राम ॥ ३२ ॥

कोमल मन अति; दीन-दयाळू । निर्हेतुक, रघुनाथ कृपाळू ।
गृध्र अधम खग; आमिष भोगी । दिली गती जी; याचिति योगी ॥१॥
एक उमे ! ते, लोक अभागी । त्यजुनी राम; विषय-अनुरागी ।
उभय पुन्हां मग; शोधिति सीता । सघन वनांतें; बघती जातां ॥ २ ॥
लता-विटप,-संकुल; घन कानन । बहु खग, मृग, वृक बहुपंचानन ।
पथि येतांचि, कबंधा वधिला । सकल शाप,-वार्ता तो वदला ॥ ३ ॥
दुर्वासें मज; दिधला शाप । प्रभु-पद बघतां; सरलें पाप ।
श्रुणु गंधर्वा; सांगु तुलाही । रुचे न मजला; द्विजकुल-द्रोही ॥४॥

दो०— त्यजुनि कपट तनु-वाणि-मनें, विप्रा जो सेवील ।
विधी, शंभु, मी, सकल सुर; त्यासी वश होतील ॥ ३३ ॥

शापिति नाडिति; परुष बोलती । विप्र पूज्य तरि; संत सांगती ।
ब्राह्मण पूज्य: शील-गुण-हीन । शूद्र न गुण-गण-विवेक-निपुण ॥१॥
समजावुनि निज-धर्म सांगती । तो मनि रुचला; बघुनी प्रीती ।
शिर नमुनी, रघुपति-पद-कमला । गेला नभिं; निज गती पावला ॥ २ ॥
रामें त्या, लावुनि निज-गतिला । शबरीचे; आश्रमिं पद दिधला ।
शबरी, बघुनि; राम गृहिं आले । मुनि वच स्मरुनि,मुदित मन झालें ॥३॥
सरसिज लोचन; बाहु विशाल । जटा मुकुट शिरिं; कंठीं माळ ।
श्याम गौर ती; जोडी दिसली । शबरीनें पदिं; मिठी घातली ॥४॥
प्रेम-मग्न, मुखिं; वचन न आलें । पदकमळीं शिर; कितिदां नमिलें ।
घेउनि जळ, पद सादर धुतले । रम्य आसनीं; मग बसवीले ॥ ५ ॥

दो०— कंद मूल फल सुरस अती; प्रभुला दे आणून ।
प्रेम सहित प्रभु खाति तीं; बहुविध वाखाणून ॥ ३४ ॥

इति श्री अरण्य काण्डे श्रीरामविलापादि शबरी मीलन-
वर्णनं नाम पंचमोऽध्यायः ॥

---

१ सिंह.

अध्याय ६ वा

कर जोडुनि मग, उभी राहिली । रूप बघुनि अतिः प्रीति वाढली ।
कशी स्तुती तव; करूं खरारी । अधम जानि मी; जडमति भारी ॥१॥
अधर्मी अधम; अधम अति नारी । त्यांतहि मी; मति मंद, अघारी ! ।
राम म्हणे श्रृणु; भामिनि, मातें । —विदित एक; भक्तीचें नातें ॥ २ ॥
जात, गोत, कुल: धर्म-महत्ता । धन, बल, परिजन; सुगुण चतुरता ।
भक्तिहीन नर; भासे कैसा । जळ-विण वारिद; दिसतो जैसा ॥३॥
नवधा भक्तीः सांगू तुजला । सावध ऐक धरी हृदयाला ।
प्रथम भक्ति, संतांचा संग । दुसरी, प्रिय ममः कथा-प्रसंग ॥४॥

दो०— गुरु-पद-पंकज-सेवन; तिसरी भक्ति, अमान ।
चौथि भक्ति मम गुण गणः त्यजुनि कपट करि गान ॥ ३५ ॥

जप मम मनुचा: दृढ विश्वासें । भक्ति पांचवीः वेद वदतसे ।
शम दम षष्ठ; विरति बहु कर्मी । निरत निरंतर; सज्जन-धर्मी ॥ १ ॥
सप्तम समः ममसय, जग बघणें । मजहुनि संत; विशेषचि गणणें ।
अष्टम यथा;-लाभ संतोष । स्वप्निंहि नहि; बघणें पर दोष ॥ २ ॥
नवम सरल; सर्वा, छलहीन । श्रद्धा मनि मम; हर्ष न दैन्य ।
नवांत एकहिः असे जयांसी । नारि पुरुष, चर-अचर कुणासी ॥३॥
अतिशय तो प्रिय भामिनि मजला । नवधा, भक्ति असे दृढ तुजला ।
योगि-वृंद-दुर्लभ-गति जी ही । तुजला आजः सुलभ अति तीही ॥४॥
मम दर्शन-फल; परम अमूप । पावे जीव सहज निजरूप ।
जनक-सुतेचा; शोध भामिनी । जाणसि नरि वद; कुंजर-गामिनि ॥५॥
पंपा-सरा; जाइ मा-कान्ता । तिथें होइः सुग्रीव मित्रता ।
सर्व; वदे तो प्रभु रघुवीरा । जाणुनि ही; पुसतां मतिधीरा ! ॥ ६ ॥
पुनः पुन्हां प्रभुः-पदिं शिर नमुनी । प्रेमें सकलहि; कथा सांगुनी ॥ ७ ॥

छं०— सब कथा सांगुनि; बघुनि हरिमुख; हृदयिं मुख पंकज शिरे ।
त्यजि योग-पावकिं; देह; हरिपदि लीन जेथुनि ना फिरे ॥
नर ! विविध कर्म: अधर्म बहुमतः शोक-दाई त्याग रे ।
विश्वास धरुनी, स्वामि प्रज्ञा ! ; रामपदिं अनुराग रे ॥ १ ॥

दो०— जाति-हीन अघ-जन्म-मही; मुक्त केलि अशि नारि ।
अशा प्रभुसि विसरूनि मनाः मंद बघासि सुख भारि ॥ ३६

१ मंत्राचा. २ पापांचे उत्पत्ति स्थान.

जाति रामः त्यागुनि वन तेंही । अतुलित-बल; नर-केसरि दोही ।
प्रभु विरही इव करिति विषादा । सांगति बहुतः कथा संवादा ॥ १ ॥
बघ लक्ष्मणाः वनाची शोभा । बघुनि कुणा मनि न करी क्षोभा ।
हे खग मृग, सहः नारीवृंदां । करित फिरति जणुः माझी निंदा ॥२॥
मज पाहुनि, मृग-निकर धावती । तुम्हां नसे भयः मृगी बोलती ।
रहा मुदित, मृग-योनि जन्मले । कांचन-मृग हे; शोधित आले ॥३॥
करि करेणीतें: संगें घेती । जणूं-काय मज; धडाचि देती ।
शास्त्र सुचिंतित· पुन्हां पहावें । भूप सुसेवित, वश न गणावे ॥ ४ ॥
ठेविलि नारि, जरी हृदयीं ही । युवती, शास्त्र; नृपति, वश नाहीं ।
पहा तात ! हा, वसंत सुंदर । प्रिया-हीन--मजः भासे भयकर ॥ ५ ॥

दो०— विरह-विकल बलहीन मज; जाणुनि अति असहाय ।
मोहित विपिन-मधुकर-खग मदन करी बहु घाय ॥३७ (क) ॥

दो०— बघुनि बंधुसह दूत मग; मागे जाउनि मात ।
कटक थांबवुनि, दइ तळः जणूं दुष्ट मन-जात ॥ ३७ (ख) ॥

विशाल विटपी; लता गुंतल्या । तंबूसम जणुं; विविध शोभल्या ।
कदलि ताल जणुं; ध्वजा पताका । बघुनि न मोह; तो नर पक्का ॥ १ ॥
विविध-जाति; फुललें तरु नाना । निरंदाज घालुनि; निज बाणा ।
कुठें विटप अति रम्य शोभले । पृथक् पृथक् भट जणूं राहिले ॥ २ ॥
कूजति पिक जणुः मत्त वनकरी । सारस, चक्र, जणुः उंट खेचरी ।
मोर, चकोर, कीर, वर-वाजी । पारावत बहु; हंसहि ताजी ॥ ३ ॥
तित्तिर, लावीः पदचर-यूथ । वर्णु न शकेंच मदन-वरूथ ।
रथ गिरिशिलाः दुंदुभी नाले । चातक बंदीः गुण-गण वदले ॥ ४ ॥
मधुकर-मुखर; भेरि बहु सनई । त्रिविध पवन जणुं; वकील येई ।
चतुरंगिणीः सैन्य सह घेतो । आव्हानचि जणुं, देत फिरे, तो ॥ ५ ॥
लक्ष्मण, बघुनी; काम अनीक । धीर धरिति, त्यांचे यश नीक ।
याचें एक; परम बल नारी । बचेल यांतुनि; तो भट भारी ॥ ६ ॥

दो०— तात तीन अति सबल खलः क्रोध काम आणि लोभ ।
मुनि-विज्ञान-धाम-मनीः निमिषार्धें करि क्षोभ ॥ ३८ (क) ॥

१ घाव, आघात. २ मदन. ३ गणंवश ४ पोपट. ५ कबूतर. ६ घोड्याची जात, अरबी घोडे. ७ ध्वनि. ८ सैन्य.

लोभा इच्छा-दंभ बल; कामा केवल नारि।
क्रोधा परुषाक्षरें बल; मुनि वदती सुविचारि ॥ ३८ (ख) ॥

गुणातीत सचराचर स्वामी । उमे! राम सब-अंतर्यामी ।
कामी जन-दीनता दाखविति । धीरांचे मनि; विरति वाढविति ॥१॥
क्रोध, मनोज, लोभ मद माया । सुटति, दया करि; जरि रघुराया ।
इन्द्रजालि तो; नर ना भुलतो । नट अनुकूल, जयाते असतो ॥ २ ॥
उमे सांगतो; अनुभव अपुले । सत्य भजन, जग मृगजळ सगळें ।
प्रभु मग जाति; सरोवर तीरा । पंपा नाम, सभग गंभीरा ॥ ३ ॥
संत हृदय सम: निर्मल वारी । घाट सुबद्ध: मनोहर चारी ।
पीती तिथें; विविध मृग सु-जळा । उदार गृहिं जणुं; याचक मेळा ॥ ४ ॥

दो०— सघन कमलिनी-आड जल; वेगें कळे न मर्म।
मायाच्छिन्न[1] न दिसे जगीं जैसें निर्गुण ब्रह्म ॥ ३९ (क) ॥

दो०— सुखी मीन सब समानही; अति अगाध जळिं होति ।
धर्मशील-दिन यथा जगीं: अति सुख-संयुत जाति ॥३९(ख)॥

सरसिज विकासित; नाना रंगें । मधुर मुखर गुंजनि बहु भृंग ।
जल-कुक्कुट; कलहंस बोलती । जणुं रघुवरा: बघुनी स्तविती ॥ १ ॥
चक्रवाक बक; खग समुदाय । बवर्णे शक्य; न वदला जाय ।
सुंदर खग-गण-गिरा मनोहर । पथिका जणुं; बोलावी सादर ॥ २ ॥
उप-तडाग[2] मुनि-आश्रम बनले । भोंवति कानन- विटप शोभले ।
चंपक बकुल; कदंब तमाल । पाटल, पनस पलाश रसाल ॥ ३ ॥
नवपल्लव: कुसुमित तरु नाना । चंचरीक[3]-मंडल करि गाना ।
शीतल, मंद सुगंध मनोहर । संतत वाहे सहज गंध-हर[4] ॥ ४ ॥
कुहू, कुहू रव कोकिल करिती । ऐकुनि मुनिही ध्यान विसरती ॥ ५ ॥

दो०— फल—भारें नमले विटप; लवले भूमि—तळास ।
पर-उपकारी पुरुष जगीं विभवें नमती खास ॥ ४० ॥

मज्जन करुनी, सरांत भावें । प्रभू सुखद सुख अपार पावे ।
पाहुनि सुंदर; तरुवर-छाया । बसले अनुजा सह रघुराया ॥ १ ॥

१ मायेनें आच्छादित. २ तडागा समीप. ३ भृंग. ४ वायु

तेथें मुनि, सुर; सकलहि आले । स्तुती करुनि: निज धामा गेले ।
प्रसन्न बसले परम कृपाळ । सांगति अनुजा; कथा रसाळ ॥ २ ॥
विरहवंत; भगवंत पाहिले । नारद मनः अनुतापें भरलें ।
शाप करुनि मम, अंगीकार । प्रभु सोशिति नाना दुख-भार ॥ ३ ॥
जाउनि, ऐशा; प्रभुसि पहावें । पुन्हां असा, समयो ना फावे ।
सुविचारें, नारद करि वीणा । आले जिथें प्रभु असे आसना ॥ ४ ॥
गानी राम; चरित मृदु-वाणी । प्रेम सहित विविधा वाखाणी ।
प्रणाम करितां: हृदयीं धरिलें । बाढवेळ[1] मग, धरुनि ठेविले ॥ ५ ॥
कुशल विचारुनि, निकट बसविले । अनुजें सादर; पदां क्षाळिलें ॥ ६ ॥

दो०— नानाविध विनती करुनी; प्रसन्न प्रभु जाणून ।
नारद वदले वचन मग कर कमळें जोडून ॥ ४१ ॥

इति श्री अरण्यकाण्डनवधाभक्तिवर्णनादि
रामनारदमीलनं नाम षष्ठोऽध्यायः ॥

अध्याय ७ वा

ऐका दानशूर रघुनायक । सुंदर अगम-सुगमः सुखदायक ।
द्याल एक वर; मागूं स्वामी । यद्यपि जाणां; अन्तर्यामी ॥ १ ॥
जाणां माझाः मुने ! स्वभावू । भक्तापाशिं न कांहिं हि लपवूं ।
प्रिय अशि वस्तूः मला कोणती । मुनिवर मागुं न; शकां तुम्हीं नी ॥२॥
भक्तां कांहिच अदेय नाहीं । हा विश्वास न चुकुनि त्यजाही ।
नारद वदले;· मनें प्रमुदितें । हा वर मागूं. करूं धृष्टते ॥ ३ ॥
नामें प्रभुचीं; जरी अनेक । वद श्रुती एकाहुनि एक ।
" राम "सकल नामांहुनि अधिक । होउं नाथ ! अघ-खग-गण-वधिक ॥४॥

---

१ पुष्कळ वेळ. २ वायु.

दो०— राका-रजनी भक्ति तव: राम-नाम तो सोमे ।
अपर नाम उडुगण विमलः वसो भक्त-उर-व्योम ॥४२(क)॥

दो०— एवमस्तु मुनितें वदलेः कृपानिधि रघुनाथ ।
मग नारदमनिं हर्ष अती. प्रभुपदिं नमिलें माथ ॥४२(ख)॥

प्रसन्न अति; रघुनाथ जाणुनी । नारद पुन्हां: म्हणति मृदुवाणी ।
राम यदा, प्रेरिलि निज माया । मला मोहिलें: श्रुणु रघुराया ॥ १ ॥
तदा लग्न मी: करूं इच्छिलें । कारण कवणः करूं ना दिधलें ।
श्रुणु मुनि वदतो तुला सहर्ष । भजति मला जे सोडुनि आस ॥ २ ॥
त्यांसि सदा मी रक्षीं ताता । जशी बालका. रक्षी माता ।
शिशू सर्प पावक धरूं जातां । स्वकरें दूर करी आणि माता ॥ ३ ॥
होतां प्रौढः सुतावरि माता । प्रीति न करी पूर्वि जशि ताता ! ।
प्रौढ-तनय-सम, मजला ज्ञानी । बालक-सुत-सम दास अमानी ॥४॥
भक्तां मम बल; निज-बल त्यांसी । क्रोध काम हेः रिपु उभयांसी ।
जाणुनि हें मजः पंडित भजती । ज्ञानहि होतां; भक्ति न त्यजती ॥५॥

दो०— क्रोध काम-लोभादि मद मोह-कटक हें फार ।
त्यातहि अति दारुण दुखदः माया रूपी नार ॥ ४३ ॥

श्रुणु मुनि म्हणतिः शास्त्र श्रुति संत । मोह काननी नारि वसन्त ।
जपतप-नेमः-जलाशय भारी । ग्रीष्म होउनी शोषी नारी ॥ १ ॥
क्रोध-काम-मद, मत्सर भेक । हर्ष दायि त्यांः वर्षा एक ।
दुर्वासना कुमुद-गण भाई । त्यांतें शरद सदा सुखदाई ॥ २ ॥
धर्म सकल सरसीरुह-वृंदां । स्त्री हिम दाहक, अधर्म-सौख्यदा ।
ममता जवस, तदा बहु होई । पाळी नारि;-शिशिर-ऋतु भाई ॥३॥
पाप—उलूक—निकर—सुखकारी । नारि निबिड;-रजनी अंधारी ।
मति, बल, शील, सत्य,सब मीन । स्त्री हि गळास्मम; वदती निपुण ॥४॥

दो०— अवगुण-मूलहि शूलदाःप्रमदा दुःखद खाण ।
म्हणुनी केलें निवारणाः मुनि मीः हें मनिं आण ॥४४॥

---

१ चंद्र. २ स्वतःचें बळ. ३ नारी ४ नीच सुख देणारी. ५ जवस वृक्ष.

श्रुत्वा रघुपति; वचन सुशोभन । मुनि तनु पुलकित;सजल विलोचन ।
वद कोणा प्रभुची अशि रीती । दासांवरि अति ममता प्रीती ॥ १ ॥
न भजे प्रभुसि अशा, भ्रम-रागी । ज्ञान-रंक नर मंद अभागी ।
मग सादर: वदले मुनि नारद । एका प्रभु विज्ञान-विशारद ॥ २ ॥
संतांचे लक्षण रघुवीरा । वदा नाथ ! भवभंजन, धीरा ।
श्रुणु मुनि, संतांचे गुण वदतो । ज्यांनीं मी: त्यांच्या वश असतो ॥३॥
षड्-विकार-जित, अनघ अकाम । अचल अकिंचन; शुचि सुखधाम ।
अमित बोध; अनीह मित-भोगी । सत्य-सार, कवि, कोविद योगी ॥४॥
सावधान, मानद, मदहीन । धीर, धर्मगति, पुरा प्रवीण ॥ ५ ॥

दो० — गुणागार संसार-रुज;-रहित विगत संदेह ।
सोडुनि मम-पद-कमल-रती, प्रिय नच देह कि गेह ॥४५॥

स्वगुण कानिः पडतां संकोचति । परगुण परिसुनियां, अति हर्षति ।
सम, शीतल, नाः त्यागिति नीती । सहज सरळ सकलांसीं प्रीती ॥ १ ॥
व्रत. जप तप दम; संयम नेम । गुरु-गोविंदें-विप्र-पदिं प्रेम ।
श्रद्धा क्षमा, सुमैत्री सु-दया । मुदिता, मम पदिं प्रीति अ-माया ॥२॥
विरति, विवेक, विनय विज्ञान । यथार्थ जाणति; वेद पुराण ।
दंभ मान मद: कधीं न करिती । चुकुनि पाय कधिं;कुपथिं न धरिती॥३॥
सदा चरित मम; गाति एकती । हेतु-रहित परहित रत असती ।
श्रुणु मुनि संतांचे गुण जितुके । वदुं न शकेचि गिरा श्रुति तितुके ॥

छं०— वदुं शकति ना; श्रुति शेष, नारद, धरिति प्रभु-पंकज-पदें ।
प्रभु दीन-बंधु, कृपाळु निजमुखि, भक्तगुण ऐसे वदे ॥
शिर नमुनि चरणीं; वार बहु मुनि, सत्यपुर गमना करी ।
तो धन्य तुलसी !, आस सांडुनि; दास, हरि-पदिं रति धरी ॥

दो०— रावणारि यश पावन, गाति ऐकती लोक ।
राम भक्ति दृढ पावती; विण जप-विराग योग ॥ ४६ ॥

१ ऐकून. २ भ्रमरूपी विषयांवर प्रेम करणार. ३ षड्रिपु किंवा षडूर्मी. सहा ऊर्मी,– क्षुधा, तृषा, निद्रा, इत्यादिक. ४ परमात्मा. ५ निष्कपट.

इति श्री अरण्यकांडे श्रीराम-नारद-संवादो-नाम
सप्तमोऽध्यायः।
मासपारायणे द्वाविंशो विश्रामः।

इति श्रीमद् रामचरितमानसे सकल-कलि-कलुष-विध्वंसने
तृतीयः सोपानः।

अरण्य-काण्ड समाप्तम

जय जय रघुवीर समर्थ.

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥

॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

॥ श्री राम चरित मानस ॥

॥ चतुर्थः सोपानः ॥

॥ किष्किन्धा काण्डम् ॥

अध्याय १ ला

*स्रग्धरा०— वैदेहीं मार्गमाणः प्रति-तरु-कुरंगं, जानकीं मन्यमानो।
गाढाश्लेषं च दत्वा, वितरति सुगतिं,दुर्लभां मुक्ति-रूपाम ॥
दत्ते शोक-प्रलापैः स्वहितपथरतां कामरूपे विरक्तिं
कामान्धानां चरित्रं, जनि--मृति--भयदं दर्शय-
न्पातु रामः ॥ १ ॥ *

*पृथ्वी०— महाभय-निवारकं कलि-मलौघ-संक्षालकं
त्रिताप-कुमुदातपं हरिपदाब्ज-संदर्शकम् ॥
भ्रमादि-तम-हारकं निज-सुख-प्रभा-भास्करं
स्मरारि-सुखदायकं मनुज राम-नाम स्मर ॥ २ ॥ *

शा. वि० कुन्देन्दीवर-सुन्दरावतिबलौ, विज्ञान-धामावुभौ।
शोभाढ्यौ वर-धन्विनौ श्रुति-नुतौ, गो-विप्र-वृन्द-प्रियौ ॥
माया-मानुषरूपिणौ, रघुवरौ सद्धर्म-वर्मौ हितौ।
सीतान्वेषण-तत्परौ पथिगतौ भक्ति-प्रदौ तौ हि नः ॥ १ ॥

---

१ स्त्रीच्या ठिकाणीं. * अशा खुणा केलेलें श्लोक अनुवादकाचे स्वकृत आहेत.

शा. वि०— ब्रह्माम्भोधिसमुद्भवं कलिमल-प्रध्वंसनं चाव्ययं
श्रीमच्छम्भु-मुखेन्दु-सुन्दर-वरे संशोभितं सर्वदा ॥
संसारामय-भेषजं सुख-करं श्री-जानकी-जीवनं
धन्यास्ते कृतिनः पिबन्ति सततं, श्रीराम-नामामृतम ॥२॥

सो०— मुक्ति जननि जी खास, ज्ञान खाणि अघ हानि कर
जिथें शिव-शिवा-वास: सेविति काशी कां न नर ॥ अ ॥

सो०— जळतां सव सुरवृंद घोर गरल जो पान करि ।
त्या न भजति मन मंद शिवसम कृपालु कोण तरि ।

रघुनायक मग, पुढें चालले । ऋष्य-मूक-गिरि-निकट पावले ।
तिथें सचिव-सह, सुकंठ राहे । अतुल पराक्रमि: येतां पाहे ॥ १ ॥
म्हणे सभय अति, श्रृणु हनुमान । पुरुष-युगल, बल-रूप-निधान ।
त्वां बटु-रूपा: धरुनी जावें । जाणुनि मनिं: संकेत वदावें ॥ २ ॥
पाठवि वाली: मलिन मनानें । हा गिरि सोडुनि, सत्वर जाणें ।
विप्ररूप, घेउनि कपि गेला । मस्तक नमुनी: पुसता आला ॥ ३ ॥
कोण तुम्हीं, तनु: श्यामल गौर । क्षात्ररूप वनिं, फिरतां वीर ।
कठिन भूमि. कोमलपदगामी । कवण हेतु: वनिं फिरतां स्वामी ॥४॥
मृदुल मनोहर. सुन्दर गात्रें । आलां वन-वातातप-पात्रें ।
तुम्हि कीं त्रय; देवांतुनि कोणी । नर नारायण, कीं तुम्हि दोनी ॥ ५ ॥

दो०— जग-कारण तारण भव, भंजन धरणीभार ।
कीं तुम्हि अखिलहि भुवनपती: धरा मनुज अवतार ? ॥१॥

कोसलेश-नृप-तनय जन्मलों । पितृवचना, मानुनि वनिं आलों
बंधू नाम राम आणि लक्ष्मण । सवें नारि, सुकुमारि सुलक्षण ॥ १ ॥
हरिलि निशिचरें, वनिं वैदेही । विप्र ! फिरूं, शोधित तीतेंही ।
वदलों आम्हीं; चरित्र असुचें । सांगा विप्र: कथसी तुमचें ॥ २ ॥
ओळखुनी प्रभु: पडला चरणीं । तें सुख उमे ! कवण किति वर्णी ! ।
पुलकित तनु, वच: येइ न वदना । पाहुनि सुंदर: सुवेष-रचना ॥ ३ ॥
स्वनाथ जाणुनि; मनीं हर्षला । स्तुती करी: धरुनी धीराला ।
पुसिलें मी निज-मती प्रमाणें । प्राकृत नर-सम: तुम्हींहि पुसणें ! ॥४॥
तव माया-वश; फिरतों भुलला । म्हणुनि नाहिं स्यां: प्रभु ओळखला ॥५॥

दो०— एक मंद मी, मोहवश, कुटिलहृदय अज्ञान ।
त्यांतहि स्मरति न प्रभू मज: दीन-बंधु भगवान ! ॥ २ ॥

१ सुग्रीव.

प्रभु मम अवगुण जरि बहु असती । स्वामि सेवकां; कधिं न विसरती ।
जीव, नाथ; मोहित तव मायां । तरति कृपेनें; तव रघुराया ॥१॥
सत्य शपथ; अपुली प्रभुराया । मी न जाणतों; भजन उपाया ।
सेवक सुत; पति, जननि अधारें । वसति निश्चिंत[1]; करिति प्रभु तारें ॥२॥
असें वदुनि, चरणीं मिठि घाली । निज तनु प्रगटि, प्रीति मनिं भरली ।
रामें उचलुनि हृदयीं धरिला । लोचनजळ-सेकांनि[2] सांविला ॥३॥
एक कपे मनिं; मानि न उणें । लक्ष्मणाहुनी, प्रिय तुम्हि दूणे
समदर्शी मज, सर्वहि ह्मणती । अनन्यगति; सेवक प्रिय असती ॥४॥

दो०— तो अनन्य ज्याची अशी, मति न ढळे हनुमंत ।
मी सेवक, सचराचर रूप स्वामि भगवंत ॥३॥

वदे पवनसुत; पति अनुकूल । मनीं हर्ष; सब हरला शूल ।
प्रभु गिरिवरि, कपिपति वसताहे । तो सुग्रीव, दास तव आहे ॥१॥
नाथ ! तयाशीं; मैत्री कीजे । दीन जाणुनी; अभया दीजे ।
तो सीतेचा; शोध करील । जिथें तिथें बहु; कपि धाडील ॥२॥
यापरि सकल; कथेसी वदले । खांद्यावरि; उभयांसि घेतलें ।
यदा सुकंठें; राम पाहिला । स्वजन्म अतिशय; धन्य मानिला ॥३॥
भेटे सादर; मस्तक पायां । अनुज सहित; भेटति रघुराया ।
विचार करि कपि; मनिं या रीतीं । करितिल हे, विधि मजसी प्रीती ॥४॥

दो०— मग हनुमन्तें उभयही कथा दिल्या सांगून ।
पावक साक्षी ठेवुनी मैत्री दिली करून ॥४॥

प्रीति जडलि; अंतर मुळिं नाहीं । लक्ष्मण वदे; राम चरिताही ।
वदे सुकंठ; नयनिं बहु वारी । सापडेल प्रभु !; जनक-कुमारी ॥ १ ॥
इथें सचिवसह; एके समयीं । बसलों करित; विचारा हृदयीं ।
मला गगनपथिं; जातां दिसली । विलपत होती; परवश झाली ॥२॥
राम ! राम ! हा राम ! म्हणोनी । पाहुनि कपि; दे वस्त्र टाकुनी ।
राम मागती, सत्वर दिधलें । अतिशोकें तें; हृदयीं धरिलें ॥३॥

१ निश्चित. २ शिंपून.

म्हणे सुकण्ठ, ऐक रघुवीरा । त्यजुनि शोक, मनिं; धरा सु-धीरा ।
सर्व प्रकारें; करीन सेवा । मिळेल जेणें सीता, देवा ॥४॥

दो०— सखा-वचन ऐकुनि मुदित: कृपासिंधु बल-शीव ।
काय कारणें वससि वनीं; सांग सख्या, सुग्रीव ॥५॥

नाथ, वालि आणी मी भाई । होती प्रीति न, वदली जाई ।
मय-सुत जया; नाम मायावी । तो आला प्रभु, अमुचे गांवीं ॥१॥
मध्यरात्रि, पुरद्वारिं गर्जला । वाली रिपुबल; साहुं न शकला ।
वालि धावला: असुर पळाला । वाली-संग, मीहि मग धरला ॥२॥
गिरी-गुह-माजीं तो शिरला । तव्हां वाली: मजसि म्हणाला ।
एक पक्ष मम, वाट पाहणें । आलों ना तर; मृत्यु समजणें ॥३॥
मास राहिलों, तिथें खरारी । रुधिर-धार: वाहे मग भारी ।
वालि मारिला: मारिल मजला । शिळा लावुनी, पळत्चि काढिला ॥४॥
विना भूप पुर सचिवां दिसलें । बळेंचि मजला, राज्य अर्पिलें ।
त्या मारुनि घरिं वाली आला । विरोध मजला बघुनि मांडिला ॥५॥
रिपुसम मारी, मजला भारी । हरुनि घेइ; सर्वस्व नि नारी ।
त्या भीतीनें: राम कृपाला ! । फिरत भुवनिं बहु: काढु हालों ॥६॥
इथें शापवश, येउं शकेना । तदपि सभय मी; क्षेम असेना ।
एकुनि सेवक-दुःख, दयाळा । स्फुरूं लागल्या; भुजा विशाला ॥७॥

दो०— एक सख्या त्या वधिन मी, एकचि बाणें जाण ।
ब्रह्म-रुद्र-शरणागतहो: तरी न वांचे प्राण ॥८॥

मित्र दुःख ज्यां: न दुःखकारी । तयां दर्शनें: दोषचि भारी ।
स्वदुःख गिरिसम; रज सम गमतें । मित्र-दुःख-रज, मेरु वाटतें ॥१॥
जयां अशी मति, सहज न नाता । कशासि ते शठ, करिति मित्रता ।
कुपथ निवारुनि, सुपथिं चालवी । प्रगटुनि गुण: अवगुणांसि लपवी ॥२॥
देत घेत मनिं: शंकित नसतो । यावत् शक्य: सदा हित करितो ।
विपत्तीत करि, शतगुण स्नेहा । वदे संत, श्रुति: मित्र-धर्म हा ॥३॥
प्रिय समक्ष बहु वदतो ममता । मागें अनाहित: मनीं कुटिलता ।
फणि-गति-सम ज्या: नित्य वागणें । अशा कुमित्रा; बरें त्यागणें ॥४॥

(१) अपे वाढ्न.

सेवक शठ, नृप कृपण, कुनारी । कपटी मित्र, शूलसम चारी ।
चिंता सर्वचि, मजला द्यावी । कार्य सकल, झाली च पहावी॥५॥
सुकण्ठ म्हणतो, श्रृणु रघुवीर । वालि महाबल; अति रणधीर ।
दुंदुभि-अस्थीः ताड दाखवी । विना प्रयासें रघुवर उडवी ॥ ६ ॥
बघुनि अमित बलः वाढे प्रीती । वधिति वालिला; अशी प्रतीती ।
वारंवार नमी; पदिं शीस । प्रभुसि जाणुनी, मुदित कपीश ॥७॥
उपजे ज्ञान; वचन मग बोले । नाथ! कृपेनें; मन ना डोले ।
सुख संपद, परिवार, महत्ता । सर्वहि सांडुनि; करूं दास्यता ॥ ८ ॥
हीं सब राम-भक्तिची बाधक । वदति संत, तव-पद-आराधक ।
शत्रु मित्र सुख; दुःखहि कांहीं । मायाकृत; परमार्थे नाहीं ॥ ९ ॥
वालि परम-हित; ज्या प्रसादां । तुम्हीं भेटलां; शमन विषादा ।
स्वप्नीं युद्ध, होइ जरि त्यासी । जागृति जाणुनि; लाज मनासी ॥१०॥
अतां कृपाळोः असें करावें । त्यजुनि सर्व; दिनरात भजावें ।
परिसुनि विरति-युता कपिवाणी । सस्मित वदति, राम धनुपाणी ॥११॥
तूं वदसी तें; सत्यचि आहे । मित्र! वचन मम; नसें मृषा हें ।
नट-मर्कट इव, सकल नाचवी । —राम; खगेश! वेद हें वदवी ॥१२॥
सुग्रीवा, घेउनि रघुनाथ । निघेः चाप;-सायक करिं घेत ।
मग सुग्रीवा, दिला धाडुनी । निकट गर्जला, बळा पावुनी ॥१३॥
ऐकुनि वाली क्रोधें धावे । पद धरुनी, स्त्री म्हणे न जावें ।
श्रुणु पति भेटे ज्यां सुग्रीव । ते युगबंधु, तेज-बलशीव ॥ १४ ॥
लक्ष्मण रघुवर; दशरथ-बाळ । संग्रामीं जिंकितील काळ ॥ १५ ॥

दो०— वालि वदे श्रुणु भीरु प्रियेः समदर्शी रघुनाथ ।
जरी कदाचित मारिती; तरि होईन सनाथ ॥

इति श्री किष्किंधाकाण्डे, हनुमद् मिलनादि-वालीवधप्रतिज्ञादि-
वर्णनं नाम प्रथमोऽध्यायः ।

अध्याय २ रा

सांगुनि निघे; महा-अभिमानी । सुग्रीवा, तृण-समान मानी ।
भिडले उभय; वालि अति तर्जे । मुष्टी मारि, महाध्वनि गर्जे ॥ १ ॥

तंव सुकंठ अति; विकल पळाला । मुष्टिघातः वज्रासम गमला ।
सांगितलें मी, प्रथम कृपाळ । वालि न हा साक्षात् मम काळ ॥ २ ॥
एकरूप तुम्हिः बंधू दिसलां । संशय, वाटुनि, तया न वधिला ।
सुकंठ-देहा; हस्त लाविला । जाउनि पीडा, पवि-सम झाला ॥ ३ ॥
कंठिं घातलीः प्रसून-माळ । धाडिति, बळः देउनी विशाळ ।
झाला नाना-विध संग्राम । वृक्षा आडुनिः बघती राम ॥ ४ ॥

दो०— बहु छल, बल, सुग्रीव करीः कचला मनीं भिऊन ।
मारिति वालिसि हृदयिं मगः बाण, धनू ताणून ॥ ८ ॥

शरें विकल तो, भूवरि पडला । प्रभु सन्मुख पाहुनि, मग उठला ।
श्याम-गात्र शिरिं: जटा बांधिलें । अरुण नयन,शरचाप घेतलें ॥ १ ॥
कितिदां बघुनि, पदीं मन लावी । सुफळ जन्मः मानी, प्रभु भावी ।
प्रीति हृदयिं, वच वदनिं कठोर । बोले मगः लक्षुनि रघुवीर ॥ २ ॥
स्वामी ! धर्मास्तव अवतरलां । व्याधासम कां वधिलें मजला ।
मी वैरी, सुग्रीव तु प्यारा । अवगुण कवण; नाथ मज मारा ? ॥३॥
अनुज-वधू, भगिनी, सुत-नारी । श्रुणु शठ, कन्याः सम या चारी ।
कुदृष्टिनें जोः यांनां पाही । वधितां तया, लेश अघ नाहीं ॥४॥
मूढ धरिशि, अतिशय अभिमाना । नारि-मंत्र तूं; घेशि न कानां ।
मम भुज-आश्रित, त्या जाणोनी । मारूं वधास्तिः दृढ अभिमानी ॥ ५ ॥

दो०— ऐका प्रभु ! स्वामी पुढें, युक्ति न चाले माझि ।
नाथ अज्ञान मी पातकीः अंत काळिं गति तुझि ॥ ९ ॥

ऐकुनि राम, सुकोमल वाणी । वालि-शिरीं, ठेविति निज-पाणी ।
अचल करूं तनु राखी प्राणां । वालि म्हणे श्रुणुः कृपानिधाना ॥१॥
जन्म जन्म मुनि, साधन करिती । अंतीं राम मुखीं नच येती ।
ज्याच्या नाम-बळें, शिव काशीं । सकलां समगतिः दे अविनाशी ॥२॥
तो मम लोचन-गोचर होई । योग असा प्रभु पुन्हां न येई ॥ ३ ॥

छं०— तो नयन गोचर, गुण जयाचे, नेति वेदहि वर्णिती ।
सह पवन-मन-जयःविरस-इंद्रियःध्यानिं मुनि क्वचि पावती ॥
प्रभु ! बघुनि मज अभिमान-वश अतिःम्हणति राखि शरीर कीं ।
तो कवण शठ, सुर-वृक्ष तोडुनिः वारि घालि बभूंळि कीं ॥१॥

१ सुग्रीव म्हणतो. २ राम म्हणाले. ३ मुळात "अधम" आहे ४ बाभुळीला.

हे नाथ! ठेवुनि, दृष्टि करुणा; देइ वर जो मागतो।
ज्या योनिं जन्मूं, कर्मवश त्या: रामपदिं, अनुराग तो॥
हा तनय मम, सम-विनय-बल; कल्याण-प्रद! प्रभु! स्वी-करा।
करिं धरुनि सुर-नर-नाथ, अपुला, दास अंगद, हा करा॥ २॥

दो०— राम चरणिं दृढ प्रीति युत; वालि करी तनु त्याग।
सुमन-माळ जशि गळ्यांतुनीः गळतां नुमजे नाग॥ १०॥

वालीला निज-धामिं धाडिलें। सकल नगर-जनः विव्हळ जाले।
नाना विध करिः विलाप तारा। सुटले केस, नः धरवे धीरा॥१॥
तारा विकल, बघुनि रघुराया। ज्ञान देउनी, हरिती माया।
क्षिति जल पावक गगन समीर। पंच-रचित हेंः अधम शरीर॥ २॥
तनु ती प्रगट; पुढें तव आहे। जीव नित्य. रडणें कोणा हें!।
उपजे ज्ञान, पदीं मग लागे। परम भक्तिचा ती वर मागे॥ ३॥
उमे! दारु-योषित सम जाणा। नाचवि सर्वां; हा रघुराणा।
अनुशासन, सुग्रीवा दिधलें। अंत्य कर्म सवः विधिवत केलें॥ ४॥
राम म्हणाले, अनुजा "जाई। सुग्रीवासि, राज्यपद देई"।
रघुपति-चरणीः मस्तक नमिलें। रामाज्ञेनें, सर्वांहि गेले॥ ५॥

दो०— लक्ष्मण बोलावी त्वरितः पुरजन-विप्रसमाज।
राज्य सुकंठा अर्पिलें, अंगदासि युवराज्य॥ ११॥

उमे! रामसम; हितकर कांही। पितर, गुरू, बंधू, प्रभु, नाहीं।
सुर नर मुनि, सर्वांची रीती। स्वार्थासाठिं; करिति सव प्रीती॥ १॥
वालि-भयें, व्याकुळ दिनराती। तनु सव्रण, चिंताज्वर छातीं।
तो सुग्रीवः करिति कपिराव। कृपाळु अति, रघुवीर स्वभाव॥ २॥
जाणुनि हें प्रभुला परिहरती। ते नर कां नः संकटीं पडती।
सुग्रीवा, बोलावुनि घेती। नाना विध, नृपनीति शिकविती॥३॥
वदले, श्रृणु, सुग्रीव हरीशा। नगरिं न जाउं; चतुर्दश वर्षे।
ग्रीष्म विगत, वर्षा ऋतु आला। इथें निकटः राहूं वरि शैला॥ ४॥
त्वां अंगद सह; राज्य करावें। मम कार्यातें; सदा स्मरावें।
जव सुकंठ निज, भुवना फिरले। प्रभू प्रवर्षणः-गिरिवरि बसले॥ ५॥

दो०— प्रथम सुरांनीं गिरिगुहाः ठेविलि रुचिर करून।
रामकृपानिधि कांहिं दिनः वास करिति जाणून॥ १२॥

इति श्री किष्किन्धाकाण्डे वालीवधादि-सुग्रीवाभिषेचनं नाम द्वितीयोऽध्यायः॥

---

२ काष्टपुतळी। ३ धनी। ४ शस्त्राचे घाव व वालीला मारल्याचे व्रण.

अध्याय ३ रा

सुंदर कुसुमित; वन अति शोभे । गुंजति मधुप-निकर मधुलोभें ।
कंद-मूल-फल; पत्र चांगले ।-झाले बहुत; यदा प्रभु आले ॥ १ ॥
बघुनि मनोहर; शैल अनूप । बसले अनुजा-सह सुर-भूप ।
मधुकर-खग-मृग-तनु, धरिती । सिद्ध मुनिहि, प्रभु-सेवा करिती ॥२॥
तें-पासुनि वन; मंगल बनलें । जें पासुनि; श्री-निवास बसले ।
स्फटिक-शिला, अति निर्मल सुंदर । सुखासीन. तेथें बंधूवर ॥ ३ ॥
सांगति अनुजा; कथा अनेक । भक्ति, विरति: नृपनीति विवेक ।
वर्षा-काल-मेघ: नभि भरले । गर्जन असतां; गाइ लागले ॥ ४ ॥

दो०— पहा लक्ष्मणा मोर गण· नाचति मेघ बघून ।
गृही विरति रत, हर्षयुत विष्णु-भक्त पाहुन ॥ १३ ॥

घन गड्गड् गर्जति नभि घोर । प्रियाहीन मन डरतें थोर ।
चपला चमकति. घनांत पाही । दुर्जन प्रीति: यथा स्थिर नाहीं ॥ १ ॥
वर्षति जलद: भूमिस्सी लवले । विद्येनें बुध जैसे नमले ।
बिंदु-घात, साहति गिरि कैसे । दुष्टवचन: साधुजन जैसे ॥ २ ॥
क्षुद्र नद्या. फोंफावत जाती । अल्प धनें खल; जसे माजती ।
भूवरि पडतां; सुजल गढुळलें । जसे जीव, मायेनें मळले ॥ ३ ॥
जळ सांचुनि सर;हळु हळु भरती । जसे सगुण; सुजनास्सी जमती ।
सरिता-जल: जलधीतें धावे । होइ अचल, जें जिवहरि पावे ॥ ४ ॥

दो०— हरित भूमि तृणसंकुल: कुठें दिसेना पंथ ।
पाषंडहि जगि वाढतां गुप्त जसे सद्ग्रन्थ ॥ १४ ॥

दर्दुर-रव, दश:-दिशांसि होय । वेद पढति जणुं; वटु-समुदाय ।
नव-पल्लव-युत: विटप अनेक । साधक-मन कीं, प्राप्त-विवेक ॥ १ ॥
अर्क जवस, पानांविण उरले । सुराज्यि खल-उद्यम जणुं सरले ।
शोधें ही अणु; मिळे न धूळ । क्रोध जसा हरि सु-धर्म-मूळ ॥ २ ॥
धन-संपन्न; खुले महि कैसी । उपकाऱ्याची: संपति जैसी ।
निशि घन-तमि;खद्योत विराजति । दांभिक-संघ; जसे बहु गाजति ॥३॥
महा वृष्टिनें; पाळी फुटती । स्वातंत्र्यें कीं: नारि बिघडती ।
कृषी खुरपिती, चतुर किसान[१] । जैसे बुध, त्यजिती मद मान ॥ ४ ॥

१ शेतकरी.

चक्रवाक खग; दिसतचि नाही। धर्म जसा, कलि बघुनि न राही।
ऊपरि वर्षतां: तृण ना निपजे। जसा काम, भक्तां-मनि नुपजे ॥ ५ ॥
विविध-जंतु-संकुल भू भ्राजे। प्रजावृद्धि जशि; मिळत सु-राजे।
स्थगित पथिक जागीं बहु नाना। ज्ञानोदयिं जशि करणें जाणा ॥ ६ ॥

दो०— कधी प्रभंजन प्रबल अती; वितळविती मेघांस।
कुपुत्र होतां होय जसा; कुल-सद्धर्मा नाश ॥ १५ (क) ॥
दो०— कधि दिवसा अति निबिड तम; प्रकट पळांत पतंग।
जातें होतें ज्ञान जसें जसा कुसंग सुसंग ॥ १५ (ख) ॥

वर्षा विगत, शरद् ऋतु आला। पहा लक्ष्मणा; किती शोभला।
फुलुनि काश, महि झांकी जाण। जणुं वर्षा निज; दावि वृद्धपण ॥ १ ॥
उदित अगस्ति, करी जल-शोषा। जसा लोभ, शोषी संतोषा।
सरिता-सर-जल: निर्मल शोभे। जसें संत-मन विण मद-लोभें ॥ २ ॥
हळु हळु सुके, सरित-सर-पाणी। ममता जैशी: सांडी ज्ञानी।
बघुनि शरद्खग: खंजन आले। समयिं सुकृत शुभ;सुफळ किं आलें ॥ ३
पंक न रेणु; रम्य अशि धरणी। जशि नय-निपुण-नृपाची करणी।
जल-संकोच-विकल अति मीन। मूढ गृही, जवी धनहीन ॥ ४ ॥
घन-विण निर्मल, रम्य अकाश। भक्त जसे, सोडुनि सब आस।
वृष्टि शारदी, तुरळक थोडी। जशि मम भक्ति,क्वचित कुणि जोडी ॥५॥

दो०— मुदित त्यजुनि पुर, निघति नृप; तापस वणिक भिकारि।
पावुनि भक्ती त्यजित श्रमा: जसे आश्रमी चारि ॥ १६ ॥

सुखी मीन जे; जळां अगाधा। जशि हरि-शरणें, एक न बाधा।
फुलुनि कमळ, खुलले सर कैसे। निर्गुण ब्रह्म, सगुण जें तैसें ॥ १ ॥
गुंजति मधुकर मुखर अनूप। सुंदर खग-रव, नाना रूप।
चक्रवाक मनि दुख निशि बघतां। दुष्ट जसे पर: संपति दिसतां ॥ २ ॥
चातक रटे, तृषित अति तोही। पावे सुख न: जसें शिव-द्रोही।
निशि-शशिनें; शरदातप हरतें। संतां बघुनि: पाप कीं पळतें ॥ ३ ॥
बघुनी चंद्र: कोक-समुदाय। निरखिति जसे; भक्त हरि-पाय।
मशक-दंश, निमले, हिम त्रासें। द्विज-द्रोहें जैसें कुल नासे ॥ ४ ॥

---

१ जागच्याजागीं, जेथल्या तेथे. ३ इंद्रिये. ४ वाग ५ सूर्य. ६ अंधकार
७ दर्भाची जात. ८ अगस्ति-तारा ९ डास, मच्छर.

दो०— होतें जें जिव-जाळ बहु; शरदागमनें जाय ।
सद्गुरु मिळतां जाति जसे भ्रम-संशय-समुदाय ॥ १७ ॥

गत वर्षा; निर्मल ऋतु आला । सीता-शोध; तात नच झाला ।
शुद्धि एकदां कशि; जरि जाणूं । काळासी ही; जिंकुनि, आणूं ॥ १ ॥
कोठेंही जरि; जिवंत असली । समज तात ! निज यत्नें अणिली ।
सुग्रीवहि मम; शुद्धि विसरला । राज्य, कोश, पुर, नारि, पावला ॥२॥
ज्या बाणें मीं, वाली वधिला । त्यानें उद्यां; वधीन तयाला ।
ज्या कृपें मद; मोह, नासती । उमे ! स्वप्निं ते, कोपत कि होती ! ॥३॥
ही लीला मुनि जाणे ज्ञानी । जो रघुवीर चरणीं रति मानी
क्रोधवंत प्रभु; जाणे लक्ष्मण । चढवुनि धनु, करि घेई बाण ॥ ४ ॥

दो० तंव अनुजा समजाविती; रघुपति करुणासींव ।
भय दावुनि ये घेउनी; तात सखा सुग्रीव ! ॥ १८ ॥

इथें विचार; पवन तनयाला । रामकाज, सुग्रीव विसरला ।
निकट जाउनी; पदिं शिर नमवी । चारि विधीनें; त्या समजावी ॥ १ ॥
सुकंठ ऐकुनि; सभीत झाला । विषयीं हरलें मम ज्ञानाला ।
अतां पवनसुत ! दूत-वरूथां । जिथें तिथें; धाडी कपि-यूथां ॥ २ ॥
पक्षामध्यें परत न येई । त्याचा वध निज-हस्तें होई ।
मग बोलावी, मारुति दूतां । सन्माना देउनी बहु त्यां ॥ ३ ॥
दाखविलें भय, नीती प्रीती । चरण वंदुनी, सकळ हि जाती ।
लक्ष्मण तेव्हां, नगरीं आले । क्रुद्ध बघुनि कपि धावत सुटले ॥४॥

दो०— चाप चढवुनी म्हणति तंव; जाळिन नगरी छार ।
बघुनी व्याकुळ नगर सब; आला वालिकुमार ॥ १९ ॥

चरणीं नमुनि शिर; करी विनती । अभय वचन मग लक्ष्मण देती ।
लक्ष्मण कुपित, ऐकुनी कानीं । वदे कपीश, अती भय मानी ॥ १ ॥
श्रृणु हनुमंत; संगें त्या तारा । समजावा, विनवूनि कुमारा ।
गेले तार-सह हनुमान । प्रभु-यश वर्णुनि वन्दी चरण ॥ २ ॥
विनवुनि मग; मंदिरीं आणिले । पद धुउनी; मंचकीं बसविलें ।
कपीश मग, चरणीं शिर नमवी । लक्ष्मण धरुनी; गळ्यास लावी ॥३॥
दुजा विषयसम, मद प्रभु नाहीं । मुनि-मन मोहिति क्षणांत पाहीं ।
ऐकुनि नम्र, वचन सुख पावे । लक्ष्मण त्या; शिकवी बहु भावें ॥४॥

१ शोध, बातमी २ विषय.

पवन-तनय मग; सर्वहि वदले । दूत-समूहां कसे धाडिले ॥ ५ ॥

दो०— मुदित जाति सुग्रीव मगः अंगदादि कपि साथ ।
पुढे लक्ष्मणा ठेवुनीः येति जिथे रघुनाथ— ॥ २० ॥

इति श्री किष्किंधा-काण्डे प्रवर्पणे वर्षाशरदृतुवर्णनादि-लक्ष्मण-
कोपवर्णनं नाम तृतीयोऽध्यायः ॥

अध्याय ४ था

नमुनि चरणि शिर,मग कर जोडी । कांहीं नाथ ! नसे मम खोडी ।
अतिशय सबल देव तव माया । सुटे, कृपेची जरि तव छाया ॥ १ ॥
विषय-विवश सुर-नर-मुनि, स्वामी ! । मी पामर पशु, कपि, अति कामी ।
नारि-नयन-शर, ज्यासि न लागे । क्रोध-घोर-तम-निशि, जो जागे ॥ २ ॥
लोभ-पाश ज्या गळां न बद्ध । प्रभो तुम्हां-सम, तो नर सिद्ध ।
हे गुण साधन करुनि न मिळती । तुम्हां कृपे कुणि कुणी पावती ! ॥३॥
तदा रघुपतीः हसुनी वदती । भरतासम तुम्हि, मला प्रिय अती ।
मनापासुनी; यत्न करावा । जेणे सीता,-शोध मिळावा ॥ ४ ।

दो०— ऐशा गोष्टी चालतां, आले वानर यूथ ।
विविध वर्ण, दाही दिशां; दिसती कपिश वरूथ ॥ २१ ॥

वानर कटक; उमे, मज दिसले । तो मूर्खचि, जो म्हणेल गणले ।
प्रभुपदि येउनि ठेविति माथ । वदन-दर्शने; होति सनाथ ॥ १ ॥
कटकिं असा कपि एकहि नाहीं । रामे कुशल न; पुसिले ज्याही ।
नाहीं प्रभुचें: हे आश्चर्य । व्यापक; विश्वरूप, रघुराय ॥ २ ॥
उभे भोंवतीं; आज्ञा घेउनि । कपीश सांगे; त्यां समजावुनि ।
माझी आज्ञा; प्रभुचें काज । चहुंकडे जा; वानर आज ॥ ३ ॥

१ वानर.

जाउनि जनक-सुत शोधावें । महिन्यामध्यें; मागें यावें ।
अवधी-नंतर; विना हि शोध । येती त्यांचा करविन मी वध ॥ ४ ॥

दो०— वचन एकुनी कीशगण, जाती यथा पसंत ।
बोलावी मग कपीश्वर; अंगद नल हनुमंत ॥ २२ ॥

एक नील, अंगद हनुमाना । जांबवंत मति-धीर सुजाणा ।
सब भट मिळुनि; दक्षिणे जावें । सर्वां सीता-वृत्त पुसावें ॥ १ ॥
तनु-मन-वचनें; उपाय योजा । सुफळ करा; श्रीप्रभुचे काजा ।
पाठि पोटि रवि वन्हि भजावे । स्वामी छलविण, जीवें भावें ॥ २ ॥
माया त्यजुनि; लाभ परलोक । हरति सकल, भव-संभव शोक ।
देह धरुनि; हें फल पावावें । त्यजुनि काम; रामासि भजावें ॥ ३ ॥
तोचि गुणज्ञ, हि, तो बहु-भागी । जो रघुवीर-चरण-अनुरागी ।
आज्ञा घेउनि; वंदुनि पायां । स्मरत जाति हर्षे रघुराया ॥ ४ ॥
शेवटिं पवन-तनय, शिर नमती । जाणुनि कार्य, पुढें प्रभु घेती ।
पाणि-सरोजा; शिरीं ठेउनी । कर-मुद्रिका दिली जन म्हणुनी ॥५॥
सीतेसी, बहुविध बोधावें । वदुनि, विरह-बल; सत्वर यावें ।
मारुति, जन्म सुफल निज मानी । निघे, मनीं ठेवुनि धनुपाणी ॥ ६ ॥
राम जरी, जाणति सब वार्ता । राज-नीति, रक्षी सुखदाता ॥ ७ ॥

दो० जाति सकल वन शोधित; सरिता सर, गिरि, वास ।
रामकार्य अति लीन मन; सुटला देहाभ्यास ॥ २३ ॥

कोठें और कुणि; निशिचर भेट । प्राण घेति; एकेक चपेटं ।
नाना-परि गिरि-वनां हेरिती । मुनि भेटे कुणि; तया घेरिती ॥ १ ॥
तृषार्त ते अति; व्याकुळ बनले । मिळे न जळ, घन-गहनीं भुलले ।
मग हनुमान; म्हणे अनुमानें । मरतिल सर्वहि; विण जलपानें ॥ २ ॥
गिरि-शिखरी चढुनी बघताहे । भूमि-विवरिं, कौतुक दिसताहे ।
चक्रवाक-बक-शुकादि उडती । अनक खग; त्या-मधे प्रविशती ॥३॥
गिरिहुनि खालि; पवनसुत येई । विवरा-सन्निध, सर्वां नेई ।
हनुमंतासी, पुढें घातला । शिरले विवरिं; विलंब न केला ॥४॥

१ महा भाग्यवान २ शोधण्यात. ३ आपला दास. ४ त्याच्या भोवती जमत.

दो०— जातां उपवन-वर बघती: सर विकसित-बहु-कंज ।
मंदिरिं तेथें, रुचिर बहु ; दिसे नारि तप-पुंज ॥ २४ ॥

सर्वांनी निज, दुरुनि, नमिलें । पुसतां निज: वृत्तांता कथिलें ।
तदा म्हणे किं: करा जलपाना । सुंदर, सुरस, फळें ग्वा नाना ॥ १ ॥
स्नान करुनि मधु फळांसि, खाती । सर्व हि तिच्या, निकट मग जाती ।
तिनें सर्व निज: कथा वर्णिली । "प्रभुपासीं जातें मी" वदली ॥ २ ॥
नयन मिटुनि; विवरासि त्यजावें । मिळेल सीता, धैर्य धरावें ।
मिटले नयन, उघडती वीर । सकल उभे, 'उप-सागर-तीर ॥३॥
ती मग गेलि, जिथें रघुवीर । जाउनि ठेवि; कमलपदिं शीर ।
नाना-विध ती, करि बहु विनती । अनपायिनी, भक्ति प्रभु देती ॥ ४ ॥

दो०— बदरि-कानना जाइ मग, आज्ञेनें जगदीश ।
हृदयिं धरी प्रभुचरणयुग ज्यां वंदिति अजेश ॥ २५ ॥

इथें विचारिति, कपी मनाही । सरली अवधि; कार्य ही नाही ।
सर्व मिळुनि मग वदती वार्ता । कशास जावें; ऐसे, आता ! ॥ १ ॥
सजल-नयन मग, अंगद वदला । उभय रीतिनें मृत्यु पातला ।
येथें सीता;-शोध हि नाहीं । जातां मारिल; कपीश पाहीं ॥२॥
बापा-नंतर; मला हि वधिता । रक्षी राम, न नृप-गुण बघतां ।
अंगद सांगे; सर्वांना ही । आलें मरण, न संशय कांही ॥ ३ ॥
अंगद वच; ऐकुनि कपि वीरां । वदवेना, ढाळिति बहु नीरा ।
क्षणैक चिंता;-मग्न राहिले । पुन्हा सकळ, हें, वचन बोलले ॥४॥
"विना शोध सीतेचा घेतां । जाऊं ना, युवराजा, ताता ।"
बोलुनि लवण-सिंधु तटि गेले । दर्भ पसरुनी सर्व हि बसले ॥ ५ ॥
जांबवंत, अंगद-दुख बघुनी । कथा विशेषा; वदे जाणुनी ।
रामा, तात ! न: मनुष्य माना । निर्गुण ब्रह्म, अजित, अज जाणा ॥६॥
आम्हि सब सेवक, अति सद्भागी । संतत सगुण-ब्रह्म-अनुरागी ॥ ७ ॥

दो०— निज इच्छे प्रभु अवतरती; सुर-भू-धेनु-द्विजांसि ।
सगुणोपासक सर्व सव; त्यजुनी मोक्ष सुखासि ॥ २६ ॥

ऐशा कथा, वदति बहु रीती । गिरि-गव्हरिं ऐके संपाती ।

---

१ रामचंद्राच्या आज्ञेने, २ ब्रह्मदेव व शंकर, ३ जन्मरहित.

ये बांहर, यथे बहु कीश। देइ अहार: मजसि जगदीश ॥ १ ॥
मर्वां आजच; भक्षण करतों। बहुत दिवस; अन्नाविण मरतों।
कधिं न मिळे: भर उदर अहार । दैवें दिला, एकदां फार ॥ २ ॥
सभय, गृध्रवच-येतां कानां। आलें मरण; आज तुम्हि जाणां।
गृध्रा बघुनी: कपि सव उठले। जांबवंत मन; सचिंत झालें ॥ ३ ॥
सु–विचारें मग; अंगद वदला। धन्य जटायू–सम नच झाला।
रघुवर–कार्यास्तव तनु त्यागी। गेला: हरि–धामा, सद्भागी ॥ ४ ॥
परिसुनि खग, मुद–शुच-युत वाणी। आला निकट कीश भय-खाणी।
अभय देउनी, जाउनि पुसलें। सर्व कथा ते त्याला वदले ॥ ५ ॥
ऐकुनि स्वर्ग, बंधूची करणी। रघुपति–महिमा: बहु विध वर्णी ॥६॥

दो०— घेउनि जा मज सिंधु–तटीं; देउं तिलांजलि त्यास ।
वचन सहाय्य करिन मी; मिळेल सीता खास ॥ २७ ॥

अनुज क्रिया: करुनी जलतीरा। वदे निज कथा, श्रुणु कपिवीरा।
उभय बंधु नव;–युवक जाहलों। गगनिं उडत,रवि निकट पोंचलों ॥१॥
तेज न साहे; तो मग फिरला। मी अभिमानी; भानु गाठला।
पंखचि जळले: तेज अपार। पडलों भूवरि, घोर चि-कार ॥२॥
मुनी नाम, चंद्रमा जयासी। बघुनि दया मम; आली त्यासी।
मज उपदेश: तयानें केला। देह–जनित: अभिमान हरविला ॥३॥
"त्रेतीं ब्रह्म, मनुज–तनु धरिती। निशिचरपति, त्यांची स्त्री हरिती।
शोध कराया; धाडिति दूत। तयां भेटतां: होशि पुनीत ॥ ४ ॥
फुटतिल पंख; नको करुं चिंता। त्यांस दाखवुनि; दे तें सीता"।
झालि सत्य, मुनि–गिरा हि आज। ऐकुनि वचन, करा प्रभु काज ॥ ५ ॥
त्रिकूट–गिरिवरि; वसली लंका। तिथें वसे, रावण; ना शंका।
अशोक उपवन; तेथें आहे। तिथें; शोक–युत सीता राहे ॥६॥

दो०— मी बघतों, नाहीं तुम्हीं; गृध्रां दृष्टि अपार।
वृद्ध जाहलों ना तरी: करितों सहाय फार ॥ २८ ॥

जो लंघिल, शत योजन सागर । तो करि राम–काज मति–आगर।
बघुनि धरा, मज, मनांत धीर। कसें प्रभु–कृपें: होय शरीर ॥ १ ॥

---

१ (म्हणे,) २ आनंद–शोक युक्त, ४ संपाती. ३ जटायू. ५ चीत्कार करीत

पापि हि ज्याचे; नामा स्मरती। भवसागर, अति अपार तरती।
त्यांचे दूत; त्यजा कातर्या। स्मरुनि राम मनिं; करा उपाया॥२॥
ऐसें सांगुनि; गृध्र उडाला। त्यांचे मनिं अति; विस्मय झाला।
सर्व हि निज निज, बला सांगती। पार जावया, संशय धरिती॥ ३॥
झालों जरठ; म्हणे ऋक्षेष। देहीं नसे; पूर्व बल-लेश।
यदा त्रिविक्रम; होति खरारी। तदा तरुण मी; बल अति भारी॥४॥

दो०— बालिसि बांधितां वाढले; ती तनु वर्णिल कोण।
प्रदक्षिणा मीं सात तदा; केल्या घडींत दोन॥ २९॥

अंगद म्हणे पार मी जाइन। परि संशय मनिं; येइन वा न।
जांबवंत म्हणती; तुम्हि लायक। कसे पाठवूं; सर्वां नायक॥ १॥
म्हणे भालु-पति; शृणु हनुमाना। गप्प बससि कां बहु बलवाना।
पवन-तनय, बल; पवन समान। मति-विवेक-विज्ञान-निधान॥ २॥
कठिण असें जगिं; काज कोण कीं। तात तुलाही; न होय जें कीं।
प्रभु-कार्यास्तव; तव अवतार। परिसुनि होइ; पर्वताकार॥ ३॥
कनक-वर्ण-तनु-तेज विराजे। जाणों अपर; गिरींचे राजे।
सिंहनाद; करुनी बहुवार, । सलील लंघिन; जलधी क्षार॥ ४॥
सहित सहाय हि, रावण मारिन। त्रिकूट उपटुनि; येथें आणिन।
जांबवंत मी; पुसतों तुजसी। करा योग्य, उपदेशा मजसी॥ ५॥
जाउनि इतुकें; तुवां करावें। सीता बघुनी; वृत्त अणावें।
मग निजभुजबल; राजिव लोचन। सवें घेति कपि; कौतुकें-कारण॥ ६॥

छं०— कपि सैन्य संगें, वधुनि निशिचर; राम सीते, आणिती।
त्रैलोकिं पावन; सुयश सुरमुनि; नारदादी, वानिती॥
जें गात ऐकत; वदत समजत; परम पद नर; पावती।
रघुवीर पद-पाथोज-मधुकर; स्वामि-प्रज्ञा, वर्णिती॥ १॥

दो०— भवभेषज रघुनाथ यश, ऐकति जे नर नारि।
त्यांचे सकल मनोरथ, सिद्ध करी त्रिशिरारि॥ ३० (क)॥

१ भित्रेपणाला. २ जांबवान ३ वामन. ४ मारुती म्हणाला ५ कौतुकास्तव. ६ कमळ.

सो०-- नीलोत्पल तनु श्याम, कामकोटि शोभा अधिक।
सुनिय तासु गुन ग्राम; जासु नाम अघ-खग-बधिक ॥ ३०(ख)॥

इति श्री किष्किंधाकांड श्रीरामसुग्रीव-संवादादि संपातिभाषणान्त-
वर्णनं नाम चतुर्थोऽध्यायः।

मास-पारायण त्रयोविंशो विश्रामः।

इति श्रीमद्रामचरितमानसे सकल-कलिकलुष-विध्वंसने
चतुर्थः सोपानः

(किष्किंधा काण्ड समाप्त)

श्रीरामचन्द्रार्पितमस्तु

ॐ तत्सत।

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥

॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

॥ श्री राम चरित मानस ॥

॥पञ्चमः सोपानः ॥

॥ सुन्दर-काण्डम् ॥

अध्याय १ ला

स्रग्धरा:* उत्तीर्णं यस्य नैव प्रभवति भवितुं रामचन्द्रः स्वयं तं—
भक्तानामग्रगण्यं खल-गण-गहन-ध्वंसकं वायु-सूनुम् ॥
संसाराम्भोधिपारे गमनकृतमतिः प्राप्नुयाद्यत्सहाय्यं ।
वंदेऽहं वानराणां मरणभयहरं आञ्जनेयं कपीशम् ॥ १ *

आ० *यदनुग्रह-भानु-करै-र्दृश्यं सर्वं त्वदृश्यतां नीतं ।
तं ब्रह्मविद्वरिष्ठं केवल-चिन्मूर्तिरूपमहमीडे ॥ २ ॥ *

शा० वि०-शान्तं शाश्वतमप्रमेयमनघं निर्वाण-शान्तिप्रदं ।
ब्रह्मा-शम्भु-फणीन्द्र-सेव्यमनिशं वेदान्त-वेद्यं विभुम् ॥
रामाख्यं जगदीश्वरं सुरगुरुं माया-मनुष्यं हरिं ।
वंदेऽहं करुणाकरं, रघुवरं भूपाल-चूडा-मणिम् ॥ १ ॥

व० ति०-नान्या स्पृहा रघुपते हृदयेऽस्मदीये ।
सत्यं वदामि च भवानखिलान्तरात्मा ॥
भक्तिं प्रयच्छ रघुपुङ्गव निर्भरां मे ।
कामादि-दोष-रहितं कुरु मानसं च ॥ २ ॥

---

* अशी खूण असलेले श्लोक अनुवादकाचे स्वकृत आहेत.

मालिनी०-अतुलित-बलधामं हेम-शैलाभ-देहं ।
दनुज-वन कृशानुं ज्ञानिनामग्रगण्यम् ॥
सकल-गुण-निधानं वानराणामधीशं ।
रघुपति-प्रिय-भक्तं, वातजातं नमामि ॥ ३ ॥

जांबवंत वच; परम सुशोभन । ऐकुनि मारुति; होइ मुदित-मन ।
तोंवरि वाट; पहा तुम्हि माझी । दुःख साहुनि; खाउनि फळ भाजी ॥१॥
जोंवरि बघुनि येउं सीतेला । होय कार्य, मनिं हर्ष बहु मला ।
सांगुनि सर्वां; नमुनी माथा । निघे मुदित, मनिं धरि रघुनाथा ॥२॥
एक सिंधु-तटिं; भूधर सुंदर । स-लील उडुनी; चढले त्यावर ।
अनेक वेळां; स्मरुनि खरारी । उडले पवन;-तनय बल भारी ॥३॥
ज्या गिरिवरि पद; दे हनुमंत । पाताळीं तोः जाइ पळांत ।
अमोघ जैसाः रघुपति-बाण । तसाच तो; जाई हनुमान ॥४॥
जलनिधि, रघुपति-दूत जाणुनी । मैनाका[1] ! तूं हो श्रम-हरणी ॥५॥

दो०— हनुमान कर लावुनी, मग करी प्रणाम ।
रामकार्य केल्याविणा; कसला मज विश्राम ! ॥१॥

जात पवनसुत; देव पाहती । तद्बुद्धी, बल; जाणुं इच्छिती ।
सुरसा नामः अहींची माता । धाडिलि वदली येउनि वार्ता ॥१॥
आज सुरांनी; दिला अहार । ऐकुनि वदलेः पवन कुमार ।
रामकार्य करुनी मी येतों । सीता-खबरः प्रभुला देतों ॥२॥
मग मी तव मुखिं शिरतों । माते ! जाउं दे आतां तों ।
कुण्या उपायें; जाउं देइना । मारुति म्हणती; खाउं शकासिना ॥३॥
योजन-भर ती निज मुख पसरी । कपि निज तनूः द्विगुण विस्तारी ।
षोडश योजनः तें मुख झालें । त्वरित पवन सुतः बात्तिस बनले ॥४॥
जसें जसें तीः वदन वाढवी । तसें द्विगुण कपिः रूप दाखवी ।
शत योजन तें आनन झालें । अति लघुरूपः पवनसुत बनले ॥५॥
मुखीं शिरोनी बाहिर पडले । आज्ञा मागुनिः मस्तक नमिलें ।
विबुधा मज ज्या लागिं धाडिलें । मतिबल-मर्मः तुझें मज कळलें ॥६॥

दो०— रामकार्य करिशील तूंः अतिबल- बुद्धि-निधान ।
आशिस देउनि गेलि तीः निघे मुदित हनुमान ॥ २ ॥

१ म्हणे.

राक्षसि एक; सागरीं होती। मायेनें, नभ खगांसि धरि ती।
जीवजन्तु जे गगनीं उडती। पड-छाया त्या; जळांत पडती ॥ १ ॥
छाया-धरितां; उडुं न शकति ते। सदा गगनचर ऐसे खाते।
तैसा छल; हनुमंता करि ती। तिचें कपट कपि; त्वरित जाणती ॥२॥
तिज मारुनि, मारुत-सुत वीर। जलधि-पार; गेले - मतिधीर।
जाउनि तिथें; बघे वनशोभे। चंचरीक, गुंजति मधुलोभें ॥ ३ ॥
नाना तरु, फल, मूल शोभलें। खग-मृग-वृंद बघुनि मन रमलें।
विशाल शैलहि मनिंध पाहुनि। त्यागुनि भय; चढले वरि जाउनि॥४॥
उमे! न हें; कपिचें आश्चर्य। राम-प्रतापें; काळा खाय।
गिरिवर चढतां; लंका दिसली। वदवेना; दुर्गम बहु गमली ॥ ५ ॥
अति उत्तुंग; वारिधी भोंवति। कनक-कोट बहु; प्रकाश पाडिति ॥६॥

छं०— कनक कोट; विचित्र मणिकृत; सुंदरायतनें किती।
चौहाट हाट; सुवाट वीथी; चारु पुरि बहु शोभती ॥
गज-वाजि-खेचर;-निकर, पद्चर; रथ वरूथ न गणवती।
बहुरूप निशिचर-यूथ अतिबल; कटक कवण कि वर्णि तीं ॥१॥
वन बाग उपवन; वाटिका सर; कूप वापी शोभती।
नर-नाग-सुर;-गंधर्व-कन्याः-रूप मुनि-मन मोहिती ॥
बहु मल्ल, देह; विशाल शैल;-समान अतिबल गर्जती।
नाना अखाडीं, भिडति बहुविध; एकमेकां तर्जती ॥ २ ॥
सह यत्न भट; तनु-विकट कोटी; नगर चहुं दिशिं रक्षिती।
बहु महिष, मानुष; धेनु-खर, अज; खल निशाचर भक्षिती ॥
हा हेतु त्यांची, दास-तुलसी; अल्प वार्ता सांगती।
रघुवीर-शर,-तीर्थी शरीरां; सोडुनी गति पावती ॥ ३ ॥

दो०— पुर-रक्षक पाहोनि बहु; कपि मनिं करी विचार।
अति लघुरूपा धरुनि निशीं करूं नगरिं संचार ॥ ३ ॥

मशका इतुकें; रूप कपि धरी। लंके जाई; स्मरुनि नरहरी।
एक लंकिनी; नाम राक्षसी। म्हणे "न पुसतां; कोठें जासी ॥ १ ॥
जाणसि ना शठ; मर्म माझें। तस्कर[१] तितुके; माझें खाजे[२]।"

१ चोर. २ खाद्य.

कपिनें एकचि; मुष्टि मारिली । रुधिर वमत; धरणीवरि पडली ॥ २ ॥
पुन्हां सावरुनि; उठली लंका । जोडुनि करयुग; विनवि सशंका ।
रावणासि वर: विधिनें दिधला—।—जातां खूण; बोलले मजला ॥ ३ ॥
विकल होसि जैं; कपिच्या मारें । मले जाण; निशाचर सारे ।
सुपुण्य माझें; तात बहुत । दिसे मला; रामाचा दूत ॥ ४ ॥

दो०— जगी स्वर्ग-अपवर्ग-सुख ठेवी एक तुलांगिं[१] ।
सर्व मिळुनि तीं न तोलती जें सुख लव-सत्संगिं ॥ ४ ॥

प्रविशुनि नगरिं; करी सब काजा । हृदयिं धरी: कोशलपुर-राजा ।
गरल सुधा; रिपु करिति मित्रता । गोपद सिंधु; अनलिं शीतलता ॥१॥
गरुड ! सुमेरु रेणुसम त्यासी । राम कृपायुत: बघती ज्यासी ।
अति लघुरूप; धरुनि हनुमान । नगरिं शिरे स्मरतां भगवान ॥ २ ॥
प्रति मंदिरीं; करी तो शोधा । दिसे जिथें तिथ; अगणित योधा ।
रावण-मंदिरिं: जाउनि पाही । विचित्र अति तें; वदवत नाहीं ॥ ३ ॥
दिसे तिथें: निजलेला तोही । परि न दिसे; तेथें वैदेही ।
भुवन एक अति; सुंदर दिसलें । हरिमंदिर ही भिन्न अढळलें ॥ ४ ॥

दो०— रामायुध[२]-अंकित-गृह: शोभा वदलि न जाय ।
नव तुलसींचे वृंद बहु: बघुनि मुदित कपिराय ॥ ५ ॥

इति श्री सुन्दरकाण्ड मंगलाचरणादि बिभीषण-गृहदर्शन-
वर्णनं नाम प्रथमोऽध्यायः ।

अध्याय २ रा

लंका निशिचर-निकर-निवास । इथें कसा: भक्तांचा वास ।
मारुति मनीं; तर्क करुं लागे । त्या समयींच विभीषण जागे ॥ १ ॥
"राम राम" तो; वदे मुखानें । कपि मनिं मुदित; सज्जनचि जाणे ।
भेटुं तयाला; स्वयें जाउनी । साधुचेनि नहि; सु-कार्य-हानी ॥ २ ॥
ब्राह्मणरूपें; हाक मारिली । उठुनि विभीषण; स्वारी आली ।
कुशल विचारी: प्रणाम करुनी । विप्र ! वदा, निज कथा वर्णुनी ॥ ३ ॥

---

१ तराजूच्या पारड्यात. २ धनुष्य बाण.

कीं तुम्हि कोणीः हरिचे भक्त । मन अति माझें प्रेमासक्त ।
कीं तुम्हि रामः दीन-अनुरागी । आलां मजः करण्या सद्भागी ॥ ४ ॥

दो०— तंव सांगे हनुमंत सब; रामकथा निज नाम।
युगल देह पुलकित, मनही; मग्न स्मरुनि गुण-ग्राम ॥ ६ ॥

एक पवनसुत; अमुचि राहणी । जभि विचारी; जशि या दशनीं ।
कधीं तात ! मज बघुनि अनाथ । करितिल कृपा; भानुकुल-नाथ ॥१॥
तामस तनु, लव साधन नाहीं । पदपद्मीं प्रीति न मनिं पाही ।
आतां मम, निश्चय हनुमंता । विना हरिकृपा; भेटि न संतां ॥२॥
रामें यदाः अनुग्रह केला । स्वयेंचि आपण; मला भेटलां ।
एक बिभीषण, प्रभुची रीती । सदा करिति; दासावरि प्रीती ॥३॥
सांग किती मी; परम कुलीन ! । कपि, चंचलः सब रीतीं हीन ।
प्रातर् घेतां; नाम आमुचें । त्या दिनिं मिळे: अन्न न साचें ॥४॥

दो०— असा अधम मी, मख्या श्रुणू, मजवरिही रघुवीर ।
करिति अनुग्रह. स्मरुनि गुणां, भरे विलोचनिं नीर ॥७॥

हें जाणुनि; रामासि विसरतां । भ्रमित कां न ते; दुःख भोगतां ।
ऐसें वदतां; हरि-गुण-ग्रामा । पावति अनि-वाच्य विश्रामा ॥१॥
कथा बिभीषण; वदला पाहे ! । जशी जानकी; तेथें राहे ।
मग हनुमंत, म्हणे श्रुणु भाई । बघूं इच्छितां; सीता माई ॥२॥
युक्ति बिभीषण; सकलहि सांगे । निघे अनिलसुत; निरोप मागे ।
स्व-रूप घेउनि: गेला तेथें । अशोक वनिं; ती सीता जेथें ॥३॥
बघुनि, मानसीं करी प्रणामा । बसल्या कंठी ती[१] निशि यामां[२] ।
कृश-तनु, एक-जटा शिरिं वेणी । जपे हृदयिं; रघुपति-गुण-स्वाणी ॥४॥

दो०— निजपदिं लावुनि नयन, मनें प्रभु पदपद्मीं लीन ।
पवन-तनय अति दुःखितः बघुनि जानकी दीन ॥८॥

वृक्ष पल्लवीं; लपुनि राहिला । काय करूं हा; ध्यास मनाला ।
तदा दशानन; तेथें आला । घेउनि भूषितः बहु नारींला ॥१॥
खल नानापरि, तिज समजावी । साम, दान, भय, भेद दाखवी ।
रावण म्हणे, सुमुखि, बघ सीतें । मंदोदरी, आदि राणींतें ॥ २ ॥

---

१ सीता. २ रात्रीचे चारी प्रहर.

तव अनुचरीः करित पण आहे । तूं एकदां, मजकडे पाहे ।
तृण धरि आडः वदे वैदेही । स्मरुनी रघुवरः अति जे स्नेही ॥३॥
श्रुणु दशमुख ! खद्योत प्रकाशा । कधिं पावे कीं; नलिनि विकासा ।
असें समज मनिं; म्हणे जानकी । प्रभुशर-शक्ति न; खळा ठाउकी ॥४॥
शठ चोरुनि: अणिलें कीं मजसी । अधम निलज्जा; लाज न तुजसी ॥५॥

दो०— मला म्हणे खद्योत-सम; रामा भानुसमान ।
ऐकुनि कटु वच काढि असीः बोले रुषायमान ॥९॥

सीते तूंः वदसी अपमानें । तोडिन तव शिर; तीव्र कृपाणें ।
नातरि सपदि; मान मम वाणी । सुमुखि होइ वधः जीवन-हानी ॥१॥
श्याम-सरोज-दाम-सम सुंदर । प्रभु-भुज करिकर-सम दशकंधर ।
कंठीं तो भुजः कीं असि घोरा । एक हा मम, पण, शठ चोरा ॥ २ ॥
चन्द्रहास हर मम परितापं । रघुपति विरहानल-संजातं ।
शीतल, निशित, वहसि वर धारा । सीता म्हणे, हरी दुखभारा ॥ ३ ॥
मारुं धावला; ऐकुनि वचनां । नीति वदे; मन्दोदरि नाना ।
सांगे, बहु, निशिचरि अणवुनी । भय दावा; सीतेस जाउनी ॥ ४ ॥
मास-भरांत; जरी मानी ना । तरि मारीनः कृपाणें जाणा ॥ ५ ॥

दो०— भुवनिं जाइ दशकंधर :इथें पिशाचिनिवृंद ।
भय दाविति सीतेसि बहुः धरुनि रूप अति मंद ॥ १० ॥

त्रिजटा नामः राक्षसी एका । रामचरणरत; निपुण विवेका ।
जमवुनि सर्वां स्वप्न सांगते । निज-हित साधा; सेवुनि सीते ॥ १ ॥
जाळी वानरः लंका सारी । यातुधान सेना सब मारी ।
खर-आरूढः नग्न दशशीस । मुंडित-शिरः खंडित भुज वीस ॥ २ ॥
ऐसा तो, पितृ-दिशेसि गेला । राज्य मिळालें बिभीषणाला ।
नगरिं फिरे रामाची द्वाही । बोलावुनि, नेती सीताही ॥ ३ ॥
समजा स्वप्नः निश्चयें भारी- । होइ सत्य दिन; जातां चारी ।
ऐकुनि तिचेंः वचन त्या डरल्या । जनकसुतेच्या; पायां पडल्या ॥ ४ ॥

दो०— राक्षसिनी गेल्या सगळ्याः सीता मनीं सुभीत ।
मास-दिवस जातांचि मजः राक्षस वधिल खचीत ॥ ११ ॥

जोडुनि करः वदली त्रिजटेसी । माइ ! विपत्संगिणि तूं असरी ।
त्यजिते तनु; करि शीघ्र उपाया । न साहवेः दुःसह विरहा या ॥ १ ॥

१ रागावून, २ तलवार ३ तलवारीचे नांव. ४ वाईट, ५ दक्षिण दिशेला, ६ संकटात मदत करणारी.

काष्ठ आणुनीः चिता रचावी । माते नंतरः अग्नी लावी ।
सत्य करी प्रीती ही वाणी-।-ऐके कोण शूल-सम कानीं ॥ २ ॥
ऐकुनि वच; नमुनी समजावी । प्रभु-प्रताप-बलः सुयश ऐकवी ।
रात्रीं अनल न; मिळे मैथिली । असें वदुनि निजः सदना गेली ॥ ३ ॥
सीता म्हणे; विधी प्रतिकूल । मिळे न पावक; सुटे न शूल ।
दिसती प्रगट; गगनिं अंगारे । भूमिस येति न; कोणी तारे ॥ ४ ॥
पावक-मय-शशि; देइ न आगी । जणूं मानितोः मज हतभागी ।
ऐक विनति मम; विटप अशोका । सत्य नाम कर; हर मम शोका ॥ ५ ॥
नूतन किसलयः अग्नि-समान । देति न अनल न करिति निदान ।
बघुनि परमः विरहाकुल सीता । होइ कल्पसमः पळ हनुमन्ता ॥ ६ ॥
सो०— कपि मनिं करुनि विचारः टाकुनि दे मुद्रिका तंव ।
जणुं अशोक अंगारः देइ. मुदित घे उठुनि मग ॥ १२ ॥
तंव दिसलीः मुद्रिका मनोहर । 'राम'-नाम अंकित अति सुंदर ।
बघे चकित; जाणुनी मुद्रिका । हृदयीं व्याकुळः सहर्ष-शोका ॥ १ ॥
जिंकिल कोण; अजय रघुराया । बनवुं शकेनाः दुसरी माया ।
विचार करि मग सीता नाना । मारुति मधुर वदे मग वचना ॥ २ ॥
रामचन्द्र-गुण; वर्णुं लागले । ऐकुनि, सीता-दुःख पळालें ।
ती ऐके, मन कान देउनी । कथा वर्णिलीः आदिपासुनी ॥ ३ ॥
श्रवणामृत जो; कथा ओतितो । म्हणे, प्रगट तरि कां न होइ तो ।
मग हनुमंत; निकट तिज आले । फिरुनि बसे; मन विस्मित झालें ॥ ४ ॥
रामदूत मी; जननि जानकी । सत्य सांगतोंः राम-शपथ कीं ।
जननि! मुद्रिका; ही मी अणिली । प्रभुनीं ओळखः तुला अर्पिली ॥ ५ ॥
वानर-नरांस; संगति कैसी ? । सांगे कथाः घडलि मग जैसी ॥ ६ ॥
दो०— प्रेमें कपिवच परिसुनी; उपजे मनिं विश्वास ।
जाणे तनुमनवचनिं हा; कृपासिंधुचा दास ॥ १३ ॥
जाणुनि भक्त; प्रीति करि गाढी । सजल नयन; पुलकावलि जाडी ।
विरह-जलधि; बुडतां, हनुमाना । तात होसि मज; सम जलयाना ॥ १ ॥
सांग कुशल वार्ता मज सारी । अनुज-सहित, सुखधाम खरारी ।
कृपालु कोमल-मन रघुराय । कारण कवण धरिति नैष्ठुर्य ॥ २ ॥
ब्रीद सहज, सेवक सुखदायक । स्मरण कधीं; करिती रघुनायक ? ।
कधिं हि नयन मम, शीतल ताता-।-होती बघुनि श्याम मृदु-कान्ता ॥३॥

---

३ निखारे. ४ शेवट.

वचन न येइ; नयनिं वहु वारी । ' नाथ ! विसर पडला मम भारी ! ' ।
बघुनि परम विरहाकुल सीता । बोले कपिः वचनांसि विनीता ॥ ४ ॥
जननि ! कुशल प्रभुः अनुज समेत । तव दुख-दुखिताचि: कृपानिकेत ।
माते मनि नच माना: ऊणें । प्रेम तुम्हांहुनिः प्रभुचें दुणें ॥ ५ ॥

दो०— रघुपतिचा संदेश तरीः ऐके जननि सधीर ।
होइ वदत कपि गद्गद्. भरे विलोचनिं नीर ॥ १४ ॥

प्रभु वदले; ' तव विरहें सीते । होति सकल: विपरीत चि माते
नव-तरु-किसलय. जणुं कृशानु । काल-निशासम निशिः शशि भानु ॥१॥
कुवलयें-विपिनः कुंतवन-सरिसें । तम--तेल जणुं. तोयदं वर्षे ।
हित होते ते; पीडिति फार । उरग--श्वास--सम; त्रिविध समीर ॥२॥
दुःख सांगताः कांही घटतें । सांगूं कोणा: कोण जाणतें ।
प्रेम तत्व माझें नी तुझें । प्रिय एक मन जाणे माझें ॥ ३ ॥
तें मन सदा. असे तुजपासीं । यांत जाण तूं: प्रेमरसासी ' ।
संदेशा परि-सुनि वैदेही । प्रेम-मग्नः तनु:-भान नसे ही ॥ ४ ॥
मारुति म्हणेः धीर धरि माते । स्मरा राम; सेवक--सुख--दाते ।
मनिं आणाः रघुपतिची प्रभुता । मम वच ऐकुनिः त्याजि कातरता ॥ ५ ॥

दो०— निशिचर--निकर पतंगसम: जळेल राक्षस जाण ।
जननी ! हृदयीं धीर धरीं रघुपति--बाण कृशान ॥ १५ ॥

खबर जरीः रघुवीर पावते । असुरांतक नचः विलंब करते ।
राम--बाण--रवि--उदयीं जानकी । राक्षस हे, तम--निकर जाण कीं ॥ १ ॥
घेउनि जातोंः सीत्र अतांही । राम--शपथ: प्रभु--आज्ञा नाहीं ।
धरा धीरः माते ! दिन कांहीं । रघुवर येतिल कपिसह पाहीं ॥ २ ॥
निशिचर वधुनीः घेउनि जाती । नारदादि. यशः त्रिजगीं गाती ।
असती सब कपि; तुज चि समान ? । यातुधान भटः अति बलवान ! ॥३॥
माझ्या मनीं; परम संदेह । कपि ऐके; प्रगटी निजदेह-।
कनक--भूधराकार शरीर । समरि भयकर अतिबल--वीर ॥ ४ ॥
सीते मनीं; भरवसा आला । मग लघुरूप; पवनसुत झाला ॥५॥

दो०—श्रुणु माते शाखामृगां. नहि बल-बुद्धि विशाल ।
प्रभु-प्रतापें खगपतिसीः खाइल अति-लघु व्याळ ॥१॥

मनीं मुदित; ऐकुनि कपिवाणी । भक्ति-प्रताप-तेज-बल-खाणी
प्रभु-प्रिय जाणुनि;आशिस दिधला । होसि निधानः तात ! बल-शीला ॥१॥

---

१ कमलवन. २ माल्याचे वन ३ मेघ. ४ सीता म्हणते.

अजर, अमर गुण-निधि हो बापा । रघुनायक, करितील बहु कृपा-।
"करिति कृपा प्रभु" ऐकुनि कानां । निर्भर प्रेम: हर्ष, हनुमाना ॥२॥
वारंवार: ठेवि पदिं शीस । वचन वदे: कर जोडुनि कीश ।
मात ! झालों; मी कृतकृत्य । अमोघ आशिस: तव विख्यात ॥३॥
एक जननि मज: अतिशय भूख ।-लागे बघुनि: रम्य-फळ-रुखें ।
श्रृणु सुत करिति;विपिन-रखवाली। परम सुभट: रजनीचर माळी ॥४॥
मात ! त्यांचे; भय मज नाहीं । जरी सौख्य वाटेल तुलाही ॥५॥
दो०—बघुनि, बुद्धि-बल-निपुण कपी; म्हणे जानकी जाइ ।
रघुपति -चरणां हृदयिं धरी; तात मधुर फळ खाइ ॥१७॥
इति श्री सुन्दरकाण्डे हनुमद् बिभीषण संवादादि-सीता-
मारुतिसंवादो नाम द्वितीयोऽध्यायः ।

अध्याय ३ रा

जाइ नमुनि शिर: शिरला बागे । तरु तोडुनि फळ; खाऊं लागे ।
रक्षक बहु भट: तेथें वसती । वधिले कांहीं; कांहिं कळविती ॥१॥
नाथ एक कपि; मोठा आला । अशोक-वनिका;-विनाश झाला ।
फळें खाउनी: विटप उपटितो । रक्षक मर्दुनि; महीं अपटितो ॥२॥
मग नाना भट धाडी रावण । बघुनि तयां; गर्जे हनुमान ।
सकल निशाचर; कपिनें वधिले । कांहीं मृत-सम, रडत पळाले ॥३॥
तो मग धाडी; अक्ष-कुमारा । धेउनि गेला; भटां अपारां ।
येतां; विटपां उचलुनि तर्जे । मारुनि त्यांसि, महाध्वनि गर्जे ॥४॥
दो०— कांहिं मारिले मर्दिले, कांहीं केले चूर ।
कांहिं जाउनी पुकारिती: प्रभु मर्कट अति शूर ॥१८॥
सुतवध ऐकुनि; अती कोपला । इंद्रजीत बलवन्त धाडिला ।
मारुं नको सुत ! बांधी त्यासी । कुठला कोण: बघूं तरि कपिसी ॥१॥
निघे इंद्र-जित; अतुलित वीर । बंधु-निधन करि; कोप-समीर ।
कपि पाही, भट; दारुण आला । घोर गर्जुनी; वीर धावला ॥२॥

१ वृक्ष. २ जमिनीवर.

तरु उपटुनी एक विशाल। केला विरथ; दशानन-बाळ।
किती महाभट: त्याचे संगा!। धर धरुनी: मर्दी निज-अंगा ॥३॥
मर्वां मारुनि: त्यासी भिडला!। जणुं गजराज करिति युद्धाला।
मुष्टी मारुनि; तरुवरि चढला। कांहीं क्षण तो मूर्च्छित पडला ॥४॥
उठतां मग उपजवि बहु माया। जिंकु न शके प्रभंजन-तनया ॥५॥

दो०— तो योजी ब्रह्मास्त्र मग; कपि मनि करी विचार।
　　ब्रह्म-शरा जरि मानुंना, महिमा-नाश अपार ॥१९॥

ब्रह्मबाण तो: कपिला मारी। पडतां पडतां: चमु संहारी।
पाहुनि कपि: मूर्च्छितसा पडला। नागपाश, बांधुनि मग नेला ॥१॥
नाम जपुनि, ज्याचें हि भवानी!। भवबंधन: नर तोडी ज्ञानी।
त्याच्या दूता: बंधन न घडे। प्रभुकार्यार्थेचि: स्वयें सांपडे ॥२॥
बंधन एकुनि, असुर धावले। कौतुक बघण्या सभेंत जमले।
असुर-सभा, कपि बघे जाउनी। प्रभुता अतुलित आली दिसुनी ॥३॥
कर जोडिति सुर: दिशिप विनीत। भृकुटि विलोकिति सकल सभीत।
प्रताप बघुनि न; कपि मनि शंकित। भुजग-गणी जणुं; गरुड अशंकित ॥४॥

दो०— पाहुनि कपिसी दशानन; हसत वदे दुर्वाद[3]।
　　स्मरुनी सुत-वध चित्ति मग: उपजे बहुत विषाद ॥ २० ॥

रावण म्हणे, 'कवण तूं कीश[4]। कोण्या बळें; करिसि वन-नाश।
ठाउक नाहीं: का मी तुजला। शठ दिसतोसी: निर्भय मजला ॥ १ ॥
कां वधिलें मम; निशाचरांला। नाहि भीत का: तूं मरणाला'।
श्रुणु रावण: ब्रम्हांड-निकायां। बळें जयाच्या; रचिते माया ॥ २ ॥
बळें जयाच्या, विधि हरि ईश।' पाळिति, सृजति; हरिति, दशशीश।
जयाबळें शिर; धरि अमितानन[5]।-अंडकोश: गिरि-समेत कानन ॥ ३ ॥
विविध देह जो; धरि सुर-पाता। तुजसम शठां: सुशासन-दाता।
शिव-धनु कठिन; करी जो भंजन। तुज समेत, नृप-दल-मद-गंजन ॥ ४ ॥
खर दूषण; त्रिशिरा अणि वाली। वधी, सकल तुजसम बलशाली ॥५॥

दो०— लेश बळानें ज्याचिया; विजित[6] चराचर सारि।
　　दूत तयाचा ज्याचि तूं; अणिली चोरुनि नारि ॥ २१ ॥

---

१ इंद्रजित २ वायु-पुत्राला, ३ अपशब्द. ४ वानर. ५ शेष. ६ तूं जिंकलेंस.

मी जाणतों; तुझी रे! प्रभुता । दिसली दशशतः-भुजासि लढतां[1] ।
लढुनि वालिशीं; यश मिळविलें । बोलेना[2]; हसण्यावरि नेलें ! ॥ १ ॥
फळें खिलीं; होती भूख; । कपी स्वभावें; तोडि रूख ।
सर्वां देह, परम प्रिय स्वामी! । मारूं लागले: कुमार्ग- गामी ॥ २ ॥
मज मारिती, तय, मी वधिलें । त्यावरि तनयें; तुझ्या बांधिलें ।
बंधनाचि मज; नाहीं लाज । मज करणें प्रभुचें निज काज ॥ ३ ॥
विनति करूं, कर; जोडुनि रावण । एक त्यजुनि मद; माझी शिकवण ।
स्वकुल-महत्ता; मनीं विचारीं । भ्रम त्यज भज हि भक्त-भय-हारी ॥४॥
भयें जयाच्या[3] काळहि डरतो । जो सुर, असुर; चराचर गिळतो ।
त्यांसि शत्रुता; कधिं न करावी । माझ्या वचनें; जानकि द्यावी ॥ ५ ॥

दो०— प्रणत-पाल रघुनायक; शोभासिंधु खरारि ।
जाइ शरण; प्रभु रक्षिती: विसरुनि तव कृति सारि ॥ २२ ॥

राम-चरण;-पंकज मनिं धरिशी । लंका राज्यः अचल तूं करिशी ।
पुलस्ति-मुनियश विमल मयंक । होउं नको त्या शशिसि कलंक ॥१॥
राम-नामाविण गिरे न शोभा । करा विचारा त्यज मद लोभा ।
वसन-हीनः शोभे न सुनारी । सबभूषण;-भूषित वर-नारी ॥२॥
राम-विमुखः संपति ऐश्वर्य । असुनी नाहीं: असलें जाय ।
सजल-मूल ज्या नसती सरिता । सुकुनी जाती: वर्षा सरतां ॥३॥
श्रुणु रावण ! पण, वदतों वाणी । प्रभु-विमुखा: त्राता नहि कोणी ।
शंकर अमितः विष्णु अज तुजला । राखुं न शकतिः प्रभु-द्रोह्याला ॥४॥

दो०—मोहमूल अतिशूल-प्रद, त्यागी तम अभिमान ।
भजे राम रघुनायक; कृपा सिंधु भगवान ॥२३॥

यदपि वदे कपि; अति हित-वाणी । भक्ति--विवेक--विरति--नय—खाणी ।
बोले हसुनि; महा अभिमानी । भेटे कपि मज; गुरु बहु ज्ञानी ॥१॥
मृत्यु निकट रे ! खल तव आला । अधमा ! गोष्टी सांगसि माला ।
होइल उलटचि म्हणे वायुसुत । भ्रमित मनीं तव दिसते प्रगट ॥२॥
कपिवच ऐकुनि; क्रुद्ध जहाला । [5]सत्वर हरा; मूढ प्राणाला ।

---

१ सहस्रार्जुनाबरोबर. २ रावण गप्प राहिला. ३ जो काळ. ४ वाचेला.
५ आणि रावण म्हणाला,

ऐकुनि निशिचर; मारूं धावले । सचिवांसहित; बिभीषण आले ॥३॥
पद वंदुनि करि; विनति नम्रतां । नीति—विरोध; न मारा दूता ।
अन्य दंड द्यावा नृप ! बंधू ! । वदले सकल; मंत्र अति साधू ॥४॥
ऐकुनि हसत; वदे दशकंधर । अंगभग्न हा. सोडा वानर ॥५॥

दो०— कपि ममता पुच्छावरी; सर्वहि घ्या जाणून ।
तैलपटां[1] बांधुनी मग; पावक द्या लावून ॥ २४ ॥

पुच्छहीन, वानर मग जाइल । शठ निजनाथा; घेउनि येइल ।
ज्यांची वदला; बहुत महत्ता । पाहिन मी मग; त्यांची प्रभुता ॥१॥
वचन ऐकुनी; कपि मनिं हसला । गमे, "शारदा; सहाय मजला" ।
राक्षस ऐकुनि रावण-वचना । करूं लागले, त्रिमूढ, रचना ॥२॥
राहि न नगरिं; वसन घृत तेल । वाढे पुच्छ; करी कपि खेळ ।
कौतुक बघुं; आली पुरजनता । थट्टा करिती मारिति लाथा ॥३॥
पिटिति ढोल पिटताती टाळी । नगरिं फिरवुनि; पुच्छा जाळी ।
पावक जळत; बघुनि हनुमंत । होइ परम; लघुरूप त्वरांत ॥४॥
उडुनि चढे कपि; कनक-गृहांवरि । सभीत झाल्या, सर्व निशाचरि ॥५॥

दो०— हरि-प्रेरित अवसरिं सकल; आले मरुतहि खास ।
अट्टाहास कपि गर्जती; वाढे; स्पर्शे नभास ॥२५॥

विशाल तनु परि, अति लघुता ती । एका वरुनि अन्य गृहिं जाती ।
जळे नगर;-जन हवाल-दील । ज्वाला भडकति; कोटि कराल ॥१॥
बाबा ! आई! बोंबा उठती । अम्हां समयिं या; कोण तारिती ! ।
वदलो ना ? हा वानर नाहीं । कोणी सुर, कपिरूपें पाहीं ॥२॥
साधु-अवज्ञेचें; फळ मिळतें । अनाथ-नगरा,—सम पुर जळतें ।
क्षणांत एका; नगर जाळिलें । एक बिभीषण-सदन राखिलें ॥३॥
त्यांचा दूत; अनल जे सृजिती । म्हणुनि न जळला; कपी, पार्वती ! ।
उलट सुलट; लंके[2] मग जाळी । जाऊनि उडी, सागरीं घाली ॥४॥

दो०— पुच्छ विझवुनी हरी श्रमा; पुन्हां धरी लघुरूप ।
जनक-सुतेचे पुढें करां, जोडुनि राहे चूप ॥२६॥

कांहीं चिन्ह; मला द्या मातें ! । जसें दिलें; रघुनाथें मातें ।
चूडामणि मग; काढुनि देई । हर्षें पवन-तनय तो घेई ॥१॥

---

१ तेलात भिजविलेलीं वस्त्रें. २ लंकिनी (प्रवेशकरितांना जिला मूठ मारिली होती ती.)

म्हणे तात! सांगुनि प्रणामा। वदा "प्रभो हे सुपूर्ण-कामा! ।
दीन दयाळा: ब्रीद विचारा। हरा नाथ! मम संकट-भारा ॥२॥
तात! शक्रसुत कथा वदावी। इषू-प्रतापाची स्मृति द्यावी।
जरि मासांत; नाथ ना येती। तरि मग मज ना: जिवंत बघती ॥३॥
वद कपि केवि; धरूं प्राणांतें। तूं तर म्हणसी: 'जातो, माते!'।
शीतल झालि: बघुनि तुज छाती। मजला पुन्हां: त्याच दिनराती" ॥४॥

दो०— सीतेला समजावुनी: बहु परि देउनि धीर।
चरण कमलिं शिर ठेवुनी; गमन करी कपिवीर ॥ २७ ॥

इति श्री सुन्दरकाण्ड–अशोकवन–विध्वंसनादि–लंकादहन–
वर्णनं नाम तृतीयोऽध्यायः।

अध्याय ४ था

जात महाध्वनि: गर्जे भारी । स्रवती गर्भ निशाचर-नारी ।
सागर लंघुनि; पार हि आला । वानर ऐकति; शब्द किल-किला ॥१॥
हर्षति सर्व, बघुनि हनुमाना । नूतन जन्म: म्हणति झाला ना!।
प्रसन्न मुख, तनु तेज-विराजित ।–बघुनि, म्हणति; आला कृतकृत्य ॥२॥
भेटुनि सकल; होति सुखरूप । मरत मीन: पावे जळ खूप ।
मुदित निघाले; रामापासीं । वदत पुसत नव: इतिहासासी ॥३॥
सकलहि मग ते; मधुवनिं शिरले । अंगद-संमत; खाति मधु-फळें ।
रक्षक जेव्हां; वर्जु लागले । मुष्टि-मार, मिळतांत्रि पळाले ॥ ४ ॥

दो०— जाउनि देती खबर सव: वन उजाडि युवराज।
सुकंठ हर्षित म्हणे कपी: येति करुनि प्रभुकाज ॥ २८ ॥

सीता खबर; जरी ना मिळती । मधुवन-फळ: खाऊं कीं शकती ।
यापरि विचार;[१] करितो राजा । तों आले कपि: सहित-समाजा ॥ १ ॥
येउनि सकल; नमिति पदिं शीस। मोदें भेटे तयां, कपीश।
पुसती[२] कुशल–कुशल पद दिसले। रामकृपेनें, सुकार्य घडलें ॥ २ ॥

---

१ सुग्रीवाची बाग. २ अंगदादि कपी म्हणाले.

नाथ ! कार्य हें; करि हनुमान । रक्षी सकल कपींचे प्राण ।
एकुनि पुनरपि; भेटे त्याला । सहित कपीं: प्रभुकडे निघाला ॥ ३ ॥
कपींस येतां: रघुवर पाहति । झालें कार्य; बघुनि अति हर्षति ।
स्फटिक-शिळवरि; उभय बैसले । सकळ जाउनी: पायां पडले ॥ ४ ॥
दो०— प्रीति सहित अति भेटती; रघुपति करुणापुंज ।
कुशल विचारिति नाथ ! सब: कुशल बघुनि पदकंज ॥ २९ ॥
म्हणे भालुपति; श्रृणु रघुराया । नाथ करां; ज्यावरी तुम्हि दया ।
त्यासि सदा शुभ; कुशल निरंतर । सुर नर मुनिही: प्रसन्न त्यावर॥१॥
तो विजयी; विनयी, गुणसागर । यश त्याचें त्रिभुवनीं सु-भास्वर ।
अपुल्या कृपें, सफळ सब काज । अमुचा जन्म: सुफळ बहु आज ॥२॥
नाथ ! पवनसुत;–कृत ही करणी । अवर्णनीया, सहस्र-वाणी ।
पवन-सुताचें चरित्र सुंदर । वदे ऋक्षपति. एकनि रघुवर ॥३॥
तदा कृपाब्धी प्रसन्न झाले । पुन्हां कपिवरा; हृदयिं कवळिलें ।
सांग तात ! मज कशी जानकी । -राहे; रक्षी: स्वीय असू कीं ॥४॥
दो०— " नाम पाहरा दिवानिशीं: अपुलें ध्यान कपाट ।
लोचन निजपदिं यंत्रित: जाण्या प्राण न वाट ॥३०॥
निघतां मज: चूडामणि दिधला " । रामें घेउनि हृदयीं धरिला ।
नाथ ! युगल लोचनिं बहु वारी, । -निरोप सांगे: जनक-कुमारी १॥
अनुजा सह नमुनी प्रभुचरणां ! । – दीन बंधु प्रणतार्ती-हरणा ।
तनु मन वचन चरण-अनुरक्ता । दोषें कवण, असें मी त्यक्ता ॥२॥
अवगुण एक; असे मम जाणां । विरहें प्राण न; करी प्रयाणा ।
तो नयनांचा: दोषचि सगळा । प्राणां जातां: करिति अडथळा ।
विरह वन्हि. तनु तूळें समीर । -श्वास; जळे निमिषांत शरीर ।
स्रवती नयन जला स्वहितांसी । तनु न जाळेव; विरहाग्नीसी ॥४॥
सीता-विपदा; अती विशाला । वदें न वदणें दीन दयाळा ॥५॥
दो०— निमिष निमिष करुणानिधी; जाते कल्प समान ।
जाउनि सत्वर अणा प्रभू: खल-दल हरुनी प्राण ॥३१॥
सीता-विपद: श्रवुनि सुख-अयना । भरलें जळ बहु; राजिव-नयनां
तनु-मन-वचनें; मम गति ज्यांसीं । स्वप्नि हि होय किं; विपत्ति त्यांसीं ।१।
म्हणे पवनसुत: तीच विपत्ति । स्मरण, भजन तव; यदा न घडती ।
काय राक्षसां, पाड असे कीं । आणिति जिंकुनि; नाथ जानकी ॥२॥

१जाबवान, २ कापूस, ३ रामचंद्राच्या दर्शनाची आशा,

श्रुणु मारुति; तुजसम उपकारी । कुणि नहिः सुर-नर;-मुनि;-तनुधारी ।
प्रति-उपकार, करूं तुज कोण । मम मन सन्मुखः होउं शके न ॥ ३ ॥
श्रुणु सुत अनृणः तुझा मीं नाहीं । विचार करितां; गमे मनाही ।
कितिदां बघति; कपीसि कृपाल । सजल नयन; पुलकित सुर-पाल ॥४॥

दो०— प्रभुवच परिसुनि बघुनि मुखः मुदित-गात्र हनुमंत ।
पायिं पडे प्रेमाकुल; पाहि ! पाहि ! भगवंत ॥ ३२ ॥

पुनः पुन्हां प्रभुः उचलुं पाहती । प्रेम-मग्न-मनः उठूं न शकती ।
प्रभु-कर-पंकज; कपिचे शीसा । स्मरुनी दशा, प्रेम गौरीशा ॥ १ ॥
सावधान मनः करुनी शंकर । सांगुं लागले कथा मनोहर ।
उचलुनि कपिला, हृदयीं धरिलें । करें धरुनि अतिः निकट बसविलें ॥२॥
वद कपि रावणः-पालित लंका । दुर्ग, जाळली कशि नहि शंका ? ।
प्रभू प्रसन्न बघुनि, हनुमान ।-बोले वचन; विगत अभिमान ॥ ३ ॥
शाखा मृगांसिः बहु पुरुषार्थ ! । शाखें शाखें; उडणें व्यर्थ ।
लंघुनि सिंधुः कनक-पुर-होळी । निशिचर-गण-वध; वन-खांडोळी ॥४॥
प्रताप सब हा प्रभु तव पाही । नाथ मुळीं मम ना प्रभुता ही ॥ ५ ॥

दो०— त्यासी दुर्गम कांहिं नसे; ज्यासी प्रभु अनुकूल ।
रामबळें वडवाग्निसी; जाळुं शके खलु तूल ॥ ३३ ॥

नाथ ! भक्ति तव; अति सुखदायिनि । द्यावी कृपा; करुनि, अनपायिनि ।
ऐकुनि परम, सरल कपि-वाणी । असें घडो; प्रभुः वदे भवानी ॥ १ ॥
उमे ! कळे प्रभु;-स्वभाव ज्याला । कांहिं न रुचे; भजन-विण त्याला ।
हा संवाद; मनीं ज्या भावे । रघुपति-चरण-भक्ति तो पावे ॥ २ ॥
ऐकुनि वचन; वदति कपि-वृंद । जय जय जयः कृपालु सुखकंद ।
बोलावुनि कपि-पतिसि खरारी । म्हणति निघावें; करा तयारी ॥ ३ ॥
कवण्या कारण; विलंब कीजे । कपिनां त्वरवर; आज्ञा दीजे ।
कौतुक बघुनी; सुमन वर्षती ।-हर्षित सुर नभिं; भवना निघती ॥ ४ ॥

दो०— बोलावी सुग्रीव तंव; आले यूथप-यूथ ।
नाना वर्णहि अतुल बली; वानर-भालु-वरूथ ॥ ३४ ॥

प्रभुपदपंकजिं; नमुनी शीस । गर्जति भालु; महाबल कीश ।
दिसलें प्रभुसि; सकल कपि सैन्य । बघति कृपेनें; राजिव-नयन ॥ १ ॥

---

१ विध्वंस. २ अस्वल (भालु हा संस्कृत शब्द आहे).

राम–कृपाबल–युक्त कपींद्र । होति पक्षयुत: जणूं गिरींद्र ।
प्रभु हर्षित मग; करी प्रयाणा । शकुन होति; सुंदर शुभ नाना ॥ २ ॥
वस्तु मंगलमय; ज्याची कीर्ती । तया प्रयाणिं; शकुन ! ही नीती ।
प्रभु–प्रयाण; जाणे वैदेही । वदे स्फुरण: वामांगीं देहीं ॥ ३ ॥
शकुन जानकिसि; होतो जो जो । रावणानि मग: अशकुन तो तो ।
निघे कटक; किति सांगु न पार । गर्जति वानर: भालु अपार ॥ ४ ॥
नख–आयुध: गिरि–पादप–धारी । भू–नभ–गामी; इच्छा–चारी ।
केसरि–नाद; भालु-कपि करिती । दिग्गज डग.-मगती, चिक्करिती ॥५॥

छं०— चिक्करिती दिग्गज: कंप महि, गिरि लोल. सागर खळबळे ।
मनि मोद सव; गंधर्व–सुर–मुनि–नाग-किन्नर–दुख टळे ॥
कटकटति मर्कट: विकट भट बहु: कोटि कोटी धावती ।
जय राम प्रबल:–प्रताप, कोशल–नाथ-गुण-गण वर्णिती ॥१॥
सहुं शके भार न, शेष फारहि, वार बहु अति, मोहती ।
धरि दशनिं किति दां; कमठपृष्ठ; कठोर, तें जणुं शोभती ॥
रघुवीर रुचिर, प्रयाण प्रस्थिति; बघुनि परम सुशोभनी ।
जणुं कमठ-खर्परिं: सर्प-राजचि लिहिति अविचल पावनी ॥२॥

दो०— ऐसे जाउनि कृपानिधी: आले सागर–तीर ।
खाउं लागले तिथें फळ: विपुल भालु कपिवीर ॥ ३५ ॥

इति श्री सुन्दरकाण्डे हनुमदागमनादि श्रीरामादीनां
सागरतीरागमनं नाम चतुर्थोऽध्यायः ।

अध्याय ५ वा

इथें राक्षसां: त्रासी शंका । जें कपि जाळुनि गेला लंका ।
निज गृहिं सकलहि: करिति विचारा । निशिचर–वंशा: नसे आसरा ॥ १ ॥
दूतबलातें, न वर्णवे कीं । नगरिं येत ते काय होय कीं ! ।
दूतिमुखें जन–वाणि ऐकिली । मंदोदरि अति; विव्हळ झाली ॥ २ ॥

१ पंख फुटलेले. २ सिंहनाद. ३ पाठीवर ४ शेष.

रहेसि जुळुनि कर;पति-पदिं पडली। बोले वाक्य, नीतिरस-भरलीं।
राम-विरोधा; नाथ त्यजावें। मम वच हितकर; मनीं धरावें॥३॥
बघुनि, जंया; दूताची करणी। स्रवति गर्भ रजनीचर-गृहिणी।
निज सचिवासह; त्यांची नारी। धाडा; जरि हितइच्छा भारी ॥४॥
तव कुल-कमल-विपिन-दुख-दाई। सीता शीत-निशा सम होई।
सीता दिधल्या-विण हित नाथ। करूं शकति ना विधि गिरिनाथ॥५॥

दो०— रामबाण अहिगण सरिस; निशिचर निकर सु-भेक।
जोंवरि गिळति न तोंवरी: यत्न करा सविवेक॥ ३६॥

शठ कानीं; ऐकुनि ती वाणी। विहसे विश्व-विदित अभिमानी।
सभय स्वभाव: स्त्रियांचा साचा। मंगलांत भय; विचार काचा॥ १॥
मर्कट कटकें; यदि बहु येती। सजिव बिचारे: निशिचर खाती।
कांपति लोकप, ज्याच्या त्रासें। त्याची नारि; सभय! हें हासें॥ २॥
बोलुनि, आलिंगी निजकांते। जाइ सभेसी, साधिक ममतें।
मंदोदरि-चित्ता; बहु चिंता। विधि विपरीत; वळे निज-कान्ता॥३॥
सभेंत वसतां; खबर मिळाली। सिंधुपार बहु; सेना आली।
म्हणे 'सचिव! मत उचितचि सांगा'। ते म्हणती कीं: स्वस्थ रहा गा॥४॥
जिंकुनि सुरासुरां श्रम नाहीं। नर वानर मग: हिसाब कांहीं!॥५॥

दो०— सचिव, वैद्य, गुरु, तिघे जरी: प्रिय बोलति भय, आस।
राज्य धर्म तनु तीन हीं, सत्वर पावति नाश॥ ३७॥

तोचि रावणा; योग मिळाला। मुखावरी बहु; करिती स्तुतिला।
अवसर बघुनि; विभीषण आले। भ्रातृचरणिं निज; मस्तक नमिलें॥१॥
शिर नमुनी, निज; आसनिं बसले। अनुज्ञेसि मग; घेउनि वदले।
कृपाळु जरि मज; पुसती वार्ता। यथामती हित वदतों ताता!॥ २॥
कांक्षिति कोणी; जे कल्याणा। सुयश, सुमति;शुभगति, सुख नाना।
तरि पर-नारि;-ललाटा जाण। त्यजा चतुर्थी—चंद्र—समान॥ ३॥
चौदा भुवनिं; एक पति होई। भूत-द्रोह-रत; टिके न भाई।
गुणसागर; नागर नर जोही। अल्पहि लोभें; अवघ तोही॥ ४॥

दो०— क्रोध काम मद लोभ सब; नरकदायि हे पंथ।
हें सोडुनि रघुवरा भजा; भजती ज्यासी संत॥ ॥३८॥

---

१ एकांतांत. २ ज्याच्या. ३ मोठे बेडूक. ५ रावण म्हणे. ६ निंद्य.
४ कैलासपति.

तात ! राम न हि नर-भूपाल । भुवनेश्वर; काळांचा काळ ।
ब्रह्म अनामय; अज भगवंत । व्यापक अजित अनादि अनंत ॥१॥
गो-द्विज-धेनु;—देव—हितकारी । कृपासिंधु, मानुष—तनु—धारी ।
जन-रंजन; दुर्जन भंजनही । वेद-धर्मः—रक्षक तो प्रभुही ॥२॥
त्यजुनि वैर त्यां; नमवीं माथा । प्रणतार्ती-भंजन रघुनाथा ।
द्यावी प्रभो ! प्रभुनि वैदेही । भजा राम; निर्हेतुक स्नेही ॥३॥
शरण येति त्या; प्रभु न त्यागिती । विश्व—द्रोह पापी जरि असती ।
नाम जयाचें; त्रिताप—नाशन । ते प्रभु प्रगटः समज मनि रावण ॥४॥

दो०— चरण धरुनि बहुवार तुझः विनति करूं दशशीश ।
काम मोह मद सांडुनीः भजा कोसलाधीश ॥३९॥ (क)

दो०— मुनि पुलस्ति निज शिष्यमुखें; धाडुनि देती मात ।
सत्वर ती मी निवेदिली; बघुनी सुसमय तात ! ॥३९ (ख)

माल्यवंत, मंत्री अति सुज्ञ । सुख मानी, हें ऐकुनि वचन ।
तात । अनुज तवः नीतिविभूषण । करा मान्य, जें; म्हणे बिभीषण ॥१॥
[२]रिपु-उत्कर्ष; वदति शठ दोन्ही । दूर करा ! नाहीं का कोणी ।
माल्यवंत मग; गृहा परतला । कर जोडुनी; बिभीषण वदला ॥२॥
सुमति कुमति;सकळां मनिं वसती । वेद पुराण; नाथ हें वदति ।
सुमति तिथें; संपत्ति नाना । कुमति तिथें आपत्ति निदाना ॥३॥
तव मनि कुमतीः वसलि विचित्र । हित अनहित; मानिसि रिपु, मित्र ।
काळ-रात्रि जीः निशाचरांची । सीतेवरि त्या प्रीति फारची ॥४॥

दो०— चरण धरुनि प्रभु ! मागतोः इतुकें या मूर्खास ।
सीता द्यावी रघुवराः अहित होइना खास ॥४०॥

बुध, पुराण—संमत—श्रुति—वाणी । वदे बिभीषणः नीती वानी ।
ऐकुनि रावणः उठ कोपला । खल तव मृत्यु; निकट अति आला ॥१॥
जगसि सदा शठः ज्यां जगवीला । रिपुचा पक्ष; मूढ ! तुज रुचला ।
असा कोण जगिं सांग तरि खला । जया भुजबळें नसे जिंकिला ॥ १ ॥
मम पुरि वसुनि; तापसीं प्रीती । भेट तयां जाः सांग नीती ।
वदुनि असेंः करि पदें प्रहार । अनुज धरी पदः वारंवार ॥ ३ ॥

१ समुदाय २ रावण म्हणाला

हेंचि उमे! मोठेपण संतां । भलें करिति: अपकारीं छळितां[1] ।
भलें पित्यासम; मारां माला । स्वहिता-स्तव प्रभु! भज रामाला ॥४॥
सचिवा घेउनि: नभ-पथिं गेला । सर्वां समक्ष; ऐसें वदला ॥ ५ ॥
दो०— राम सत्य-संकल्प प्रभू; सभा तुझी वश काल ।
मी रघुवीरा शरण, मग; दोष मला ना घाल ॥ ४१ ॥
जाइ विभीषण; सांगुनि जेव्हां । आयुहीन सव: झाले तेव्हां ।
साधु-अवज्ञा; त्वरित भवानी । करी अखिल; कल्याणा हानी ॥ १ ॥
यदा विभिषणा, रावण त्यागी । होइ विभव-विण: तदा अभागी ।
जाइ मुदित; रघुनाथा-पाशीं । असे मनोरथ; करित मनासी ॥ २ ॥
जाउनि पाहिन; पद-जलजांनां । अरुण, मृदुल; सेवक-सुखदांनां ।
पद लागुनि; तरली ऋषि-नारी । दंडक-कानन-पावनकारी ॥ ३ ॥
जे पद जनक-सुता मनिं धरिते । धावति कपट:-मृगा-मागें तें ।
हर-उर-सर-सरसिजिं पद जेही । अहो! भाग्य मम: बघेन तेही ॥ ४ ॥
दो०— ज्या पायींच्या पादुका; भरतहि ध्यानिं मनांत ।
ते पद पाहिन आज तरी; या लोचनीं क्षणांत ॥ ४२ ॥

इति श्री सुन्दरकाण्डे मंदोदरी-रावण-संवादादि-विभीषण
मनोरथवर्णनं नाम पञ्चमोऽध्याय: ।

अध्याय ६ वा

प्रेमें यापरि; करित विचारा । आला सपदि: सिंधुचे पारा ।
बघुनि येत, कपि: विभीषणास । म्हणति कोणि; रिपुदूतचि खास ॥१॥
रोधुनि त्या कपि-पतिसी आले । समाचार तो सकल बोलले ।
कपिपति म्हणे; एक रघुनाथा । भेटूं आला: रिपुचा भ्राता ॥ २ ॥
सख्या! म्हणति प्रभु;निज-मत सांगा । म्हणे कपीश: एक , श्री-रंगा ।
समजेना प्रभु; ,निशिचर-माया । कामरूप कीं; येत पहाया ॥ ३ ॥
भेद पहाया; शठ हा आला । ठेवा बांधुनि, रुचतें माला ।
सख्या नीति ही; उत्तम सारी । ममपण, शरणा;--गत--भयहारी ॥४॥

---

१ अपकार करणाऱ्यांनीं.

ऐकुनि वचन; मुदित हनुमंत। शरणागत-वत्सल भगवंत!॥५॥

दो०— शरणागतांसि जे त्यजिती; जाणुनि अनहित-खाणि।
ते नर पामर पाप-मय; त्यांचे दर्शनिं हानि॥४३॥

कोटि विप्रवध; पातक ज्यासीं। येतां शरण; त्यजूं ना त्यासी।
सन्मुख होति; जीव मम जेव्हां। जन्मकोटि-अघ; नासे तेव्हां॥१॥
पातक्यासि तों; सहज स्वभावें। माझें भजन; कधीं ना भावें।
दुष्टहृदय जरि; खरांच असता। माझे सन्मुख;कधिं तरि वळता?॥२॥
निर्मल-मन. जन; तो मज पावे। कपट, छिद्र, छल; मज ना भावे।
भेदास्तव जरि; असे धाडिला। लाभ हानि नहि; कपीश मजला॥३॥
सख्या! जगीं या; निशिचर जितुके। क्षणांत लक्ष्मण; मारिल तितुके।
जगी शरण तो; सभीत आला। प्राणांसम मी; जपेन त्याला॥४॥

दो०— उभय रीतिं या धेउनी; हसले कृपानिकेत।
जयकारें मग कपि निघती; अंगद हनू समेत॥४४॥

सादर पुढें. करुनि त्या वानर। जाति जिथें; रघुपति करुणाकर।
दुरुनि दिसले; दोघे भ्राते। नयनानंद, जनानां दाते॥१॥
पुन्हां राम. छवि-धाम विलोकुनि। स्तब्धचि राह; निमिष रोखुनि।
प्रलंब भुज कंजारुण लोचन। श्यामल तनू प्रणत-भय-मोचन॥२॥
वृषस्कंध, उर आयत शोभे। आननिं; अमित-मदन-मन लोभे,।
तनु पुलकित; नयनी बहु नीर। बोले मृदु; मनिं धरुनी धीर॥३॥
नाथ असे मी; रावण—भ्राता। निशिचर-वंशिं; जन्म मा—कांता।
सहज पाप-प्रिय तामस देह। यथा तमावरि; उलुका स्नेह॥४॥

दो०— यश ऐकुनि आलों असें; प्रभु भंजन भवभार।
त्राहि त्राहि आर्ती-हरणा; शरण-सुखद; सुखसार॥४५॥

वदुनि दंडवत; करितां दिसला। उठले प्रभु मनिं हर्ष जाहला।
दीन वचन; परिसुनि मनिं भरला। बाहु-विशालें; हृदयीं धरला॥१॥
भेटुनि सानुज; सचिव भारी। - वसवुनि वदले; जन-भय-हारी।
वद लंकेशा; सहित परिवारा।--कुशल कुठायीं; वसति सुखकरा॥२॥
खळ-मंडळिं; दिनरात वसा कीं। सख्या! धर्म निभतोचि कसा कीं।
मज कळली; तुमची सब रीती। अति नय-निपुण, न, रुचे अनीती॥३॥

---

१ हनुमंत.

भला वास नरकांत हि ताता। दुर्जन-संग न; देउं विधाता,।
पद-दर्शनें; कुशल रघुराया। केली दासा-वरी निज दया ॥४॥

दो०— तोंवरि जीवा कुशल नस; स्वप्नि न मनि विश्राम।
जोंवरि न भजे प्रभा तुज; त्यजुनि शोक-गृह काम ॥४६॥

तों-वरि वसति; मनीं खल नाना। लोभ मोह मद; मत्सर जाणां।
जोंवरि वास, न; मनि, रघुनाथा। करीं चापसायक कटि भाता ॥१॥
ममता तरुण;-रजनि अंधारी।-द्वेष-राग: घुवडां, सुखकारी।
-तोंवरि वसे; जीव मनि पाही। जोंवरि प्रभु:-प्रताप--रवि नाहा ॥२॥
कुशल अतां मीं; भय ही हरलें। राम! बघुनि, पद-कमल आपुलें।
प्रभू कृपालु, जया अनुकूल। त्यासि न व्यापि; त्रिविध भव-शूल ॥३॥
मी निशिचर, अति; अधम स्वभावें। शुभ आचरण: कधीं ना ठावें।
जें स्वरूप मुनि;-ध्यानिं न येतें। ते प्रभु धरिति; मला हृदयात ॥४॥

दो०— अहो! भाग्य मम अमित अती; राम कृपा-सुखपुंज।
दिसले नयनिं; विरंचि-शिव;-सेव्य युगल पदकंज ॥४७॥

एक वदूं निज;-स्वभाव धन्या। जाणति काक, शंभु, गिरि-कन्या।
जरि नर होइ; चराचर द्रोही। येई शरण; सभय जरि तोही ॥ १ ॥
त्यजुनि मोह मद; छलादि नाना। सर्पादि साधुसम: करुं त्या जाणा।
जननि जनक सुत बंधू दार। तनु धन धाम: सुहृद परिवार ॥ २ ॥
यांची ममता, ताग: विणोनी।-गुण; मम पदिं मन: दे जखडोनी।
समदर्शी मुळिं: इच्छा नाहीं। हर्ष शोक भय: मनि न च कांहीं ॥३॥
हे सज्जन: मनि; वसती कैसे। लोभ्या हृदयिं: वसे धन जैसें।
तुज मम: साधू प्रिय बहु असती। धरूं देह; नहि अन्य-विनंती ॥ ४ ॥

दो०— सगुण उपासक परहित:- निरत नीति दृढ नेम।
नर ते प्राण-समान मम: ज्यांचे द्विजपदिं प्रेम ॥ ४८ ॥

शृणु लंकेश; सकल गुण तुजसी। म्हणुनी तूं प्रिय; अतिशय मजसी।
राम-वचन; ऐकुनि कपियूथ। सकल म्हणति; "जय; कृपा-वरूथ" ॥१॥
बिभिषण ऐके प्रभुची वाणी। तृप्ति नसे; श्रवणामृत मानी।
पदांबुजां धरि; वारंवार। हृदयिं राहिना; प्रेम अपार ॥२॥

१ काकभुशुंडी. २ तागाचा वाख. ३इतरांच्या प्रार्थनेनें.

एका देव; चराचर-स्वामी। प्रणत-पाल, प्रभु! अंतर्यामी।
कांहि वासना; होती पहिली। पदप्रेम-सरितेंत वाहिली ॥ ३ ॥
अतां कृपालु; भक्ति निज पावनि। द्यावि सदा; शंकर-मन-भावनि।
'एवमस्तु;' म्हणुनी प्रभु धीर। मागति सपदिः सिंधुचें नीर ॥ ४ ॥
यद्यपि सख्या; इच्छा तुज नाहीं। मम दर्शन, जगिं; अमोघ पाहीं।
असें म्हणुनि त्याः टिळक लाविती। नभांतुनी बहु; पुष्प वर्षती ॥ ५ ॥

दो०— दशमुख-कोपाग्नि अनल, निजः-श्वास समीर प्रचंड।
जळत बिभीषण रक्षिला; दिधलें राज्य अखंड ॥ ४९ (क) ॥
,, शिवें रावणा संपद जी; दिली देत दशमाथ।
,, तीच संपदा बिभीषणा; संकोचें रघुनाथें ॥ ४९ (ख) ॥

त्यजुनि असा प्रभु, भजती आनां। ते नर पशु; विण पुच्छ विषाणा।
दास जाणुनी; केला अपुला। स्वभाव प्रभुचा; कपींस रुचला ॥१॥
मग सर्वज्ञ; सर्व उर—वासी। सर्वरूप, सबरहित उदासी।
वदती वचन; नीति संरक्षक। कारण-मनुज; दनुज-कुल-नाशक ॥२॥
श्रुणु कपीश; लंकापति वीरा। तरणें कसें; जलधि गंभीरा?।
संकुल, मकर; उरग, झष-जाती। अति अगाध; दुस्तर सब रीती ॥३॥
मग लंकेश; म्हणे 'रघुनायक। कोटि-सिंधु;-शोषक तव सायक।
तदपि नीति; ऐसें म्हणत कीं। सागरासि; करणें विनती कीं ॥४॥

दो०— प्रभु अपुले कुलगुरु जलधि वदति उपाय-विचार।
प्रयास विण सागर तरती कपि-कटकें हि अपार ॥५० ॥

सख्या बोललां; योग्य उपाय। करूं; होइ, जरि; दैव सहाय।
लक्ष्मणासि हा; मंत्र न भावे। राम-वचन; ऐकुनि दुख पावे ॥ १ ॥
प्रभु! दैवाचा; कोण भरोसा। शोषा सिंधु; करुनि मनिं रोषा।
कातर-चित्ता; एक अधार। दैव! दैव! आलस्य-विचार ॥२॥
श्रुत्वा हसुनि; म्हणे रघुवीर। तसेंचि करुं; धरि मनांत धीर।
प्रभु मग; अनुजा समजावुनियां। सिंधु निकटः जाती रघुराया ॥ ३ ॥
आधीं नमन करुनि शिर नमुनी। मग बसले तटिं; दर्भ पसरुनी।
बिभिषण यदा प्रभू प्रति आले। तदा रावणें; दूत धाडिले ॥ ४ ॥

दो०— सकल चरित अवलोकिलें; धरुनि कपट-कपि-देह।
प्रभुगुण हृदयीं वानिती; शरणागति तो स्नेह ॥ ५१ ॥

प्रगट वानिती; प्रभु-स्वभावा। प्रेमें विसरुनि; निज छल-भावा।

१ देती. २ दुसऱ्याला. ३ कपट-रूपाला.

शत्रुदूत मग कपी जाणिती । बांधुनि कपिपति-पाशिं आणिती ॥१॥
कपिपति म्हणती; ऐका वानर । सोडा भंगुनि; अंग, निशाचर ।
आज्ञा ऐकुनि; कीश धावले । बांधुनियां; चौफेर फिरविले ॥२॥
नाना रीतीं मारुं लागती । दीनांसम; विनवितां न त्यजिती ।
" हरितिल अमुचे; नासा-कानां । श्रीरामाचि; आण त्यां जाणा " ॥ ३ ॥
ऐकुनि लक्ष्मण; निकट आणवी । दयार्द्र होउनि, शीघ्र सोडवी ।
रावण-करिं हा; खलिता देणें । कुल-घातक्या ! पत्र हें बघणें ॥ ४ ॥

दो०— सांगा तोंडीं जडासि त्या, मम संदेश उदार ।
भेटुनि जानकि अर्पिणें; ना तरि मरसी ठार ॥ ५२ ॥

इति श्री सुन्दरकाण्डे, बिभीषण-शरणागत्यादि लक्ष्मणपत्र-
समर्पणवर्णनं नाम षष्ठोऽध्यायः ।

अध्याय ७ वा

त्वरित नमुनि; लक्ष्मणपदिं माथा । निघति दूत, वर्णित गुणगाथा ।
वदत रामयश; लंके आले । रावण-चरणीं; मस्तक नमिलें ॥१॥
हसुनि रावणें; पुसिली वार्ता । शुक ! वदसी ना तुझी कुशलता ? ।
समाचार वद, बिभीषणाचा । निकट असे अति; मृत्यू ज्याचा ॥२॥
राज्य करित शठ; लंके त्यागी । यवकीटक; होईल अभागी ।
कपिकटकांचें; वृत्तहि बोल । आणि जयांनां; प्रेरुनि काळ ॥ ३ ॥
त्यांचें जीवन, रक्षण-कारी । होइ चित्त-मृदु; सिंधु विचारी ।
तापस-वार्ता; सांगचि सगळी । ज्यांच्या मनिं; मम भीती भरली ॥४॥

दो०— भेट झालि कीं परतले; ऐकुनि मम यश, रोष, ।
वदसि न, रिपु-दल-तेज-बल; चकित-चित्त दिसतोस ॥५३॥

नाथ ! कृपाकर; पुसतां जैसें । कोप त्यजुनि, माना वच तैसें ।
अनुज जाउनी; यदा भेटला । राज्य-टिळक त्या; रामें केला ॥१॥
रावण-दूत; ऐकुनी कानां । बांधुनि देति; दुःख कपि नाना ।
श्रवण नासिका; कापुं लागले । रामशपथ; घालितां सोडिलें ॥ २ ॥

पुसिलें नाथ ! राम कटकातें । कोटिमुखें नच: वर्णन त्यांचें ।
नानावर्ण; भालु कपि भारी । विशाल, विकटानन भयकारी ॥३॥
जाळुनि पुर जो; वधि तनयाला । सकलांहुनि बल; अल्प तयाला ।
अमित-नाम भट; कठिन कराल । अमित-नाग-बल; विपुल विशाल ॥४॥

दो०— द्विविद, मयंद, नील नल, अंगद गद बलवंत ।
दधिमुख केसरि निशठ शठ; जांबवंत यशवंत ॥ ५४ ॥

सुग्रीवासम; हे कपि जाणा । यांसम अगणित-कोटी नाना ।
रामकृपें बल; अतुलित त्यांना । त्रैलोक्या तृण—समान; गणना ॥१॥
आलें श्रवणिं असें दशकंधर । अठरा पद्में; यूथप वानर ।
कटकिं नाथ ! ऐसा कपि नाहीं । जो जिंकूं न; शकेल तुम्हांही ॥ २ ॥
परम कुपित; चोळिति सब हात । आज्ञा देति न; परि रघुनाथ ।
शोषूं सिंधु; सहित झषव्यालां । ना तरि भरूं तो; कुधर विशालां ॥३॥
मर्दुनि, पीठ; करूं दशशीशा । असें ऐकिलें; वदतां कीशां ।
गर्जति तर्जति; सहज न शंका । गिळूं पाहती; जणुं तव लंका ॥४॥

दो०— सहजशूर कपि भालु सब; त्यांत शिरावरि राम ।
रावण ! काळां कोटि ही; करूं शकति संग्राम ॥ ५५ ॥

रामतेज, बल, बुद्धि, विपुलता । शेष-अयुत ही; थकतिल वदतां ।
एक-शरें शोषिल; शत सागर । तव बंधूस पुसति; नयनागर ॥ १ ॥
त्याच्या वचनें; जलनिधिपाशीं । मागति पंथ; कृपा, चित्तासी ! ।
ऐकुनि वच, विहसे दशशीश । अशि मति म्हणुनी; सहाय कीश ॥२॥
सहज-भीरुचें; वचन मानुनी । सागरासि बसेल; हठ धरूनी ।
मूढ ! मृषा कां; महत्व गासी । जाणूं रिपु-बल—मति--ठावासी ॥३॥
सचिव सभींत; बिभीषण ज्यासी । विजय, विभूति; कुठें जगिं त्यासी ।
ऐकुनि खल-वच; दूत कोपला । समय बघुनि; काढी खलित्याला ॥४॥
रामानुजें; दिला हा खलिता । करा वाचुनी; चित्त—शांतता ।
हसुनी घेइ, वाम-करिं रावण । सचिवा--करवी करवी वाचन ॥ ५ ॥

दो०— [1]मनोरथांवरि भुलुनि शठा; करूं नको कुलनाश ।
राम-विरोधिं न वाचविती शिव विधि विष्णुहि खास ॥५६॥(क)

---

१ लक्ष्मण खलित्यांत लिहिले ते असे.

दो०— त्यजुनि मान हो, अनुज जसा; प्रभुपदपंकज-भृंग।
अथवा राम शरानलीं; खल! कुल-सहित पतंग ॥ ५६ (ख)
श्रवुनि, सभय मनिं; मुखें प्रसन्न। सर्वां सांगे; "पहा," दशानन।
—"भूवरि पडुनी; धरी अकाशा। करि लघु तापस वचन-विलासा"॥१॥
म्हणे, नाथ! शुक, सत्य सुवाणी। –समजा; त्यजुनि; प्रकृति,अभिमानी।
ऐका मम वच; सोडा क्रोधा। प्रभो! प्रभूशीं; त्यजा विरोधा॥२॥
अति कोमल, रघुवीर स्वभाव। यद्यपि अखिल; जगाचा राव।
तुम्हीं भेटतां; कृपाच्चि करिती। मनिं अपराध न एकहि धरिती॥३॥
जनक-सुता; रघुनाथा दीजे। इतुक्या माझ्या; वचना कीजे।
यदा म्हणे; "द्यावी वैदेही"। चरणें मारी; शठ त्यातेंही॥४॥
चरण नमुनि ता; गेला तेथें। कृपासिंधु, रघुनायक जेथें।
नमन करुनि निज; कथेसि वदला। रामकृपें; निजगतीं पावला॥५॥
कुंभज-मुनिचा; शाप भवानी। निशिचर होता तो मुनि ज्ञानी।
कितिदां वंदुनि; रामपदाला। गेला मुनि मग; निजाश्रमाला॥६॥
दो०— विनति न मानी जलधि जड; गेले वघ दिन तीन।
वदले राम सकोप तदा; प्रीति नव्हे भय-वीण॥५७॥
लक्ष्मण, बाण; शरासन आणा। शोषूं वारिधि; विशिख कृशानां[१]।
शठां विनय; कुटिलांसी प्रीती। स्वभाव-कृपणां; सुंदर नीती॥१॥
ममता-निरतां; ज्ञान-कहाणी। अति लोभ्यासि; विरति वाखाणी।
क्रोध्या शम; काम्यासि हरिकथा। उषरिं पेरिलें बीज; फळ तथा॥२॥
असें म्हणुनि मग; चाप चढविलें। लक्ष्मणासि हें; मत मनिं रुचलें।
संधानी प्रभु; शरा कराला। उठे उदधि-उदरीं; तों ज्वाला॥३॥
मकरोरग-गण; व्याकुळ झाले। जीव जळति; जल-निधीस दिसले।
कनक-पात्रिं घे; मणि-गण नाना। विप्ररूप ये; त्यजुनी माना॥४॥
दो०— नानापरिं शिंपा कदली; कापुनि फळते तीच।
विनति न मानि, खगेश! पहा; धाकें नमतो नीच॥५८॥
सभय सिंधु; पद धरुनी[२] प्रभुचे। क्षमा नाथ! अवगुण-गण अमुचे।
गगन, समीर, अनल, जल धरणी। यांची नाथ! सहज जड करणी॥१॥
त्वां प्रेरित; मायेनें केले। सृष्टी-स्तव; सव; ग्रंथ बोलले।
प्रभु-आज्ञा, ज्या; जैशी आहे। तसें राहतां; तो सुख पाहे॥२॥
बरें जाहलें; शिक्षा दिधली। मर्यादा तरि; तुम्हीं लाविली।

१ अग्निबाणानें. २ सिंधु म्हणे.

ढोल, गवार, शूद्र, पशु, नारी । सकल ताडनाचे अधिकारी ॥ ३ ॥
प्रभो! प्रतापें; सुकेन पाहीं । उतरे कटक, न; महत्व कांहीं ।
अनुलंघ्य, आज्ञा श्रुति गाती । व्हावी आज्ञा, सत्वर करुं ती ॥ ४ ॥

दो०— नम्र वचन अति परिसुनी म्हणति हसुनि रघुराय ।
पार जाइ कपि कटक जसें; सांगा तोचि उपाय ॥ ५९ ॥

नाथ, नील नल; युग बंधूंला । बाळपणीं ऋषि-आशिस आला ।
त्यांच्या हस्तें, गिरी ठेविले । तुमच्या तेजें; तरतिल सगळे ॥ १ ॥
प्रभू-प्रभुत्व धरुनि मी हृदया । करिन यथाबल; योग्य सहाया ।
ऐसा नाथ! जलधि बांधावा । यश-महिमा; त्रैलोक्यें गावा ॥ २ ॥
याचि शरें; उत्तर तटवासी । वधा, नाथ! खल-नर अघराशी ।
ऐकुनि सागर-हृदय-व्यथेला । सत्वर हरिती; रघुवर तिजला ॥३॥
प्रभु-बल,-पौरुष; बघुनि अपार । हर्षित सुखी; पयोधि न पार ।
सर्व चरित्रा; प्रभुतें कथिलें । चरण नमुनि; पाथोधि निघाले ॥ ४ ॥

छं०— निज भुवनिं गेले; सिंधु, श्री रघु-पतिसि हें मत मानलें ।
हें चरित कलिमल;-हर, यथा मति; दास तुलसी गाइलें ॥
सुख-भुवन संशय;-शमन दमन; विषाद, रघुपति गुण-गणां ।
सब त्यजुनि आस; दुरास, गा रे; ऐक संतत शठ मना! ॥१॥

दो०— सकल सुमंगल दायक; रघुनायक गुणगान ।
सादर ऐकुनि तरति भव;-सिंधु विना जलयान ॥ ६० ॥

इति श्री सुन्दरकाण्डे शुकरावणसंवादादि सागर-रघुवर-संवादो
नाम सप्तमोऽध्यायः ।

मास-पारायणे चतुर्विंशो विश्रामः

इति श्रीमद्रामचरितमानसे सकल-कलि-कलुष-विध्वंसने

पञ्चमः सोपानः

(सुन्दर-काण्डं समाप्तम्)

ॐ तत् सत्

---

१ सागर.

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥

॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

॥ श्री राम चरित मानस ॥

॥ षष्ठः सोपानः ॥

॥ लंका-काण्डम ॥

अध्याय १ ला

* अहं-दशास्यं घटकर्ण-मोहं, कामाञ्जनादं[१] परिवारयुक्तान ।
हत्वा रिपून मैथिल-राजपुत्र्या शान्त्या समेतोऽभयदोऽस्तु रामः॥१॥ *

पृथ्वी०— * निपीय मनुजोऽमृतं यदि भवाब्धिमुक्तो रुज— ।
स्तथापि न निवारयेज्जनिभय प्रपञ्चं हि तत् ॥
महारुज--निवारकं गुरुपदाब्ज--निर्णेजनं ।
सुपुण्य--धन--तोषित--प्रभु--कृपांकितैर्लभ्यते ॥ २ ॥ *

शा० वि०— रामं कामारि-सेव्यं भव-भय-हरणं काल-मत्तेभ-सिंहं ।
योगीन्द्रं ज्ञान-गम्यं गुण-निधिमजितं निर्गुणं निर्विकारम ॥
मायातीतं सुरेशं खलवध-निरतं, ब्रह्म-वृन्दैक-देवं ।
वन्दे कुन्दावदातं, सरसिजनयनं; देवमुर्वीश-रूपम ।१।

,, शङ्खेन्द्वाभमतीव-सुन्दरतनुं शार्दूल-चर्माम्बरं ।
काल-व्याल-कराल-भूषणधरं, गङ्गा-शशाङ्क-प्रियं ।

---

* अशा खुणा केलेले श्लोक अनुवादकाने रचून आहेत १
नवनाद.

काशीशं कलि-कल्मषौघ-शमनं कल्याण-कल्पद्रुमं ।
नौमीड्यं गिरिजापतिं गुणनिधिं, कन्दर्पहं शङ्करम ॥ २ ॥

श्लोक— यो ददाति सतां शम्भुः कैवल्यमपि दुर्लभं ।
खलानां दण्डकृद्योऽसौ शङ्करः शं तनोतु मे ॥ ३ ॥

दो०— लव निमेष, परमाणु, युग, वर्ष, कल्प, शर चंड ।
भजसि न मन तूं प्रभुसि ज्या, काळ जया कोदंड ॥ (अ)॥

सो०— श्रवुनि सिंधुवच राम, आणुनि सचिवां प्रभु म्हणति ।
काय विलंबा काम, करा सेतु उतरे कटक ॥ (ब)॥

सो०— ऐका रविकुल–केतु: जांबवंत मग म्हणति किं ।
नाथ! नाम तव सेतु, चढुनि भवाब्धी तरति नर ॥(क)॥

तरण्या हा लघु:जलधि न वार । ऐकुनि वदले पवन-कुमार ।
प्रभु–प्रताप वडवानल भारी । प्रथम शोषिलें: पयोधि-वारी ॥ १ ॥
तव–रिपु–नारि-रुदन-जल-धारां । भरला पुनरपिः म्हणुनी खारा ।
परिसुनि, पवन–सुताची उक्ती । कपि हर्षित: रघुपति-मुख बघती ॥२॥
जांबवंत, आणुनि नलनीलां । सर्व कथा, वदला उभयांला ।
राम प्रतापा, स्मरुनि मनीं ही । सेतु रचा: आयासचि नाहीं ॥ ३ ॥
बोलावुनि कपि:-निकर आणिती । म्हणे सकल: ऐका मम विनती
प्रभु–पद–पकज:मनीं धरावें । भालु कपी, कौतुका करावें ॥ ४ ॥
धावा मर्कट, विकट वरूथ । आणा विटप–गिरींचे यूथ ।
जाति भालु कपि करिती हू! हा! । जय रघुवीर प्रताप–समूहा ॥ ५ ॥

दो०— अति विशाल गिरि पादप: घेउनि येति सलील ।
देति तयांसी: सेतु मग: रचिती ते नल नील ॥ १ ॥

शैल विशाल: अणुनि कपि देतीं । कंदुक इव नल, नील हि घेती ।
बघुनि सेतु अति: सुंदर–रचना । हसुनि कृपानिधि: वदले वचना ॥१॥
परम रम्य ही उत्तम धरणी । महिमा अमित: कोण किति वर्णी
इथें शंभुची: करूं स्थापना । माझे हृदयीं: परम कल्पना ॥ २ ॥
कपि--पतिनें बहु; दूत धाडिले । बोलावुनि मुनि: सकल आणिले ।
स्थापुनि लिंग, यथाविधि पूजा । प्रिय मज नच शिवसमान दूजा ॥ ३ ॥
द्रोही शिव, मम भक्त म्हणवितो । स्वप्निंहि तो नर; मज न पावतो ।
शंभु-विमुख, मम भक्ति वांछितो । तो नारकी: विमूढ--मती तो ॥ ४ ॥

दो०— शंकर-प्रिय मम द्रोही; शिवद्रोही मम दास ।
ते नर करिती कल्पवरी; घोर नरकिं कीं वास ॥ २ ॥

जे रामेश्वर; दर्शन करिती । त्यजितां तनु; मम लोकीं वसती ।
जे गंगाजळः आणुनि घालिति । ते सायुज्य; मुक्ति नर पावति ॥ १ ॥
निष्कामें: निष्कपट सेविती । शंकर त्यां मम; भक्ती देती ।
मम—कृत सेतू,-दर्शन करिती । भवसागर ते: श्रमविण तरती ॥ २ ॥
रामवचन, सर्वां मनिं रुचलें । मुनिवर निज; निज आश्रमिं वळले ।
गिरिजे अशी; रघुपतिची रीती । करिति सदा; प्रणतावरि प्रीती ॥ ३ ॥
" सेतु बांधिला: हा नलनीलें " । रामकृपें यश; जगीं पसरलें ।
आपण बुडुनी; दुजां बुडविती । तेचि उपल[1]; नौक-सम होती ॥ ४ ॥
महिमा हा न जलधिचा गणती । कपि-कृति ना;न उपलगुण म्हणती ॥ ५ ॥

दो०— श्री रघुवीर-प्रताप हा; जळीं तरति पाषाण ।
त्यजुनि राम मतिमंद ते; भजति दुजा प्रभु प्राण ॥ ३ ॥

सेतु बांधुनीः दृढ अति बनला । बघुनि, कृपानिधिचे मनिं भरला ।
चाले कटक; न वदलें जाय । गर्जति मर्कटः-भट-समुदाय ॥ १ ॥
सेतु-तटीं; चढुनी रघुवीर । बघति कृपाल; सिंधु-विस्तार ।
बघावया प्रभु, करुणा-कंद । प्रगट होति सब; जलचर—वृंद ॥ २ ॥
मकर नक्र; नाना झषव्याल । शतयोजन तनु; परम विशाल ।
कांहीं असे, अशांही खाती । कोणां पाहुनि, तेही डरती ॥ ३ ॥
प्रभुसि बघति,-ना हटति हटविले । हर्षित मन; सर्वां सुख झालें ।
त्यांचे , न; दिसनें वारी । मग्न बघुनि; हरिरूपा भारी ॥ ४ ॥
कटक निघे, प्रभु—आज्ञा होतां । कोण वर्णि; कपि-कटक-विपुलता ॥ ५ ॥

दो०— झालि सेतुवरि गर्दि अती; कपि नभपथिं उडतात ।
अपर चढुनि जलचर वरी सहज पार जातात ॥ ४ ॥

बघुनि कौतुका; बंधु उभय । जाति कृपालु हसत रघुराय ।
उतरति सेने;-सह रघुवीर । अपार गर्दि, न; वदण्या धीर ॥ १ ॥
सिंधु पार डेरा प्रभु; देती । सकल कपींनां; आज्ञा करिती ।
जाउनि खा फळ; मूळें सुंदर । भालु कीश अति; धावति सत्वर ॥ २ ॥

१ पाषाण.

नव तरु फळले; रामा लागुनि । कालगती ऋतु; अऋतू त्यागुनि ।
त्यांनि मधुर फळ; विटप हलविती। गिरि-शिखरें: लंकेवरि फेकिति ॥ ३ ॥
फिरतां फिरतां; निशिचर पाहति । घेरिति सकलहि; नाच नाचविति ।
दशनीं कापुनि; नासा-कानां । प्रभुयश वदवुनि; सोडिति त्यांनां ॥४॥
ज्यांचे नासा; कर्ण कापिले । रावणासि ते; जाउनि वदले ।
श्रवणीं ऐकुनि; वारिधि—बंधन । व्याकुळ होउनि; वदे दशानन ॥ ५ ॥

दो०— सुबद्ध वननिधि, नीरनिधी: जलधि सिंधु वारीश ।
सत्य, तोयनिधि कंपती, उदधि पयोधि नदीश ॥ ५ ॥

निज वैकल्या; मनीं आणुनी । हसत जाइ गृहिं; भया दाबुनी ।
प्रभु आले; मंदोदरि जाणे ।-लीलेनें; पाथोधि बांधणें ॥ १ ॥
पतिलि धरुनि करिं; सदना आणी । बोले परम मनोहर वाणी ।
चरणीं नमुनि शिर: पदर पसरला । त्यज कोपा प्रभु ! श्रुणु वचनाला ॥२॥
नाथ वैर तों; त्यासी करणें । बुद्धि-बळें ज्यां; शक्य जिंकणें ।
तुम्हां रघुवरा; अंतर कैसें । खलु दिनकर; खद्योतां जैसें ॥ ३ ॥
मधुकैटभ अति-बल जो मारी । महावीर दितिसुत संहारी ।
बांधुनि बालि; दश-शत-भुज मारी। अवतरला तो; भूभर-हारी ॥ ४ ॥
त्यासी न करा विरोध नाथा । जीव, काल; कर्महि ज्या हातां ॥५॥

दो०— रामा अर्पुनि जानकी; नमुनि कमलपदिं माथ।
तनया देउनि राज्य: वनीं; जाउनि भज रघुनाथ ॥ ६ ॥

दीनदयाळू; रघुराज तो । वाघहि शरणागता, न खातो ।
करणें होतें; नितुकें केलें । तुम्हि सुर असुर चराचर जितले ॥१॥
संत वदति अशि; नीति, दशानन !। वृद्ध नृपें सेवावें कानन ।
तेथें तद्भजना करि नाथा । जो कर्ता, धर्ता, संहर्ता ॥२॥
रघुवर तोचि; प्रणत-अनुरागी । भजा नाथ ! ममता मद, त्यागी, ।
मुनिवर करिति, यत्न ज्या लागीं । त्यजुनि राज्य नृप; होति विरागी ॥३॥
न कोसिलापती रघुराया । येती करण्या; तुम्हांवरि दया ।
प्रिय जरि मानां; माझी शिकवण । यश परम त्रैलोकीं पावन ॥४॥

१ यांतील दहानंद वननिधि वगैरे 'सागर' या अर्थाचे असून दहा मुखातून एकेक शब्द उमटला. २ रामचंद्र, ३ सहस्रार्जुन.

दो०— विनवित नयनीं नीर भरे धरि पद, कंपित-काय[1]।
रघुनाथासी नाथ भजा मम सौभाग्य न जाय ॥७॥
रावण, उठवी; तदा मयसुते। मग खल सांगे; अपुले प्रभुते।
वृथाचि तूं भय; मानिसि जाण। कोण वीर मम; जगीं, समान ॥१॥
वरुण, कुबेर, पवन, यम, काळ। भुजबल-विजित; सकल दिक्पाल।
देव, दनुज नर; सब वश मजला। कवण हेतु; भय; उपजे तुजला ॥२॥
समजावुनि, नानाविधि तिजला। पुनरपि सभेंत; जाउनि बसला।
मंदोदरि निज; मनीं विचारी। होइ कालवश; हा मद भारी ॥३॥
सभेंत येउनि; पुसिलें सचिवां। कसा रिपूशीं; समर करावा।
सचिव म्हणति श्रुणु निशिचरराया। पुसणें वार-वार कासया ॥४॥
वदा कवण भय; करा विचार। नर-कपि-भालू; अम्हां अहार ॥५॥
दो०— प्रहस्त ऐकुनि वचन हें; बोल; करयुग जोडि।
नीति विरोध न करा प्रभू; सचिवां मति अति थोडि ॥८॥
वदति सचिव शठ; तोंडपुजे हे। पार न पावां, प्रभु! समजां हें।
लंघुनि अलधि; एक कपि आला। चरित्र त्याचें; नाहिं विसरलां ॥१॥
तेव्हां नव्हती; क्षुधा तुम्हांला। नगर जाळितां; कां न भक्षिला।
कर्णमधुर; अंतीं दुखदायक। असें सचिवमत; निशिचर-नायक ॥२॥
समुद्र [illegible]; सहज बांधिला। सैन्या सहित; सुवेला आला।—
म्हणा, 'मनुज तो!' खाऊं बघतां। गाल फुगवुनी; वृथा वल्गतां ॥ ३ ॥
नाथ! वचन मम; ऐका सादर। समजुं नका मनि. मजला कातर।
जे प्रिय वाणी; ऐकति वदती। ऐसे नर जगिं; अनंत असती ॥ ४ ॥
वचन परम-हित; कर्ण-कठोर। ऐकति वदति न. जगिं नर फार।
प्रथम दूत धाडी; श्रुणु नीती। सीता अर्पुनि; करणें प्रीती ॥ ५ ॥
दो०— मिळतां नारी जाति जरी तरि न वाढवा वैर।
ना तरि सन्मुख रणांगणीं; युद्ध करावें स्वैर ॥ ९ ॥
जरि हें मत, माना प्रभु अमुचें। उभय विधा जगिं सुयशचि तुमचें।
सुता वदे; दशकंठ कोपला। केला बोध; कोणि हा तुजला[2]? ॥ १ ॥
एव्हांपासुनि; संशय तूंस। वेणुमुळीं उपजलासि फूस[3]।
ऐकुनि परुष; वचन अति घोर। निघे गृहा; वच वदुनि कठोर ॥ २ ॥

१ देह. २ तुजला ३ एक प्रकारचें गवत.

हित-मत मम, तुज रुचे न कैसें । मरणासन्ना औषध जैसें ।
संध्या-समयः बघुनि दशशीस । निघे भुवनीं निरखित भुज बीस ॥३॥
लंका-शिखरावरि आगार । नाचगान सजलसा अपार
तेथें जाउनि बसला रावण । किन्नर करिती गुण-गण गायन ॥४॥
टाळ मृदंगः वाजति वीणा । नृत्य करिति; अप्सरा प्रवीणा ॥५॥

दो०— सुनासीर-शत सरिस तो संतत करी विलास ।
प्रबल परम रिपु, शिरावरी, तदपि न चिंता त्रास ॥१०॥

सुबेल शैलिं इथें रघुवीर । उतर घेउनि सैन्य अपार ।
एक सानु उत्तुंग बघोनी । परम रम्य सम शुभ्र मेदिनी ॥१॥
तरु-किसलय, सुमनें बहु आणुनी । लक्ष्मण, रम्य; रची स्वकरांनी ।
त्यावरि रुचिर, मृदुल मृग-चर्म । आसनिं त्या भ्राजे श्रीराम ॥२॥
कपीश अंकीं राम वरांग । वाम दक्षिणें चाप निषंग ।
युग-कर-कमळीं धरिले बाणां । करि लंकेश मंत्र मग कानां ॥३॥
अंगद; मारुति सभाग्य मानां । चरण कमलः संवाहति जाणा ।
मागें, लक्ष्मण कृत-वीरासन । कटि निषंग; करि बाण शरासन ॥४॥

दो०— यापरि कृपा-सुरूप-गुण-धाम राम आसीन ।
ध्यानिं अशा नर धन्य जे असति सदा अति लीन ॥११(क)॥

दो०— पूर्व दिशे पाहतां प्रभु दिसला उदित मयंक ।
सांगति सकलां बघा शशी मृगपति-सरिस अशंक ॥११(ख)॥

प्राची-दिशि-गिरि-गुहा-निवासी । परम-प्रताप-तेज बल-रासी ।
मत्तनाग-तम-कुंभ-विदारी । शशि-केसरी गगन-वनचारी ॥१॥
विकिरित नभिं मुक्ताफल तारा । रजनि सुंदरी करि शृंगारा ।
प्रभु म्हणती शशि-मधें शामता । सुविचारें सांगावें स्वमता ॥२॥
वदे कपि-पती, शृणु रघुराया । शशि-बिंबीं प्रगटे भूछाया ।
कोणि म्हणे ग्रह शशिला मारी । त्याचा डाग श्याम हा भारी ॥३॥
कोणि म्हणे विधि रतिमुख रचितां । काढुनि घेई शशीसारता ।
तेंचि छिद्र शशि-हृदयीं वसतें । त्यातुनि नभ-छाया ही दिसते ॥४॥
राम म्हणति विष बंधु इंदुचा । ठेवी हृदयीं प्रिय अति साचा ।
विष-संयुत कर-निकरां पसरी । जाळी विरहवंत नर-नारी ॥५॥

१ इंद्र. २ [illegible]. ३ [illegible]. ४ दाखवीत. ५ राहू. ६ चंद्र. ७ पसरलेल्या. ८ केलेले.

दो०— लंका प्रभु मारुती म्हणेः शशि तुमचा प्रिय दास ।
मूर्ती विधु-हृदिं वसे तव; तोचि शाम आभास ॥ १२ (क) ॥
इति श्री लंकाकांडे मंगलाचरणादि-चंद्रोदयवर्णनं नाम
प्रथमोऽध्यायः । नवाह-पारायण सप्तमो विश्रामः ।

अध्याय २ रा

दो०— पवन-तनय-वच, परिसुनी, हसले राम सुजाण ।
दक्षिणेसि बघुनी प्रभुः वदले कृपानिधान ॥ १२ (ख) ॥
र्भीषणा बघः दक्षिण आशा[1] । घनगर्दी; दामिनी विलासे ।
मधुर मधुर घन; गर्जति घोर । पडो न पाउस; उपल-कठोर[2] ॥१॥
ण विभीषण; एक कृपाला । नसे तडित ना; वारिद-माला ।
लंका शिखराग्री आगार । अखाड्यांत; बसला दश-कंधर ॥२॥
छत्र मेघडंबर-शिर-धारी । काळी जलद-घटा[3] जणुं भारी ।
मंदोदरी-श्रवणि ताटंक[4] । प्रभु ते जणुं; दामिनी चमंक ॥३॥
वाजति ताल;-मृदंग अमूप । तो रव मधुर; ऐक सुरभूप ।
भु स्मित ! बघुनी अभिमाना । करि कोदंडिं बाण-संधाना ॥४॥
दो०— छत्र मुकुट ताटंक तव; पाडी एकचि बाण ।
समक्ष पडले महीवरी; मर्म न कळलें जाण ॥१३ (क)॥
लीला करुनी राम शर; करी प्रवेश निषंग ।
रावण-सभा सभीत बहु; बघुनि महा-रसभंग ॥१३ (ख)॥
मिकंप ना, नसे प्रभंजन । अस्त्र शस्त्र बघती न विलोचन ।
ज निज चित्तीं; सचिंत सारीं । अशकुन दिसे: भयंकर भारी ॥१॥
शमुख बघुनि; सभा भयभीता । युक्ति करुनि मग; होय बोलता ।
शिर गळतां शुभ;संतत ज्यासी । पडतां मुकुट किं; अशकुन त्यासी ॥२॥

१ दिशेला. २ गारा. ३ मेघसमुदाय. ४ कर्णफुलं, ५ आपपल्या.

निजा, निजा, निज,गृहा जाउनी" । गेले सदनिं: सकल, शिर नमुनी ।
मंदोदरि-मन सचिंत बसलें । श्रवण-फूल जैं; महिवरि खचलें ॥३॥
सजल नयन मग; करयुग जोडी । ऐका कान्त ! विनति मम थोडी ।
कान्ता राम-विरोध त्यजावा । नर मानुनि, मनिं हट्ट: नसावा ॥४॥

दो०— विश्वरूप रघुवंश मणी: धरा वचनिं विश्वास ।
लोक-कल्पना वेद करा प्रत्यंगीं हो उयास ॥१४॥

पद पाताळ; शीर्ष अज-धाम । अपर लोक अंगी विश्राम ।
भृकुटि विलास; भयंकर काळ । नयन दिवाकर: कच[1] घन-माळ ॥१॥
घ्राण ज्यासि अश्विनी-कुमार । दिवस रात्रि हे; निमिष अपार ।
श्रवण दिशा दश: श्रुति वाखाणी । वायु श्वास; निगम प्रभु-वाणी ॥२॥
अधर लोभ, यम दशन कराल । माया हास्य बाहु दिक्पाल ।
आनन अनल. अंबुपति जिव्हा । सृजणें, पालन. प्रलय. समीहा ॥३॥
रोमराजि, अष्टादश भार । अस्थि शैल: सरि शिरा अपार; ।
उदर महोदधि: गुह्य यातना । प्रभु जगमय कां बहुत कल्पना ॥४॥

दो०— अहंकार शिव, बुद्धि अज: मन शशि चित्त महान ।
मनुजवास सचराचर.-रूप राम भगवान ॥ १५ (क) ॥

दो०— अशा विचारें प्राणपती; प्रभु-वैरासि विहाय ।
प्रीति करा रघुवीर-पदीं; मम सौभाग्य न जाय ॥ १५ (ख) ॥

विहसे ऐकुनि, पत्नी-वचन । अहो मोह-महिमा बलवान ! ।
नारि-स्वभाव. सत्य कवि वदती । अवगुण आठ. सदा मनिं वसती ॥१॥
साहस. माया, अनृत चपलता । भय अविवेक. अशौच, अदयता ।
रिपुचें सकलहि; रूप गाइलें । विशाल भय अति: मला दाविलें ॥२॥
प्रिये सकल तें: जग वश माझे । तुझ्या प्रसादें: आतां समजे ।
प्रिये समजली तुझी चतुरता । ऐशी तूं मम: वदसी प्रभुता ॥ ३ ॥
वाणी तुझी गूढ मृग-लोचनि ! । जाणुनि, सुखद: श्रवणि-भयमोचनि ।
मंदोदरी: मनीं. हें ठसलें । काळें पति, मति-भ्रमें ग्रासिले ॥४॥

दो०— यापरि करित विनोद बहु; झाला प्रात:काळ ।
मदांध, निर्भय सहज तो: सभे जाइ सुर-काळ ॥ १६ (क) ॥

सो०— फुले फळेना वेत: यदपि सुधा वर्षति जलद ।
मूर्ख न हृदयीं घेत: जरि गुरु मिळति विरंचि शत ॥१६(ख)॥

१ केश. २ वरुण. ३ इच्छा. ४ रोमावली ५ अठरा भार वनस्पती.
६ विष्णु. ७ नाग. ८ निर्दयता

प्रभातिं इकडे: रघुवर उठले । बोलावुनिः सचिवांसीं वदले ।
सांगा करणें; कवण उपाया । वदे भाल्लुपतिः वंदुनि पायां ॥ १ ॥
श्रृणु सर्वज्ञः सर्व-उर-वासी । मति-बल-तेज;-धर्म-गुण-राशी ।
मी वदतों निज-मति अनुसारें । दूत पाठवा: वालिकुमारा ॥ २ ॥
निका मंत्र; रुचला सर्वांसीं । अंगदासि: म्हणती सुखराशी—
वालि-सुता! मति,-बल-गुण-धामा। जा लंकेंत; तात मम कामा ॥ ३ ॥
तुला बहुत नें; किति सांगावें । परम चतुर तूं; मजला ठावें ।
रिपु-हित; अमुचें कार्यहि व्हावें । असें रिपूशीं; तुवां वदावें ॥ ४ ॥
सो०— पदिं वंदुनि जगदीश· शिरि धरुनि आज्ञा, वदति ।
तो गुणसागर ईश! राम! कृपा ज्यावरि तुमची ॥ १७ (क) ॥
स्वयं-सिद्ध सब काज, नाथ मला आदर देति ।
चिंतुनि हें युवराज; तनु पुलकित हर्षित होति ॥ १७ (ख) ॥
पद वंदुनि, मनिं; प्रताप धरुनी । अंगद निघती, सकलां नमुनी ।
प्रभु-प्रताप मनिं; सहज न शंका । रणबांकुरा वालिसुत बांका ॥ १ ॥
नगरीं शिरतां: रावण अंगज । खेळ खेळतां, भेटे सहज ।
युद्ध जुंपलें: वदतां वदतां । युगल अतुलबल, तशी तरुणता ॥२॥
अंगदासि तो: उचली लाता । धरुनि पदां: भ्रमवुनि करि घाता ।
निशिचर निकर: बघुनि भट भारी । भूग गिळुनि; पळले अघ-कारी ॥ ३ ॥
कोणी कोणा: मर्म न वदती । सुत-वध बघुनी: गप्प राहती ।
कोलाहल; एकचि ते काळीं । "आला कपि जो: लंका जाळी! ॥४॥
"काय करी कीं जगकर्ता तो" । सभीत जो तो: विचार करतो ।
पुसल्या-विण ते, मार्ग दाविती । ज्यां बघतो,, ते: उभ्यांच सुकती ॥ ५॥
दो०— जाइ सभा-दरबारि तदा; स्मरुनि राम-पद-कंज ।
सिंहासम बघतो सकलां; धीर, वीर, बलपुंज ॥ १८ ॥
त्वरित निशाचर; एक धाडिला । समाचार दश-मुखा कळविला ।
ऐकुनि हसत; वदे दशशीश । बोलावा, बघं; कुठला कीश ॥ १ ॥
आज्ञेनें बहु; दूत धावले । त्या कपिवर्या: घेउनि आले ।
दिसे अंगदा; रावण कैसा । सप्राणचि, कज्जलगिरि जैसा ॥ २ ॥
भुजा विटप: शिर शृंगचि जाणा । रोमावली, लता, जणुं नाना ।
मुख नासिका; नयन आणि कानां । गिरिकंदरा, गुहा, अनुमाना ॥ ३ ॥

---

१ पुत्र. २ रावण–पुत्राच्या. ३ रणधुरंधर ४ निस्तेज होतात.

सभेंत शिरला; मुळीं न डरला । वालितनय अतिबल भट कळला ।
उठे सभा सब; कपिस पाहुनी । रावण मनीं: क्रुद्ध अति, वघुनी ॥४॥
दो०— यथा मत्तगज-निकरिं हरी देई पद ठेउन ।
प्रभु-प्रतापा स्मरुनि मनीं: बसला सभे नमून ॥ १९ ॥
इति श्री लंकाकाण्डे श्रीरामबाणप्रभावादि-वालिसुतस्य
सभाप्रवेशो नाम द्वितीयोऽध्यायः ।

अध्याय ३ रा

रावण म्हणे, कवण तूं वंदर । मी रघुवीर-दूत दशकंधर ।
मम जनका तव: होति मित्रता । तुझ्या हितास्तव: आलों ताता ॥ १ ॥
उत्तम कुळिं तू पुलस्ति-नातू । विरंचि शिव; पुजिले विविधा तूं ।
वर पावुनि सव: केली काजें । विजित हि लोक,-पाल सब राजे ॥२॥
महिप! मदानें मोहें किंवा । हरिली त्वां. सीता जगदंबा ।
अतां ऐक, वदनों शुभ माझें । क्षमिती प्रभु अपराधां तूझे ॥ ३ ॥
दांतीं तृण धरि: कंठि कुठारी । परिजन सहित: सर्व निजनारी ।
सादर जनकसुतेस्च मागें, । ऐसं चला कपट: भय त्यागें ॥४॥
दो०— प्रणतपाल रघुवंश मणी; पाहि पाहि मूर्खास ।
दीन वाणि परिसुनी प्रभू. देतिल अभयचि खास ॥२०॥
'रे कपि-पोरा; वद संभाळुनि । मूढा मजला. सुरारि जाणुनि ।
वद निज-नाम; पित्याचें आतां । नातें कोण्या घडे मित्रता ॥ १ ॥'
'अंगद नाम; तनय वालीचा । योग तया कधि, तरि भेटीचा?।'
लाजे ऐकुनि. अंगद-वचनें । "-होता वाली, वानर, जाणें ॥२॥
अंगद! तूंचि तनय वालीचा! । उपजलासि वंशानल तूं साचा ।
गर्भ, न गळला: व्यर्थ उपजला । स्वमुखें तापस-दूत बोलला ॥ ३ ॥
सांग कुशल. कोठें तो आहे" । अंगद हसुनि: वचन वदताहे ।
'दशदिनिं वालिकडे त्वां जावें । मित्रा भेटुनि; कुशल पुसावें ॥ ४ ॥
राम-विरोधें; कसें कुशल तें । सर्व हि तो; सांगेलाचि तुजतें ।
श्रुणु शठ होइ. भेद मनिं त्याचे । श्री रघुवीर: हृदयिं नहि ज्याचे ॥ ५ ॥

१ आणि रावण म्हणाला २ असे बोल.

दो०— मी कुल-नाशक सत्य, तुम्हीं: कुल-पालक दशशीस !।
बधिर अंध हि न वदति हें: नयन कान तव वीस ॥ २१ ॥

शिव विरंचि: सुर-मुनि-समुदाय । सेवु इच्छिती: ज्याचे पाय ।
दूत होउनी; कुळा बुडविलें । अशामतें तव हृदय न फुटलें '॥ १ ॥
ऐकुनि कपिची; कठोर वाणी । वदे दशाननः नयन ताणुनी ।
'खल तव कठिण;वचन सव सहतो । नीति धर्म मी; पाळित असतो '॥२॥
' धर्म-शीलता; प्रसिद्ध भारी । असे विदित: कृत पर-वधु-चोरी ।
दिसली नयनिं; दूत रक्षकता । बुडुनि न मरसि: धर्म-व्रत-धर्ता ॥ ३ ॥
नाक-कान-विण: पाहुनि भगिनी । क्षमाच केली; धर्म जाणुनी ।
धर्म-शीलता: विदित जगासी । दर्शन झालें: भाग्य अम्हांसी !' ॥ ४ ॥

दो०— ' जल्पसि कां जड जंतु कपी पहा शठा मम बाहु ।
लोकपालबल-विपुल शशी: गिळण्यास्तव बहु राहु ॥२२(क)॥
मग नभसरिं मम करनिकर,-कमलीं करितां वास ।
शोभा पावे हंस जणु शंभु सहित कैलास ॥ २२ (ख) ॥

तुमच्या कटकामधिं वद्य अंगद । मजसी भिडे कवण योधा वद :
प्रभु तव, नारि-विरह-द्युतिहीन । अनुज दुखित: त्या दुःखें म्लान ॥ १ ॥
तूं सुग्रीव; कूल-द्रुम दोही । अनुज आमुचा; भीरु चि तोही ।
जांबवंत; मंत्री अति वृद्ध । तो होई कीं; रणिं कटि-बद्ध ॥ २ ॥
शिल्पिकर्म जाणति नल-नील !। हां ! कपि एक महाबलशील ।
प्रथम येइ नगरा जो जाळी ' । वदे ऐकुनी; कुमार वाली ॥ ३ ॥
' सत्य वचन हें ! निशिचर राया । खरें चि कीं कपि; पुरदाहा या ?।
रावण-नगर ! अल्प कपि जाळी !। कोण म्हणे ही; सत्य कुचाळी ॥४॥
सुभट म्हणुनि ज्या वानिसि रावण !। तो कपि-पति-लघु-दूतचि जाण ।
बहुत चालतां; वीर न होतो । खबरि घ्यावया; भूप धाडि तो ॥५॥

दो०— सत्यचि जाळी नगर कपी प्रभु आज्ञा नसतांच ।
पुन्हां न गेला प्रभूकडे, सभय कुठें लपलाच ॥ २३ [क] ॥
सत्य वदसि दशकंठ सब; ऐकुनि मज ना क्रोध ।
कोणि न अमुच्या कटकिं,तुज;लढण्या सुयोग्य योध॥२३[ख]॥
प्रीति विरोध समान सह, करा; असे हा न्याय ।
' जरि मृगपति, मण्डुका वधी; वरें म्हणति कीं काय ? ॥२३[ग]॥

१ त्याचा दूत. २ अंगद म्हणाला. ३ रावण म्हणाला. ४ तीर आणि तीरावरील वृक्ष.

यद्यपि ही लघुता प्रभुस्मी, तुज वधितां बहु दोष ।
तदपि कठिण रावणा श्रुणू ; क्षात्र-जातिचा रोष ' ॥२३[घ] ॥
वक्रोक्ती धनु, वचन शर: हृदय दाहि, रिपु कीश ।
उत्तर-सांडसि धेवुनी: काढी भट दशशीश ॥ २३ [ङ] ॥
हसुनि वदे दश-मौलि मग: ' कपिचा बहु गुण एक ।
प्रतिपाळी जो, तयास्तव: करी उपाय अनेक ॥ २३ [च] ॥

धन्य कीश जे निज-प्रभु-काजा । नाचति त्यजुनी; सर्वहि लाजा ।
नाचुनि उडुनी; जनां रिझविती । धर्म-निपुण अति, पति-हित करिती ॥१॥
अंगद ! स्वामि-भक्त तव जाती । प्रभु-गुण कां न; वदसि या रीती ? ।
मी गुण-ग्राहक परम सुजाण । कटु वचनां तव देइ न कान ' ॥ २ ॥
म्हणे कपी, ' तव गुण-ग्राहकता । समजे, पवन सुतानें वदतां ।
वन भंगुनि; सुत वधि, पुर जाळी । तदपि त्यासि ना: कलि टवाळी ॥३॥
बघुनि तुझा तो: स्वभाव सुंदर । केलि धृष्टता, मी दशकंधर ' ।
येउनि वदतां; जे कपि वदला । लाज न रोप न: त्वेष हि तुजला ॥४॥
'अशि मति,म्हणुनी;स्वाशि पित्याला' । ऐसें बोलुनि, रावण हसला ।
' बापा खाउनि; स्वातो तुजला । परंतु कांही; सुचलें मजला ॥ ५ ॥
वालि-विमल-यश,-भाजन जाणुंन । जगत्रं तुला. अधम-अभिमानी ।
वद रावण; रावण जगिं कितुके । मी वदतो मज. कळलें तितुके ॥ ६ ॥
वालि-विजया; पाताळी गेला । हय शाळे त्या; शिशुनिं बांधिला ।
खेळति बालक; जाति मारिती । दया करुनि त्या बली सोडिती ॥ ७ ॥
एक सहस्र,-भुजातें दिसला । जन्तु जाणुनी. धावुनि धरिला ।
कौतुक म्हणुनी: गृहासि आणी । पुलस्ति मुनि मग. सोडि-जाउनी ॥८॥

दो०— एक सांगतां लाज अती. ठेवि वालि खाकेंत ।
यांत कवण तूं सांग मज. त्यजुनि दुष्ट संकेत ।' ॥ २४ ॥

श्रुणु शठ तो: बलशीलचि रावण । लीला जाणे हरगिरि जाण ।
उमापतीः शूरत्वा जाणे । जया पूजिलें शिर-सुमनांनें ॥ १ ॥
शिर कमळें, काढुनी निजकरीं । किती वेळ पूजिला पुरारी ।
भुज-विक्रमः जाणति दिक्पाल । घाव न बुजले; जातां काळ ॥ २ ॥
जाणति दिग्गज; कठोर छाती । यदा यदा; जातां मज भिडती ।
ज्यांचे दन्त कराल न रुपती । छातीवरि: मूलक सम तुटती ॥ ३ ॥
जया चालिनें. डोले धरणी । चढतां मत्त-गजें: जशि तरणी[1] ।

---

१ नौका

तो रावण जग-विदित प्रतापी । वृथा जल्पका विदित कदापी ॥ ४ ॥
दो०— अशा रावणा लघु म्हणसी, नर-गुण करिसी गान ।
रे कपि बर्बर ! खर्व खल; कळे अतां तव ज्ञान '॥ २५ ॥

ऐकुनि वदला, सकोप वाणी । संभाळुनि वद जड;-अभिमानी ।
सहस्रभुज-भुज गहन अपार । -दहन अनल सम,ज्याचे कुठार ॥१॥
यत्परशू-सागर,-खर धारां । बुडले नृप; अगणित बहु वारां ।
जया बघुनि: तो ही मद त्यागी । तो कीं नर ! दशकण्ठ ! अभागी ॥२॥
कसा राम नर; रे ! शठ लुंगा । धन्वी काम, नदी तरि गंगा ! ।
पशु सुरधेनु: कल्पतरु रूख । अन्न दान; अणि रस पीयूष ! ॥ ३ ॥
खगपति खग; अहि सहस्र-आनन । चिंतामणि कीं; उपल दशानन ।
श्रृणु मतिमंद, लोक वैकुंठ । लाभ किं रघुपति;-भक्ति अकुंठ ! ॥४॥
दो०— मान मथुनि तव, चमूसह; वन, पुर, विध्वंसून ।
रे शठ ! कीं हनुमान कपी; सुत जो जाइ वधून ॥ २६ ॥

श्रृणु रावण; सोडुनी चतुरता । भजसि न कृपा;-सिंधु रघुनाथा ।
जरि होशी; रामाचा द्रोही । रक्षिति ना तुज: शंभु विधीही ॥ १ ॥
मूढ वृथा: जल्पसि वाचाळा । प्रभु-वैरें वध; सोशिसि हालां ।
तव शिर-निकर; कपींचे पुढतीं । रामशरें; धरणीवरि पडती ॥२॥
मग तव शिर; कंदुक इव नाना । कपि खेळति; चेंडूफळि जाणा ।
यदा समरिं; कोपति रघुनायक । कराल अति बहु, सुटती सायक ॥३॥
चाले तुझा, जल्प तैं सारा ? । सुविचारें भज; राम-उदारा ।
ऐकुनि वच; रावण-मन जळलें । जळत महानलिं; जणुं घृत पडलें ॥४॥
दो०— कुंभकर्ण-सम बंधु मम; सुत विश्रुत शक्रारि ।
पराक्रमा मम न जाणसी: विजित चराचर सारिं ॥२७॥

शठ ! शाखामृग; सहित सहाया । सागर-बंधन; ही प्रभुता त्या ।
अनेक खग; लंघिति वारीशा । शूर न होती; श्रृणु ते कीशा ॥१॥
मम भुज-सागर: बल-जल-पूरा । जो बुडवी बहु सुर-नर-शूरां ।
वीस पयोधि, अगाध अपार । कवण वीर जो; जाइल पार ॥२॥
दिक्पालां मी, जलासि भरवी । खल मांगसि मज; नृप-यश-पदवी ।
जरि तो समर-सुभट तव नाथ । गासी बहुधा: यद्गुण-गाथ ॥३॥
दूत धाडि मग; कवण काजा । रिपुशी प्रीति; करत नहिं लाजा ।
हर-गिरि मथन; निरखि मम बाहू । प्रभुप्रौढि निज; वद मग पाहूं ॥ ४ ॥

१ ज्याचा परशु. २ वृक्ष.

दो०— शूर कवण रावण-सरिस; स्वकरें छेदुनि शीस।
होमि अनलिं बहुधा मुदित; असे साक्षि गौरीश ॥ २८ ॥

जळतां पाहें; यदा कपाळां । विधिचे लिखित; अंक निजभाळा ।
नरहस्तें मम; वध मी वाचीं । हसलों कीं; विधि-गिरा अ-साची॥१॥
स्मरतां तें; भीति न मनिं मानें । भ्रांत जरठ विधि; लिहि लेखातें ।
अन्य-वीर-बल; शठ मज पुढती । वदनि त्यजुनि बहु; लाज मुर्वते ॥२॥
अंगद म्हणे; सलज्ज जगीं ही । रावण! कोणी; तुज सम नाही ।
लाजवंत तूं; खरा स्वभावें । निजमुखिं निजगुण; वदसि न ठावें ॥३॥
शिर अणि शैल; कथा तूं स्मरसी । वीस वेळ म्हणुनी तूं वदसी ।
ते भुजबल; खऽयांतचि घाली । जिंकिलि, सहस्र-भुज, बलि वाली! ॥४॥
श्रृणु मति—मंदा; बोल खरे रे! । शूर न नर; छेदिल्या शिरें रे! ।
गारुड्यासि कधिं; म्हणती वीर । स्वकरें कापी; सकल शरीर ॥ ५ ॥

दो०— पतंग जळती मोहवश; भार वाहि खर-वृंद ।
त्यांनां शूर न म्हणति जगीं; जाणुनि घे मतिमंद ॥ २९ ॥

बोल वृथा; वाढवूं नको रे । श्रृणु मम वचन; त्यजुनि माना रे ।
दश-मुख वध मी; दूत न आलों । अशा विचारें; असें धाडिलों ॥ १ ॥
किती वेळ हें; म्हणनि कृपाल । न हि गजारि-यश; वधुनि शृगाल ।
स्मरुनि वचन हें; मनीं प्रभूचें । कठोर वचनां; सहतों तूझें ॥ २ ॥
ना तरि तव मुख,-भंजन करुनी । जातों सीते; वळें घेउनी ।
कळलें तव बल; अधम सुरारी । कपटें चोरिलि; तूं परनारी ॥ ३ ॥
तूं निशिचर-पति; गर्व बहुत । मी, रघुपति-दासाचा दूत ।
प्रभु-अपमाना; जरी न डरतो । तुज देखत हें; कौतुक करतो ॥ ४ ॥

दो०— अपटुनि तुज महिं, वधुनि चमू; नगर करुनि तव नाश ।
तव युवतीं-सह-जानकिसी; नेतां नच अवकाश ॥ ३० ॥

असें घडे तरि; नसे महत्व । मृतासि वधणें; नहि पुरुषत्व ।
कौलें; कामवश, कृपण, विमूढ । दरिद्रि-अति, अयशी अति बूढ ॥१॥
सदा रोगवश; संतत क्रोधी । विष्णु-विमुख; श्रुतिसंत-विरोधी ।
तनु-पोषक· निन्दक, अघखाणी । जिवंत शवसम, चौदा प्राणी ॥ २ ॥

---

१ वाममार्गी.

हें जाणुनि खल ! वधूं न तुजला । क्रोध नको तू उपजवुं मजला ।
ऐकुनि रावण; सकोप झाला । अधर चावतो; बोलि करांला ॥३॥
रे कपि ! अधम मरण तूं वांछिसि । लहान मुखिं बहु गोष्टी सांगसि ।
कटु जल्पसि जड; जया बळासी । प्रताप-बल-मतिः तेज न त्यासी ॥४॥

दो०— जाणुनि अगुण; अमान त्या· देइ पिता वनवास ।
तें दुख, वरि युवती-विरह निशिदिन मम बहु त्रास ॥२१ [क]॥

दो०— मद तुजला ज्याच्या बळें ऐसे मनुज अनेक ।
खाति निशाचर दिवस निशीं समज त्यजुनि अविवेक ॥२१ (ख)

केली यदा; प्रभूची निन्दा । कोप अती तैं, येइ अंगदा ।
हरि-हर-निंदा; श्रवणिं ऐकती । गोहत्या-सम, पापें घडती ॥ १ ॥
कट-कटूनि; कपिकुंजर भारी । तवकें भुजयुग, भूवरि मारी ।
डोलुनि धरणि; सभासद् खचले । पळती जणुं; भय--पवनें ग्रसले ॥२॥
पडत उठ; अवरुनि दशकंधर । भूवरि मुकुट पडति, अति सुंदर ।
कांही तो उचलुनि; शिरिं ठेवी । कांहीं प्रभुसी; अंगद लावी ॥३ ॥
येतां मुकुट; बघुनि कपि पळती । हा ! हा ! दिवसा तारे गळती ।
की कोपें, रावणें फेकिले । चार कुलिश, येवोनि पातले ! ॥४॥
राम म्हणति,मानि जरा भिउं नका । राहु-केतु ना, अशनि न उल्का ।
किरीट हे; दशकंधर-शिरिंचे । प्रेरित अंगद-येती साचे ॥ ५ ॥

दो०— उडुनि पवन-सुत, करिं धरी; आणी प्रभुचे पास ।
कौतुक बघती, भालु कपी; दिनकर-सम्नि प्रकाश ॥२२ (क)॥

इतिश्री लंकाकाण्डे अंगद-रावण-संवादे रावण-मुकुट-प्रेषणं नाम
तृतीयोऽध्यायः ।

अध्याय ४ था

दो०— इकडे क्रुद्ध दशानन, वदे सकोप अपार ।
"धरा धरा मारा कपिर्माः" अंगद हसला फार ॥ २२ (ख) ॥

---

१ आवेशाने ४ फेकून दिले पाठविले.

ाम्मरुनि वेगें; भट सब धावा । खा कपि जो जो: सन्मुख पावा
मर्कट-हीन; करा महि जा जा । जीत धरा युग;–तापस-राजां ॥ १ ॥
पुन्हां सकोप; वदे युवराजा । वृथा बल्गर्मी; सोडुनि लाजा ।
घे गळ फास; कुळा दे माती । मम बळ पाहुनि: फुटे न छाती ? ॥२॥
रे स्त्री-चोरा, उत्पथ गामी । खळ, मळ-राशि, मंदमति, कामी ।
त्रिदोष-वश, जल्पसि दुर्वादां । होसि कालवश; खल मनुजादा ॥३॥
बळ न यांचे फळांसि गिळतां । भालु कपींचे; चपेट मिळतां ।
'राम मनुज' वदतां तव वाणी । झडे न तव: रसना अत्रखाणी ॥ ४ ॥
गळेल जिव्हा: संशय नाहीं । रण-भूवरि: शिर-समेत पाहीं ॥ ५ ॥
सो०— तो नर, कीं मतिमंद: एक शरें जो वालि वधि ।
वीसहि लोचन अंध: धिक् तव जन्म कुजाति जड ॥३३ (क) ॥
सो०— तव रुधिराची आस: तृषित रामसायक-निकर ।
सोडूं म्हणुनि तुज खास; कटु जल्पक निशिचर अधम ॥३३(ख)॥
मी तव दशन, पाडण्या लायक । परि नाहीं: आज्ञा रघुनायक ।
क्रोध असा ! दश-मुखांसि फाडूं । लंका उचलुनि: सागरिं गाडूं ॥ १ ॥
औदुंबर फल; सम तव लंका । मधें वसा तुम्हि; जंतु न शंका ।
वानर मी, फळ; खात न वार । देति न आज्ञा; राम उदार ॥ २ ॥
उक्ति ऐकतां; रावण हसला । मूढ कुठें रे: असत्य शिकला ।
वालि कधीं अशि; करी न वडवड । तापस-संगें: होसि लवाड ॥ ३ ॥
वीस-भुजा ! मी खरा लवाड । जरि दश जिव्हा; कापुं न जाड ।
प्रभू प्रताप; स्मरुनि कपि कोपी । पण करि; सभेंत निज-पद रोपी ॥ ४ ॥
शठा मम पदा; जरी उचलिसी । फिरति राम हरलों सीतेसी ।
एका सुभट; म्हणे दशशीश । अपटा धरणिं: धरुनि पद कीश ॥ ५ ॥
इंद्रजीत: आदिक वलवान । मुदित उठति; नाना भट जाण ।
उचलण्यास पद: करिति उपायां । न चळे: जाती: नमुनी पाया ॥ ६ ॥
पुन्हां उठति, उचलिति सुर-शत्रू । चरण ढळेना परि रति—मात्रू ।
कुयोगि नर, कीं, उरगारातीं ! । मोह-विटप, उपटूं ना शकती ॥७॥
दो०— मेघनाद सम कोटि भट; उठले अति हर्षून ।
उचलिति: चळे न कपि चरण: वसले शिर नमवून ॥३४ (क)॥
दो०— सोडि न धरणी कपि-पदा: रिपु-मद सोडी ठाय ।
विघ्न-कोटिनें संत-मन: नीती सोडिल काय ? ॥ ३४ (ख) ॥

२ भीति. १ गरुडा.

कपिबल बघुनि;सकल मनिं हरले । पाचाग्नितां: स्वयें मग उठले ।
धरतां चरण; वदे तो अंगद । जगशी ना जरि: धरिशी मम पद ॥१॥
धरिसि न रामचरण शठ जाउनि ! । अति सलज्ज: फिरला, हें ऐकुनि ।
श्री हरली; तेजोहत झाला । जसा मध्य-दिनिं: चंद्र उगवला ॥२॥
सिंहासनीं; अधोमुख बसला । जणुं ऐश्वर्या, नाश जाहला ।
जगदात्मा; प्राणाधिप राम । तद्विमुखा न; मिळे आराम ॥ ३ ॥
राम-भृकुटिच्या, उमे ! विलासें । विश्व उपजुनी; पुनरपि नासे ।
तृणा कुलिश;कुलिशा तृण करिती । दूताचे पण; कधिं तरि टळती ॥ ४ ॥
सांगे कपि: नाना-विध नीती । काळ निकट, त्या: कसा मानि ती ।
रिपुमद मथुनि: रामयश वदला । सागुनि असें; वालिसुत फिरला ॥५॥
-" खेळवुनी रणिं; तुला न मारूं । वढाइ तोंवरि; वृथा; ना करूं " ।
प्रथमचि त्याच्या, सुता मारिलें । ऐकुनि दुःखित रावण झाले ॥ ६ ॥
यातुधान, अंगद-पण पाहुनि । भय-विव्हळ अति;विषाद सब-मनिं॥७॥

दो०— रिपुदल मर्दुनि मुदित कपी, वालि तनय बलपुंज ।
पुलकित-तनु लोचन सजल; धरी राम-पद-कंज ॥३५(क)॥

दो०— संध्या पाहुनि दशानन, भुवनीं जाइ उदास ।
मंदोदरि मग रावणा बहु समजावी खास ॥ ३५ (ख) ॥

कान्त ! विचारें; त्यजा कुमतिसी । योग्य न तुम्हां;समर रघुपतिसी ।
रामानुज लघु; रेषा काढी । लंघवे न अशि; शक्ती गाढी ! ॥ १ ॥
जिंका तुम्हीं; त्यासि संग्रामें । दूतांचीं अशि, ज्यांच्या कामें ।
सहज, सिंधु, लंघुनि तव लंके ।-आला कपि,-केसरी न शंके ॥ २ ॥
रक्षक वधुनी; विपिन विनाशी । तुज देखत, मारी अक्षासी ।
तव पुर जाळुनि; भस्मचि केलें । बल-मद-दर्प; कुठें तव गेले ॥ ३ ॥
नाथ ! बढाया; वृथा न मारा । मी वदतें तें; मनीं विचारा ।
पति ! रघुपतिसि: नृपति नच माना । अग-जग-नाथ; अतुलबल जाणां ॥४॥
बाण-प्रताप; विदित मारीचा । मानिलें न; तद्वचना नीचा ।
जनक सभेत अमित भूपाल ।-होते. तुम्हिंहि; बली सुविशाल ॥ ५ ॥
भंगुनि चापा; जानकि वरिली । तदा करुनि रण; कां न जिंकिली ? ।
सुरपति-सुत, बल; अल्प समजला । जिवंत ठवुनि; नेत्र फोडिला ॥ ६ ॥
शूर्पणखेची झालि दशा ती । तदपि मनीं नहिं; लाज कशी ती॥ ७ ॥

---

२ रावण स्वत: ३ वज्र.

दो०— वधि विराध खर दूषण ही; सलील मारि कबंध।
एक शरें वालीस वधी; जाणा त्या दशकंध ॥ ३६ ॥

जो जल-नाथा; बांधी हेलां । प्रभु उतरे, दलः—सहित सुवेला
कारुणीक दिनकर-कुल-केतू । दूत पाठवी; तव-हित-हेतू ॥ १ ॥
मथी तव बला; सभेंत कैसा । गजयूथांमधिं; मृगपति जैसा ।
अंगद हनुमान्; अनुचर ज्याचे । रणझुंझार; वीर अति साचे ॥ २ ॥
त्यांसि नाथ; कितिदां नर म्हणतां । मुधा मान, ममता, मद धरता ।
नाथ करुनि हा ! रामविरोधा । काल-विवश, मनिं; धरा न बोधा ॥३॥
काळ कुणा हि, न दंडें वधितो । धर्म, बुद्धि, बल विचार हरतो ।
स्वामिन् ! काळ; निकट ज्यां येतो । तुमच्या एसा; त्यां भ्रम होतो ॥ ४ ॥

दो०— सुत-युग मेलें पुर जळलें; अतां रिपुस्त्री देइ।
कृपासिंधु रघुवर भजुनी; नाथ विमल यश घेइ ॥ ३७ ॥

शर-सम नारी;-वचन ऐकिलें ।'प्रभात होतां; सभेंत गेले ।
सिंहासनीं बसे; अति फुलुनी । अति अभिमानें; भयासि भुलुनी ॥ १ ॥
इथें अंगदा; प्रभु बोलावी । येउनि पद-कमलीं शिर लावी ।
बसवुनि सादर, समीप भारी । बोलति हसत; कृपालु खरारी ॥ २ ॥
वालितनय ! अति; कौतुक मजला । तात सत्य वद; पुसतो तुजला ।
रावण यातु; धान-कुळ-टिळका ।-भुजबल अतुल; विदित त्रैलोका ॥३॥
किरीट त्याचे; चार धाडिले । सांग तात ! तुज; कसे मिळाले ।
श्रुणु सर्वज्ञ; प्रणत—सुखकारी । मुकुट न हे; भूपति-गुण चारी ॥ ४ ॥
साम दाम आणि; दंड विभेद । नृपमनिं वसति; वदे प्रभु वेद ।
धर्म-नीतिचे; सुरम्य चरणाचि । असें जाणुनी; आले शरणाचि-॥ ५ ॥

दो०——धर्महीन प्रभुपदविमुख; कालविवश दशशीस।
आले त्यागुनि त्यासि गुण; पदीं कोसलाधीश ॥ ३८ (क) ॥

दो०— परम चतुरता पाहुनी; हसले राम उदार।
समाचार वदले सकल; पुरिचे वालि कुमार ॥ ३८ (ख) ॥

इति श्री लंकाकांडे अंगदपणादि-रामांगदसंवादो नाम
चतुर्थोऽध्यायः।

———

१ लीलेनें. २ व्यर्थ. ३ येथें गोरखपूरचा पाठ न घेतां दुसरा पाठ घेतला आहे. ४ विसरून.

अध्याय ५ वा

समाचार जें; रिपुचा कळला । बोलावी प्रभु; सचिवां सकलां ।
लंकाद्वार; विकट अति चार । कशीं व्यापणें; करा विचार ॥ १ ॥
मग कपीश; ऋक्षेश, बिभीषण । स्मरुनि हृदयिं; दिनकर-कुल-भूषण।–
विचार करुनी; कार्य ठरविलें । चार भाग कपि:-कटक बनविलें ॥२॥
यथायोग्य, सेनापति केले । बोलावुनि; सब यूथप आले ।
प्रभू-प्रतापा; सांग वर्णिलें । सिंहनाद ते; करित धावले ॥ ३ ॥
हर्षित राम:-चरणिं शिर नमिती । गिरि शिखरें; घेउनी धावती ।
गर्जंति तर्जंति, भालु-कपीश । जय रघुवीर; कोसलाधीश ॥ ४ ॥
जाणति परम; दुर्ग अति लंका । प्रभू--प्रतापें; कपिंसि न शंका ।
मेघ-घटा-सम वेढा घालिति । डंके भेरी; मुखें वाजविति ॥५॥

दो०— जयति राम जय लक्ष्मणा; जय कपीश सुग्रीव ।
सिंहनाद कपि गर्जती: भालु महा-बल-शींव ॥ ३९ ॥

कोलाहल; लंकेमधिं भारी । —ऐकुनि रावण अति मद-धारी ।
कपी-धृष्टता; तरी पहावी. । हसुनी रावण; सैन्य आणवी ॥ १ ॥
आले कीश; काळ जणुं प्रेरी । क्षुधावंत; रजनीचर भारी ।
अट्टहास शठ: विशाल करि तो । घर बसल्या विधि; अहार देतो ॥२॥
सुभट सकल ! चहुं;दिशांसि जावें । भालु कीश सब; धरुनी खावे ।
उमे ! रावणा; किति अभिमान । टिट्टिभ शयन: करी उत्तान ॥३॥
आज्ञा घेउनि; राक्षस गेले । भिंडिपाल; बरच्यादि घेतले ।
तोमर मुद्गर; परशू चंड । शूल कृपाण; परिघ गिरिखंड ॥४॥
जणुं अरुणो[1]पल-निकरा पाहति । मांसाहारी शठ, खग धावति ।
चंचुंभग दुख; ते न पाहती । तसेचि हे: मनुजाद[2] धावती ॥ ५ ॥

दो०— नानायुध शरचापधर; यातुधान बल-वीर ।
चढले तट-बुरुजां-वरती; कोटि कोटि, रणधीर ॥४०॥

दुर्ग--तटावरि; शोभति कैसे । मेरु-शृंगिं घन; बसले जैसे ।
रण-वाद्यें बहु: गर्जु लागलीं । वीरश्री भट;-चित्तीं चढली ॥ १ ॥
ढोल वाजती; भेरि अपारा । कातर हृदयीं वसे दरारा ।
जाउनि बघति; कपींचे थाटां । अति विशाल-तनु; भालु-सुभटां ॥२॥
धावति गणिति न; अवघड घाटां । फोडुनि पर्वत; पाडिति वाटा ।

१ लाल-पाषाण. २ नरभक्षक.

कट-कटती; कोटी भट गर्जति । दशनिं ओठ खाती, अति तर्जति ॥३॥
रावण, राम; शपथ बहु होई । जय जय जय जय सुरू लढाई ।
शिखर समूहां; निशिचर फेंकिति । उडुनि धरुनि, कपि; तसेचि झोंकिति॥४॥

छं०— बहु कुधर खंडहि चंड मर्कट; भालु, दुर्गीं टाकिती ।
पदिं धरुनि, फिरवुनि; धरणिं अपटुनि; पळुनि मग पाचारिती॥
अति तरुण, तरल,-प्रताप, तर्पनि; उडुनि दुर्गीं चढति ते ।
कपि भालु चढुनी; मंदिरीं बहु; राम सुयशा गाति ते ॥ १ ॥

दो०— एकेकासी धरुनि कपी; येर्इनि जाति पळून ।
आपण वरती खालिं भट; पटनि धरणि येऊन ॥ ४१ ॥

प्रभू-प्रतापें, बल कपि-यूथां । मर्दिति[1], निशिचर-सुभट-वरूथां ।
जिथें तिथें; दुर्गावरि वानर । जय रघुवीर प्रताप-दिवाकर ॥ १ ॥
जिकडे तिकडे; राक्षस पळती । प्रभंजनें जणुं; मेघ वितळती ।
हा हा !-कार नगरिं मग भारी । रडती आतुर; बालक, नारी ॥ २ ॥
सर्व रावणा; गाळी देती । करितां राज्याचि, मृत्यु घेती ।
निजदल विकल; कानिं जं पडलें । भटां फिरवुनी, क्रोधें वदलें[2] ॥ ३ ॥
जो रण-विमुख, येइ मम काना । कराल खड्गें मारिन जाणां ।
सर्व खाउनी; भोगुनि नाना । समरा तुमिं निज जपतां प्राणां ॥४॥
उग्र वचन, ऐकुनि सब डरल । सकोप वळले; सुभट लाजल ।
सन्मुख मरणचि; वीरां शोभा । त्यजिती ते; प्राणांचे लोभा ॥ ५ ॥

दो०— बहु आयुध-धर, सुभट सब; भिडति रिपुसि बाहुनि[3] ।
व्याकुळ केले भालु कपी, परिघ शूल मारूनि ॥ ४२ ॥

भय-भीतहि कपि; पळूं लागती । पुढ जरी ते; उमे ! जिंकिती ।
म्हणति, कुठें; अंगद हनुमंत । कोठें नील; द्विविद बलवंत ॥ १ ॥
दळ पळलें, कळलें हनुमाना ।—पश्चिम द्वारिं असे;. बलवाना ।
तिथें करी, घननाद लढाई । द्वार फुटेना; अति कठिणाई ॥ २ ॥
पवन-तनय, उपजवि मनिं क्रोधा । गर्जे प्रबल, कालसम योधा ।
लंकादुर्गीं; उडुनी आला । घननादावरि; स-गिरि धावला ॥ ३ ॥

---

१ आरोळ्या देऊं लागले २ रावण म्हणाला. ३ आव्हान करून.

रथ भंगुनि, सूतासि निपाती । लाथा मारी; त्याच्या छातीं ।
दुसरा सूत; विकल त्या जाणुनि । आणी त्वरित, घरीं रथिं घालुनि ॥ ४ ॥
दो०— असे एकला पवनसुत; दुर्गावरि; जाणून ।
खेळासम मग वालिसुतः जाइ उडी मारून ॥ ४३ ॥

युद्धिं विरुद्ध; क्रुद्ध युग वांदर । राम-प्रताप; स्मरुनि निज आंतर[1] ।
रावण भुवनिं; चढुनि दोघेही । करिती रघुवर शपथा तेही ॥ १ ॥
धरुनी, कळसा-सह; गृह ढकलिति । बघुनि, दशानन मनीं दचकती ।
नारिवृंद करि; पिटिती छाती । दोघे कपि; आले उत्पाती ॥ २ ॥
लीलेनें कपि; तयां दटाविति । रघुवीरांचें; सुयश ऐकविति ।
करीं घेउनी; कांचन स्तंभा । म्हणति करूं; उत्पात—अरंभा ॥ ३ ॥
रिपु-कटकामधिं; गर्जत शिरले । बाहुबळें त्यां; मर्दुनि चिरलें ।
कोणा लाथाः चपेट कोणा । राम भजा ना; तें फळ घ्याना ॥ ४ ॥
दो०— एकैकातें मर्दुनी, तोडुनि फेंकिति मुंड ।
पुढें रावणा पडुनि ती, फुटती जणुं दधिकुंड ॥ ४४ ॥

महा महाः मुख्याचि जे मिळती । धरुनि पदीं प्रभु;—कडे फेकिती ।
वदे विभीषण; त्यांच्या नामां । त्यांना राम देति निज—धामा ॥ १ ॥
खल मनुजाद; द्विजामिष-भोगी । पावती गति जी; याचिति योगी ।
उमे ! राम मृदु-मन करुणाकर । रिपुभावें स्मरती; मज निशिजर ॥२॥
देति परम गति, असें जाणुनी । कृपाळु ऐसे, कोण भवानी ।
त्यजुनी भ्रम, न, होति अनुरागी । ते पामर; मतिमंद अभागी ॥ ३ ॥
अंगद आणि, मारुती प्रवेश—।-करिति दुर्गि; वदले परमेश ।
दुर्गी कपियुग; शोभति कैसे । मथिति सिंधु, युग-मंदर जैसे ॥ ४ ॥
दो०— बाहुबळें रिपुदल दमुनी; बघुनि दिनाचा अंत ।
आले उभयहि विना श्रम; उडुनि जिथें भगवंत ॥ ४५ ॥

प्रभु-पद-कमलीं; मस्तक नमिलें । बघुनि भटां प्रभु प्रसन्न झाले ।
राम कृपायुत. दोघां बघती । श्रम जाउनि अति सौख्य पावती ॥१॥
उभय हि गेले; यदा जाणती । नाना भालु-कपी-भट फिरती ।
प्रदोष-बळ; पावुनी निशाचर । धावति जय जय; करुनि अपार ॥२॥
निशिचर-सैन्य; बघुनि, कपि फिरले । जिथें तिथें; अति गर्जुनि भिडले ।
युग, दल बली; परस्पर वाहिति । लढतां सुभट न, हारहि मानिति ॥३॥

---

१ आपल्या अंतःकरणात.

महावीर राक्षस; सब काळे । नानावर्ण वलीमुख सगळे ।
सबल युगलदलिं; समबल योधे । कौतुक करिति; लढति अति क्रोधें ॥४॥
प्रावृट्-शरद-पयोद, न गणती । प्रभंजनें; प्रेरित, जणुं लढती ।
अनिप, अकंपन, अणि अतिकाया । भग्न बघुनि दल; करिती माया ॥ ५ ॥
क्षणांत झाला; अति अंधार । वृष्टि होय; रुधिरोपल फार ॥ ६ ॥
दो०— बघुनि दशदिशीं निबिड तमा; कपि-दलिं खळबळ फार ।
पाहुं न शकती परस्परां; झाला हा-हा-कार ॥ ४६ ॥
सकळ मर्म; जाणे रघुराणा । बोलावुनि; अंगद हनुमानां ।
वृत्त सकळ हें; कानिं घातलें । क्षणांत परिसुनि; वीर धावले ॥१॥
हसुनि कृपाळू; चाप चढविती । पावक-सायक; सपदि सोडिती ।
प्रकाश करुनी; तमास हरिलें । ज्ञानोदयिं जणुं; संशय सरले ॥ २ ॥
भालु-वलीमुख; मिळुनि प्रकाश । धावति मुदित; नसे श्रम-त्रास ।
मारुति अंगद; रणीं गर्जती । हांक ऐकुनी; निशिचर पळती ॥ ३ ॥
भट पळतां त्यां; अपटिति धरणीं । करिति भालु कपि; अद्भुत करणी ।
पदीं धरुनि; जलधींत फेकिती । मकर उरग, त्यां; धरुनी खाती ॥ ४ ॥
दो०— मेले किति घायाळ किती; पळले दुर्गिं चढून ।
भालु गर्जती वलीमुख; रिपु-गाळण उडवून । ॥ ४७ ॥
विभाग चारी; निशा जाणुनं । आले जेथें; राम जग-धनी ।
राम कृपायुत बघती जेव्हां । होति गतश्रम[4] वानर तेव्हां ॥ १ ॥
इथें रावणें; सचिव जमविले । सांगे मग जे; सुभट मारिले ।
कटकार्धाचा; तो संहार । कपिनीं केला; करा विचार ॥ २ ॥
माल्यवंत अति; जरठ निशाचर । रावण-माता;—मह, मंत्रीवर ।
नीति-वचन अति; बोले पावन । ऐका थोडी; माझी शिकवण ॥ ३ ॥
सीतेला जैं; हरुनि आणिलें । अशकुन होति, न जाति वर्णिले ।
यश ज्याचें श्रुति; पुराण गाती । त्यासि विमुख सुख कोणा प्राप्ती ॥४॥
दो०— हिरण्याक्ष, बंधू-सहित; मधु कैटभ बलवान ।
जो मारी तो अवतरे; कृपासिंधु भगवान ॥ ४८ (क) ॥

इति श्री लंकाकांडे युद्धारंभ-वर्णनं नाम पञ्चमोऽध्यायः ।
मास पारायणे पञ्चत्रिंशो विश्रामः ।

---

१ वानर २ वर्षाकाळचे-काळे, मेघ, आणि शरदतूतील पांढर मेघ. ३ रक्त आणि दगड . ४ श्रम रहित.

अध्याय ६ वा

दो०— कालरूप, खलवन-दहन; गुणागार घनबोध।
विधि-हरि-हर-ज्या सेविती; त्यासी केविं विरोध ! ॥४८(ख)॥

वैर विसरुनी; द्या वैदेही । भजा कृपानिधि; अनुपम स्नेही ।
त्याचें वचन; बाण-सम लागे । काळें कर मुख; अभागि सांगे ॥ १ ॥
वृद्ध म्हणुनि ना; मारूं तुजला । तोंड न दावी; मम नयनांला ।
तो निज-चित्तीं; करि अनुमान । वधूं बघति या; कृपानिधान ॥ २ ॥
गेला उठुनि; वदत दुर्वाद । सकोप बोले; मग घननाद ।
सकाळिं कौतुक; बघाल कोडें । फार करिन मीं; वदतों थोडें ॥ ३ ॥
ऐकुनि सुत-वच; आशा चित्तीं । अंकीं घेई; समेत प्रीती ।
विचार करितां; झालि पहाट । निरोधिती कपि; चारी वाट ॥ ४ ॥
दुर्गम दुर्गा; कपी वेढिती । कोलाहल बहु; नगरीं करिती ।
विविधायुध-धर; राक्षस धावति । गडावरुनि, गिरि-शिखरें ढकलिति ॥५॥

छं०— ढकलीति भूधर;-शिखर कोटी; वि विध गोळे चालले।
घड् घोष जणुं; पविपात; गर्जति; प्रळयिचीं जणुं वादळें[2] ॥
भट विकट, मर्कट; भिडति पडति; न डरति तनु जर्जर क्षितीं ।
बहु शैल उचलुनि; दुर्गि पे किति; जागिं[1] निशिचर मृत किती ॥१॥

दो०— मेघ--नाद ऐके यदा, गड घेती वेढून ।
वीर गडाहुनि उतरुनी; सन्मुख जाइ चढून ॥ ४९ ॥

कुठें अयोध्या-पति युग बंधू । धन्वी सकल; लोकिं, जनवन्द्य ।
कुठें नलि--नल; द्द सुग्रीव । अंगद, हनूमंत बल-शीव ॥ १ ॥
कुठें विभीषण; बंधू-द्रोही । मारुं आज सब; विशेष तोही ।
म्हणुनि असें क्षुर[3],--शर संधानी । अति कोपें; आकर्णचि ताणी ॥ २ ॥
शर--समूह बहु; सोडुं लागला । सपक्ष जणुं, बहु नाग धावला ।
पळत चहुंकडे; दिसती वानर । सन्मुख होण्या; मिळे न अवसर ॥३॥

---

१ जागच्या जागीं. २ मेघ. ३ तीक्ष्ण.

जिकडे तिकडे; पळूं लागले । युद्धेच्छेते: सर्व विसरले ।
रणीं भालु कपि; एक न दिसला । प्राणशेष जो; नाहीं केला ॥ ४ ॥
दो०— सर्वां दृश दश मारि शर; पडले भूवरि वीर ।
सिंहनाद करि गर्जना; मेघनाद बल-धीर ॥ ५० ॥

बघुनि पवनसुत; कटका हाल । क्रोधवन्त; जणुं धावे काळ ।
एक महागिरि; सत्वर उपटी । घननादावरि; सकोप अपटी ॥ १ ॥
येतां बघुनी; गगनिं पळाला । सूत-तुरग-रथ;-नाश जहाला ।
हनुमंते; बहुवार वाहिल । निकट येइना; मर्म पाहिलें ॥२॥
रघुपति--निकट; जाइ घननाद । नानाविध: वदला दुर्वाद ।
अस्त्र शस्त्र; नानाविध टाकी । तोडुनि वारिति[1]; सहज कौतुकी ॥३॥
प्रताप पाहुनि; शठ चौताळे । नानाविध करि; माया—चाळे ।
गरुडासी, जणुं; कुणि करि चाळा । दटावि दावुनि; लघु सापाला ॥ ४ ॥

दो०— ज्याची माया वश करी: विधि-शंकर, लघुथोर ।
त्यासि दाखवी निशाचर; शठ मायेचा जोर ॥ ५१ ॥

नभीं चढुनि: वर्षी अंगारां । भूंतुनि प्रगट, होति जल-धारा ।
पिशाच नाना, पिशाचिनि किती । मारा कापा, म्हणत नाचती ॥ १ ॥
विष्ठा पूय[2] रुधिर कच हडकें । वर्षी कधीं; उपल बहु धडकें ।
वर्षुनि धूळ; करी अंधारा । दिसे न अपुला; देह—पसारा ॥ २ ॥
व्याकुळ अति कपि; माया बघतां । मरण येइ हें; असें चालतां ।
कौतुक बघुनी; राम विहसले । सभय सकल कपि: मनीं जाणिलें॥३॥
एक्या बाणें; हरिली माया । भानु जसा हरि; तिमिर—निकाया ।
कृपा दृष्टिनें; सकळ पाहिलें । रणीं प्रबळ; ना रहति राखिले ॥ ४ ॥
दो०— रघुवर आज्ञा घेउनी; अंगदादि सह कीश ।
चाप बाण घेऊनि करीं, जाति क्रुद्ध धरणीश[3] ॥ ५२ ॥

अरुण-नयन--बाहु विशाल । हिमगिरि-निभ-तनु, किंचित लाल ।
इथें रावणें; सुभट धाडिले । नाना शस्त्रा;--स्त्रांसह आले ॥ १ ॥

१ निवारिति. २ पू. ३ लक्ष्मण.

भूधर-नख-विटपायुध-धारी । धावति कीश, रामजयकारी ।
भिडति सकल; जोडीशी जोडी । उभयां जय;-इच्छा ना थोडी ॥ २ ॥
मुष्टी लाथा; दशनीं कापिति । कपि जयशील; मारुनी दापिति ।
मार मार; धर; धर धर पकडा। शिरें तोडुनी; भुजाहि उखडा ॥ ३ ॥
ऐसा रव; व्यापी नव खंडें । धावति भूवरि; रुंडें चंडें ।
बघती कौतुक; नभिं सुरवृंद । कधीं सविस्मय; कधि आनंद ॥ ४ ॥

दो०— गर्ता मध्यें रुधिर जमे; वरती धूळ उडून ।
भासे पावकराशि जणूं; राख ठेवि झांकून ॥ ५३ ॥

घायळ वीर, विराजति कैसे । कुसुमित किंशुक-तरूच जैसे ।
लक्ष्मण मेघ-नाद युग—योधे । भिडति परस्पर; अति ते क्रोधें ॥ १ ॥
एक दुजाते; जिंकुं न शकती । निशिचर, छलबल; करी अनीती ।
क्रोधवंत मग; होति अनंत । तोडिति रथ, सारथी, क्षणांत ॥ २ ॥
प्रहार करि; नाना-विध शेष । राक्षस तदा; प्राण-अवशेष ।
रावण-सुत करि; मनिं अनुमाना । संकट महा! हरिल हा प्राणां ॥ ३ ॥
वीर-घातिनी; शक्ती सोडी । तेज-पुंज लक्ष्मण-उर जोडी ।
मूर्च्छा आली; शक्ति लागुनी । जाइ निकट मग; भया त्यागुनी ॥४॥

दो०— मेघनाद-सम कोटि शत; वीर तया तुकतांत ।
उचले जगदाधार कसा? बहु लज्जित जातात ॥ ५४ ॥

श्रुणु गिरिजे! क्रोधानल ज्याचा । दाह करी; चौदा भुवनांचा ।
कोण जिंकि संग्रामीं त्यासी । सेविति सुर नर; अगजग ज्यासी ॥१॥
हें कौतूहल; तेचि जाणिती । कृपा जयावरि राघव करिती ।
संध्या होतां; .कटकें फिरलीं । सेनापतिनीं; गणना केली ॥ २ ॥
व्यापक ब्रह्म अजित भुवनेश्वर । लक्ष्मण कुठें? पुसे करुणाकर ।
तदा मारुती घेउनि आले । अनुज बघुनि प्रभु; दुःखित झाले ॥३॥
म्हणे भालुपति; वैद्य सुषेणा । आहे लंके; जाउनि आणा ।
लघुरूपें; जाउनि हनुमंत । गृहासहित आणिला क्षणांत ॥ ४ ॥

दो०— सुषेण येउनि मस्तका; नमवी रघुपति पायिं ।
वदे नाम गिरि औषधी; क्षणांत मारुति जाइ ॥ ५५ ॥

राम-चरण;-सरसिज मनिं धरुनी । निघे समीरण-सुत; बल वदुनी ।

४ पळसाचें झाड. ५ उचलूं पाहतात. ६ स्थावर, जंगम. ७ वायु-पुत्र.

कहे दूत; मर्म सब वदला । रावण काल;-नेमि-घरिं आला ॥ १ ॥
सर्व मर्म त्या; रावण सांगे । ऐकुनि तो बहु; शिर पिटुं लागे ।
तुमच्या समक्ष; नगरी जाळी । कोण करी त्या; मार्गिं कुचाळी ॥ २ ॥
राम भजुनि हित; साधा अपणां । त्यजा नाथ या; वृथा वल्गना ।
नीलकंज-तनु; सुंदर शामा । हृदयिं धरा; लोचन-अभिरामा ॥ ३ ॥
मी तूं; मम तव; मौढ्यां त्यागा । महामोह-निशि; निजले, जागा ! ।
काल-भुजंगा;- भक्षक ऐसा । जिंका स्वप्नसमरिं तरि कैसा ॥ ४ ॥

दो०— ऐकुनि; रावण क्रुद्ध अती; तो मनिं करी विचार ।
राम-दुत-करिं मरण बरें; हा खल, शठ, मलभार ॥ ५६ ॥

अशा विचारें; पथिं रचि माया । सर, मंदिरें बाग तरु-छाया
मारुत-सुत पाही शुभ आश्रम । आज्ञेनें जळ; पिऊं पळे श्रम ॥ १ ॥
राक्षस तो; छल-वेषें बसला । मोहुं बघे; श्रीपति-दूताला ।
जाइ मरुत-सुत; नमवी माथा । तो गाई मग; हरिगुण-गाथा ॥ २ ॥
होत महारण; राम-रावणा । जिंकिल राम; न संशय, जाणां
येथें बसुनि; सर्व मज दिसतें । ज्ञान-दृष्टिनें; बळ बहु असतें ॥ ३ ॥
कपि मागे जळ; देइ कमण्डल । पुरेल ना, मजला थोडें जळ ।
स्नान करुनि तूं सत्वर यावें । दीक्षा देऊं; ज्ञान तूं पावें ॥ ४ ॥

दो०— तडागिं शिरतां पद मकरी धरि, अति व्याकुळ जाण ।
वधितां; ती मग दिव्य तनू; धरुनि चढे नभ-यान ॥ ५७ ॥

कपि तव दर्शन; हरि मम पापा । झालें मुक्त; मुनीच्या शापां
मुनी नसे हा; राक्षस घोर । मानी सत्य; वचन मम सार ॥ १ ॥
वदुनि अप्सरा; गेलि जेधवां । कपि गेला; मुनि पाशिं तेधवां ।
मुने दक्षिणा; प्रथमचि घ्यावी । नंतर आम्हां; दीक्षा द्यावी ॥ २ ॥
शिरिं लांगूल; लपेटुनि अपटी । प्रगटी निज तनु; मरतां कपटी ।
राम राम म्हणुनी; त्यजि प्राण । ऐकुनि मुदित, जाइ हनुमान ॥ ३ ॥
शैल पाहिला; औषधि न दिसे । सहसा गिरि; उपटूनि घेतसे ।
गिरिसह रात्रीं; नभीं निघाला । पुरी अयोध्ये-वरुनि चालला ॥ ४ ॥

दो०— पाहुनि भरत विशाल अती, राक्षस मनांत मानि ।
फलविण सायक मारि, धनू; आकर्णी तो तांणि ॥ ५८ ॥

मूर्छित पडला; लागत सायक । बोलत राम, राम रघुनायक ।
प्रिय वच ऐकुनि; भरत धावले । अति आतुर, कपि,-संनिध आले ॥ १ ॥

---

१ मूर्खपणाला. २ कालनेमि. ३ विमान.

बघुनि विकल कपि; हृदयीं लावी । जागेना जरि; बहुत जागवी
उदास मुख, मनिं; दुःखित भारी । वदे वचन; लोचनिं बहु वारी ॥ २ ॥
जो विधि, राम-विमुख मज करितो । तोचि पुन्हां; दारुण दुख देतो ।
जरि माझी, मन; वच-अणि काया । प्रीति रामपदिं, सत्य अ-माया ॥ ३ ॥
तरि होवो कपि; गत-श्रम-शूल । जरि मजला; रघुपति अनुकूल ।
वच वदतां कपि; उठुनि बैसला । जय जय सीता-राम बोलला ॥ ४ ॥

सो०— कपिला हृदयीं घेति; पुलकित तनु लोचन सजल ।
हृदयीं माय न प्रीति; स्मरत राम रघुकुल टिळक ॥ ५९ ॥

तात ! कुशल वद; सुखनिधान कीं । सहित अनुज अणि जननि जानकी ।
थोडक्यांत कपि; चरित्र वदले । व्याकुळ होउनि; विलपुं लागले ॥१॥
अहा दैव ! जगिं; कसा जन्मलों । प्रभुच्या एक न; काजा आलों ।
असमय समजुनि; मनिं धरि धीर । मग कपिला; बोले बलवीर ॥ २ ॥
तात ! विलंब; होय तुज जातां । नासे कार्य हि; सकाळ होतां ।
मम सायकिं चढ; शैल समेतां । निकट पाठवूं; कृपा-निकेता ॥ ३ ॥
ऐकुनि कपि-मनिं; ये अभिमान । मम भारें; जाइल कीं बाण ? ।
राम-प्रभावा; मनीं आणिलें । वंदुनि पद, कर जोडुनि वदले ॥ ४ ॥

दो०— प्रताप तव मनिं धरुनि प्रभू; जातों नाथ पळांत ।
आज्ञा घेउनि नमुनि पदा; पवन-तनय जातात ॥ ६० (क)॥

दो०— भरत बाहु-बल, शील गुण; प्रभुपदिं प्रीति अपार ।
वाखाणित मनिं जाति बहु; किंतिदां; पवन-कुमार ॥६०(ख)॥

बघुनि लक्ष्मणा राम खरारी । वदती वचन; मनुज-अनुकारी ।
अर्ध-निशा गत, कपि ना येई । अनुजा राम: पोटिं मग घेई ॥ १ ॥
पाहूं शकसि न; दुःखी मजला । स्वभावें चि तूं सदा कोमला ।
मजसाठीं; त्यजुनी पितृमाता । सहसि विपिनिं; हिम, आतप, वाता ॥२
तो अनुराग; कुठें तव गेला । ऐकुनि उठासि न; विकल वचांला ।
बंधु-वियोगा, जरी जाणतों । त्या पितृवचना; मुळि न मानतों ॥ ३॥
सुत, धन, नारि; धाम परिवार । होति जाति जगिं; वारंवार ।
सु-विचारें मनिं; जागे ताता । जगतिं मिळे न; सहोदर भ्राता ॥ ४ ॥
यथा पंखविण; खग अति दीन । मणिविण फणि; करिवर कर-हीन ।
तसें जिवन मम; बंधु तुजविणें । जरि जड दैवें; असेल जगणें ॥ ५ ॥
नगरिं जाउं, मुख, कवण घेउनी । नारीस्तव प्रिय; बंधु गमवुनी ।

१ निष्कपट. २ मावे. ३ भरत.

अपयशाही; सहतो जगिं पाही । नारि-हानि; क्षति विशेष नाहीं ॥ ६ ॥
आतां अपयश; दुःख सुत तुझें । सहिल अदय मन; कठोर माझें ।
निज जननीचा; एक कुमार । तात तिचा तूं प्राणाधार ॥ ७ ॥
सोंपवि तुज मज धरुनी पाणी । सर्वहि सुखद; परम हित मानी ।
जाउनि काय वदूं; मी तिजला । उठुनी कां नच; सांगसि मजला ॥८॥
बहुविध शोचति; शोच-विमोचन । स्रवति सलिल; राजिव-दल-लोचन ।
एक अखंड, उमे ! रघुनायक । नरगति दाखवि; जन-सुखदायक ॥९॥

दो०— शोका ऐकुनि जाण; विकल होति वानर निकर ।
तों आले हनुमान; जणुं करुणेम वाररस ॥६१॥

भेटति हर्षें; प्रभु हनुमाना । प्रभु कृतज्ञ अति परम सुजाणा ।
त्वरित वैद्य मग; उपाय करिती । लक्ष्मण हर्षित; उठूनि बसती ॥ १ ॥
हृदयिं धरी प्रभु; भेटे भ्राত্যা । मोद सकल; कपि—समुदाया त्या ।
कपिनें वैद्या; पुनरपि नेला । जसा तयाला; प्रथम आणिला ॥२॥
हा वृत्तांत; रावणा कळला । विषाद अति, शिर; पिटूं लागला ।
घट-कर्णा[२] प्रति; व्याकुळ आला । नाना यत्नें; जागवि त्याला ॥ ३ ॥
जागे राक्षस; दिसला कैसा । काळ जणूं देहा धरि तैसा ।
कुंभकर्ण; म्हणतो हे बंधू । सुकला कां रे ! तुझा मुखेंदू[३] ॥ ४ ॥
सांगे सकल; कथा अभिमानी । जैसी सीते हरुनी आणी ।
तात ! कपींनीं, निशिचर वधिले । महा महा; वीरांसि मारिलें ॥ ५ ॥
दुर्मुख; सुररिपु; मनुजाहारी । भट अति—काय; अकंपन भारी ॥
अपर महोदर; आदिक वीर । रणभूवरि; पडले रणधीर ॥ ६ ॥

दो०— ऐकुनि रावण-वचन मग; कुंभकर्ण मनिं म्लान ।
जगदंबेसी[४] हरुनि शठा; इच्छिसि तूं कल्याण ॥ ६२ ॥

ठीक न केलें निशिचर-राया । जागविलें मज; अतां कासया ।
अझुनी तात ! त्यजुनि अभिमान । भज रामासि; होय कल्याण ॥ १ ॥
असे रावणा ! नर रघुनायक ? । मारुति—सम ज्या सेवक लायक ।
अहह ! बंधु तूं वाइट केलें । प्रथम चि मला; कां न कळविलें ॥२॥

---

१ नाश, तोटा. २ कुंभकर्णा जवळ. ३ मुखचंद्र ४ म्हणे.

केला प्रभु ! त्या विरोध देवा । शिव-विधि-सुर; करिती वत्सेवा ।
नारद मला; ज्ञान जें वदला । तुला सांगतों ! समय न उरला ॥३॥
एकवार; आलिंगी मजला । जाउनि करिनि, सुफळ नयनांला ।
शाम वपू; सरसीरुह—लोचन । बघूं जाउनी; त्रिताप-मोचन ॥४॥
दो०— राम-रूप गुण स्मरत तो; प्रेममग्न लव एक ।
रावण मागवि कोटि घट; मद[1]; आणि महिष अनेक ॥६३॥
खाउनि महिष; करी मदपान । गर्जे वज्राघात—समान ।
कुंभकर्ण; दुमद रणरंगें । त्यजी दुर्ग, नहि; सेना संगे ॥ १ ॥
बघुनि, बिभीषण; सन्मुख गेला । पदिं शिर नमुनी, स्वनाम वदला ।
अनुजा उठवुनि; हृदयीं धरिला । रघुपति-भक्त; बघुनि, मनि भरला ॥२॥
तात ! लाथ मज; रावण मारी । होतें वदत; मंत्र हित-कारी ।
त्या दुःखें रामा-प्रति आलों । दीन म्हणुनि मी;प्रिय अति झालों॥३॥
बाळा ! ऐक; काल--वश रावण । कसा मानि तो; हितकर शिकवण ।
धन्य धन्य तूं ! धन्य बिभीषण । होशिल बा ! निशिचर-कुल-भूषण ॥४॥
बंधु ! करिसि तूं ; उज्ज्वल वंशा । भज भज सदा; विबुध-अवतंसा ॥५॥
दो०— तनु मन वचनें, त्यजुनि छल, भजा राम रणधीर ।
जा ! नच निजपर समज मज; मी हि काल-वश वीर ! ॥६४॥

इति श्री लंकाकांडे लक्ष्मणमेघनादयुद्धादि बिभीषण—कुंभकर्ण-संवादो नाम षष्ठोऽध्यायः ।

अध्याय ७ वा

परिसुनि वच मग; निघे बिभीषण । येइ जिथें; त्रैलोक्य—विभूषण
नाथ ! भूधराकार-शरीर । आला कुंभ-कर्ण रणधीर ॥ १ ॥
कपि-कर्णी हैं जेव्हां पडलें । किल-किलूनि; बलवान धावले ।
उपटुनि घेति; विटप अणि भूधर । कड—कडूनि बहु; टाकिति त्यावर ॥२॥

---

[1] मदिरा.

कोटि कोटि गिरि,-शिखर प्रहार । -करिति भालु कपि; एकचि वार ।
डगें न मन, तनु; ढळतां न ढळे । गजासि मारुनि; जशीं रुइ-फळें ॥३॥
मग मारुत-सुत; मारी मुष्टी । शिर पिटि पडुनि; विकल भू-पृष्ठीं ।
तो ही उठुनि; मारि हनुमंता । वेळ न लागे; भूवरि पडतां ॥ ४ ॥
मग नलनीलां भूवरि निजवी । जिथें तिथें भट; धुळीं लोळवी ।
बलिमुख सेना; जाइ पळोनी । अति भयभीत; न सन्मुख कोणी ॥ ५॥

दो०— अंगदादि कपि मूर्छित; करुनि सहित सुग्रीव ।
कपि-राजा खाके धरुनी; निघे अमित बल-शीव ॥ ६५ ॥

उमे ! करिति; रघुपति नर-लीला । जसा गरुड करि; अहिगणि खेळा ।
भ्रूभंगें जो; काळा खाई । शोभे कीं त्या; अशी लढाई ॥ १॥
जग-पावन; कीर्ती विस्तरती । जी गातां नर; भवनिधि तरती ।
मूर्च्छा गेली; मारुति जागे । सुग्रीवा मग, शोधूं लागे ॥ २ ॥
सुग्रीवहि; शुद्धीवर आला । खालिं पडे. मृत; गमला त्याला ।
कर्ण-नासिका; कापी दशनें । गर्जुनि नभिं तो; जातां जाणे ॥ ३ ॥
पाय धरुनि मग; अपटि भूवरी । उठुनि सुकंठ; पुन्हां त्या मारी ।
प्रभूकडे, ये मग बलवान । वदे जयति जय; कृपानिधान ॥ ४ ॥
नाक कान निज; तुटले बघुनी । धावे क्रुद्ध; मनीं बहु ग्लानी ।
सहज भीम वपु; गत-नासा-श्रुति । बघुनि कपिदळें; धरिती भीती ॥ ५ ॥

दो०— जय जय जय रघुवंशमणी; धावति कीश-वरूथ ।
सर्व एकदां तयावरी; फेकिति गिरि-तरु-यूथ ॥६६॥

कुंभकर्ण रण,-रंगिं विरुद्ध । सन्मुख जाइ; काळ कीं क्रुद्ध ।
कोटि कोटि कपि; धरुनी खाई । टोळधाड जशि; गुहेंत जाई ॥ १ ॥
नासा-मुख; कानांच्या वाटे । बाहिर येति; भालु कपि लाटे ।
मर्दुनि देहिं; कोटि करि मुर्दा । धुळींत मिसळुनि; कोटिक खुर्दा ॥२ ॥
रण-मद-मत्त; निशाचर दर्पी । गिळण्या विश्व; विधी जणुं अर्पी ।
भग्नें सुभट, ना; फिरति फिरविले । नयनिं दिसे न; न ऐकति वदलें ॥३॥
कपि-फौजे; धुळ-धाण उडाली । ऐकुनि, निशिचर; धाड हि आली ।
बघती राम; विकल कटकाला । शत्रु जमावहि बराच आला ॥ ४ ॥

दो०— 'श्रुणु सुग्रीव बिभीषण; अनुज ! रक्षणें सैन्य !
बघतों खळ-बल-दळ,' वदले; हारक भवभय-दैन्य ॥६७॥

---

१ डगमगेना. २ वानर, ३ सीमा. ४ कुंभकर्ण. ५ दाणादाण झाली.

कटि तूणीर, सज्ज धनु हातीं । अरिदल-दलना; रघुपति आती ।
प्रथम करी प्रभु; धनु-टंकोर । रिपुदल बधिर, श्रवुनि रव घोर ॥१॥
सत्य संध; सोडिति शर-लक्ष । काळ सर्प जणुं; उडति सपक्ष ।
भोंवति सोडिति; बहु नाराचां । कापिति बहु भट; विकट पिशाचां ॥२॥
तोडिति उर, शिर, पद, भुजदंडां । बहुत भटां; करिती शतखंडां ।
घायळ; मूर्छित; महिवरि पडती । सुभट सांवरुनि; उठती लढती ॥३॥
बाण लागतां; घन सम गर्जेति । कठिण बघुनि इषु; बहु रणें वर्जिति ।
रुंडें चंड; मुंडविण उडती । धर धर मार मार रव रडती ॥ ४ ॥

दो०— रामशरांनीं क्षणांत ते वधिले विकट पिशाच्च ।
येउनि रघुवर इषुधिमधीं; शिरती सब नाराच ॥ ६८ ॥

बघुनि; मनीं घट-कर्ण विचारी । राक्षस-धाड, बधिलि क्षणिं, भारी ।
क्रुद्ध होइ अति; अतिबल-वीर । करि मृगनायक;-नाद गभीर ॥ १ ॥
कोपें उपटुनि; घेई भूधर । टाकि जिथें भट; मर्कट बहुतर ।
रामें गिरि, येतांचि पाहिले । शरें भंगुनी; रजसम केले ॥ २ ॥
ओढुनि धनू; कुपित रघुनायक । कराल अति; बहु सोडिति सायक ।
शिरुनि तनूंत; निघुनि शर जाती । जशा हि चपला; घनीं चमकती ॥ ३ ॥
कृष्ण शरीरीं; शोणित वाहे । गेरु-पाट; कज्जलगिरि-वर हे ।
विकल बघुनि; कपि भालु धावले । हसे विकट, जैं निकट पावले ॥ ४ ॥

दो०— महा नाद करि गर्जना; कोटि कोटि धरि कीश ।
गजपतिसम त्यां आपटुनी; शपथ करी दशशीर्ष ॥ ६९ ॥

पळले भालु; वलीमुख-यूथ । जसे बघुनि वृक; मेष-वरूथ ।
जाति पळुनि, कपि-भालु भवानी । रडती आर्त, विकल अति वाणीं ॥१॥
दुकाळ सम हा; राक्षस दिसतो । कपिकुल-देशीं पडूं पाहतो ।
कृपा-वारिधर; 'राम खरारी । पाहि पाहि, शरणार्ती-हारी ॥ २ ॥
सकरुण वच; ऐकुनि भगवान । सज्ज करुनि; निघती, धनुबाण ।
निज सेना प्रभु; मागें घाली । जाति सकोप; महाबलशाली ॥ ३ ॥
धनु ताणुनि शत;-शरां लाविले । सुटले तीर; शरीरीं शिरले ।
शर लागत, धावे रुषं-भरला । कुधरीं डगमग; डोल धरेला ॥ ४ ॥
घेई, शैल एक तो उपटी । रघुकुलटिळक; भुजा ती छाटी ।
वामकरें गिरिधारी धावे । कापुनि टाकिति; राम लाघवें ॥ ५ ॥

---

१ बाणांना, २ रणांतून पळाले. ३ भाता. ४ सिंह-नाद. ५ रावणाची.
६ रोषानें भरलेला. ७ पर्वतांनां.

छिन्न-बाहु खल; दिसला कैसा । पक्षहीन गिरि; मंदर जैसा ।
उग्र विलोकें; प्रभुसि विलोकी । गिळूं पाहतो; जणूं त्रिलोकी ॥ ६ ॥

दो०— करुनि घोर, चिक्कार अती; धावे मुख पसरून ।
गगनिं सिद्ध सुर घाबरे; हा ! हा ! हेति ! करून ॥ ७० ॥

करुणानिधि; सुर; सभय जाणती । शरासना; आकर्ण ताणिती ।
विशिख-निकर;निशिचरमुखिं भरला । तदपि महाबल जरा न डरला ॥ १ ॥
मुखि-शर-भरला; सन्मुख धावे । काळ-तूण जणुं; सदेह यावें ।
प्रभु तैं क्रुद्ध; तीव्र शर घेती । धडा वेगळें; तच्छिर करिती ॥ २ ॥
तें शिर पडलें; रावण-सन्मुख । विकल होइ जणुं; फणि मणि-विन्मुख ।
खवे धरा धड-धावे चंड । प्रभु कापुनि करिती युग-खंड ॥ ३ ॥
पडे नभांतुनि जसा हि भूधर । चिरडी बहु कपि; भालु निशाचर ।
प्रभु-मुखिं त्याचें; सुतेज शिरलें । सुर मुनि सकळहि; विस्मय-भरले॥४॥
बाजविती सुर, दुंदुभि, हर्षति । स्तुती करुनि बहु; सुमनें वर्षति ।
विनति करुनि सुर; सकल परतले। देवर्षी त्या; समयीं आले ॥ ५ ॥
गगनीं मुनि; हरि-गुण-गण-गाती । रुचिर वीर रस, राम तोषती ।
"बधा त्वरित खल" सांगुनि गेले। समरभूवरी; राम शोभले ॥ ६ ॥

छंद०— संग्राम भूवरि; राम राजति; अतुल-बल कोसल-धनी ।
श्रम-बिंदु मुखिं; राजीव-लोचन; अरुण तनु शोणितें-कणी ॥
भुज युगलिं, फिरवित; शर-शरासन; भालु-कपि चहुं दिशिं किती ।
म्हणताति तुलसी; वदुं शकेना; रूप, अहि वदनें अती ॥ १ ॥

दो०— निशिचर अधम मलाकरा पहा दिलें निजधाम ! ।
गिरिजे ते नर मंदमती; भजति न जे श्रीराम ॥ ७१ ॥

गत दिन;उभय,कटक मग फिरलें । रणीं सुभट, झाले श्रम-भरले ।
रामकृपें कपिदळ-बळ गाढें । जसा मिळत तृण; अग्नी वाढे ॥ १ ॥
घटति निशाचर; दिन अणि रातीं । स्वमुखें वदुनि; सुकृत जशिं जातीं ।
दश-कंधर बहु; विलाप करितो । पुनः पुन्हां शिर; उरासि धरितो ॥२॥
रडति नारि, करिं छाति बडविती । पति-बल-तेजा; विपुल वानिती ।
मेघनाद त्या, अवसरिं आला । समजावी बहु-परी पित्याला ॥३॥
उद्यां बघा तुम्हि; मम पुरुषार्था । वढाइ आतां मारूं व्यर्था ।
इष्ट दैवतें; बल-रथ दिधला । तात ! तुम्हां नहि; अझुनि दाविला ॥४॥

---

२ भाता. ३ त्याचें शिर. ४ रक्त. ५ पर्वत. ६ शेष. ७ पापाची खाण.

असें अल्पतां; रात्र संपली । चारी द्वारें; कपिंनि रोधिलीं ।
इथें भालु कपि, अतिबल वीर । तिथें निशाचर; अति रणधीर-॥ ५ ॥
लढति सुभट, निज-निज जय-हेतू। अशक्य रण-वर्णन खग-केतू ! ॥ ६ ॥

दो०— मेघनाद मायामयीं; रथिं चढला आकाश।
अट्टहास बहु गर्जला; बहु कपि-कटका त्रास ॥ ७२ ॥

शक्ति, शूल; तलवारि, कृपाणां । अस्त्र शस्त्र, कुलिशायुध नाना-।
टाकी, परिघ, परशु पाषाणां । वर्षू लागे, असंख्य बाणां ॥ १ ॥
दशादिशि शर; नभ व्यापुनि भरले। मघां-मेघ-जळ, जणुं बहु झरलें ।
धर, धर, मार ! येइ रव कानां । कोण मारितो; उमज न कोणा ॥ २ ॥
गिरि-तरु-धर कपि; गगनिं धावती। दिसे न तो मग; दुःखित वळती ।
अवघड घाट; वाट, गिरिकंदर । माया-बळें; करी शरपंजर ॥ ३ ॥
मारुत-सुत, नल; अंगद, नीलां । व्याकुळ करी; सकल बल-शीलां।
जाति कुठें ? अति; व्याकुळ वांदर। सुरपति बंदि; पडे जणुं मंदर ॥ ४ ॥
मग लक्ष्मण; सुग्रीव बिभीषण । केलें, शर; मारुनि जर्जर-तन ।
मग रघुपतिशीं; लढाइ ३ रि तो । सोडी शर, तो नाग लागतो ॥ ५ ॥
नाग-पाश-वश; होति खरारी । एक, अनंत; स्ववश अविकारी ।
नट इव कपट-चरित करि नाना । प्रभु भगवान; राम तो जाणा ॥ ६ ॥
रण-शोभेस्तव; बद्ध जाहले-।-नाग-पाशिं देवां भय पडलें ॥ ७ ॥

दो०— गिरिजे ! ज्याचे नाम-जपें; मुनि तोडिति भवपाश।
बंधनिं तो कीं सापडे; व्यापक विश्व-निवास ! ॥ ७३ ॥

रघुवर-लीला; सगुण भवानी ! । अतर्क्य मन,-बुद्धी-बल-वाणीं ।
हें जाणुनि जे तज्ञ विरागी । त्यजुनि तर्क ते; भजन-विभागी ॥१॥
व्याकुळ करुनि; कटक, घननाद । प्रगटपणें; वदला दुर्वाद ।
म्हणे जांबवान्; "खला थांब रे !"। ऐकुनि त्याच्या; क्रोध मनिं भरे ॥ २ ॥
"वृद्ध समजुनी; सोडूं तुजला । अधमा तूं; पाचारिसि मजला।"
बोलुनि सोडी; तरलहि शूला । जांबवान त्या धरुनि धावला ॥ ३ ॥
घननादाचे, उरांत मारी । पडला महिवरि; मूर्छित भारी ।
कोपें चरणीं; धरूनि फिरवी । भूवरि अपटुनि; बळा दाखवी ॥ ४ ॥
वर-सामर्थ्यें; मरे न तो कीं । पद पकडुनि; लंकेमधिं झोंकी ।

---

१ पायाची खाण. २ मघानक्षत्रातील मेघाचें पाणी. ३ मेघनाद म्हणाला.

इथें नारदें; गरुड धाडिला । राम-समीप; सर्पदि तो आला ॥ ५ ॥
दो०— खगपति खाई धरुनि सब; मायानाग-वरूथ ।
झाले माया विगत, अती; हर्षति वानर-यूथ ॥ ७४ (क) ॥

इति श्री लंकाकाण्डे, कुम्भकर्ण-वधादि नागपाशबंध-विमोचनं
नाम सप्तमोऽध्यायः ।

———

अध्याय ८ वा

दो०— नख-गिरि पादप-उपल-धर; धावति कपि कोपून ।
वळति तमीचेर विकलतर; चढती दुर्गि पळून ॥ ७४ (ख)॥

मेघनाद; मूर्च्छेतुनि जागे । बघुनि पित्यास; लाज अति लागे ।
त्वरित जाइ तो; कुधर-कंदरीं । 'करूं अजय-मख;' असें मनिं धरी ॥१॥
करी बिभीषण; मंत्रविचारा । ऐका प्रभु! बल, अतुल, उदारा ।
मेघनाद, मख; करी अपावन । खल मायावी, सुर-भय-कारण ॥२॥
प्रभो जरी तो; सिद्धी जाइल । शीघ्र जिंकणें; अशक्य होइल ।
परिसुनि रघुपति; अति सुख मानी । अंगदादि; बोलावुनि आणी ॥ ३ ॥
लक्ष्मणसंगें; सकलहि जावें । विध्वंसन; यज्ञासि करावें ।
लक्ष्मण तुम्हि; मारा रणिं त्यातें । बघुनि सभय सुर; दुःखचि मातें ॥४॥
मारा त्या, बल-बुद्धि-उपायां । जेणें निशिचर; मरेल, राया! ।
जांबवंत; सुग्रीव, बिभीषण । कटक समेतहि; रहा तिथे जण ॥५॥
जैं रघुवीर; देति अनुशासन । तूण कसुनि कटिं; सज्ज शरासन ।
प्रभु-प्रताप मनिं; धरि रणधीर । वदे वचन मग; घन-गंभीर ॥ ६ ॥
तया न वधितां; जरि मी यइन । प्रभुसेवक तरि; कधीं न म्हणविन ।
सहाय करिती; जरि शत शंकर । तथापि मारिन; शपथचि रघुवर ॥७॥

दो०— रघुपति चरणीं शिर नमुनी; निघती त्वरित अनंत ।
अंगद नील मयंद नल; सवें सुभट हनुमंत ॥ ७५ ॥

---

१ निशिचर. २ पर्वतगुहेंत.

जातां तो; बसलेला दिसला । रुधिर, महिष करि; हवन अग्निला ।
कपिनीं केलें; मख-विध्वंसा । उठे न, करिती तदा प्रशंसा ॥ १ ॥
तदपि उठेना; धरिति कचांनां । पळती लाथा; मारुनि नाना ।
त्रिशूल घे, धावे; कपि पळती । रामानुज;-सन्निध ते[1] वळती ॥२॥
अति कोपें; प्रेरित जणुं आला । गर्जे बहु करि; घोर रवाला ।
अंगद मारुति; सकोप धावति । त्रिशूल-घातें; महिवरि लोळति ॥३॥
सोडी प्रभुवरि; शूलहि चंड । अनंत[2]; करिति; शरें युग खंड ।
कोपें उठुनी; अंगद मारुति । मारिति परि त्या; घाव न लागति ॥४॥
फिरति वीर, रिपु मरे न मारें । धावे पाठीं; घोर वि-कारें ।
येतां बघुनि; घोर जणुं काळ । लक्ष्मण सोडी; विशिख[3] कराल ॥५॥
येती बघुनि; कुलिश सम बाण । त्वरित होइ खल अन्तर्धान ।
विविध वेष धरि; करी लढाई । कधीं प्रगट कधिं; लपूनि जाई ॥६॥
बघुनि अजय रिपु; डरले कीश । महाक्रुद्ध मग; होति अहीश[4] ।
अनंत[2]-चित्तीं निश्चय झाला । खेळविलें बहु; या अधमाला ॥ ७ ॥
स्मरुनि, कोशलाधीश—प्रतापा । शर-संधान; करी सह दर्पा ।
सुटुनि बाण त्या उरीं लागला । मरण समयिं सब, कपट विसरला ॥८॥

दो०— कोठें लक्ष्मण राम कुठें; म्हणुनी, सोडी प्राण ।
धन्य जनी[5] तव म्हणति तंव; कपि, अंगद हनुमान ॥ ७६ ॥

अनायास; हनुमंत उचलुनी । आले लंकाद्वारिं ठेवुनी ।
तद्वध ऐकुनि; सुर गंधर्व । आले नभीं; विमानीं सर्व ॥ १ ॥
सुमन वर्षती; दुंदुभि झडती । श्री-रघुनाथ-विमलयश गाती ।
जय अनंत जय; जगदाधारा । प्रभु तुम्हि सर्व; सुरां उद्धारा ॥ २ ॥
स्तुती करुनि सुर; सिद्ध निघाले । कृपाब्धिपाशीं, लक्ष्मण आले ।
सुत-वध ऐके; रावण जेव्हां । मूर्छित होउनि; पडला तेव्हां ॥ ३ ॥
मंदोदरी; रुदन करि भारी । उर ताडन बहु; विलाप-वारी ।
नगर लोक अति; विव्हळ शोक । सकल म्हणति दशकंधर नीच ॥ ४ ॥

१ वानर, २ लक्ष्मण, ३ बाण, ४ शेष, लक्ष्मण, ५ माता, ६ त्याचा वध.

दो०— मग तो रावण विविध विधी; समजावी सब नारि।
प्रपंच नश्वर-रूप अती; वधा विचारें भारि ॥ ७७ ॥

तयां ज्ञान; उपदेशी रावण । सुमंद तो; परि; वच शुभ पावन ।
पर-उपदेश;-कुशल बहुतेक । आचरती ते; नर न अनेक ॥ १ ॥
निशा संपुनी; उषा पातली । कपि रीसें; चौद्वारिं लागलीं ।
भट बोलावुनि; रावण बोले । रण-सन्मुख मन; ज्यांचे डोले ॥ २ ॥
अतांचि त्यांनीं; भलें पळावें । वरें न हें कीं; रणीं वळावें ।
स्वभुज-बळें म्यां; वैर मांडिलें । उत्तर देइन; जरि रिपु चढले ॥ ३ ॥
सांगत वायु-वेग रथ साजे । वाजति सकळ; लढाऊ बाजे ।
चालति वीर; अतुल-बल-शाली । कज्जल वावटुळी जणुं आली ॥ ४ ॥
अशकुन अमित; होति त्या-काळीं । गणी न तो; भुज;-बल-मद-शाली ॥५॥

छंद०— अति गर्व न गणी; शकुन अशकुन; गळति अयुधें हातिचीं ।
भट पडति रथिंचे; वाजि गज, चिक्करत पळती साथची ॥
गोमायु गृध्र, कराल, खर-रव; कुर्कर रडती अति किती ।
जणुं कालदूत; उलूक घूषति; वचन परम भयाण तीं ॥ १ ॥

दो०— त्या कीं संपद शकुन शुभ; स्वप्निं हि मनिं विश्राम ।
भूत-द्रोह-रत, मोहवश; राम-विमुख रत-काम ॥ ७८ ॥

चाले निशिचर,-कटक अपार । चतुरंगिणी, ध्वंजिनि जणुं धार ।
नानाविध वाहन, रथ यानें । विपुल वर्ण ध्वज; पताक न गणे ॥१॥
जाति मत्तगज-यूथ न गणती । प्रावृड्-घन जणुं; पवनें पळती ।
विचित्र वेषहि; वीर-निकायां । समर-शूर; जाणति बहु माया ॥ २ ॥
विचित्र बहु, वाहिनी विराजे । वीर-वसंत, सैन्य जणुं साजे ।
जात कटक, दिक्-सिंधुर डगती । क्षुभित पयोधि; कुधर डगमगती ॥३॥
रेणु उडुनि जणुं; रवीस लपवी । स्थगित पवन;व्याकुळ अति पृथिवी ।
पणव निशाण; घोर रव करिती । जसे प्रलयिंचे, जलद गर्जती ॥ ४ ॥
भेरी तुरई; वाजे सणई । मारू राग; सुभट सुखदाई ।
केसरि-नाद, वीर सब करिती । निज निज बल; पौरुष उच्चारिती ॥५॥
म्हणे दशानन; ऐका सुभट । मर्दा रीस,-कपींचे थाट ।
मी मारितों भूप युग-भाई । सांगुनि फौजा; सन्मुख नेई ॥ ६ ॥
यद्रा खबर ही; कपी पावले । राम शपथ ते; करुनि धावले ॥ ७ ॥

१ हल्ला केला. २ काजळाची वावटळ ३ कोल्हे. ४ कुतरे. ५ सैन्य.
६ वर्षाकाळचे ढग.

छं०— गेले विशाल; कराल मर्कट; रीस काळा-समचि ते ।
बहु, पक्षयुत जणुं; उडति भूधर;-वृंद नाना-वेष ते ॥
नख-दशन, शैल;-महा-द्रुमायुध; सबळ भीति न मानिती ।
जय राम, रावण-मत्तगज-मृगराज-सुयशा, वानिती ॥१॥

दो०— उभयहि जय जय जय करुनी; निज निज जोड बघून ।
भिडती दोही वीर तदा; निज निज नृप वर्णून ॥ ७९ ॥

रावण रथीं; विरथ रघुवीर । -बघुनि विभीषण होइ अधीर ।
प्रीति अधिक मनिं; ये संदेह । वंदुनि चरण; वदे सस्नेह ॥ १ ॥
नाथ! न रथ, नहि; तनु पद-त्राण । जिंकां केविं; वीर बलवान! ।
ऐक, म्हणति मग; कृपा निधान । जय-दायी तो; स्यंदन आन ॥ २ ॥
शौर्य धैर्य त्या; रथासि चाकें । सत्य शील दृढ; ध्वजा-पताकें ।
बल विवेक दम; परहित घोडे । क्षमा-कृपा समता-गुणें जोडे[३] ॥ ३ ॥
ईश-भजन; सारथी सुजाण । विरति ढाल; संतोष कृपाण ।
दान परशु; मति शक्तिहि चंड । वर-विज्ञान; कठिण कोदंड ॥ ४ ॥
अमल अचल मन; तूंण[४] समान । शम, यम, नियम; शिलीमुख[५] जाण ।
कवच अभेद्य; विप्रपद-पूजा । यासम विजय-उपाय न दूजा ॥ ५ ॥
सख्या धर्ममय, हा रथ ज्यासी । जिंकण्यासि रिपु; नसेचि त्यासी ॥६॥

दो०— महा अजय संसार-रिपू; जिंकु शके तो वीर ।
ज्याचा ऐसा सु-रथ दृढ; ऐक सख्या, मति-धीर ॥८०(क)॥

दो०— परिसुनि वचना विभीषण; मुदित धरी पद कंज ।
उपदेशिति या-मिसें मज; राम कृपा-सुख-पुंज ॥ ८० (ख)॥

इति श्री लंकाकाण्डे मेघनाद-वधादि-धर्ममयरथ-वर्णनं
नामाष्टमोऽध्यायः ।

———

अध्याय ९ वा

दो०— तिथें प्रचारी रावण; इथ अंगद हनुमान ।
लढति निशाचर भालु कपी; करुनी निज-नृप आण ॥८०(ग)॥

---

१ निराळा. २ दोर, लगाम. ३ जोडलेले. ४ भाता. ५ बाण.

ब्रह्मा अमर सिद्ध, मुनि, नाना । बघती रण नभिं; चढुनि विमानां ।
मी पण उमे! असें त्यां संगां । पाहत रामचरित रण-रंगां ॥ १ ॥
उभय सुभट रण-रसांत मस्त । कपि जयशील; रामबल-युक्त ।
एकैका भिडती पाचारिति । एकैकातें; मर्दुनि पाडिति ॥ २ ॥
मारिति तोडिति; धरिति अपटिती । शिरें तोडुनी; शिरें मारिती ।
उदर विदारिति; भुजा उपटिती । धरुनि पाय भट; भुवीं पाडिती ॥ ३ ॥
रिपु-भटांसि मर्हिं; गाडिति भालू । वरी लोटिती; वहुत वाळू ।
वीर वलीमुख, युद्धिं विरुद्ध । दिसती विपुल; काळ कीं क्रुद्ध ॥ ४ ॥

छं०— क्रोधें कृतांत; समान कपि,-तनुः रुधिर गळतां भ्राजती ।
मर्दूनि निशिचर;-कटक-भट; बलवंत, घन-सम गाजती ॥
देती चपेटा; दशनिं कापुनि; लाथ मारुनि मर्दिती ।
चिक्-करति मर्कट;भालु,छल,बल,करुनियां खल नाशिती ॥१॥

छं०— कुणि गाल फाडिति, उर विदारिति कंठिं अंत्रें घालिती ।
प्रल्हादपति[3] जणुं; विविध देहीं; समर आंगणिं खेळती ॥
धर मार कापा, घोर वाणी; गगनिं भरली भूवरी ।
जय राम जो तृणःकुलिश करि वा;कुलिश करितो तृण तरी॥२॥

दो०— निज दल विचालित पाहुनी; वीस करीं दश चाप ।
निघे चढुनि रथिं दशानन, "फिरा फिरा" दे ताप ॥ ८१ ॥

धावे अती क्रुद्ध दशकंधर । सन्मुख जाति, हुहु-कर वांदर[1] ।
करिं घेउनि बहु; पादप उपलां । टाकिति त्यावरि एके वेळा ॥ १ ॥
वज्रदेहिं त्या; शैल लागती । खंड खंड ते; होउनि फुटती ।
अचळ, चळे न असे रथ रोपुनि । रण-दुर्मद, रावण अति कोपुनि ॥ २ ॥
जिथें तिथें कपि;-भटांसि दपटी । क्रोधें मर्दुनि; महिवरि अपटी ।
जाति पळून, भालु कपि नाना । रक्ष रक्ष, अंगद! हनुमाना ॥ ३ ॥
'पाहि पाहि; रघुवीर अम्हां कीं । खातो खळ; काळासम हा कीं' ।
बघुनि कपी; पळले सह नायक । दाहिं धनूंवरि; लावी सायक ॥ ४ ॥

छं०— लक्षुनि बहु शर,-निकर सोडी; उरग[2] सम उडुं लागती ।
शर धरणि अंबर; भरुनि उरले; विदिशीं दिशीं कपि धावती ॥

१ वानर. २ नाग. ३ नारसिंह

कोलाहल हि बहु; विकल कपि दल; भालु बोलति धाव रे-।
रघुवीर करुणा-सिंधु बंधू; आर्त-जन रक्षक हरे ॥ १ ॥

दो०— स्वदल विकल पाहुनि कटीं-कसुनि तूण, धनु हातिं ।
नमुनि राम-पदिं मस्तका; लक्ष्मण सकोप जाति ॥ २ ॥

[२] रे खळ मारिसि; रीस कपी कीं । आलों मी तव; काळ विलोकीं ।
[३] शोधित होतों; तुज सुत-घाती । मारुनि आज; शान्त करुं छाती ॥ १ ॥
सांगुनि सोडि; शरां प्रचंड । लक्ष्मण करी; सकल शतखण्ड ।
काटि आयुधें; रावण मारी । तिळसम कापुनि; सर्व निवारी ॥ २ ॥
निज नाराचीं[४]; तया प्रहारी । स्यंदन भंगुनि; सारथि मारी ।
शत शत शर; मारी दश भालीं । जणुं गिरि-शिखरीं प्रविशति व्याली[५] ॥ ३ ॥
मग शत शर उरिं; मारी पाहीं । पडे धरणि-तळिं; शुद्धि न राही ।
उठे, प्रबळ जैं; मूर्च्छा उडली । ब्रह्मदत्त ती; शक्ति सोडिली ॥ ४ ॥

छं०— ती ब्रह्मदत्त; सुचंड शक्ति; अनंत-उरिं; लागे त्वरें ।
तों वीर पडला; उचलि दशमुख; अतुलबल महिमा सरे ॥
ब्रह्मांड भुवनें; वसति ज्याचे; एक शिरिं जशि रज-कणी ।
त्या उचलुं पाहे; मूढ रावण; उमज ना; त्रिभुवन-धनी ! ॥ १ ॥

दो०— पाहुनि धावे, पवन-सुत; बोले वचन कठोर ।
मारी तो येतां कपिसी; घात मुष्टिचा घोर ॥ ८३ ॥

जानु टेकि कपि; खालिं न पडला । उठे सावरुनि; बहु रुष[६] चढला ।
मुष्टि एक; त्यासि कपि मारी । पडे शैल जणुं; वज्र-प्रहारीं ॥ १ ॥
मूर्छा जाउनि; पुनरपि जागे । कपिबल[७] विपुलचि; वर्णूं लागे ।
धिग् धिग् मम; पौरुष धिग् मजसी । सुर-द्रोह्या जरि; जीत राहसी ॥ २ ॥
लक्ष्मणासि मग; कपिनें नेलें । बघुनि दशानन; विस्मित झाले ।
म्हणति राम, " करि विचार ताता । कृतांत-भक्षक; तूं सुर-पाता " ॥ ३ ॥
ऐकुनि वचना; उठति कृपाल । नभीं गेलि ती; शक्ति कराल ।

---

१ माता. २ लक्ष्मण म्हणाले. ३ रावण म्हणाले. ४ बाणांनीं. ५ सापिणी. ६ रोष, ७ मारुतीचें सामर्थ्य.

पुन्हां चाप शर; घेउनि गेले । रिपु-सन्मुख अति; सत्वर आले ॥४॥

छं०— सत्वर पुन्हां; भंगूनि स्यंदन; सूत वधि, व्याकुळ करी ।
दशकण्ठ भूवरि; विकळ पडला; बाणशत लागत उरीं ॥
त्या घालुनी रथिं; अन्य सारथि; शीघ्र ने लंकेप्रती ।
रघुनाथ-बंधू; तेज-सिंधू; रामचरणीं, करि नती ॥ १ ॥

दो०— इकडे रावण जागुनी; एक करितसे यज्ञ ।
रामविरोधें इच्छि जया; शठ हठ-वश अति अज्ञ ॥ ८४ ॥

बिभीषणातें; वृत्त समजलें । सपदि जाउनी; प्रभुसि कळविलें ।
प्रभु ! रावण करि; एका यागा । होतां सिद्ध न मरे अभागा ॥ १ ॥
धाडा सत्वर; प्रभु ! भट वानर । होतां नाश; येइ[1] दशकंधर ।
प्रभात होतां; सुभट धाडिले । अंगदादि हनुमंतहि गेले ॥ २ ॥
सहज उडुनि कपि; चढले लंका । शिरले रावण-भवनिं न शंका ।
यज्ञ करित तो; तेथें दिसला । सर्व कपींनां; क्रोधचि चढला ॥ ३ ॥
निलज्ज रण; सोडुनि गृहिं आला । करितो येथें बक-ध्यानाला ।
बोलुनि अंगद; लाथा मारी । बघे न शठ, रत; स्वार्थी भारी ॥ ४ ॥

छं०— जैं पाहिना; कपि; कुपित दशनीं; धरुनि लाथा, मारिती ।
स्त्री केश धरूनी नेलि बाहिर; दीन वचनें रडत ती ॥
मग उठुनि कुपित; कृतांतसम, कपि धरुनि चरणी उडविले ।
संधींत या कपि; नाशिती मख; बघुनि मन बहु कचरलें ॥१॥

दो०— मख विध्वंसुनि कुशल कपी; आले रघुपतिपाशीं ।
क्रुद्ध निशाचर निघे; नसे, जीवन[2] आशा त्यासि ॥ ८५ ॥

जातां अशकुन; होति भयंकर । गृध्र बैसती; उडति शिरांवर ।
असे कालवश; कांहिं गणीना । म्हणे वाजवा; युद्ध निशाणां ॥ १ ॥
जाइ तमीचर-सैन्य अपार । बहु गज रथ; पादाती स्वार ।
प्रभु-सन्मुख खल; धावति कैसे । शलभ-संघ; अग्नीवरि जैसे ॥ २ ॥
इथें सुरांनीं; स्तवनें केलीं । यानें[3] दारुण, दुःखें दिधलीं ।
पुरे प्रभो या; खेळविणें ही । अतिशय विकल; असे वैदेही ॥ ३ ॥

---

१ रणांगणात येईल. २ भीति. ३ या रावणाने.

प्रभु हसले; ऐकुनि सुर-वचनां । रघुवर उठुनि; घेति धनुबाणां ।
जटा-जूट दृढ; शिरीं बांधिला । सुमें,-ग्रथित, अति सुंदर दिसला ॥४॥
अरुण-नयन; तनु वारिद-शामा । अखिल-लोक-लोचन--अभिरामा ।
कटितटि परिकर; कसुनि निषंगा । करिं कोदण्ड, कठिण शारंगा ॥ ५ ॥

छ०— शारंग सुंदर; करिं निषंग; शिलीमुखाकर कटि कसे ।
भुजदंडपीन मनोहरायत[2]; उरिं, धरासुर-पदलसे[3] ।
प्रज्ञा म्हणे कीं, राम जैं, शर; चापकरिं, निज फिरविती ।
ब्रह्मांड, दिग्गज; कमठ, अहिमहि; सिंधु भूधर डोलती ॥१॥

दो०— शोभा पाहुनि मुदित सुर; वर्षति सुमन अपार ।
जय जय जय, करुणानिधी; छवि-बल-गुण-आगार ॥ ८६ ॥

या संधींत; निशाचर सेना । आली दौडत; किति गणवेना ।
सन्मुख जाति; बघुनि, कपिवीर । प्रलय काळिंचे; जणुं घन घोर ॥ १ ॥
कृपाण बहु; तलवारि चमकती । जणुं दशदिशिं; दामिनी दमकती ।
गजरथ तुरग; वि-कार कठोर । गर्जति जणूं; बलाहक[4] घोर ॥ २ ॥
कपिलांगूल, विपुल; नभ भरलें । जसें इंद्र धनु; दिसे उभवले ।
उठली धूळ, जणूं जलधारा । बाण, बुंदसम, वृष्टि अपारा ॥ ३ ॥
उभयहि करिती; गिरी प्रहार । वज्रपात जणुं वारंवार ।
शर बहु सोडि; कुपित रघुराय । घायळ बहु; निशिचर समुदाय ॥ ४ ॥
लागत बाण; वीर चिक्करती । जिथें तिथें महिं; मूर्छित पडती ।
स्रवति शैल जणुं; निर्झर भारी । रुधिर-नदी; कातर-भयकारी ॥ ५ ॥

छं— कातर-भयावह; रुधिर सरिता; निघे परम अपावनी
युग कूल दळ; रथ रेत, चक्र; अवर्त फार भयावनी ॥
जल-जंतु पद्चर; तुरग, गज, खर; विविधि यानन बोलवे ।
शरशक्ति, तोमर; भुजग, कार्मुक, वीचि; ढाली कासवें ॥ १ ॥

दो०— वीर पडति जणुं तीर-तरु; वाहे मज्जा फेंस ।
पाहुनि कातर सभय अती मनिं सुभटांचे त्वेष ॥ ८७ ॥

मज्जति भुतें; प्रेत वेताळ । प्रमथ महा; झोटिंग कराल ।
काक कंक भुज; घेउनि पळती । एकैकांचें; हिरूनि गिळती ॥ १ ॥
एक म्हणति कीं; ही स्वस्ताई ! । दरिद्रता शठ; तुमचि न जाई ।

---

१ भाता, २ मनोहर--आयत, ३ श्रीवत्सांक, ४ मेघ.

घायळ भट कण्हती; तटिं पडले । अर्धजळीं जणुं; मस्त ठेविले ॥ २ ॥
ओढिति गृध्र; आंत्र तटिं दिसले । गळ टाकुनि जणुं; कोळी बसले ।
बहु भट वाहति; खग वरि चढती । नाविक जणुं; सरितेंत खेळती ॥ ३ ॥
योगिणि खर्परिं; रुधिर सांचति । प्रेत-भूत-वधु; नभीं नाचती ।
भट कपाल;-करताल वाजती । चामुंडा; नाना-विध गाती, ॥ ४ ॥
बहु जंबुक; तट्तटा कापिती । खाउनि हू हू ! दुजां दापिती ।
कोटि रुंड; मुंडाविण डोलति । रुंडें मद्धिवरि; जय जय बोलति ॥ ५ ॥

छं०— जय करिति जयजय; मुंड, रुण्ड; हिचंड शिराविण धावती ।
खग खर्परीं; झडपूनि झुंझति; सुभट सुभटा ढकलिती ॥
वानर, निशाचर निकर मर्दिति; रामबल-दर्पित अती ।
संग्राम अंगणि सुभट निजले; रामबाण हत किती ॥ १ ॥

दो०— रावण चिंति विचार करी; कृत-राक्षस-संहार ।
मी एकट कपि भालु बहु; माया निर्मुं अपार ॥ ८८ ॥

देवांनां प्रभु; पदचर दिसले । तदा सकल अति; खिन्न जाहले ।
सुरपतिनें मग; स्वरथ धाडिला । मुदित मातली; घेउनि आला ॥ १ ॥
तेज-पुंजरथ, दिव्य सुरूप । चढले मुदित; अयोध्या-भूप ।
चंचल तुरग, मनोहर चारी । अजर अमर मन-सम गति-धारी ॥ २ ॥
रथारूढ, रघुनाथ पाहुनी । कपि धावति, बल अधिक पाहुनी ।
कपी-प्रहार, असह्यचि भारा । तैं रावण; माया विस्तारी ॥ ३ ॥
ती माया; रघु-वरासि कळली । लक्ष्मण कपिनीं; सत्य मानिली ।
कपींस दिसले; राक्षस कटकीं । अनुजासह किति; तरि रघुवर कीं ॥ ४ ॥

छं०— बहु राम लक्ष्मण, बघुनि मर्कट,-भल्लु-मन आत गडबडे ।
जणुं चित्र-लिखित; समेत लक्ष्मण; जागिं पाहत सब खडे ॥
निज कटक चकित; बघोनि शर धनु; घेउनी कोशल धनी ।
माया हरी हरि; निमिष मात्रें; मुदित मर्कट-वाहिनी ॥ १ ॥

दो०— पुन्हां राम सर्वां बघुनी; वदले वचन गभीर ।
द्वंद्व युद्ध, बघणें, सकलीं; श्रमित फार मम वीर ॥ ९ ॥

इतिश्री लंकाकांडे, वानर-राक्षस युद्धादि-रावण-माया विनाशनं
नाम नवमोऽध्यायः

---

१ भालू, अस्वलें. २ सैन्य.

अध्याय १० वा

सांगुनि, रथ रघुनाथ चालवी । विप्रचरण; पंकाजें शिर नमवी ।
रावण मनिं तैं क्रोध व्यापला । गर्जत तर्जत; सन्मुख आला ॥ १ ॥
[1]जिंकिलेत भट; समरीं जे जे । तापस ! मी त्यां; सम ना समजे ।
रावण नाम, जगतिं यश भरलें । लोकप ज्याचे बंदीं पडले ॥ २ ॥
विराध, खर, दूषण तुम्हिं मारा । वधा व्याध-सम; वालि बिचारा ।
निशिचर-निकर,-सुभट संहरिले । कुंभकर्ण; घननादहि वधिले ॥ ३ ॥
घेतो आज सूड, सर्वांचा । हे नृप ! जरि रणिं; पळसि न साचा ।
आज सोपवूं खलु काळासी । कठिण रावणा-करिं पडलासी ॥ ४ ॥
काळविवश वचनांतें परिसुन । सस्मित वदले, कृपानिधान ।
सत्य सत्य तव; सगळी प्रभुता । कां जल्पसि; दावी पुरुषार्था ॥ ५ ॥

छं०— निज जल्पनेनें; सुयश नासे; ऐक नीति; करी क्षमा ।
संसारिं नर या; त्रिविध, पाटल, फणस आम्राचे समां ॥
एक सुमनद; एक फुल फळ; फळचि एका लागतीं ।
कुणि वदति करिति न; वदति करिती; अन्य करिति, न बोलती॥

दो०— रामवचन परिसुनि हसे; मजला शिकवी ज्ञान ।
वैर मांडितां भीति नसे; प्रिय बहु आतां प्राण ॥ ९० ॥

दुर्वच वदुनि; कुपित दशकंधर । सोडूं लागे; पविसम निजशर ।
नानाकार; शिलीमुख सुटती । दिशिं विदिशीं; नभिं भूवरि भरती॥१॥
पावक-शर; सोडिति रघुवीर । क्षणांत जळले; राक्षस-तीर ।
सोडी तीव्र; शक्ति अति विड्डुनी । शरसंगें प्रभु; देति फिरवुनी ॥ २ ॥
कोटी चक्र, त्रिशूलां मारी । अनायास प्रभु; तोडुनि वारी ।
विफल होतिं; रावण शर कैसे । सकलहि, दुष्ट-मनोरथ जैसे ॥ ३ ॥
मग शत बाण; सारथ्या मारी । 'राम' म्हणोनी पडे भूवरी ।
कृपा करुनि; सूता उठवीलें । प्रभु मग अती क्रोध युत झाले ॥ ४ ॥

छं०— अतिक्रुद्ध युद्धिं; विरुद्ध रघुपति; तूण-सायक फुसफुसे ।
कोदंड ध्वनि अति; चंडतो मनु; जाद[2] मनिं भयभीतसे ॥

१ रावण म्हणतो. २ राक्षस.

मंदोदरी उरिं, कंप कंपति; कमठ भू गिरि , डरतसे ।
चिकरति दिग्गज; दशनिं धरि महि, पाहुनी सुर चकितसे॥१॥

दो०— ओढुनि चापा श्रवणवरी सोडिति विशिख कराल ।
जाति राम-मार्गेणगण[१]; फुस्कारत जणुं व्याळ ॥ ९१ ॥

जाति बाण जणुं, सपक्ष उरगचि । प्रथम मारिती; सारथि तुरगचि ।
केतु पताका, रथा भंगिले । गर्जे अति; अंतरिं बल थकलें ॥ १ ॥
चवताळुनि रथि बसला अन्या । अस्त्र शस्त्र; सोडी विध नाना ।
विफळ होति; उद्यम सब त्याचे । पर-द्रोहीं-रत नर-वित्ताचे ॥ २ ॥
मग रावण दश;-शूलां सोडी । वाजि चारि; मारुनि महिं पाडी ।
उडवुनि तुरग; कुपित रघुनायक । ताणुनि कार्मुक; सोडिति सायक ॥३॥
रावण-शिर-सरोज--वन--चारी । जाई राम-शरांची स्वारी ।
दश दश शर; दश-भालिं सोडिले । निघति पार, रजें[२]-पाट चालले ॥ ४ ॥
स्रवत रुधिर; धावे बलवान । करिती पुन्हां प्रभु; शरसंधान ।
तीस तीर, रघुवरें धाडिले । समेत शिर भुज; महीं पाडिले ॥ ५ ॥
कापतांचि; होताति नवीन । पुन्हां करिति भुज; मस्तक--वीण ।
प्रभु बहुवार; बाहु शिर हरती । कापतांचि नवं[३]; येती वरती ॥६॥
पुनः पुन्हां; कापिति भुज शीस । अति कौतुकी; कोसलाधीश ।
नभीं पसरले; शिर अणि बाहू । जाणों अगणित; केतू राहू ॥ ७ ॥

छंद— जणुं राहु केतु; अनेक नभ-पथिं; स्रवत शोणित धावती ।
रघुवीर-तीर हिचंड; लागति; भूमि येउं न पावती ॥
एकैक शर शिर;-निकर छेदित; गगनिं उडतां शोभतो ।
जणुं सरुष दिनकर;-कर निकरिं बहु;बहु विधुंतुद[४] ओंवितो ॥१॥

दो०— हरिति शिरें प्रभु त्याचि जशीं; तैशीं होति अपार ।
विषय भोगितां अधिक जसा; नित्य नूतनचि मार[५] ॥ ९२ ॥

दशमुख बघुनी; शिरांशी वाढ । विसरे मरण; रोष करि गाढ ।
गर्जे मूढ; महा अभिमानी । धावुनि दहा; शरासन ताणी ॥१॥
रणभूवरि; दशकंधर कोपे । वर्षति बाण; राम रथ लोपे ।
घटिकाभर रथ; दृष्टि पडेना । जणुं नीहारीं[६]; भानु दिसेना ॥ २ ॥

१ रामचंद्राचे बाणाचा समुदाय. २ रक्ताचे पाट. ३ नवीन. ४ राहू. ५ मदन, विषयवासना. ६ धुक्यामध्यें.

हाहाकार; यद्रा सुर करिती। कोपें प्रभु मग; कार्मुक धरिली।
वारुनि शर; रिपुशिरें कांपिती। तीं दशदिशा; गगन भू व्यापिति ॥३॥
छिन्न शिरें नभ,-मार्गि धावती। जय जय करुनी; भय उपजविती।
लक्ष्मण कुठें; सुकंठ कपीश। रघुवर कुठें कोसलाधीश ॥ ४ ॥

छं०— शिर, राम कोठें; वदत धावति; बघुनि, कपि पळुं लागले।
घेऊनि धनु, रघुवंशमणि करिं; शिर शरांनी वेधिलें ॥
शिर-मालिका करिं; कालिका घे; वृंद-वृंदें चाललीं।
मग रुधिर सरितें; नाहुनी रण-वट पुजाया, धावली ॥ १ ॥

दो०— मग दशकंठ सकोप अती; सोडी शक्ती चंड।
जाइ बिभीषण-सन्मुख, जणुं काळाचा दंड ॥ ९३ ॥

येत बघुनि प्रभु, शक्ती घोर । प्रणतार्ती-भंजन पण थोर ।
त्वरित बिभीषण; मागें केला । सन्मुख राम; घेति शक्तीला ॥ १ ॥
शक्ति लागतां; मूर्च्छा कांहीं । प्रभुचा खेळ; सुरां भय पाहीं ।
बिभीषण बघे; प्रभू श्रम पावे । गदा धरुनि करिं; सकोप धावे ॥ २ ॥
"रे कुभाग्य शठ, मंद अबुद्ध । तूं सुर नर मुनि, नाग-विरुध्द[1] ।
शिवासि सादर; शिरें अर्पिलीं । एकैकाचीं; कोटि लाभलीं ॥ ३ ॥
त्याकारण खळ; अजुनि वांचसी । काळ अतां शिरिं; नाचे बघसी ।
राम-विमुख; इच्छिसी संपदा" । सांगुनि मारी; उरावरि गदा ॥ ४ ॥

छं०— उरिं गदा-मार; कठोर घोरावि; लागतां महिं कोसळे।
दशवदनिं शोणित; वहत उठुनी; जाइ कोपें अति बळें ॥
युग भिडति अतिबल; मल्ल युध्दीं; एकमेकां मारिती।
रघुवीर-बल;-दर्पित बिभीषण; लेश त्या[2] ना मानिती ॥ १ ॥

दो०— उमे, बिभीषण रावणा; सन्मुख कधि तरि जाय ?।
आतां भिडला काळ जसा; प्रताप हा रघुराय ॥ ९४ ॥

दिसला श्रान्त; बिभीषण भारी । धावे हनूमान; गिरिधारी ।
करि रथ-तुरग-सारथी-घाता । मारी त्याच्या; उरांत लाथा ॥ १ ॥
उभा असे परि; गात्र कांपती । रामाकडे, बिभीषण जाती ।
कपिस मारि रावण; पाचांरुनि[3] । उडे गगनिं कपि; पुच्छ उभारुनि ॥२॥
पुच्छ धरुनि, कपि सहीत उडला । मारुति पुन्हां; तयासी भिडला ।
गगनीं लढती; समबल योध्दे । मारिति एकैकातें; क्रोधें ॥ ३ ॥

---

१ विरोध केला. २ रावण. ३ आव्हान देऊन.

शोभति नभिं;छल,बल बहु करिती। सुमेरु कज्जल-गिरि जणुं लढती ।
बुध्दि-बळें पाडिता, पडेना । मारुति मग; करितो प्रभु-स्मरणा ॥४॥

छं०— रघुवीर चिंतुनि हाक देउनि; रावणा कपि मारिती।
युग पडति भूवरि; उठुनि लढती; देव जय जय बोलती ॥
हनुमंत संकट; बघुनि मर्कट भालु कोपें, धावती ।
रणमत्त रावण; सकल सुभटां; भुजबलानें मर्दिती ।

दो०— मग रघुवीरें धाडिले; धावति कीश हिचंड।
प्रबल कीश बल पाहुनी; प्रगट करी पाषंड ॥ ९५ ॥

अंतर्धान; होई पळ एक । प्रगटी मग; खल रूप अनेक ।
रघुपति कटकिं; भालु कपि जितके। दिसती प्रगट; दशानन तितके॥ १॥
पाहुनि कपि; अगणित दशशीश । सुटले पळत, रीस अणि कीश।
पळती वानर, धरति न धीरा । पाहि पाहि; लक्ष्मण रघुवीरा ॥ २॥
दश दिशिं धावति; कोटिक रावण। गर्जति घोर; कठोर भयावन ।
भयें सुरांसि; पळापळ होई । "जय-आशा; सोडा रे भाई "-॥ ३॥
सब सुर जिंकि; एक दशकंधर । झाले बहुत; बघा गिरिकंदर ।
विरंचि शिव मुनि; उरले ज्ञानी । प्रभु-महिमा; जाणिला जयांनीं ॥ ४॥

छं०— ज्यां विदित महिमा; तेचि निर्भय; सत्य रिपु, कपि, मानिती।
अति चलित मर्कट; रीस सर्वहि रक्ष रघुवर, बोलती ॥
हनुमंत अंगद; नील नल अति; वीरभूजे रणिं लढति ते।
मर्दिति दशानन; कोटि कोटी; कपट-भू-भट, उठति ते ॥ १॥

दो०— सुर वानर पाहुनि विकल; हसुनि कोसलाधीश।
सोडुनि केवळ एक शरा; वधिति सकल दशशीश ॥ ९६ ॥

क्षणांत एका; माया आटे । रवि उदयीं तम जैसा फाटे ।
रावण एक; बघुनि सुर हर्षति । फिरुनि सुमन ते प्रभुंवरि वर्षति ॥१॥
भुज उचलुनि प्रभु; कपिंसि फिरविती। पुनरपि एक; दुजां पाचारिति ।
प्रभुबलयुत कपि; भालु धावले । तरल तडक, रण; भूवरि आले॥ २॥
स्तुती करित सुर:-संघ पाहिले । एकटाचि मीं; यातें गमलें ।
सदा तुम्हीं शठ; म्यांच मारिले । कोपें बोलुनि; गगनिं धावले ॥ ४॥
हाहाकार; करित सुर पळती । कुठें जाल खल; माझ्या पुढतीं।

१ माया. २ कपटापासून उत्पन्न होणारे. ३ परत येऊन ४ रावण म्हणतो ५ रावण

बघुनि विकल सुर; अंगद उठला । ऊडुनि धरुनि पद; मही पाडिला॥४॥

छंद०— पाडी महीवरि; लाथ मारी; जाइ अंगद प्रभुकडे ।
मग उठुनि सावध; थोर रावण, घोर रव अति गडगडे ॥
सह दर्प चढवुनि; चापदश, शर; जोडुनी अति वर्षतो ।
करि सकळ, घायळ; भट भयाकुळ, बघुनि निजबल हर्षतो ।

दो०— मग रघुपति दशकंधर--शीसभुजा, शर, चाप ।
छेदिति पुनरपि वाढती; जसें तीर्थि कृत पाप ॥ ९७ ॥

शिरभुज वृद्धि; रिपूची दिसली । कपि--रिस--चित्तें; क्षुब्ध जाहलीं ।
मूढ न मरे; छिन्न भुज शीस । धावति कुपित रीस भट कीश ॥ १ ॥
वालितनय, मारुति, नलनील । वानरराज, द्विविद, बलशील ।
विटप महीधर; फेकिति भारी । तेचि धरुनि तो; कपींस मारी ॥ २ ॥
एक नखें रिपु--वपुसि विदारुनि । पळति; एक बहु; लाथा मारुनि ।
तों नलनलि; शिरांवरि[1] चढले । नखें ललाटां; विदीर्ण केलें ॥ ३ ॥
रुधिर बघुनि त्या; विषाद भारी । त्यांतें धरण्या; स्वभुजा पसरी ।
सांपडती न; करांवरि फिरती । जणुं युग मधुप; कमल-वनिं चरती ॥
उंच उडुनि; उभयांतें धरिती । महिं फेकित[2]; भुज; मुरुडुनि पळती ।
सकोप मग, दश धनु करिं धरिले । शर मारुनि कपि; घायळ केलें ॥ ५ ॥
मूर्छित करि; हनुमदादि वांदर । संध्या बघुनि मुदित दशकंधर ।
मूर्छित बघुनि; सकल कपिवीर । जांबवंत; धावे रणधीर ॥ ६ ॥
सर्व भालु; भूधर--तरु--धारी । हांका देउनि; मारिति भारी ।
चढे क्रोध अति; प्रबळ रावणा । भूवरि झोडि; पदें[3] भट नाना ॥ ७ ॥
बघुनि भालुपति; निजदळ--घाता । सकोप मारी; उरांत लाथा ॥ ८ ॥

छं०— उरिं लाथ--घात; द्विचंड लागत; विकल पडला भूवरी ।
करिंवीस, रीसहि; धरुनि, जणुं निशि; कमळिं वसती मधुकरी
पाहुनि मूर्छित; लाथ मारुनि; भालुपति ये प्रभु प्रती ।
निशि पाहुनी रथिं; घालुनीं त्या; सूत यत्नें जगविती ॥ १ ॥

---

१ त्याला, रावणाला, २ फेकीत असतां, ३ पायाला धरून.

दो०— मूर्च्छाविगतहि भालु कपी सब आले प्रभुपासि ।
राक्षस सकल सभीत अती घेरिति दशाननासि ॥ ९८ ॥

इति श्री लंकाकांडे; भीषण युद्धादि-रावण-दीर्घ-मूर्च्छावर्णनं नाम दशमोऽध्यायः । मास पारायणे षड्विंशो विश्रामः ।

——

अध्याय ११ वा

त्याच रात्रिं; जाउनि सीतेसी । त्रिजटा सांगे; सर्व कथेसी ।
शिर-भुज-वृद्धि; परिसुनी रिपुची । सीता सभय; होय मनिं साची ॥ १ ॥
उदास मुख; उपजे मनिं चिंता । त्रिजटेसी मग; बोले सीता ।
काय होय, कां; वदसि न वार्ता । कैसा मरे, विश्व-दुखदाता ? ॥ २ ॥
रामशरें शिर-तुटुनि न मरतो । विधि विपरीत; क्रिया सब करतो ।
अभाग्य माझें; जगवी त्यातें । हरिपद-विरहित जें करि मातें ॥ ३ ॥
जें करि कपट-कनक मृग खोटा । तेंचि दैव; दावी मज सोटा ।
जो विधि मज दुख; दुसह सहवितो । लक्ष्मणासि कटु; वचन वदवितो ॥४॥
रघुपति-विरह सविष शर भारी । लक्षुनि मार; वार बहु मारी ।
अशाहि दुःखीं; जगवी प्राणां । तो त्यां वांचवि; अन्य न जाणा ॥५॥
विलाप बहु-परि; करी जानकी । कृपानिधाना; स्मरण करुनि कीं ।
त्रिजटा वदे, ऐक सुकुमारी । शर उरिं लागत; मरे सुरारी ॥ ६ ॥
मारि प्रभु न, शर; उरीं जाण, कीं । वसे तयाचे हृदयिं जानकी ॥ ७ ॥

छं०— सीता वसे त्या;-हृदयिं, सीते-हृदयिं माझी वस्ति ती ।
मम उदरिं भुवन; अनेक, लागत; बाण सर्वहि नाशती ॥
मनिं वचन उपजवि; हर्ष शोकहि: बोलली त्रिजटा; पहा-।
रिपुमरण होइल, या परी खलु; सोडि हा संशय महा ॥ १ ॥

दो०— तुटतां शिर होइ विकल; जाइ सुटुनि तव ध्यान ।
तदा रावणा[1] हृदयिं शर; मारिति राम सुजाण ॥ ९९ ॥

ऐशी विविधा; समजुत केली । त्रिजटा मग निज; सदना गेली ।
राम-स्वभावा; स्मरतां सीता । वाढे विरह;-व्यथा अति चित्ता ॥ १ ॥
निशि,-शशिनां; निंदी बहुरीतीं । युगसम झाली; सरे न राती ।
विलाप करिते; मनांत भारी । राम वियोगें; दुःखित फारी ॥ २ ॥

---

१ रावणाला.

विरह-दाह जै; चित्ती दारुण । स्फुरला बाहु, वाम, विलोचन ।
शकुन जाणुनी; धरि मनि धीर । कृपाळु भेटति, मज रघुवीर ॥ ३ ॥
इथें अर्ध-निशिं; रावण जागे । सूतावरी; रोष करूं लागे ।
समर-विमुख तूं केलें मजला । धिग् धिग् अधम; मंदमति तुजला ॥४॥
चरण धरुनि तो; विनवी भावें । प्रातः स्यंदनिं; बसुनी धांवे ।
ऐकुनि रावण-आगमनातें । कपि दळिं खळबळ; फारचि उडते ॥५॥
जिथें तिथें गिरि; विटप उपटुनी । सुभट धावती; दात खाउनी ॥ ६ ॥

छं०— धावूनि रीस हि विकट कीश: कराल बहु भूधर करीं ।
अति कुपित देती; घाव, मारिति; पळति राक्षस मग तरी ॥
उधळूनि दळ, बळ-वंत कपि ते; रावणासी घेरिती ।
चहुं दिशि चपेटा, देति, फाडिति; होइ तो व्याकुळ अती ॥१॥

दो०— बघुनि महा मर्कट प्रबल, रावण करुनि विचार ।
गुप्त होउनी क्षणांतचि, करि माया-विस्तार ॥ १०० ॥

छं०— जैं मांडिलें पाषंड । बहु प्रगट जंतु हिचंड ।
वेताळ भूत पिशाच्च । करिं धरुनि, धनु नाराच ॥ १ ॥
योगीणि, करिं करवाल । करिं अन्य, मनुज-कपाल ।
नव करुनि: शोणित पान । नाचूनि; करिती गान ॥ २ ॥
धर मार, बोलति घोर । चौफेर, बहु रव थोर ।
मुख वासुनी, जैं खाति । तैं कीश पळुनी जाति ॥ ३ ॥
कपि पळति, ज्या ज्या मार्गि । तिथ जळत बघती आगि ।
अति विकल, वानर भालु । मग वर्षुं; लागे वाळु ॥ ४ ॥
स्थगित ठायिंच कीश । गर्जे, पुन्हां दशशीश ।
लक्ष्मण, कपीश समेत । मग सकल, वीर अचेत ॥ ५ ॥
" हा राम ! हा रघुनाथ " । भट वदुनि; चोळिति हात ।
बळ सकल, ऐसें झोडि । मग अन्य माया सोडि ॥ ६ ॥
मग प्रगट, बहु हनुमान । येताति; करिं-पाषाण ।
येऊनि; घेरिनि राम । चहु बाजुनी बेफाम ॥ ७ ॥
मारा, धरा, जाई न । कटकटति; पुच्छ उचलून ।
दिशि दाहिं पुच्छ-समाज । त्या माजिं, कोसल राज ॥ ८ ॥

छं०— त्यां माजिं कोसल;-राज सुंदर; श्याम तनु शोभा कशी ।
जणुं इंद्रधनु बहु; करुनि कुंपण; दिव्य तुंग तमाल-शी ॥

---

१ रावण त्वरेनें गेला. २ मूर्छित. ३ बरकरून. ४ समुदाय.

प्रभु बघुनि, हर्ष;-विषाद-युत सुर; वदति जय जय जय हरि।
रघुवीर एकचि; तीर सोडुनि सकळ ती माया हरी ॥ १ ॥
कपि रीस माया;-विगत हर्षित; विटप-गिरि-धर धावती।
शर-निकर वर्षुनि; राम, रावण;-बाहु-शिर महिं पाडिती॥
श्रीराम रावण; रण-चरित्र; नैक कल्पहि वर्णिती।
शत-शेष-वाणी निगम, सुकवी; तदपि पार न पावती॥ २ ॥

दो०— म्हणुनि वदे गुण अल्पसे; जडमति तुलसीदास।
जशि निजबल अनुसार ती; माशी क्रमी नभास॥ १०१ (क)॥
छेदिति शिर-भुज, वार बहु; मरे न भट लंकेश।
क्रीडे प्रभु; सुर, सिद्ध, मुनी, व्याकुळ बघुनी क्लेश॥ १०१ (ख)॥

शिरें वाढती; जशीं छेदिती। प्रतिलाभें जशि लोभवृद्धि ती।
रिपु न मरे श्रम; विशेष होती। राम बिभीषण;—मुखा पाहती॥१॥
काळ हि ज्याच्या इच्छे मरतो। भक्त-परीक्षा, राम करी तो।
श्रुणु सर्वज्ञ; चराचर नायक। प्रणत-पाल, सुर;-मुनि-सुखदायक॥२॥
नाभिकुंडिं त्या; पियूष वसतें। नाथ! जगे खळ; रावण, बळ तें।
ऐकुनियां हें; वचन कृपाल। मुदित घेति करिं, बाण कराल॥३॥
अशकुन होति; तदा बहु नाना। श्वान शृगाल; रडति खल जाणा।
बोलति खग बहु, जनार्ति-हेतू। प्रगट होति बहु; गगनीं केतू[1]॥ ४॥
दाहि दिशेसी; दाह लागला। रवि-उपराग[2]; पर्व[3]-विण झाला।
मंदोदरि-उर सकंप भारी। प्रतिमा ढाळिति; लोचन-वारी॥५॥

छं०— प्रतिमा रडति पवि;-पात नभिं अति; वात, पृथ्वी डोलते।
बर्षति बलाहक[4];रुधिर-कच रज[5]; अशुभ, कितितरि बोलुं तें॥
उत्पात अमित; बघोनि नभिं सुर;विकल, जय जय बोलती।
सुर सभय बघुनि; कृपालु रघपति;चापिं शर मग जोडिती॥१॥

दो०— ताणुनि धनु आकर्णते सोडिति शर एकतीस।
रघुवर शरवर जाति तदा; जैसे काळ-फणीश॥ १०२॥

एक्या शरें; नाभि सर शोषे। लागति अपर; बाहु-शिरिं रोषें॥
हरले शिरभुज; सब, नाराचें। शिरभुजहीन; रुंड महिं नाचे॥ १ ॥
धड धावे; धरणीवर चंड। शर सोडी प्रभु; करि युग खंड।
गर्जे मरत; घोर रव करुनी। कुठें राम! मारितो प्रचारुनि॥ २ ॥
डोले भूमि; पडत दशकंधर। क्षुभित सिंधु, नद; दिग्गज, भूधर

१ धूमकेतु. २ सूर्यग्रहण. ३ अमावास्या नसतां. ४ मेघ. ५ माती.

पडे मही युग; खंडां पसरुनि । मर्कट भालु, निकर बहु चिर्डुनि ॥३॥
मंदोदरी पुढें भुज-शीस । ठेवुनि, शर, सन्मुख जगदीश।
येउनि सर्व; निषंगीं प्रविशति ।-पाहुनि सुर; दुंदुभी वाजविति ॥४॥
त्याचें तेज; शिरे प्रभु-आननि । केला हर्ष; शंभु-चतुराननि ।
जय जय रव; व्यापी ब्रह्मांडा । जय रघुवरा; प्रबल-भुजदंडा ॥ ५ ॥
वर्षति सुमन; देव-मुनि-वृंद । जय कृपालु, जय जयति मुकुंद ॥६॥

छं०— जय कृपाकंद, मुकुंद भिदहर; शरणजन-सुखदा प्रभो ।
खल-दल-विदारण; परमकारण; कारुणीक, सदा विभो ॥
सुर सुमन वर्षति; हर्ष-संकुल; दुंदुभी गर्जति महा ।
संग्राम अंगणि; राम-अंगिं; अनंग बहु शोभा पहा ॥ १ ॥
शिरिं जटा मुकुट; प्रसून मांधिं मांधिं; अति मनोहर राजती ।
जणुं नील गिरिवरि; तडित पटल;-समेत उडुगण भ्राजती ॥
भुज दंडि शर कोदंड फिरवित; रुधिर-कण अति शोभती ।
जणुं अरुण पक्षि; तमाल वृक्षीं, सौख्य-मग्नचि बैसती ॥ २ ॥

दो०— कृपादृष्टिच्या वृष्टिनें; अभय होति सुरवृंद ।
कीश रीस बहु हर्षती; जय सुख-धाम मुकुंद ॥ १०३ ॥

इति श्री लंकाकांडे, त्रिजटा सीता संवादादि रावण वधो
नामैकादशोऽध्यायः

अध्याय १२ वा

पतिचीं शिरें; बघुनि मंदोदरि । मूर्छित विकल पडे धरणीवरि ।
युवती सकलहि; रडत धावल्या । उचलुनि तिजं; त्या समीप आल्या ।१।
पति गति बघुनी; विलाप करिती । केश सुटोनी; भान विसरती ।
नानाविध करिती; उर-ताडन । रडतां करिती, प्रताप-वर्णन ॥ २ ॥
नाथ! बळें तव; डोले धरणी । तेजहीन; पावक, शशि तरणी ।
भार कमठ अहि; सहुं न शकले । शरीर भूवरि; धुळींत पडलें ! ॥ ३ ॥
वरुण, कुबेर; सुरेश समीर । कधिं सन्मुख रणिं; धरिति न धीर ।
भुजबल-विजित; काल, यम नाथ ॥ पडलां महिवरि; जसे अनाथ ॥ ४ ॥

---

१ भेद विनाशक. २ मंदोदरीला,

जग-विश्रुत, तुमची प्रभुता ती । सुत-परिजन-बल; वर्णु न शकती ।
राम-विमुख हे; हाल जाहले । रडण्या कोणि न: कुळीं राहिले ॥ ५ ॥
विधि सृष्टी सब; तव-वश नाथा । समय दिशिप, नित; नमिती माथा ।
खाती शिरभुज; जंबुक पाहीं । राम विमुख ! हें; अनुचित नाहीं ॥६॥
काल-विवश पति ! वच न मानिलें । अगजग-नाथ; नरासम गणिले ।

छं०— गणिला नरासम; दनुज-कानन; दहन-पावश हरि च जो ।७।
ज्यां नमिति शंकर, विधि सुरेश्वर; ना भजां करुणाब्धि, तो ॥
आजन्म बहु पर; द्रोहरत; पापौघमय तव तनु जरी ।
तुजलाहि दे: निज-धाम, राम; नमामि परमात्मा हरि ॥ १ ॥

दो०— अहह ! नाथ ! रघुनाथ-सम; कृपासिंधु नहि आन ।
योगि-वृंद-दुर्लभ-गती; देति तुम्हां भगवान ॥ १०४ ॥

मंदोदरि वच; पडतां कानां । सुर-मुनि,-सिद्ध सुखी सब जाणां ।
अज-महेश, नारद सनकादी । जे जे ऋषि मुनि; परार्थ-वादी ॥ १ ॥
नयन भरुनि ते; रघुपति बघती । प्रेममग्न सब; सुखमय होती ।
रुदन करित; दिसतां त्या नारी । जाइ बिभीषण; दुःखित भारी ॥ २ ॥
बघुनि बंधुगति; व्याकुळ झाला । आज्ञा देति; राम अनुजाला ।
तया लक्ष्मणें; बहुत सांत्विलें । प्रभूकडे मग; बिभिषण आलें ॥ ३ ॥
कृपा-दृष्टिनें तया पाहिलें ।'शोक त्यजुनि करि; अन्त्यहि' पहिलें।
रामाज्ञेनें क्रियाहि केली । विधिवत देशकाल-सम सगळीं ॥४॥

दो०— मंदोदरि आदीक सब; देति तिलांजलि त्यासि ।
सदनीं यती रामगुण-गण वर्णीत मनासि ॥ १०५ ॥

बिभीषणहि ये; नमी शिरासी । बोलाविती; राम अनुजासी ।
तुम्हि कपीश: अंगद नल नील । जांबवंत मारुति नयशील ॥ १ ॥
सर्व मिळुनि जा; विभिषण-साथ । अभिषेकों; म्हणती रघुनाथ ।
पितृवचनें मीं; नगरि न येतो । मम-सम कपि;-अनुजासि धाडितो ॥२॥
निघति शीघ्र कपि; ऐकुनि वचना । करिति सर्व, अभिषेका रचना ।
सिंहासनिं बसवूनी सादर । करुनि टिळक; केली स्तुति फार ॥३॥
जोडुनि हात; सकल शिर नमिती । प्रभूकडे सह-बिभिषण येती ।
प्रभु मग कपि; बोलावुनि घेती । प्रिय वचनें; सर्वां सुख देती ॥ ४ ॥

छं०— केले सुखी त्यां; वाक्सुधें तुमचे बळें रिपु मारिले ।
पावे बिभीषण; राज्य, लोकीं; सुयश तुमचें पसरलें ॥

---

१ नित्य, २ (व म्हणाले,) ३ अंत्य कर्म. ४ अभिषेक करा.

मम सहित शुभ, ही; कीर्ति तुमची; गाति जे प्रेमें अती।
संसार-सिंधु; अपार पार; अयासविण नर पावती ॥ १ ॥

दो०— रघुवर-वचनां ऐकुनी; तृप्त नव्हति कपिपुंज।
नमुनी वारंवार शिरा; धरिति सकल पदकंज ॥ १०६ ॥

प्रभु मग, बोलावुनि हनुमाना । लंके जाइं; म्हणति तूं प्राज्ञा।
वृत्त सर्व, सीतेसि वदावें । कुशल तियेचें; पुसुनी यावें ॥ १ ॥
मग नगरीं; हनुमंत पावले । निशिचरि, निशिचर; परिसुनि जमले।
नानाविध; तत्पूजा करुनी । जनकसुता त्या; दिली दावुनी ॥ २ ॥
प्रमाण तीला; दुरून केलें । रामदूत, सीतेसी कळलें ।
तात वदा ! प्रभु; कृपानिकेत । कुशल, अनुज-कपि-चमू-समेत ॥ ३ ॥
सर्वहि कुशल; कोशलाधीशा । मातें ! रणिं; वधिलें दशशीशा ।
अविचल राज्य; बिभीषण पावे । वच ऐकुनि, मनिं; हर्ष न मावे ॥ ४ ॥

छं०— अति हर्ष मनिं, तनु; पुलक-युत, जल; लोचनीं वदली रमा।
देउं तुज कपि; काय ? नच जगिं कांहिं यावाणी-समा ॥
श्रुणु जननि, ! पावे; अखिल मज जग;-राज्य आज न संशय।
रणिं विजित-रिपुदल; बंधुयुत; बघुनी हि राम अनामय ॥१॥

दो०— श्रुणु सुत सद्गुण सकल तव;-हृदयिं वसति हनुमंत।
सानुकूल कोशलपती; होतिल सहित अनंत ॥ १०७ ॥

आतां उपाय; करि बा ताता । पाहिन नयनिं; शाम मृदु कांता ।
प्रभु पाशीं मग; मारुति आले । जनक सुतेचें; कुशल बोलले ॥ १ ॥
ऐकुनि वृत्त; भानुकुलभूषण । बोलाविति, युवराज बिभीषण।
पवन-नन्दना;-सह तुम्हि जावें । सीतेला सादर आणावें ॥ २ ॥
जाती सत्वर; जेथें सीता । सेविति निशिचरि; सकल विनीता ।
तयां बिभीषण सर्वहि सुचवी । मंगल स्नानें; विविध घालवी ॥ ३ ॥
नानाविध; भूषणें घातिलीं । रुचिर पालखी; सजुनि आणिली ।
हर्षें आंत बसे वैदेही । स्मरुनि राम सुख सिंधू स्नेही ॥ ४ ॥
वेत्रपाणि, रक्षक चौफेर । जाति सकल मनिं; प्रमोद फार ।
दर्शनार्थ कपि भालू जमले । क्रोधें रक्षक; वारुं लागले ॥ ५ ॥
राम म्हणति [1] कीं; माझें माना । मित्र ! जानकी; पदचर आणा ।
बघोत कपि; माते-सम तीतें । हसुनि म्हणति; रघुनाथ तयांतें ॥ ६ ॥
ऐकुनि वचन; भालु कपि हर्षति । नभांत सुर; सुमनें बहु वर्षति ।

---

१ मारुतीनें दुरून नमस्कार केलें, २ कुशल.

पूर्विच सीते; अनलिं राक्षिती । अंतरसाक्षि; प्रगट करुं बघती ॥ ७ ॥
दो०— यास्तव ते, करुणा निधि; वदति कांहिं दुर्वाद ।
निशाचरी ऐकूनि सब; करुं लागती विषाद ॥ १०८ ॥
प्रभुवचना शिरिं धरुनी सीता । बोले तनु-मन-वचन-पुनीता ।
लक्ष्मण! व्हा धर्मासि सहाय । अनल पेटवा, करा उपाय ॥ १ ॥
एकुनि लक्ष्मण; सीता-वाणी । विनय-विवेक-धर्म-नय-खाणी ।
लोचन सजल; जोडि कर दोहीं । प्रभुतें सांगु; शकेना तोही ॥ २ ॥
लक्ष्मण, राम-हेतु जाणोनी । अग्नि पेटवी; काष्ठ अणोनी ।
पावक प्रबल; बघुनि वैदेही । हृदयिं हर्ष; नच भय कैसेंही ॥ ३ ॥
तनुमन वचनें; जरि मन कांहीं । रघुवर त्यजुनि; अन्य गति नाहीं ।
तरि जाणे सब; मर्म कृशानू । मज होवो श्रीखंड-समानू ॥ ४ ॥
छं०— श्रीखंड सम अनलांत सीता स्मरुनि राम प्रवेशली ।
जय कोशलेश; महेश-वंदित; चरण-रति निर्मल भली ॥
प्रतिबिंब लौकिक; दोष सकलहि, चंड अनले भाक्षिले ।
प्रभुचरित अल्प न; गम्य नाभिसुर; सिद्ध मुनि बघती भले ॥१॥
,, प्रत्यक्ष पावक; धरुनि करिं श्री; सत्य श्रुति-जन-विश्रुता ।
जशि क्षीरसागर इंदिरा; रामा समर्पी तो तथा ॥
ती राम-वाम विभागिं भ्राजे; रुचिर अति शोभागळी ।
नव-नील-नीरज-निकट माना; कनक-कमळाची कळी ॥२॥
दो०— वर्षति सुमनें मुदित सुर; गर्जति गगनिं निशाण ।
गाती किन्नर- सुर-वधू; नाचति चढुनि विमान ॥ १०९(क)॥
दो०— जैं जानकी समेत प्रभू शोभा अमित अपार ।
बघति; भालु कपि हर्षती; जय रघुपति सुखसार! । १०९(ख)।
इति श्री लंकाकांडे; मंदोदरी शोकादि-सीतादिव्य वर्णनं
नाम द्वादशोऽध्यायः ॥

अध्याय १३ वा

मग रघुपति-आज्ञेसि घेऊनी । मातलि जाइ, चरणिं शिर नमुनी ।
आले देव सदा जे स्वार्थी । वचन वदति जणुं; बहु परमार्थी ॥ १ ॥

---

१ चंदनासारखा-शीतल, २ सीतेला,

दीनबंधु ! दयालु रघुराया । कोटि दया प्रभु ! देव-निकायां ।
विश्व-द्रोह-रत; हा खळ कामी । नष्ट निज अर्थे; कुमार्ग-गामी ॥ २ ॥
प्रभु सत्स्वरूप; ब्रह्म अविनाशी । सदा एकरस; सदा उदासी ।
अकल, अगुण अज; अनघ, अनामय। अजित, अमोघ;-शक्ति करुणामय ॥३॥
कच्छप, सूकर, मीन, नरहरी । वामन - परशुराम - वपु - धारी ।
जैं जैं सुरास; दुःखें होती । नाना देहें प्रभु निरसां ती ॥ ४ ॥
सुर-द्रोही खळ; मळिण सदाही । काम-लोभ-मद;-रत, क्रोधीही ।
अधम-शिरोमणि; तव पदिं जावा । हा अमुचे मनिं; विस्मय देवा !॥५॥
आम्ही देव परम अधिकारी । रामभक्ति-विण; निजार्थ-कारी ।
या भव-डोहीं; संतत पडलों । त्राहि अतां प्रभु ! शरण पातलों ॥६॥

दो०— विनति करुनि सुर, सिद्ध सब, उभे-जोडुनी हात ।
पुलक-प्रफुल्लित-तनू विधी; पुढें स्तवन करितात ॥ ११० ॥

तोटकः-जय राम सदा; सुखशांतिकरा । रघुनायक सायक-चाप-धरा ।
भव-वारण-दारण, सिंह प्रभो । गुणसागर, नागर, नाथ विभो ॥१॥
तनु काम अनेक अनूप छवी । गुण वर्णिति सिद्ध मुनींद्र कवी ।
यशपावन, रावण-नाग महा । खगनाथ यथा;अति कोप वधां ॥२॥
जनरंजन; भंजन शोक-भया । गत-रोष सदा; प्रभु बोधमया ।
अवतार उदार अपार-गुणा । महिभार विभंजन, ज्ञानघना ॥ ३ ॥
अज, व्यापक, एक अनादि सदा । करुणाकर राम नमामि मुदा ।
रघुवंश विभूषण; दूषण-हा । कृत भूप बिभीषण दीन पदा ॥ ४ ॥
गुणज्ञान;-विधान; अमान अजा । प्रभु राम नमामि विभो विरजा ।
भुजदंड प्रचंड-प्रतापबला । खलवृंद-निकंद-महाकुशला ॥५॥
विण कारण; दीन-दयाल-हिता । छविधाम नमामि रमा-सहिता ।
भवतारण कारण-कार्य-परा । मन संभव दारुण दोष-हरा ॥ ६ ॥
शर-चाप,-मनोहर-तूण-धरा । जलजारुण,-लोचन भूपवरा ।
सुखमंदिर सुंदर मा-रमणा । मद-मार-मुधा-ममता-शमना ॥७॥
अनवद्य, अखंड; न गोचर गो । जगरूप सदा; जग होइ न जो ।
इति वेद-सुगीत न दन्त कथा । रवि-आतप भिन्न न भिन्न यथा ॥८॥
कृत-कृत्य विभो, कपि सर्वहि हे । निरखीति, तवानन, सादर जे ॥
धिग् जीवन, देव-शरीरिं हरे । तव भक्तिविना, भवभूल भरे ॥९॥

---

१ पूर्ण, २ वराह. ३ स्वार्थसाधू, ४ अनुपम, ५ दोष नाहींसे करणारे, दूषणाचा नाश करणारे, ६ गो-गोचर, इंद्रियगोचर,

प्रभु दीन-दयाळ; दया करिजे। मति माझि विभेद-करी हरिजे।
म्हणुनी विपरीत क्रिया करतो। दुख तें सुखमानि; सुखी फिरतो ॥१०॥
खल-खंडन, मंडन रम्य क्षमा। पद-पंकज सेविति शंभु-उमा।
नृप-नायक, दे वरदान विहे। चरणांबुज-प्रेम सदा शुभ जें ॥११॥

दो०— विनति करुनि चतुरानन; प्रेम-प्रफुल्लित-गात्र।
शोभा-सिंधु विलोकतां; नयन तृप्ति ना मात्र ॥ १११ ॥

समयीं दशरथ; तेथें आले। तनय, बघुनि जळ, नयनीं जमले।
अनुजासहित प्रभु; वंदन करिती। आशीर्वाद; जनक मग देती ॥ १ ॥
तात ! सकल तव; पुण्य-प्रभाव। विजित, अजय जो; निशिचर-राव।
सुत-वचनें अति; प्रीती वाढे। नयन सजल; तनु-पुलक अपाडें ॥ २ ॥
राम पूर्वीचें; प्रेम जाणुनी। ज्ञान देति दृढ; पित्यास बघुनी।
दशरथ, उमे ! मुक्त ना झाले। कारण भेद;-भक्तिनें धाले ॥ ३ ॥
सगुणोपासक; मोक्ष न घेती। तयां राम निज-भक्ती देती।
प्रभुसि कितीदां, करुनि प्रणामा। दशरथ जाति; मुदित सुर-धामा ॥ ४ ॥

दो०— अनुज-जानकी-सहित प्रभू; कुशल कोशलाधीश।
शोभा निरखुनि मुदितमनें; स्तुती करिति सुर-ईश ॥ ॥११२॥

छं०— जयराम शोभा-धाम। दायक, प्रणत विश्राम।
धृत तूण-वर शरचाप। भुजदंड, प्रबल-प्रताप ॥ १ ॥
जय दूषणारि खरारि। मर्दुनि, निशाचर भारि।
हा दुष्ट, वधिला नाथ। सुर आज, सकल सनाथ ॥ २ ॥
जय हरण, धरणी-भार[1]। महिमा उदार अपार।
जय रावणारि कृपाल। कृत यातुधान निकाल ॥ ३ ॥
लंकेश-बल अति गर्व। कृत वश्य, सुर गंधर्व।
मुनि सिद्ध, नर खग नाग। कर धुवुनि, पाठीलाग ॥ ४ ॥
पर द्रोह रत अति दुष्ट। फळ उचित, घे पापिष्ठ।
ऐका सुदीन दयाल। राजीव नयन विशाल ॥ ५ ॥
मज असे, अति अभिमान। मम नाहिं, कोणि समान।
पाहोनि, प्रभु-पद-कंज। गत मान दुःखद पुंज ॥ ६ ॥
कुणि ब्रह्म; निर्गुण ध्याति। अव्यक्त, जें श्रुति गाति।
प्रिय मजसि कोशल भूप। श्रीराम, सगुण सुरूप ॥ ७ ॥
वैदेहि, अनुज समेत। मम करा, हृदयिं निकेत।

---

१ पृथ्वी.

मज जाणिजे निजदास । दे भक्ति रमा-निवास ॥ ८ ॥
छं०— दे भक्ति लक्ष्मी,-नाथ भयहर शरण-जन-सुख-दायका ।
सुखधाम राम; नमामि काम, अनेक छवि रघु-नायका ॥
सुर-वृंद-रंजन, द्वंद्व-भंजन, मनुज-तनु, अतुलित बला ।
ब्रह्मादि-शंकर,-सेव्य राम नमामि करुणा-कोमला ॥ १ ॥
दो०— " कृपा दृष्टिनें बघुनि मज; आज्ञा द्यावि कृपाल ।
काय करूं ? " ऐकुनि वचन; वदले दीन-दयाळ ॥११३ ॥
श्रुणु सुर पति, कपि; भालु आपुले । पडले जे; निशिचरिं रणिं वधिले ।
हितार्थ मम ते त्यजिती प्राणां । जिववी सकल; सुरेश सुजाणा ॥१॥
श्रुणु खगेश, ही; प्रभुची वाणी । अगाध अति, मुनि जाणति ज्ञानीं ।
त्रिभुवन मारुं जगवुं प्रभु शकती । केवळ शक्रा महत्त्व देती ॥ २ ॥
सुधा वृष्टिनें; सकल उठविले । उठुनि मुदित; प्रभुपाशीं आले ।
अमृत वर्षलें; उभय दळांवर । उठति भालु कपि; न हि रजनीचर ॥३॥
रामाकार; बने त्यांचें मन । मुक्त सकल; तुटुनी भवबंधन ।
सुर-अंशिक सब; कपि अणि रीस । जगले, इच्छेनें जगदीश ॥ ४ ॥
कवण राम-सम; जन-हित-कारी । केले मुक्त; निशाचर भारी ।
खल-मल-धाम; काम-रत रावण । पावे गति जी मुनि न हि कवण ॥५॥
दो०— सुमन वर्षुनी जाति सुर; चढुनी रुचिर विमान ।
पाहुनि समुचित अवसर; आले शंभु सुजाण ॥ ११४ (क) ॥
,, प्रेमें अति बद्धांजली, नलिन-नयनिं बहु वारि ।
पुलकित-तनु गद्गद गिरा; स्तवन करी त्रिपुरारि ॥११४(ख)॥
छं०— मामभिरक्षय रघुकुल-नायक । धृतवरचाप, रुचिर करिं सायक ।
मोह-महा घन;-पटल-प्रभंजन । संशय-विपिन,-अनल, सुररंजन ॥१॥
अगुण सगुण; गुणमंदिर सुंदर । भ्रमतम प्रबल;-प्रताप दिवाकर ।
काम-क्रोध मद-गज पंचानन । वसां निरंतर; जनमन-कानन ॥ २ ॥
विषय मनोरथ-पुंज कंजवन ।-प्रबल-तुषार; उदार पार मन ।
भववारिधि-मंदर, परमं दर । वारय तारय; संसृति दुस्तर ॥ ३ ॥
श्याम-गात्र; राजीव-विलोचन । दीन-बंधु, प्रणतार्ती मोचन ।
अनुज-जानकी;-सहित निरंतर । वसा राम नृप; मम उर अंतर ॥ ४ ॥
मुनि-रंजन; महिमंडल-मंडन । तुलसिदास प्रभु ! भीति विखंडन ॥५॥
दो०— नाथ यदा कोशलपुरीं; होइल टिळक उदार ।
कृपासिंधु मी येइन कीं; बघण्या चरित अपार॥ ११५ ॥

विनति करुनि जैं; शंकर गेले । तैं प्रभु निकट; बिभीषण आले ।
चरण धरुनि; मृदु बोले वाणी । श्रुणु विनती, प्रभु; शारंगपाणी ॥ १ ॥
सकुल सदल, रिपुसी प्रभु वधिलें । पावन यश; त्रिभुवनिं विस्तरलें ।
दीन मलीन; हीन--मति जाति । केली मजवरि; बहुत कृपा ती ॥ २ ॥
निज-जन-गृह, प्रभु ! पुनीत कीजे । मज्जन करुनि; समरश्रम हरिजे ।
पाहुनि मंदिर; कोश संपदा- । कपींस द्यावी प्रभो अति मुदा ॥ ३ ॥
मजला अपुला; पूर्ण करावा । अपणांसहचि अयोध्ये न्यावा ।
मृदुवच ऐकुनि: दीनदयाळ । सजल विलोचन; उभय विशाल ॥४॥

दो०— तुझें कोश गृह ममचि सब; सत्य वचन श्रुणु तात ।
भरत-दशा स्मरतां मज; निमिष कल्पसम जात ॥ ११६ (क) ॥

,, तापस वेषीं गात्र कृश; सदा जपे आम्हांस ।
तुला प्रार्थितो यत्न करीं; सत्वर भेटूं त्यास ॥ ११६ (ख) ॥

,, अवधी सरतां जाउं जरी; जीत न भेटे वीर ।
स्मरुनि अनुज-प्रीती प्रभू; नयनीं वाहे नीर ॥ ११६ (ग) ॥

दो०— करा कल्पभर राज्य तुम्हीं; मजला स्मरा मनांत ।
मग मम धामा पावसी; जिथें संत जातात ॥ ११६ (घ) ॥

ऐकुनि ता; वचना रामाचे । पद धरि मुदित; कृपा-धामाचे ।
भालु वानरें; सकल हर्षती । चरण धरुनि गुण विमल वर्णिती ॥१॥
पुन्हां बिभीषण; भुवनिं परतले । मणिगण, वसन; विमानीं भरले ।
पुष्पक आणुनि; पुढें ठेविलें । कृपा-सिंधु मग; हसत बोलले ॥२॥
चढुनि यानिं; बघ मित्र बिभीषण । नभिं जाउनि; वर्षी पट भूषण ।
बसुनि विमानीं: अंबरिं जाउनि । मणि, अंबर सब; देइ वर्षुनी ॥ ३ ॥
जें जें जया; रुचे तें घेती । चावुनि मणि; कपि फेंकुनि देती ।
हसति राम श्री-अनुज समेत । परम कौतुकी; कृपानिकेत ॥ ४ ॥

दो०— जो मुनि-ध्यानिं न सांपडे नेति नेति श्रुति-बोध ।
कृपासिंधु तो कपी-सवें; करी अनेक विनोद ॥ ११७ (क) ॥

,, उमे, योग जप दान तप; नाना व्रत मख नेम ।
राम-कृपा-प्रद म्हणति तशीं; निर्मळ जैसें प्रेम ॥ ११७ (ख) ॥

कीश रीस; पट, भुषण घेती । घालुनि रामापाशीं येती ।
नाना विधां; बघुनि त्या कीशां । आलें हास्य; कोसलाधीशा ॥ १ ॥
केली दया-दृष्टि समुदाया । वदले मृदुल; वचन रघुराया ।
" रावण, तुमच्या बळें मारिला । बिभीषणासी; भूप बनविला ॥ २ ॥

आतां निज निज; गृहासि जावें । भ्या नच कोणा; मला स्मरावें ।
ऐकुनि वच; प्रेमाकुळ वानर । पाणि जोडुनी; बोलति सादर ॥ ३ ॥
प्रभु ! जें बोलां; तुम्हां शोभेंत । ऐकुनि अमुचें; चित्त मोहतें ।
बघुनि दीन; केलेंत सनाथ । प्रभु ! त्रैलोक्य;-नाथ रघुनाथ ! ॥४॥
प्रभुवच ऐकुनिः लज्जें मरतों । मशक कधीं; खगपति-हित करतो ! ।
बघतां रघुवर;-मुख; कपि रीस । प्रेम-मग्न; निज-गृहिं नहि आस ॥५।

दो०— प्रभु आज्ञे कपि भालु सब; चिंतित रघुवर-रूप-।
जाती हर्ष विषाद-युत; स्तुती करोनी खूप ॥ ११८ (क) ॥

,, कपिपति नीलहि भालुपती; अंगद नल हनुमान ।
सहित बिभीषण अपर जे; यूथप कपि बलवान ॥ ११८ (ख) ॥

,, वदवेना त्या प्रेमवश; लोचनिं भरुनी नीर ।
टकमक बघती राममुखा, निर्निमेष अति धीर ॥ ११८ (ग) ॥

अतिशय प्रीति; बघुनि रघुराया । म्हणती; सकल विमानिं चढा ! या ।
विप्रपदांसि; मनीं शिर नमिलें । विमान उत्तर दिशे निघाले ॥ १ ॥
कोलाहल तैं; झाला भारी । जय रघुवीर; बोलती सारीं ।
सिंहासन अति; उच्च मनोहर । प्रभू सीतेसह; बसले त्यावर ॥ २ ॥
राम विराजति; सहित भामिनी । मेरु शिखरिं जशि; मेघ दामिनी ॥
रुचिर विमान; जाइ अति सत्वर । सुमन वर्षती; हर्षित अतितर ॥ ३ ॥
त्रिविधा पवनः परम सुखकारी । सागर-सर नदिं; निर्मल वारी ।
शकुन होति; सुंदर चौपासां । प्रसन्न मन, निर्मल नभ, आशां[1] ॥४॥
राम म्हणति रण; पाहे सीते । अनुज इथें वधिः सुरश-रिपुतें[2] ।
मारुति -- युवराजांच्या मारें । पडलें रणीं निशाचर भारे ॥ ५ ॥
कुंभकर्ण; रावण युग भाई । मेले इथें, सुरां दुखदाई ॥ ६ ॥

दो०— सेतु बांधिला इथें पहा; स्थापित शिवसुख धाम ।
कृपा-निधी सीते सहित; करिती शिवा प्रणाम ॥ ११९ (क) ॥

,, जिथें जिथें वनि कृपाब्धिनीं; केलि वस्ति, विश्राम ।
सर्व दाखविलि जानकिसी; सांगुनि तें तें नाम ॥ ११९ (ख) ॥

त्वरित विमान; तिथें मग आलें । दंडक-कानन जिथें शोभलें ।
कुंभजादि[3] मुनि-नायक नाना । गेले प्रभु, सर्वांचे स्थाना ॥ १ ॥

१ दिशा. २ इंद्रजिताला, ३ अगस्ति वगैरे,

घेउनि सकल; मुनी-आशीस । चित्रकूटिं; आले जगदीश ।
करुनी सर्व: मुनी संतुष्ट । विमान चाले; गति परिपुष्ट ॥ २ ॥
सीतेसी मग; राम दाविती । यमुना कलिमल-हरणि नदी ती ।
बघुनि पुढें: सुर-नदी पुनीता । म्हणति राम, करि: नमना सीता !॥३॥
पहा प्रयागा; तीर्थ-पतीतें । बघतां जन्म-कोटि अघ जातें ।
पहा परम, पावनी त्रिवेणी । शोक-हरणि; हरि-पद-पद-श्रेणी[१] ॥ ४ ॥
पहा अयोध्या:- पुरि अघनाशिनि । त्रिविध ताप, भवरोग निवारिणि ॥५॥

दो०— अयोध्येसि सीते-सह: करिति कृपालु प्रणाम ।
सजल नयन, तनु पुलकित: अतीव हर्षति राम ॥ १२० (क) ॥
पुन्हां येउनी, त्रिवेणिसी; हर्षित करुनी स्नान ।
कपीं सहित विप्रां प्रभू ; देती बहु विध दान ॥ १२० (ख) ॥

मारुतीस, म्हणती प्रभु भाई । अयोध्येंत, बटु रूपें जाई ।
भरता, अमुचें: कुशल वदावें । समाचार सब; घेउनि यावें ॥ १ ॥
त्वरित पवनसुत; जाते झाले । भरद्वाज-प्रति:प्रभु मग आले ।
बहुधा पूजन: मुनिनीं केलें । स्तुती करुनि; आशीर्वच दिधले ॥२॥
जोडुनि करयुग, मुनिपदिं नमुनी । पुन्हा निघाले; विमानिं बसुनी ।
कळे निषादा कीं; प्रभु आले । नाव ! नाव ! म्हणतां जन जमले ॥३॥
गंगेपार, यान तंव आले । प्रभु आज्ञेनें; तटीं उतरलें ।
गंगापूजन, करी जानकी । नाना-विध मग, स्तुती नमन कीं ॥४॥
गंगा देई आशिस योग्य । सुन्दरि ! अखंड तव सौभाग्य ।
ऐकुनि गुह; धावे प्रेमाकुल । आला निकट; परमसुख-संकुल ॥ ५ ॥
प्रभू-सहित; पाहुनि वैदेही । पडे धरणि-वरि भान न देहीं ।
प्रेम परम; पाहे प्रभुराया । उचलुनि मोदें धरिती हृदया ॥ ६ ॥

छं०— निज हृदयीं धरिति; कृपानिधान; सुजाण राय रमापती ।
बसवून परम; समीप पुसती; कुशल, तो करि सु-विनती ॥
ममकुशल पद;-पंकज बघोनी; शंभु-विधि-सुर-सेव्य जे ।
सुख-धाम पूरित-काम, राम; नमामि राम नमामि ते ॥ १ ॥
सब रीतिं अधम; निषाद त्या हरि; भरतसम हृदयीं धरी ।
मतिमंद तुलसी;-दास त्याला; मोहवश विसरे तरी ॥

१ भगवंताच्या पायांजवळ नेणारी शिडी;

हे रावणारि; चरित्र पावन; राम-पद-रति दे सदा।
कामादिहर, विज्ञान-कर सुर-सिद्ध-मुनि गाती मुदा ॥ २ ॥

दो०— श्री रामाचे समर-जया; करिती श्रवण सुजाण।
विजय, विवेक, विभूति, सदा त्यांसि देति भगवान॥१२१ (क)॥
हा कलिकाल मलायतन; पाहे मना विचार।
श्री रघुवर-नामा त्यजुनी; नाहीं अन्य अधार ॥ १२१ (ख) ॥

इति श्री लंकाकांडे; सुरस्तुत्यादि-श्रीरामादीनां शृंगवेरपुरागमनं नाम त्रयोदशोऽध्यायः।

मास पारायणे सप्तविंशो विश्रामः।

इति श्रीमद्रामचरित-मानसे सकल-कलि-कलुष-विध्वंसने षष्ठःसोपानः।

लंकाकाण्डं समाप्तम्

ॐ तत् सत्

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥

॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥

॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

॥ श्री राम चरित मानस ॥

॥ सप्तमः सोपानः ॥

॥ उत्तर-काण्डम् ॥

अध्याय १ ला

स्रग्धरा०-* यो द्रष्टुं नैव शक्यः; कथमपि मनसा; चक्षुषा वा कदाचि- ।
द्मिथ्या-मायावृतः सन्, घन-पटल-गतो; भास्करः खे दिवैव ॥
श्री-राम-प्रेरितेन, प्रबल-गुरु-कृपा,-मारुतेनाऽऽहतेऽस्मि- ।
न्नज्ञान-ध्वान्त-मेघे; प्रगट इव भवेदात्मरूपः स रामः ॥ १ ॥

* वैराग्यं लक्ष्मणं वन्दे; विवेकं वायु-नन्दनं ।
शमादि-षट्कं भरतं; शत्रुघ्नंच मुमुक्षुता ॥ २ ॥

पंचचामर०-* विदेह-राज-नन्दिनी, निजात्म-शान्ति-रूपिणी ।
निजस्वरूप-भद्रगाङ्क-सुस्थिताऽऽर्तिहारिणी ॥
विमोहता-विशोकता-विरागता-ह्यलंकृता ।
ह्यनन्त-सौख्य-दिव्य-तेज-संयुता हि पातु नः ॥ ३ ॥

स्रग्धरा- केकी-कण्ठाभ-नीलं; उरवर-विलस; द्विप्र-पादाब्ज-चिन्हं ।
शोभाढ्यं पीत-वस्त्रं; सरसिज-नयनं; सर्वदा सुप्रसन्नम् ॥
पाणौ नाराच-चापं; कपि-निकर-युतं; बन्धुना सेव्यमानं ।
नौमीड्यं जानकीशं; रघुवरमनिशं; पुष्पकारूढ-रामम् ॥ १ ॥
कोसलेन्द्र-पदकञ्ज-मञ्जुलौ; कोमलावज-महेशवन्दितौ ।
जानकी-कर-सरोज-लालितौ; चिन्तकस्य मनभृंगसंगिनौ ॥२॥

---

* अशी खूण केलेले श्लोक अनुवादकाचे स्वकृत आहेत.

कुन्द-इन्दु-दर-गौर सुन्दरं, अम्बिकापतिमभीष्ट-सिद्धिदं।
कारुणीक-कल-कञ्ज-लोचनं; नौमि शंकरमनङ्ग-मोचनम् ॥३॥

दो०-- असे एक दिन अवधिचा; अति आर्तचि पुरलोक।
सकलहि शोचति नारिनर; कृशतनु; राम-वियोग॥ अ०॥
शकुन होति सुंदर सकलां; प्रसन्न-मन, लघु, थोर।
प्रभु आगमना सुचवि जणूं; नगर रम्य चौफेर॥ ब॥
कौसल्यादी जननि सब; आनंदित चित्तांत।
आले प्रभु, श्री, अनुज; जणूं; कोणि सांगु येतात॥ क॥
भरत-नयन भुज-दाक्षिण; स्फुरती वारंवार।
बघुनि शकुन मनिं हर्षला; लागे करूं विचार॥ ड॥

असे एक दिन; अवधि अधार । विचारितां मनिं; दुःख अपार ।
कारण कवण; नाथ नहि आले । कुटिल म्हणुनि कीं; मला विसरले ॥१॥
अहा धन्य! लक्ष्मण सद्भागी । राम-पदारविंद-अनुरागी ।
कपटि कुटिल मज; राम मानिती । म्हणुनि नाथ मज; सवें न नेती ॥ २॥
प्रभु जरि बघतिल, माझी करणी । कल्पकोटि शत; नहि उद्धरणी ।
प्रभु; जन-अवगुण मनीं न धरिती । दीनबंधु मृदु;-स्वभाव असती ॥ ३॥
आशा याच; मनीं दृढ वसती । भेटति राम; शकुन शुभ दिसती ।
सरतां अवधि; प्राण जरि राहे। अधम कवण जगि मज सम आहे ॥ ४॥

दो०-- राम-विरह सागरांतरीं; मग्न, भरत-मन होत।
विप्ररूप-धर पवन-सुत; ठाके जैसा पोत[1] ॥ १ (क)॥

दो०-- बसले बिसति कुशासनीं; जटा-मुकुट कृश-काय।
राम, राम, रघुपति, जपत; कमल-नयनिं जळ जाय॥ १(ख)॥

हनूमान अति बघतां हर्षे । पुलकित तनु, लोचनजळ वर्षे।
स्वमनीं अति; सौख्यातें मानी। बोले श्रवण-सुधा-सम वाणी॥ १॥
ज्या विरहें; व्याकुळ दिन रातीं। रटां, निरंतर; गुणगण कीर्ती।
रघुकुल-टिळक; सुजन-सुखदाता। येइ कुशल, मुनिदेवां त्राता॥ २॥
रिपु रणिं विजित; सुयश सुरगाती। सीते सहित; अनुज प्रभु येती।
ऐकुनि वच सब विसरे दुःखां। तृषार्त पावे; जसा पियूषा॥ ३॥
तात! कोण, कोठोनी आलां। मला परम प्रिय; वचन बोललां?।
मारुत-सुत मी कपि, हनुमान। हेंचि नाम मम; कृपानिधान॥ ४॥
दीनबंधु-रघुपतिचा किंकर। ऐकत, उठुनी भेटे सादर।

१ नौका.

भेटे प्रेम, न; हृदयीं राहे । तनु पुलकित; लोचनिं जळ वाहे ॥५॥
कपि ! तुज बघुनि;सकल दुख सरलें । आज मला प्रिय; राम भेटले ।
वारंवारचि; पुसे कुशलता । काय देउं मी; तुजला ताता ? ॥ ६ ॥
या संदेशा; सम जगिं कांहीं । विचार करुनी; बघतां नाहीं ।
उतराई मी; होउं शकेना । रामचरित मज; वद बा ! नाना ॥ ७ ॥
मग हनुमंत; नमुनि पदिं माथा । सांगे सकल; राम-गुण-गाथा ।
वद कपि कधीं, कृपानिधि रघुपति । दासा – सम मजला स्मरताती ॥८॥

छं०— निजदाससम; रघुवंशभूषण-चित्ति कधि मम स्मृति घडे ।
या भरत वचनें नम्र, अतिकपि; पुलकतनु चरणीं पडे ॥
रघुवीर निजमुखिं; वदति गुणगण फार; अग जगनाथ जे, ।
कैसे न होती; परम-नम्रहि; शुद्ध सद्गुण-सिंधु ते ॥ १ ॥

दो०— राम-प्राण-प्रिय नाथ तुम्हीं; सत्य वचन मम तात ! ।
कितिदां भेटति ऐकुनी; हर्ष न हृदयिं रहात ॥ १ (क) ॥

सो०— भरत चरण वंदून; त्वरित जाइ कपि राम-प्रति ।
वदे कुशल जाऊन; यानिं चढुनि प्रभु निघे मग ॥ २ (ख) ॥

मुदित भरत; कोशलपुरिं आले । गुरुला सकळहि; वृत्त कळविलें ।
मग मंदिरीं; कळविली मात । 'रघुवर कुशल; नगरिं येतात' ॥ १ ॥
ऐकुनि माता; उठुनि धावती । भरत सर्व त्यां; कुशल सांगती ।
समाचार पुर;-जनां समजले । नर, नारी, जन; मुदित धावले ॥ २ ॥
दधि-दुर्वा;-रोचन-फळ-फूलां । नव--तुलसीदल;-मंगल-मूलां ।
कनक-पात्रिं भर-भरुनि भामिनी । गात जाति त्या; नाग-गामिनी ॥ ३ ॥
जे जैसे; तैसेचि धावती । वृद्ध-बालकां; सवें न घेती ।
परस्परां; म्हणती कीं, काय । कृपाळु दिसले का रघुराय ? ॥ ४ ॥
नगरी, प्रभु, येताति जाणुनी । होई सकल; शोभेची खाणी ।
वाहे सुरम्य त्रिविध समीर । होई; निर्मल; शरयू-नीर ॥ ५ ॥

दो०-- हर्षित, गुरु,-परिजन-अनुग;-भूसुर-वृंद-समेत ।
जाति भरत, मनिं प्रेम अती; सन्मुख कृपा-निकेत ॥ ३ (क) ॥
,, कितेक चढल्या सौधवरी; बघुनी गगनिं विमान- ।
मधुर सुरें अति हर्षित; करिति सुमंगल गान ॥ ३ (ख) ॥
,, राका-शशि रघुपति;-पुरी; सिंधु हर्षला जाण ।
वाढे खळबळ करीं जणूं; नारि तरंग समान ॥ ३ (ग) ॥

इथें भानुकुल;-कमल-दिवाकर । कपींस दावी; नगर मनोहर ।

श्रुणु कपीश; अंगद, लंकेश । पावन पुरी; रुचिर हा देश ॥ १ ॥
यद्यपि सब; वैकुंठा[1] वानिति । वेद-पुराण-विदित जगिं जाणिति ।
नसे अयोध्येसा प्रिय तोंही । या मर्मा; जाणे, विरळा ही ॥ २ ॥
जन्मभूमि मम; पुरी सुशोभन । वहे उत्तरें; शरयू पावन ।
स्नानें जीच्या; विना प्रयासा । मम समीप नर; पावति वासा ॥३॥
प्रिय अति मज, येथिंचे निवासी । मम-धामदा; पुरी सुख-राशी ।
कपी मुदित; ऐकुनि प्रभु-वाणी । धन्य अयोध्या ! प्रभु वाखाणी ॥ ४ ॥

दो०— आले पाहुनि लोक सब; कृपासिंधु भगवान ।
नगर-निकट ते प्रेरिती; उतरे खालिं विमान ॥ ४ (क) ॥
प्रभु उतरुनि त्या म्हणति कीं; जावें धनद[2]-गृहास ।
राम शासनें जाइ तें हर्ष शोक बहु त्यास ॥ ४ (ख) ॥

येति सकल जन; भरता मागें । कृश-तनु अति रघुवीर-वियोगें ।
वामदेव मुनिः वसिष्ठ, नायक । बघुनि, ठेवि प्रभु; महिं धनु सायक ॥१॥
धावुनि धरिती; गुरुपदजलरुह । अनुज सहित अति; हर्षित[3] तनुरुह ।
भेटुनि कुशल; पुसति मुनिराय । 'कुशल सर्व; बघतां गुरु-पाय' ॥ २ ॥
द्विजां भेटुनी; नमिती माथ । धर्मधुरंधर; रघुकुलनाथ ।
धरी भरत मग; प्रभु-पद-पंकज । जिथें नमति सुर मुनि-शंकर-अज ॥३॥
पडे महीं; उठवितां न उठती । बळें कृपाब्धी; पोटीं धरिती ।
श्याम तनूवरि; पुलक सुगाढे । नव-राजीव-नयनिं जल वाढे ॥ ४ ॥

छं०— राजीव लोचन; स्रवति, देहीं; ललित पुलकावलि अती ।
अति प्रीतिं, हृदयीं; धरुनि अनुजा; मिलति प्रभु त्रिभुवन-पती
प्रभु मिलत अनुजा; केविं शोभति; देउं उपमा मी कशी ।
जणुं प्रेम अणि; शृंगार तनु-धर; भेटती, शोभा तशी ॥ १ ॥
पुसती कृपानिधि, कुशल भरता; वचन आशुन[4] पावती ।
श्रुणु शिवे ! तें सुख; वचन-मन-पर; जाणती, जे पावती ॥
"सब कुशल कोशल;-नाथ ! दुःखी; जाणुनी, दर्शन दिलें ।
बुडतां वियोगा-ब्धींत सदयें; हात धरुनी काढिलें ॥ २ ॥

दो०— हर्षे रिपुदमनासि प्रभू; भेटति हृदयिं धरून ।
भेटति, लक्ष्मण-भरत मग; प्रेममग्न होऊन ॥ ५ ॥

लक्ष्मण भरतानुजासि भेटे । दुसह, विरह-भव; दुःखचि आटे ।
सीता चरणिं, भरत शिर ठेवी ।-अनुज समेत; परम सुख सेवी ॥ १ ॥

---

१ वैकुंठ. २ कुबेर. ३ रोमांचित झाले. तनुरुह-रोमांच. ४ सत्वर.

राम बघुनि; हर्षति पुरवासी । झाला अंत; विरह - दुःखासी ।
प्रेमातुर, बघुनी जन भारी । कौतुक करिति; कृपालु खरारी ॥ २ ॥
प्रगटति, अमितरूप तत्काल । भेटति सर्वां; उचित कृपाल ।
कृपादृष्टिनें; राम विलोकी । होति सकल नर; नारि विशोकी ॥३॥
क्षणांत सर्वां; राम भेटले । उमे ! मर्म हें; कुणा न कळलें ।
ऐसें सकलां; सुखवुनि राम । जाती पुढें; शील-गुण-धाम ॥ ४ ॥
धावति, कौसल्या सब माता । बघुनि वत्स जशि; धेनु प्रसूता ॥५॥

छं०— नव धेनु-वत्सा; त्यजुनि गेहीं; जाइ चरण्यातें जशी ।
दिन-अस्ति नगरीं; स्रवत स्तन, हुं-कार-युत धावे कशी ॥
सप्रेम मातां; सर्व भेटुनि; वचन मृदु प्रभु बोलले ।
गत घोर विपद्; वियोग-भव; त्यां हर्ष सुख बहु जाहलें ॥१॥

दो०— माता भेटे लक्ष्मणा; रामीं-प्रेम बघून ।
रामा भेटे कैकयी; हृदयिं बहुत लाजून ॥ ६ (क) ॥

,, लक्ष्मण सकलां भेटुनी; घे शुभ आशीर्वाद ।
कैकयीस भेटे बहुत: क्षोभ न मनिंचा जात ॥ ६ (ख) ॥

सासूनां मग भेटे सीता । पडतां पदीं; हर्ष अति चित्ता ।
आशिस देती; पुसुनि कुशलता । तव सौभाग्या; असो अचलता ॥ १ ॥
सकल राममुख;-कमल विलोकिति । मंगल म्हणुनि; नयनजल रोखिति ।
कनक-पात्रिं; करितात आरती । पुनः पुन्हां प्रभु-मुखा पाहती ॥ २ ॥
नानाविध; ओंवाळणि करती । परमानंद; हर्ष मनिं भरती ।
कौसल्या; कितिदां रणधीरा । निरखी कृपा;-सिंधु रघुवीरा ॥ ३ ॥
मनें विचारी; कितिदां, भारी । लंकापतिसि कसा तरी मारी ! ।
अति सुकुमार;.युगल मम बाळ । राक्षस सुभट, महाबळ काळ ॥ ४ ॥

दो०— लक्ष्मण आणि सीते सहित; रामा निरखी आइ ।
परमानंदीं मग्न मन; कितिदां पुलकित होइ ॥ ७ ॥

इतिश्री उत्तरकाण्डे मंगलाचरणादि-श्रीरामस्यायोध्या-
गमनं, भरतमिलनादि वर्णनंनाम प्रथमोऽध्यायः

---

१ नवीन व्यालेली

अध्याय २ रा

लंकापति, कपिपति नलनील। जांबवंत; अंगद शुभशील।
हनुमदादि सब, वानरवीर। धृत सुमनोहर; मनुज-शरीर ॥ १ ॥
भरत-सुशील; स्नेह-व्रत नेमां। सकलहि सादर; वर्णिति प्रेमां।
पाहुनि नगर-जनांची रीती। सकल वानिती; प्रभुपदिं प्रीती ॥ २ ॥
सकल सख्यांनां; राम अणविती। 'मुनिपद वंदा; असें शिकविती।
वसिष्ठ गुरु; निजकुळीं पूजिले। यांच्यां कृपें; दनुज रणि वधिले ॥३॥
सखे सर्व हे; श्रृगु मुनि अमुचे। समर सागरीं; जहाज साचे।
हिता-लागि मम; जन्म वेंचला। भरताहुनि हे; प्रिय बहु मजला ॥ ४॥
प्रभु-वचन ऐकुनि मग्न स्वभावें। पळ पळ उपजे; त्यांसि सुख नवें ॥५॥

दो०— कौसल्येच्या चरणिं मग; नमिती सर्वहि माथ।
आशिस देई, मुदित "तुम्हीं; प्रिय मज, सम रघुनाथ ८ (क)
सुमनवृष्टि-नभ-संकुल; जाति भुवनिं सुखकंद।
सौधीं चढुनी पाहतीं; सकल नारि-नर-वृंद ॥ ८ (ख) ॥

कांचन-कलशां; सजुनी भारी। सर्व ठेविती, अपुल्या द्वारीं।
तोरण रम्य, पताका केतू। सर्व सजविती; मंगल-हेतू ॥ १ ॥
वीथि सुगंधें; सकल शिंपिल्या। रांगोळ्या बहु गजमणि[1] रचिल्या।
नानाविधीं; सुमंगल साजीनि। हर्षे नगरीं; डंके वाजति ॥ २ ॥
नारि सकल; ओवाळणें करती। देति अशीस; हर्ष मनिं भरती।
कांचन-पात्रिं; आरत्या नाना। युवती सजुनि; करिति शुभ गाना ॥३॥
करिति आरती; आर्तिहराची। रघुकुल-सरसिज-दिवाकराची।
पुर-शोभा-वैभव; कल्याणा। शेष,-शारदा-श्रुति वदवेना ॥ ४ ॥
चरित बघुनि हें; तेही भ्रमती। उमे, कसे नर; तद्गुण वदती ॥ ५ ॥

दो०— नारि कुमुदिनी; नगर सर; रघुपति-विरह दिनेश।
अस्तंगत, तैं विकसति, बघुनि राम राकेश ॥ ९ (क) ॥
होती शकुन शुभ विविध विध; वाजति गगनिं निशाण।
पुर-नर-नारि-सनाथ-कर; जाति भुवनिं भगवान ॥ ९ (ख)॥

१ गजमुक्ताफळांच्या

'कैकयि लज्जित;' हें जाणोनी । तद्गृहिं गेले; प्रथम भवानी ! ।
प्रबोध करुनी; बहु सुख दिधलें । मग निज-भुवनिं; राम-पद वळले ॥ १ ॥
कृपासिंधु जैं; मंदिरिं गेले । पुर-नर-नारि; सुखी सब झाले ।
वसिष्ठ, बोलावुनी द्विजवरां । योग, लग्न, दिन; आज शुभ खरा ॥२॥
द्विज हो ! हर्षें; द्या अनुशासन । राम भूषविति; नृपसिंहासन ।
वसिष्ठ मुनि जैं; सुरम्य वदले । ऐकुनि सर्वे; द्विजां अति रुचलें ॥ ३ ॥
वदति वचन मृदु; विप्र अनेक । जग-अभिराम; राम-अभिषेक ।
अतां विलंब न; मुनिवर कीजे । टिळक महाराजांसि करीजे ॥ ४ ॥

दो०— सुमंत्रासि सांगतां मुनी; हर्षित ते जातात ।
रथ अनेक बहु वाजिगज; सत्वर सब सजतात ॥ १० (क) ॥
,, प्रेरुनि दूतां जिथें तिथें; मंगल वस्तु अणून ।
हर्षित वसिष्ठ-चरणिं मग; शिर नमिती येवून ॥ १० (ख) ॥

इति श्री उत्तरकांडे; गृहप्रवेशादि राज्याभिषेक-संभार-निर्मिति-
वर्णनं नाम द्वितीयोऽध्यायः
नवाह्न पारायणेऽष्टमो विश्रामः

अध्याय ३ रा

पुरी अयोध्या; रुचिर सजविली । सुमनवृष्टि-झड; अमरीं लाविली ।
प्रभु बोलावुनी; वदति जनांला[1] । प्रथम सख्यांनां; स्नानें घाला ॥ १ ॥
ऐकुनि सेवक; बहुत धावले । सुकंठ-मुख्यां; स्नान घातलें ।
बोलावुनि भरतासि कृपाब्धी । स्वकरें जटा; सोडविति आधीं ॥ २ ॥
तिन्हीं बंधुनां; स्नानें घालिति ।-स्वभक्त-वत्सल; कृपालु मा-पति ।
भरत-भाग्य नी प्रभु-कोमलता । शेष-कोटि-शत; थकति बोलतां ॥ ३ ॥
सोडवुनी निज; जटा करांनें । स्नान करी प्रभु; गुरु-आज्ञेनें ।
स्नान करुनि प्रभु; भूषण घालिति । अंग बघुनि शत, अनंग[2] लाजति ॥४॥

दो०— सादर सासू जानकिसी; सत्वर घालिति स्नान ।
दिव्यांबर वर भूषणें; प्रत्यंगीं शुभ जाण ॥ ११ (क) ॥
,, राम-वाम-दिशिं शोभते; रमा रूप-गुण खाणि ।
बघुनि जननि[3] अति हर्षित; सुफल जन्म निज मानि ॥ ११ (ख) ॥

---

१ सेवकांना. २ मदन, ३ कौसल्या।

श्रुणु खगेश त्या अवसरीं; ब्रह्मा, शिव, मुनिवृंद ।
आले बसुनि विमानि सुर; दर्शनार्थ सुखकंद ॥ ११ (ग) ॥

राम विलोकुनि; मुनि अनुरागे । त्वरित दिव्य सिंहासन मागे ।
रविसम तेज; न वर्णू शकती । द्विजां नमुनि शिर; प्रभु वर बसती ॥१॥
जनक – नंदिनी – सह रघुराया– । बघुनि, हर्ष अति; मुनि–समुदाया ।
वेदमंत्र द्विजवर उच्चारिती । नभि सुर, मुनिवर; जयजय करिती ॥२॥
प्रथम टिळक मुनि; वसिष्ठ करिती । मग सब विप्रां; आज्ञा देती ।
माता मुदित, बघुनि सुत होती । ओंवाळिति, बहुवार आरती ॥ ३ ॥
विविध दान बहु; विप्रां दिधलें । याचक सकल अयाचक केले ।
सिंहासनि; त्रिभुवन–पति स्वामी । बघुनि वाद्य सुर; गर्जति नामी ॥४॥

छं०— नभि वाद्य बहु; गंधर्व किन्नर; रामगुण गाती अती ।
सुर–नर्तकी बहु; नृत्य, परमानंद मुनि–सुर पावती ॥
भरतादि अनुज; विभीषणांगद; हनुमदादिक भोंवती ।
धृत-छत्र-चामर; व्यजन-धनु-असि; चर्म, शक्ति विराजती ॥१॥

,, श्री–सहित दिनकर;–वंशभूषण; काम बहु छवि शोभती ।
नव–अंबुधर–वर;–गात्र, अंबर, पीत; मुनिमन मोहती ॥
मुकुटांगदादि; विचित्रभूषण; अंग–अंगि विराजतें ।
अंभोज नेत्र, विशाल उरभुज; धन्य नर निरखीति ते ॥ २ ॥

दो०— ती शोभा सुसमाज सुख; अवर्णनीय खगेश ।
वर्णिति वाणी शेष श्रुती; तो रस विदित महेश ॥ १२ (क) ॥

,, भिन्न भिन्न करुनी स्तुती; गेले सुर निजधाम ।
बंदी वेषें वेद मग; प्राप्त जिथें श्रीराम ॥ १२ (ख) ॥

,, प्रभु सर्वज्ञचि देति अती; आदर कृपानिधान ।
समजे कोणि न मर्म तें; करुं लागति गुण–गान ॥ १२ (ग) ॥

छं०— जय सगुण: निर्गुण–रूप रूप,–अनूप भूप शिरोमणे ।
दशकंठ निशिचर–चंड–खल–तम,–हर करें निज दिनमणे ॥
अवतार नर, संसार–भारा; हरुनि, दुःखविनाश हे ! ।
जय प्रणतपाल; दयाल प्रभु, संयुक्त शक्ति नमामहे ॥ १ ॥

,, तव विषम माया–वश सुरासुर; नाग नर–अग जग हरे ।
भवपंथि भ्रमती श्रमित निशिदिन; काळ गुण कर्में खरे ।
ज्यां नाथ करुणा–युत विलोकां; त्रिविध ताप न त्यांसि हे ।
भव–खेद–छेदन–दक्ष ! आम्हां रक्ष, राम नमामहे ॥ २ ॥

जो ज्ञान-मान;-विमत्त तव, भव;-हरणि भक्ति न आदरी ।
तो प्राप्त सुरदुर्लभ पदादपि; पडत मज देखत हरि! ॥
विश्वास-युत सब; आस सांडुनि; दास तव जे होति हे! ।
तव जपुनि नामा; भवहि श्रमविण; तरति नाथ स्मरामहे ॥३॥
जे चरण शिव--अज;--पूज्य रजशुभ; लागुनी नारी तरे ।
नख-निर्गता सरि; पावनी, जग,--वंदिता सुर--मुनि--वरें ।
ध्वज-कुलिश-अंकुश;-कंज-युत वनिं; फिरत कंटक-व्रण न हे?।
पदकंज--द्वंद्व; मुकुंद राम; रमेश नित्य भजामहे ॥ ४ ॥
अव्यक्त मूल;मनादि तरु, त्वच; चारि निगमागम भणे ।
षट् स्कंध, शाखा; वीस पंच; अनेक पत्रें सुमें म्हणे ॥
फल युगलविध; कटु मधुर, वेली, एक ज्या आश्रित रहे ।
फुटतो हि फुलतो; नित्य नव सं;सार विटप, नमामहे ॥ ५ ॥
जें ब्रह्म अज; अद्वैत अनुभव;-गम्य मन-पर ध्याति हे ! ।
बोलो वदो तो; नाथ आम्हीं, सगुण यश तव गावुं हें ॥
करुणानिधे प्रभु, सद्गुणाकर; देव हा वर मागतो ।
मन वचन कर्मे; दोष सोडुनि; चरणिं तव अनुराग तो ॥५॥

दो०—सर्वा देखत वेद ही; स्तुती करूनि उदार ।
होती अन्तर्धान मग; जाती ब्रह्म-अगार ॥ १३ (क) ॥
वैनतेय श्रुणु शंभु मग; येति जिथें रघुवीर ।
स्तुती करित गद्गद गिरा; पुलक प्रफुल्ल शरीर ॥ १३ (ख)॥

छं० (तोटक) जयराम रमारमणा शमना ।-भवताप-भयाकुल पाहिजना ।
अवधेश सुरेश रमेश[३] विभो । शरणागत मागत पाहि प्रभो ॥१॥
दशशीश विनाशन वीसभुजा । कृत दूरि महा महि भूरि रुजा ।
रजनीचर-वृंद पतंग महा । शर-पावक तेजिं प्रचंड दहा ॥२॥
महिमंडल मंडन चारुतरा । धृत-सायक-चाप निषंग-वरा ।
मद-मोह-महा-ममता-रजनी ।-तमपुंज,-दिवाकर; तेज अनी[४] ॥३॥
मनजात-किरात; निपात करि । मृग-लोक; कुभोग शरांनि हरि ।
वध नाथ! अनाथ हि पाहि हरे । विषयां-वनिं पामर भूल-भरे॥४॥

---

१ म्हणतात. २ फुलें. ३ अयोध्यापति. ४ अनीक, सैन्य.

बहु रोग, वियोग जनां छळतो। भवदंघ्रि-अनादार हा फळतो।
भवसिंधु अगाध; पडे नर तो। पदपंकजिं; प्रेम न जो करतो॥ ५॥
अति दीन मलीन; दुखी नित हीं। पदपंकजिं ज्यांसिहि प्रीति नहीं।
अवलंब कथा तव ज्यां असती। प्रिय संत अनंत सदा गमती॥ ६॥
नहि राग न लोभ न मान मदां। गणती सम वैभव वा विपदा।
म्हणुनी तव सेवक, होति मुदा। मुनि सोडिति; योग-दुरास सदा॥७॥
बहु प्रेम, निरंतर, नेम तनें। पद-पंकज, सेविति शुद्ध मनें॥
समबुद्धि, अनादरिं आदरिं ही। सब संत, सुखी, फिरताति मही॥८॥
मुनि मानस, पंकज भृंग भजे। रघुवीर, महारण, धीर अजे॥
तव नाम जपामि, नमामि हरी। भवरोग-महागद मान अरी॥ ९॥
गुणशील-कृपा-परमायतना। प्रणमामि निरंतर मा-रमणा॥
रघुनंद, निकंदय द्वंद्व-घना। महिपाल, विलोकय, दिनजना॥१०॥

दो०— पुनः पुन्हां वर मागतो; हर्षें द्या श्रीरंग।
पदसरोजि अनपायिनी; भक्ति सदा सत्संग॥ १४ (क)॥
शंकर वर्णुनि रामगुणां; करिति गमन कैलास।
प्रभू देववी कपिंसि मग; सर्व सुखद आवास॥ १४ (ख)॥

शृणु, खगपति ही; कथा पावनी। त्रिविध ताप; भव-रोग-नाशनी।
श्री-रामाच्या; शुभ अभिषेका। ऐकुनि, पावति; विरति विवेका॥ १॥
सकाम नर जे; ऐकति गाती। पावति नाना; सुख-संपत्ती।
सुर-दुर्लभ-सुख; भोगुनि जगती। अंतकाळिं, रघुपति-पुर जाती॥ २॥
ऐकति मुक्त विरत, अणि विषई। नव-भक्ती, गति, संपद होई।
रामकथा; वर्णिली यथामति। भवभय-दुःख; निवारिणि खगपति!॥३॥
विरति-विवेक-भक्ति-दृढकरणी। मोहनदीतें, सुंदर तरणी।
नित्य नवें; मंगल नगरांत। हर्षित वसती; जात, कुजात॥ ४॥
प्रेम नित्य नव; प्रभु-पद-पंकज-। सर्वां; नमिती ज्यां शिव मुनि-अज।
भिक्षुकांस बहु; अहेर केले। द्विजां दान; नाना-विध दिधले॥ ५॥

दो०— ब्रह्मानंदीं मग्न कपी; प्रभुपदिं रति सर्वांस।
जातां दिवस न कळति त्यां; गेले बघ षण्मास॥ १५॥

विस्मृत गृह; स्वप्नीं स्मृति नाहीं। संतमनीं; परद्रोह जसा ही।
बोलाविति सब; सख्यां रघुपती। येउनि सादर; ते शिर नमिती॥ १॥

---

१ नित्य, २ अजय, ३ मोठें औषध, ४ नाशकरा, ५ पहा

परम प्रीतिनें; निकट बसविले । भक्त-सुखद मृदु; वचन बोलले ।
तुम्हि केली, बहु; सेवा भाई । करूं मुखावरि; करूं बढाई ॥ २ ॥
म्हणुनि तुम्ही मज; प्रिय अति झालां । मदर्थ त्यजिलें गृह-सौख्याला ।
अनुज, राज्य, वैभव, वैदेही । देह, गेह जन; परिजन स्नेही ॥ ३ ॥
हे तुमच्या सम,-प्रिय नहि जाणा । मृषा न बोलूं; हा मम बाणा ।
' सर्वां प्रिय सेवक, ' ही नीती । दासांवरि मम; फारचि प्रीती ॥ ४ ॥

दो०— जा मित्रांनों अतां गृहीं, भजा मजसि दृढनेम ।
सदा सर्वगत सर्वहित; जाणुनि ठेवा प्रेम ॥ १६ ॥

ऐकुनि वचन; मग्न ते झाले । कोण, कुठें; तनुभान विसरले ।
टक लावुनि कर; जोडुनि बघती । अति अनुरागें; वदूं न शकती ॥ १ ॥
पाहुनि प्रभू; परम-प्रेमातें । करिती विविध; ज्ञान बोधातें ।
सन्मुख कांहीं; वदूं न शकती । पुनः पुन्हां पद-कमलिं पाहती ॥ २ ॥
मागविती प्रभु; वसन भूषणां । अनुपम सुंदर; सुरंग नाना ।
सुग्रीवासी; प्रथम अर्पिलीं । भरतें स्वकरें; त्यासि घातलीं ॥ ३ ॥
प्रभु-प्रेरित; लक्ष्मणें अर्पिलीं । बिभीषणा; रघुपति मनिं रुचलीं ।
अंगद स्वस्थ; बसे, ना हाले । बोलाविति ना; प्रेम पाहिलें ॥ ४ ॥

दो०— जांबवंत नीलादिकां; अहेर करि रघुनाथ ।
राम-रूप मनिं धरूनि ते,जाति नमुनि; पदिं माथ ॥ १७ (क)

,, उठुनी अंगद नमुनि शिर; सजल नयन; करजोडि ।
अति विनीत बोले वचन; जणूं प्रेमरस गोडि ॥ १७ (ख) ॥

श्रृणु सर्वज्ञ; कृपा-सुख-सिंधो । दीन दयाकर आर्त सुबंधो ।
मरतेवेळि; नाथ ! मज वाली । प्रभु ! तुमचे, पदरा-मधिं घाली ॥१॥
अशरण-शरण, ब्रीद, मनिं अठवा । नका त्यजूं मज; हितकर देवा
माय बाप गुरु; प्रभु; मम नाथ । कुठें जाउं; त्यजुनी रघुनाथ ॥ २
करा विचार; 'तुम्हिच नर-राज । कवण, त्यजुनिपद; गृहिं मम काज
बालक, ज्ञान-बुद्धि-बल-हीन । राखा शरण; नाथ जन दीन ॥ ३ ॥
नीच कार्य गृहिं; सर्व करीन । पदपंकज; पाहुनी तरेन ।
वदुनि पडे पदिं; रघुवर ' पाहि ' । सांगु नका मज 'गृहिं जा' कांहि ॥४॥

दो०— अंगद वचन विनीत, प्रभू; ऐकुनि करुणासींव ।
धरिति हृदयिं त्या उचलुनी; सजल नयन राजीव ॥ १८ (क)॥

दो० — निज उरमाळा, वसन मणी; देति वालि-तनयास ।
बोळविती भगवान मग; समजावुनि बहु त्यास ॥१८(ख) ॥

भरत, अनुज-सौमित्रि-समेत । भक्त-कृतज्ञ; पोंचवू जात ।
अंगद-हृदयीं; प्रेम अपार । वळुनि; पाहतो वारंवार ॥ १ ॥
पुनः पुन्हां करि; दंड प्रणाम । 'रहा म्हणति मज' हें मनिं, राम ।
राम-विलोकन;-चाल, बोलणें । स्मरतां कष्टीं; हसणें बसणें ॥ २ ॥
प्रभु-मत बघुनि; विनति बहु करुनी । जाइ, हृदयिं; पद-पंकज धरुनी ।
अत्यादरें; कपी पोंचविले । बंधु सहित मग; भरत परतले ॥ ३ ॥
धरुनी मग; सुग्रीव-पदांना । मारुति करि; विनती बहु नाना ।
करुनि कांहिं दिन; प्रभु-पद-सेवा । येइन चरण;-दर्शना देवा ॥ ४ ॥
पुण्यपुंज तूं; पवन कुमारा । जाउनि सेवि; कृपा-आगारा ।
जाती कपी; स्मरत भगवंता । अंगद म्हणे; ऐक हनुमंता ॥ ५ ॥

दो०— सांग दण्डवत प्रभुसि मम; जोडुनि विनवुं करांस ।
वारंवारहि स्मरण मम; धावें रघुनाथास ॥ १९ (क) ॥

" विनवुनि गेला वालिसुत; फिरुनी ये हनुमंत ।
प्रीति त्याचि वदले प्रभुसी; मग्न होति भगवंत ॥ १९ (ख)॥

" कुलिशाहुनिहि कठोर अती; कोमल कुसुमाहुन ।
प्रभुचें चित्त खगेश वद; कोणा येइ कळून ॥ १९ (ग) ॥

कृपाळु, बोलावुनी निषादा । अर्पिति भूषण; वसन, प्रसादा ।
जा भुवना तुम्हि; स्मरण मम करा । तनु-मन-वचनें; धर्म अनुसरा ॥ १ ॥
तूं मम सखा; भरत सा भ्राता । यावें नगरीं; येतां जातां ।
ऐकुनि वच; उपजे सुख भारी । चरणिं पडे, लोचनिं बहु वारी ॥ २ ॥
चरण-कमल मनिं; धरुनी आला । प्रभु-प्रभाव; परिजनांसि वदला ।
रघुपति-चरित; बघुनि पुरवासी । कितिदां म्हणति;'धन्य सुखराशी !'३
राम-राज्यि-बसतां, त्रैलोक-। झाले हर्षित; गेला शोक ।
वैर न करि; कोणी ही कोणा । राम-प्रतापें; भेद वसेना ॥ ४ ॥

दो०— वर्णाश्रम, निज निज धर्म,-निरत, वेद-पथिं लोक-।
चालति सदा, पावति सुखही; नहिं भय रोग न शोक ॥२०॥

दैहिक, दैविक, भौतिक ताप । राम-राज्यिं; यांचा न प्रताप ।
जन सब करिति; परस्पर प्रीति । स्वधर्म-रत; वसती श्रुति-नीतीं ॥१॥
चारहि चरण; धर्म जगिं राही । पूर्ण असे; स्वप्निंहि 'अघ नाहीं ।
राम-भक्तिरत; नर अणि नारी । सकल परम;-गतिचे अधिकारी ॥२॥

शत्रुघ्न.

अल्पमृत्यु गत; पीडा पार। सब; [1]सुंदर सब; विरुज शरीर।
नहि दरिद्र कुणि; दुखी न दीन। नहि कुणि; अबुध, न: लक्षण-हीन ॥
पुण्यशील; निर्दम्भ; धर्मरत। नर अणि नारि; चतुर अति गुणयुत।
सब गुणज्ञ; पंडित सब, ज्ञानी। सब कृतज्ञ; नहि कपट-कहाणी ॥ ४ ॥

दो०— राम-राज्यि नभगेश श्रुणु; सचराचर जगिं कांहिं।
काल-कर्म-स्वभाव गुण; कृत दुख कोणा नाहिं ॥ २१ ॥

भूमी सागर;-सप्त-मेखला। एकभूप रघुपती कोसिला।
प्रतिरोमीं जग; अनंत ज्यासी। ही प्रभुता बघ!; फार न त्यासी ॥१॥
ती प्रभु-प्रभुता; बघतां सारी। हें म्हणणेंचि; हीनता भारी।
खगश!! तो महिमा जे जाणिति। ते या चरितीं; बहु रति मानिति ॥२॥
त्या ज्ञानाचें; ही लीला फल। वदति महा; मुनिवर;-दमशील।
राम-राज्यिची; सौख्य संपदा। वर्णू न शकती; शेष-शारदा ॥ ३ ॥
जन उदार सब; पर उपकारी। विप्रचरण-सेवक नर-नारी।
एक नारि-व्रत; जनता सारी। त्या, तनु मन वच;पति-हित-कारी॥४॥

दो०— 'दण्ड' यतींना, 'भेद' जिथें; नर्तक नृत्य समाजिं।
'जिंका' ऐकति मनासिच: शब्द प्रभूचें राज्यि ॥ २२ ॥

फळती फुलति; सदा तरु कानन। बसती संनिध; गजपंचानन।
खग मृग सहजहि; वैर विसरले। प्रीति परस्पर; करूं लागले ॥ १ ॥
वदती खग मृग; नाना वृंद। अभय चरति वनिं; अति सानंद।
शीतल सुरभि; समीर सुमंद। गुंजति भृंग; पिउनि मकरंद ॥ २ ॥
लता विटप; मागत मधु द्रवती। मन-वांछित-पय; धेनू स्रवती।
धन-संपन्न सदा ही; धरणी। त्रेतायुगिं कृत-युग-समकरणी ॥ ३ ॥
शैलीं प्रगट; विविध-मणि-खाणी। जगदात्मा जग-भूप म्हणोनी।
सरिता सकल; वहति वर-वारी। शीतल, विमल; स्वादु सुख-कारी॥४॥
सागर निज,-मर्यादा पाळिति। टाकिति रत्न; तटीं नर पावति।
सरसिज-संकुल; सकल तडाग। प्रसन्न अति दश;-दिशा विभाग ॥ ५ ॥

दो०— विधु निज करिं महि पूर्ण करी; उचित तपे दिन-राज।
वारिद इच्छित देति जल; रघुवीराचें राज्य ॥ २३ ॥

इति श्री उत्तर-काण्डे; राज्याभिषेकादि राम-राज्य वर्णनं नाम
तृतीयोऽध्यायः ॥

———

१ निरोगी.

अध्याय ४ था

अश्वमेध; कोटी प्रभु करिती । दान अनंत; द्विजांना देती ।
श्रुतिगण-पालक; धर्म--धुरंधर । गुणातीत परि; भोग-पुरंदर[1] ॥ १ ॥
पति अनुकूल; सदाही सीता । शोभाखाणि; सुशील विनीता ।
जाणुनि कृपा-सिंधु-प्रभुतेला । भावें सेवी; प्रभु-पद--कमलां ॥ २ ॥
यद्यपि गृहिं सेवक सेवकिणी । सेवा-कुशल; विपुल बहु सुगुणी ।
स्वकरें गृह;--परिचर्या करिते । रामचंद्र--आज्ञा अनुसरते ॥ ३ ॥
कृपा-सिंधु सुख; मानी जेणें । श्री[2] करि तें; सेवाविधि जाणे ।
कौसल्यादि सासु सकलाही ।--सेवी, मनीं; मान मद नाहीं ॥ ४ ॥
उमा--रमा--ब्रह्माणि वंदिता । जगदंबा; संतत अनिंदिता ॥ ५ ॥
दो०-- जीचा कृपा--कटाक्ष सुर; इच्छिति, मिळे न नांव ।
रामपदाब्जीं शुद्ध रती; करि ती त्यजी स्वभाव ॥ २४ ॥

सेविति, सानुकूल सब बंधू । अति प्रियतम; प्रभुपद-मकरंदू ।
प्रभु-पद-कमल, विलोकित बसती । कृपालु कधिं मज; आज्ञा वदती ॥ १ ॥
राम करिति; बंधूवरि प्रीती । नानाविध; शिकवीती नीती ।
हर्षित वसति, नगरिंचे लोक । सुर;-दुर्लभ सुख; भोगिति चोख ॥२॥
निशिदिन विधिला विनवित राहति । श्री रघुवीर,--चरण-रति मागति ।
सीते सुंदर; सुत-युग झाले । लव-कुश वेद; पुराणीं कथिले ॥ ३ ॥
उभय विजयि; विनयी गुण मंदिर । प्रभु--प्रतिबिंब; जणूं अति सुंदर ।
युग युग सुत सर्वा भावांना । पात्र सुरूप, शील सगुणांना ॥ ४ ॥
दो०-- ज्ञान-गिरा-गोतीत अज; माया गुण-मन-पार ।
तोचि सच्चिदानंद घन; करि नर-चरित अपार ॥ २५ ॥

प्रातः करुनि; शरयू-मज्जन । बसति सभेत; सर्व द्विज सज्जन ।
वेद पुराणें; वसिष्ठ वर्णिति । श्रवण करिति; यद्यपि सब जाणिति ।१।
अनुजां समेत; भोजन करिती । बघुनि सकल; माता सुख वरिती ।
भरत रिपुघ्नहिं; बंधू दोनी । सहित पवनसुत; जाति उपवनीं ॥ २ ॥
बसुनि पुसति प्रिय; रामकथाही । वदे सुमति कपि; गुण-अवगाही ।
विमल कथा; ऐकुनि सुख पावति । पुनः पुन्हां; वदवाया लाविति ॥ ३ ॥
घरोघरीं; वाचिती पुराणां । राम-कथा; पावन विध नाना ।
नर अणि नारि; राम-गुण गाती । न कळे केव्हां; निशिदिन जाती ॥ ४ ॥

१ इंद्र. २ सीता.

दो०— पुरी-अयोध्या-वासि जन; सुख-संपदा-समाज ।
कोटिशेष नहि वर्दु शकती; जिथें राम नृपराज ॥ २६ ॥

नारदादि सनकादी मुनिगण । घेण्या श्रीरामाचें दर्शन ।
प्रति दिन सकल; अयोध्ये येती । नगरी पाहुनि; विसरति विरती ॥ १ ॥
जातरूप-मणि-जडित[1] बंगले । रत्नोपल-युत सौध रंगले ।
पुर चौफेर; कोट अति सुंदर । सुंदर बुरुज; सुरंग रम्यतर ॥ २ ॥
नव-ग्रह-निकर सुसेना रचुनी । जणुं अमरावति; घेति घेरुनी ।
पथ बहुरंग; रचित मणि-कांचन । नाचति बहु; बघुनी मुनिवर-मन ॥ ३ ॥
दिव्य धाम, दिसती नभ चुंबिति । कळस जणूं रवि-शशि द्युति निंदिति ।
बहु-मणि-रचित झरोके भ्राजति । घरोघरीं मणि-दीप विराजति ॥ ४ ॥

छं०— मणि दीप राजति; भुवन भ्राजति; देहली विद्रुम-कृता ।
मणि-स्तंभ-भित्ति;विरंचि-विरचित;कनक-मणि-मरकत-युता॥
सुंदर मनोहर; मंदिरें बहु; आंगणें स्फटिकाचि तीं ।
प्रति-द्वार द्वार; कपाट हाटक; खचित हीरक; रम्य तीं ॥ १ ॥

दो०— चारु चित्रशाला विविधा; लिखित घरोघरिं जाण ।
राम-चरित जे बघति मुनी, चोरिति त्यांचें ध्यान ॥ २७ ॥

सुमन-वाटिका; सर्व लाविती । नाना विध बहु; यत्नें जपती ।
ललित लता; नाना-विध सुंदर । सदा हि फुलती; वसंत सुखकर ॥ १ ॥
गुंजति मधुकर; मुखर मनोहर । वाहे मरुत; त्रिविध अति सुखकर ।
नाना खग बहु; बाळक पाळिति । वदति मधुर बहु; उडतां शोभति ॥ २ ॥
मोर, हंस, सारस पारावत । भवनांवरि अति; शोभा पावत ।
जिथें तिथें निज, बघुनी छाया । लागति कूजन; नृत्य कराया ॥ ३ ॥
पढविति शुक;-सारिकांसि बालक । म्हणा राम ! रघुपति ! जन-पालक ।
सर्व-सुरम्यचि, भूपति द्वार । रुचिर वीथि; चौहट, बाजार ॥ ४ ॥

छंद०— बाजार रुचिर, न; वर्णवे, सब; वस्तु फुकट-हि पावति ।
नृप राम जेथें; श्रीपती ती; संपदा कशि वर्णिती ॥
बसले दुकानिं; सराफ वाणी; बहुत जेंवि कुबेर ते ।
सब सुखी सब सत्;-चरित सुंदर; नारिनर शिशु जरठ जे॥१॥

दो०— वाहे शरयू उत्तरें; निर्मल जल गंभीर ।
घाट सुबद्ध मनोहर; पंकहीन तत्तीर ॥ २८ ॥

---

[1] सुवर्ण-रत्न जडित.

दूर स्वतंत्र; रुचिर तो घाट । पिती जिथें जळ; गज-हय-थाट ।
पाणी-घाट मनोहर नाना । तेथें पुरुष न; करिती स्नाना ॥ १ ॥
राजघाट सबविधि सुंदर वर । जेथें मज्जति; चौवर्णिक नर ।
तीरानें बहु; देव-मंदिरें । त्यां भोवति; उप-वनें सुंदरें ॥ २ ॥
सरिता-तीरीं; कुठें उदासी । वसति ज्ञान-रत; मुनि, संन्यासी ।
तीरानें; तुलसी किति सुंदर । वृंद-वृंद बहु लाविति मुनिवर ॥ ३ ॥
पुरशोभा ती; अशक्य वदतां । बहिर्नगर ही; परम रुचिरता ।
पुर दर्शनें; भग्न अघ-डाग । वन उपवन; वापिका तडाग ॥ ४ ॥

छं०-- वापी तडाग अमूप कूपहि; रम्य आयत शोभती ।
सोपान सुंदर; नीर निर्मल; बघुनि सुर मुनि मोहती ॥
बहुरंग पंकज; भृंग गुंजतिः विहग मृदु मधु बोलती ।
आराम रम्य; पिकादि खग-रव, जात पथिकां बाहती ॥ १ ॥

दो०-- रमानाथ राजा जिथें; तें पुर अवर्णनीय ।
अणिमादिक, सुख, विभव; पुरी करिती स्थान स्वकीय ॥ २९ ॥

सकल हि नर; रघुपति-गुण गाती । बसुनि परस्पर; हेंचि शिकविती ।
भजा प्रणत-प्रति-पालक रामा । शोभा-शील रूप-गुण-धामा ॥ १ ॥
जलज-विलोचन; श्यामल-वपुला । पक्ष्म नयन इव; सेवक-पाला ।
धृत-शर-रुचिर-चाप-तूणीरा । संत-कंज-वन; रवि रणधीरा ॥२॥
काल-कराल-व्याल-खग-नृप-वर । नमा राम, अकाम-ममता-हर ।
लोभ-मोह-मृग;-यूथ-किराता । मनसिज-करि-हरि; जनसुखदाता ॥३॥
संशय-शोक; निबिड-तम-भानुसि । दनुज-गहन-घन-दहन-कृशानुसि ।
जनक-सुता समेत रघुपतिसी । कां न भजा; भंजन-भव-भार्तीं ॥ ४ ॥
बहु-वासना;-मशक-हिम-राशिसि । सदा एकरस; अज अविनाशिसि ।
मुनि-रंजन, भंजन-महिभारा । दास तुलसिचे; स्वामि उदारा ॥ ५ ॥

दो०— ऐसे नगरीं मारि नर; करिति राम-गुण-गान ।
सानुकूल सर्वां असती; संतत कृपानिधान ॥ ३० ॥

जेव्हां प्रभु-प्रताप; खगेश ! । उदित होई-अति बली दिनेश ।
पूर्ण प्रकाश; होति त्रैलोक । बहुतां सुख; बहुतां मनिं शोक ॥ १ ॥
जयां शोक तीं; सांगूं पहिलीं । प्रथम अविद्या; निशा नासली ।
जथ तेथ अघ;-उलूक लपले । क्रोध काम हे; कुमुद लाजले ॥ २ ॥

---

२ भव भीति भंजन करणाराला.

विविध कर्म गुण; काल स्वभाव । चकोरांसि या; नहि सुख-ठाव ।
मत्सर मान; मोह मद चोर । यांचे हुन्नर; कुठें न, घोर ॥ ३ ॥
धर्म-तडागिं; ज्ञान विज्ञान । विविध पंकजें; विकसित जाण ।
सुख, संतोष; विराग, विवेक-।-चक्रवाक; गत;-शोक, अनेक ॥ ४ ॥

दो०— हा प्रताप-रवि मानसीं; ज्यांच्या करी प्रकाश ।
मागिल वाढति, प्रथम जे, कथित पावती नाश ॥ ३१ ॥

इति श्री उत्तरकांडे; अयोध्यावर्णनादि श्रीराम-प्रताप रवि-
वर्णनं नाम चतुर्थोऽध्यायः ॥

अध्याय ५ वा

एकवार बार, बंधूसह रघुवर । सहित पवनसुत; जो अति प्रियतर ।
सुंदर उपवन; बघण्या गेले । तरु, नवपल्लव;-कुसुमित दिसले ॥ १ ॥
बघुनि समय; सनकादिक आले । तेजपुंज गुण;-शील-भूषले ।
ब्रह्मानंदिं; सदा लयलीन । दिसती बालक; बहु-काली न ॥ २ ॥
शरीर-धर जणुं; चार हि वेद । समदर्शी मुनि; विगत-विभेद ।
आशा[१] वसन; व्यसन हें धरिती । राम-कथा ज्या; होति ऐकती ॥ ३ ॥
होते हे, सनकादि भवानी ! । घट-संभव-मुनि; जेथें ज्ञानी ।
राम-कथा बहु; मुनिवर वर्णी । ज्ञान-योनि जणुं; अनला अरणी ॥ ४ ॥

दो०— राम, बघुनि येतात मुनी; करिती मुदें प्रणाम ।
स्वागत करुनी पीत-पट; बसण्या देती राम ॥ ३२ ॥

करिति दंडवत; तीनहि बंधू । सहित पवन सुत; मोद अगाधू ।
मुनि रघुपति-छवि; अतुल पाहती । मग्न होति, मन; रोखुं न शकती ॥ १ ॥
श्यामल गात्र;-सरो-रुह-लोचन । सुंदरता-मंदिर भव-मोचन ।
स्थिर, बघती, न; निमेषहि हलती । प्रभु कर जोडुनि; मौलि[२] नमविती ॥२॥
त्यांची दशा; बघुनि रघुवीर । सजल नयन; अति पुलक शरीर ।
कर धरुनी मुनि;वरां बसविले । परम मनोहर; वचन बोलले ॥ ३ ॥
धन्य आज मी; धन्य मुनीश । तुम्हां-दर्शनें, कृत अघनाश ।
बहुभाग्यें, लाभे सत्संग । विना प्रयास; होइ भवभंग ॥ ४ ॥

---

१ दिशा; २ मस्तक.

दो०— संत-संग अपवर्ग-कर; कामी संसृति-पंथ ।
वदति संत कवि कोविद; श्रुति पुराण सद्ग्रंथ ॥ ३३ ॥

ऐकुनि वचन; मुदित मुनिचारी । पुलकित तनु; करिती स्तुति भारी ।
जय भगवंत; अनंत अनामय । अनघ अनेक; एक करुणामय ॥ १ ॥
जय निर्गुण; जय जय गुणसागर । सुख-मंदिर; सुंदर अति नागर ।
जय इंदिरा-रमण जय भूधर । अनादि, अनुपम; अज शोभाकर ॥२॥
अमान, मानद; ज्ञान निधान । श्रुति-पुराण, यश; गाती पावन ।
तज्ञ, कृतज्ञ; अज्ञता-भंजन । नाम अनेक; अनाम निरंजन ॥ ३ ॥
सर्व सर्वगत; सर्व हृदालय-। -वससि; सदा; आम्हां प्रतिपालय ।
द्वंद्व-विपद,--भव, फंद विभंजय । हृदयिं वसुनि; मद-कामां गंजय ॥ ४ ॥

दो०— परमानंद कृपायतन; मन-परिपूरित काम ।
प्रेमभक्ति अनपायिनी: द्या आम्हां श्री राम ॥ ३४ ॥

द्यावि भक्ति; रघुपति अति पावनि । त्रिविध ताप, भव-दैन्य विनाशनि ।
प्रणतकाम, सुर-धेनु, कल्पतरु । प्रसन्न होउनि: द्या प्रभु हा वरु ॥ १ ॥
भववारिधि,-कुंभज रघुनायक । सेवा-सुलभ; सकल सुखदायक ।
मने[1]-संभव; दारुण दुख वारय । दीनबंधु; समता विस्तारय ॥ २ ॥
आस, त्रास; ईर्षादि निवारक । विनय विवेक, विरति विस्तारक ।
भूपमौलिमणि; मंडन धरणी । देइ भक्ति संसृति-सरि-तरणी ॥ ३ ॥
मुनि-मन-मानस-हंस: निरंतर ।-चरण कमल,--वंदिति अज शंकर ।
रघु-कुल-केतु; सेतु श्रुति रक्षक । काल, स्वभाव; कर्म, गुण-भक्षक ॥४॥
तारक तीर्ण; हरण सब दूषण । तुलसिदास प्रभु; त्रिभुवन-भूषण ॥५॥

दो०— स्तुती करुनि, बहुवार शिरा; सप्रेमें नमवून ।
ब्रह्मभुवनिं सनकादि, वर; इष्ट जाति पावून ॥ ३ ॥

सनकादिक विधि;-सदना गेले । बंधूनीं प्रभु;-पदिं शिर नमिलें ।
प्रभुला पुसण्या; सब संकोचति । सकलहि मारुत;-सुत-मुख पाहति ।१।
ऐकुं इच्छिती; प्रभु-मुख-वाणी । होइ; सकल जेणें भ्रम-हानी ।
अन्तर्यामी; प्रभु सर्वज्ञ । म्हणती, काय; सांग हनुमान ॥ २ ॥
कर जोडुनि म्हणती; हनुमंत । दीन दयाळ; ऐक भगवंत ! ।
भरत कांहिं प्रभु; पुसूं इच्छिती । विचारण्या परि; मनिं संकुचती ॥ ३ ॥

---

१ मदन, वासना.

कपे! जाणतां; स्वभाव अमुचा । भरतासी मज; भेद न साचा ।
ऐकुनि वचन: भरत धीर चरणां । ऐका प्रभु; प्रणतार्ती-हरणा ॥ ४ ॥

दो०— नाथ नसे संदेह मज: स्वप्निंहि शोक न मोह ।
केवळ अपुल्या कृपे प्रभू; कृपानंद-संदोह ! ॥ ३६ ॥

करूं कृपानिधि; एक धृष्टता । सेवक मी, प्रभु; जन सुखदाता ।
संताचा; महिमा रघुनाथा । वेद पुराण; गाति बहु गाथा ॥ १ ॥
स्वमुखें करितां; बहुत बढाई । त्यांवर प्रभू;-प्रीति अति होई ।
ऐकुं इच्छितों; त्यांचें लक्षण । कृपासिंधु ! गुण;-ज्ञान-विचक्षण ! ॥२॥
संतासंत-भेद निवडून । प्रणतपाल; करितील निरूपण ।
संतलक्षणें; ऐका तात । अगणित, निगमागम-विख्यात ॥ ३ ॥
संत-असंतां,ची अशि करणी । जशि कुठार,[1] चंदन आचरणीं ।
तोडी मलय; परशु बघ भाई । सुगंध देउनि; निजगुण देई ॥ ४ ॥

दो०— यास्तव सुर-मस्तकीं चढे. जगवल्लभ श्रीखंड ।
अनल दाह घण-घाव मुखीं: परशूला हा दंड ॥ ३७ ॥

विषयिं अलंपट; शील-गुणाकर । दुःखें दुःखी; सुखी सुखें पर ।
अभूत-रिपु, सम विमद विरागी । लोभामर्ष,-हर्ष-भय-त्यागी ॥ १ ॥
दीन-दयाकर; कोमल-चित्त । तन-मन-वचनें; मम ऋजु भक्त ।
मानद अन्यां, स्वयें अमानी । भरत ! प्राणसम; मम ते प्राणी ॥ २ ॥
विगत-काम, मम; नाम-परायण । शांति;-विरति;-विनती;-मुदितायन ।
शीतलता; सरलता; सुमैत्री । द्विजपदिं प्रीति; धर्म-जनयित्री ॥ ३ ॥
सर्व लक्षणें; वसती ज्यासी । जाणा खरा; संत मग त्यासी ।
शम दम सुयम; नीति ना सोडिति । परुष वचन जे; कधीं न बोलति ॥ ४ ॥

दो०— स्तुति निंदा ज्यां उभय सम; ममता मम-पद-कंज ।
सज्जन मम ते प्राण-प्रिय; गुण-मंदिर सुख-पुंज ॥ ३८ ॥

ऐक असज्जन-सहज-स्वभाव । चुकूनि संग न; करिजे राव ! ।
त्यांचा संग; सदा दुखदाई । जशि कपिलेसी; खडाण गाई ॥ १ ॥
खळ-हृदयीं अति; ताप विशेषें । जळति सदा; पर, संपद्-द्वेषें ।
जे परनिंदा; कानिं ऐकती । हर्षति जणुं निधि; गृहास येती ॥ २ ॥
क्रोध-काम-मद-लोभ-परायण । निर्दय कपटी; कुटिल मलायन ।
वैर अकारण; सर्व जनांशीं । जो करि हित वा; अनहित त्यासी ॥३॥
असत्य देणें; असत्य घेणें । असत्य भोजन; असत्य खाणें ।
बोलति मधुर; वचन जणुं मोर । खाति महा अहि; हृदयिं कठोर ॥ ४ ॥

---

१ चंदन.

दो०— पर-द्रोही परदार-रत;, परधन पर-अपवाद ।
ते नर पामर पापमय; धृत-शरीर मनुजाद ॥ ३९ ॥

लोभावरण; लोभ शयनासन । शिश्नोदर-पर; यमपुर-भीति न ।
जरि; कोणाची महती कळली । श्वास घेति जणुं; थंडी भरली ॥ १ ॥
यदा कुणाची, बघति विपत्ती । सुखी होति जणुं; विश्व-भूपति ।
स्वार्थी रत परिवार-विरोधी । काम, लोभ अति; लंपट क्रोधी ॥ २ ॥
माय बाप गुरु; विप्र न मानिति । आपण पडुनी; दुजांसि पाडिति ।
करिति मोहवश; द्रोह परावा । राम-कथा; सत्संग न ठावा ॥ ३ ॥

दो०-- ऐसे अधम मनुज खल; त्रेता--कृत--युगिं नाहिं ।
द्वापरिं थोडे; होति बहु; वृंदचि कलि युगिं पाहिं ॥ ४० ॥

परहित सरिस; धर्म जगिं नाहीं । पर-पीडे-सम अधम न कांहीं ।
निर्णय सकल; पुराणिं-वेदिं वर ।-वदलों; जाणति, कवि कोविद नर ॥१॥
परपीडा करिती; नर-देहीं । महाभवभया; पावति तेही ।
करिति मोहवश; नर अघ नाना । स्वार्थ-निरत; पर;-लोक न त्यांनां ॥२॥
कालरूप मी; त्यांनां ताता । शुभ वा अशुभ; कर्मफल-दाता ।
अशा विचारें; परम शहाणे । भजती मज; भवदुःखज्ञानें ॥ ३ ॥
त्यागिति कर्म; शुभा शुभ-दायक । भजती मज सुर-नर-मुनिनायक ।
संत असंत, लक्षणें कथिलीं । ते न पडति भविं; ज्यां मनिं भरलीं ॥४॥

दो०— ऐक तात मायाकृत; गुण अणि दोष अनेक ।
गुण हा उभय न पाहणें; बघणें तो अविवेक ॥ ४१ ॥

श्रीमुख-वच सब; ऐकुनि भ्राते । हर्षति; हृदयिं, न प्रेम मावतें ।
स्तुती करिति, अति; वारंवार । हनूमंत-मनिं; हर्ष अपार ॥ १ ॥
मग रघुपति निज; मंदिरिं आले । ऐसें चरित; नित्य नव झालें ।
नारद-मुनि बहु-वारचि येती । राम चरित अति; पावन गाती ॥ २ ॥
चरित नित्य नव; बघुनी जाती । ब्रह्म लोकिं तीं; सब वदताती ।
परिसुनि विधि, अति; सौख्य मानिती । 'करिं गुण-गान; पुन्हां' मग म्हणती ॥३॥
सनकादिक; नारदा वानिती । ब्रह्मनिरत मुनि यद्यापि असती ।
ऐकुनि गुण; त्यजिती सुख भारी । करिती श्रवण; परम अधिकारी ॥ ४ ॥

दो०-- जीवन्मुक्तहि ब्रह्मपर; ऐकति, त्यजुनी ध्यान ।
जे न हरि-कथे धरिति रती; तें हृदयें पाषाण ॥ ४२ ॥

बोलावुनि; एकदा आणिले । द्विज-गुरु-पुर-वासी सब आले ।
बसले गुरु, मुनि; द्विज अणि सज्जन । वदले वचन; भक्तभव-भंजन ॥ १ ॥

ऐका सब पुजन मम वाणी । वदूं न ममता; मनिं आणोनी ।
नहिं अनीति; नहिं; कांहीं प्रभुता । ऐका, करा, रुचे जरि चित्ता ॥ २ ॥
सेवक मम; तो प्रिय,-तम तोही । मम अनुशासन; मानी जोही ।
अनीति मी जरि; कांहिं वदेन । वर्जावें मज; भय सोडून ॥ ३ ॥
मानव वपु बहु; भाग्यें मिळते । सुरदुर्लभ; सद्ग्रंथ गाति ते ।
साधन-धाम; मुक्तिचें द्वार । मिळुनि साधिती; जे न लोक पर ॥४॥

दो०— ते परत्र दुख पावती; शिर पिटुनी रडतात ।
काळ-कर्म-ईश्वरा मग; वृथा दोष देतात ॥ ४३ ॥

नर-तनुचें फळ; विषय न भाई । स्वर्गहि अल्प; अंतिं दुखदाई ।
नरतनु मिळुनि; विषयिं मन देती । सुधा-सोडिं ते; शठ विष घेती ॥ १ ॥
तया भला; म्हणती ना कोणी । गुंजा घेइ; मणी सांडोनी ।
खाणी चार; लक्ष चौऱ्यासी । भ्रमे योनि हा; जिव, अविनाशी ॥ २ ॥
सदा फिरे; मायेनें प्रेरित । काल-कर्म-गुण-स्वभाव-घेरित ।
कधि करुणा, करुनी नर-देहीं । धाडि ईश; निर्हेतुक स्नेही ॥ ३ ॥
नर-तनु भव-वारिधिची नौका । सन्मुख मरुत; कृपा मम ऐका ।
सद्गुरु, कर्णधार दृढ-नावे । दुर्लभ-लाभ; सुलभ जरि पावे-॥ ४ ॥

दो०— जो न तरे भवसागरा; नर, मिळतां हें खास ।
पावे कृतघ्न मंदमती; गति जी आतमघ्नास ॥ ४४ ॥

इहपरलोकिं; सौख्य जरि व्हावें । वचन हृदयिं मम; सुदृढ धरावें ।
सुलभ सुखद हा; सुमार्ग भाई । मम भक्ती श्रुति, पुराण गाई ॥ १ ॥
ज्ञान अगम बहु; विघ्नें ऐका । साधन कठिन, न; मनासि टेका ।
बहु कष्टें तें; मिळतें कोणा । भक्ति-हीन मज, अप्रिय जाणा ॥ २ ॥
भक्ति स्वतंत्र; सकल-गुण-खाणी । विण सत्संग न; पावे प्राणी ।
पुण्य पुंज-विण, मिळति न संत । संतसंगें, संसृतिचा अंत ॥ ३ ॥
पुण्य एक जगिं; अन्य न; समजा । तनु-मन-वचें; विप्रपद-पूजा ।
देव तयांना प्रसन्न होती । निष्कपटें जे; द्विजां सविती ॥ ४ ॥

दो०— अणिक एकहि गुप्त मत; सांगूं जोडुनि हात ।
शिव-भजनाविण भक्ति मम; कुणा नये हातांत ॥ ४५ ॥

वदा भक्तिपथिं; कुठें प्रयास । योग न मख जप; तप उपवास ।
स्वभाव सरल, न; मनीं कुटिलता । मिळेल त्यानें; स्वस्थ-चित्तता ॥ १ ॥
दास म्हणुनि मम; धरि नर-आस;। कोठें सांगा; मग विश्वास? ।

---

१ अमृताच्या मोबदल्यांत. २ माझा, अमुचा. ३ आधार. ४ ज्ञान.

बहुत कशाला, हवें बोलणें । आचरणें या; मज वश करणें-॥ २ ॥
बैरन विग्रह; भीति न आशा । सुखमय तया; सदा सब आशा ।
अनारंभ, अनिकेत अमानी । अनघ अरोष; दक्ष विज्ञानी ॥ ३ ॥
प्रीति सदा; सज्जन-संसर्गी । तृण सम विषयिं, नाकिं, अपवर्गी ।
भक्ति पक्षिं हठ; तरी न शठता । दुष्ट तर्क सब; दूर सारतां ॥ ४ ॥

दो०— मम गुण-गानीं नामिं रतः गत-ममता-मद-मोह ।
त्यांचें सुख ते जाणती; परानंद संदोह ॥ ४६ ॥

ऐकुनि सुधा,-वचन; रामाचें, । धरिती चरण; कृपा-धामाचे
जननि जनक गुरु, बंधु आमुचे । प्राणाहुनि प्रिय; कृपाब्धि साचे ॥ १ ॥
तनु-धन-धाम, राम ! हितकारी । सकल तुम्हीं; प्रणतार्ती-हारी ।
असें शिकविता; कोणि नसे ही । माता पिता; स्वार्थरत तेही ॥ २ ॥
हेतु-रहित, जगिं; युगं उपकारी । तुम्हि, तुमचे; सेवक असुरारी ।
स्वार्थी मित्र; सकल जगिं असती । स्वप्नीं प्रभु ! परमार्थी नसती ॥ ३ ॥
जनता-वचन; प्रेम-रस-भरलें । ऐकुनिया प्रभु; मनीं हर्षले ।
आज्ञा घेउनि; जाति घरोघर । प्रभु-भाषण वर्णित अति सुंदर ॥ ४ ॥

दो०— उमे ! अयोध्या-वासि नर; नारी कृतार्थ रूप ।
ब्रह्म सच्चिदानंद-घन; रघुवर जेथें भूप ॥ ४७ ॥

इति श्री उत्तर काण्डे; सनकादीनामागमनादि-राम गीता
वर्णनं नाम पञ्चमोऽध्यायः ॥

अध्याय ६ वा

एकवार मुनि: वसिष्ठ आले । जिथें राम सुखधाम बैसले ।
अति आदर, रघुनायक देती । पाद धुउनि पादोदक घेती ॥ १ ॥
मुनि कर जोडुनि, एका म्हणती । राम ! कृपानिधि; अल्प विनंती ।
पाहुनि अपुलें; चरित उदार । मोह होइ मम; मनीं अपार ॥ २ ॥
महिमा अमित, न, वेदां ज्ञान । कसा वदूं मी तरि भगवान ! ।
पुरोहिताचा; गर्हित धंदा । श्रुति स्मृती करि, पुराण, निंदा ॥३॥
यदा न घेउं, वदे विधि मजला । पुढें लाभ; आहे सुत तुजला ।
परमात्मा; ब्रह्मचि नररूप । होतिल रघु-कुल--भूषण भूप ॥ ४ ॥

---

१ दिशा. २ सकाम कर्मे न करणारा ३ निधि, सार, ४ दोन.

दो०— केला हृदयिं विचार तदा; योग यज्ञ व्रत दान।
ज्यास्तव करणें प्राप्त तो; धर्म न या सम आन ॥ ४८ ॥

जपतप नियम, योग निज धर्म । श्रुति संभव, नाना शुभ कर्म ।
ज्ञान दया दम; तीर्थी मज्जन । धर्म; वदति जितके श्रुति सज्जन ॥ १ ॥
आगम, निगम, पुराण अनेक-। श्रवण-पठण-फळ; तो प्रभु एक ।
तव-पद पद्मीं; प्रीति निरंतर । सर्व साधनां; हें फळ सुंदर ॥ २ ॥
मळें धुउनि कधिं; मळ न नाशतो । वारि मथुनि कधिं; घृत न पावतो
प्रेमभक्ति जळाविण रघुवर ! तो ।-अभ्यंतर मळ कधीं न हरतो ॥ ३ ॥
तो सर्वज्ञ; तज्ञ तो पंडित । तो गुणगृह विज्ञानि अखंडित ।
दक्ष सकल-लक्षण-युत नर तो । हरिपद-कमळीं; जो रति धरतो ॥ ४ ॥

दो०— नाथ एक वर मागतो; कृपा करुनि द्या राम।
जन्म जन्म तव पदीं रती; घटो न कधिं निष्काम ॥ ४९ ॥

वसिष्ठ मुनि; विनवुनि घरि आले । कृपासिंधुला; प्रिय ते झाले ।
हनुमान, भरतादी भ्राते । घेउनि सहित; दास-सुखदाते[1] ॥१॥
बहिर्नगर मग; कृपालु गेले । मागविते, गज; हय रथ झाले ।
बघुनि कृपेनें; सर्व वानिले । ज्यां जें इच्छित; तें त्यां दिधलें ॥ २ ॥
भवश्रम-हर;-हरिला श्रम झाले । शीतल आम्रवनीं मग आले ।
पसरी वसन; भरत निज हातें । बसले प्रभु, मग; सेविति भ्राते ॥ ३ ॥
मारुत सुत मग; मारुत घाली । सजल नयन, तनु; पुलकित झाली ।
हनूमान सम; नसे सुभागी । नहि कुणि, राम,-चरण अनुरागी ॥४॥
गिरिजे ज्याची सेवा प्रीती । स्वमुखें; राम कितीदां गाती ॥ ५ ॥

दो०— त्या समयीं मुनि नारद; आले करतळिं बीन।
गाउं लागले रामयशा; निर्मळ नित्य नवीन ॥ ५० ॥

मामवलोकय; पंकजलोचन । कृपादृष्टिनें शोक-विमोचन ।
नील-तामरस[2];-शाम: काम-अरि-।-हृदय-कंज[3]-मकरंद-मधुप हरि ॥ १ ॥
यातुधान-वरूथ बलभंजन । मुनि-सज्जन,-रंजन, अघगंजन ।
विप्र-शालि[4]; नव-वृंद बलाहक[5] । अशरण-शरण; दीन-जन-रक्षक॥ २ ॥
भुजबल, विपुल,-भार, महि खंडित। खर-दूषण;-विराध-वध-पंडित ।
रावणारि, सुखरूप भूपवर । जय दशरथकुल;-कुमुद-सुधाकर॥३॥
सुयश पुराणिं; विदित निगमागमिं । गाती सुर-मुनि-संत समागमिं ।
करुणा मया; ! वृथा-मद-खंडन । सर्व कुशल; कोशलपुर-मंडन ॥ ४ ॥

---

१ दासाना सुखदेणारे-राम. २ तारा. ३ कमळ, ४ ब्राह्मणरूपी साळीला ५मेघ.

कलिमल मथंन;-नाम ममता-हन । तुलसिदास-प्रभु; ! पाहि प्रणतजन॥५॥
दो०—प्रेमें अति मुनि नारद; वर्णुनि प्रभुगुण-ग्राम ।
शोभाकर, हृदयीं धरुनी; जाति जिथें विधिधाम ॥ ५१ ॥
ऐक पार्वती ! विमल ही कथा-। सर्वहि वदलों; मती मम यथा ।
रामचरित, शत;-कोटि अपार । वेद-शारदे; न लगे पार ॥ १ ॥
राम अनंत; अमित-गुण-खाणी । कर्म अनंत; जन्म नामांनी ।
जलसीकर; महि-रज जरि गणती । राम चरित; वर्णन ना सरती ॥ २ ॥
विमल-कथा, हरि;-पदाब्ज-दायिनि । श्रवणें लाभ; भक्ति अनपायिनि ।
उमे कथा श्यां; सकल गाइली । जी गरुडासि; भुसुंडे वर्णिलि ॥ ३ ॥
अल्प राम-गुण; वर्णन केले । आतां काय, सांगु वद महिले ।
कथा ऐकुनी उमा हर्षली । अति मृदु विनीत; वाणी वदली ॥४॥
धन्य धन्य मी; धन्य पुरारी । श्रुत; रघुवर-गुण; भव-भय-हारी ॥५॥
दो०— तुमच्या कृपें कृपायतना, अतां कृतार्थ; न मोह ।
जाणुनि राम प्रताप, प्रभा; चिदानंद संदोह ॥ ५२ (क) ॥
,, नाथ तवानन-शशी स्रवे; कथा सुधा, रघुवीर ।
पान करुनि मन कर्ण पुटें; तृप्त नसे मतिधीर ॥ ५२ (ख)
राम चरित ऐकुनि जे धाती । त्यां नकळे रस; विशेष-जाती ।
जीवन्मुक्त; महामुनि जेही । नित्य ऐकती; हरिगुण तेही ॥ १ ॥
भवनिधिपार; जाउं जो पाहे । रामकथा दृढ; नौका त्या हे ।
विषयिजनां तरि; हरिगुण-सागर । श्रवण-सुखद, अति; मनाल्हादकर ॥२॥
श्रवण-वंत जगिं, कोण असाही । रघुपति-चरित; जया प्रिय नाहीं ।
जड पामर ते; आत्म-घातकी । राम-कथा ज्यां; प्रिय न होत कीं ॥३॥
रामचरित;-मानस मज कथिलें । श्रवणें मी सुख; अमित पावलें ।
म्हणतां कीं हें; शुभ अति पावन । भुसुंडि करि; गरुडासी गायन ४ ॥
दो०— ज्ञान, विरति, विज्ञान दृढ; रामपदीं सुस्नेह ।
वायस-तनुं; रघपति भक्ती ! ; मला परम संदेह ॥ ५३ ॥
मनुज-सहस्रीं; एक पुरारी । कोणी धर्मशील जो भारी ।
धर्मशील, कोटींमधि कोणी । विषय-विमुख; रत, विराग प्राणी ॥१॥
कोटि विरक्तीं; श्रुति वदताहे । सम्यग् ज्ञान; कोणि नर पाहे ।
ज्ञानवंत, कोटींत आगळा । जीवन्मुक्त, एक जगिं विरळा ॥२॥

---

१ ज्यांचें नाम कलिमल विनाशक आहे असे. २ नामें. ३ जलबिंदु.

सहस्रांत त्या; सब-सुख-खाणी । ब्रह्मलीन दुर्लभ विज्ञानी ।
धर्मशील, अणि; विरक्त ज्ञानी । जीवन्मुक्त; ब्रह्मपर प्राणी ॥ ३ ॥
तयांत तो दुर्लभ सुरराया ! । रामभक्ति-रत; गत मद् माया ।
ती हरिभक्ति; काक कशि पावे । विश्व नाथ हें; मज सांगावें ॥ ४ ॥

दो०— राम-परायण ज्ञान-रत; गुणागार मति धीर ।
नाथ वदा कारण कवण; पावे काक शरीर ॥ ५४ ॥

राम चरित शुभ; रम्य स्वभावें । वदा कृपालु;! काक कें; पावे ।
प्राप्त कसें; अपणां मदनारी । सांगा मज; कौतूहल भारी ॥ १ ॥
गरुड महा-ज्ञानी, गुण-राशी । हरि-सेवक अति; निकट-निवासी ।
काय म्हणुनि तो; काकापाशीं । सोडुनि बहु मुनि; करि श्रवणासी ॥२॥
वदा केविं; झाला संवाद । युग हरिभक्त काक उरगाद ।
गौरि-गिरा; अति; सरल मनोहर । ऐकुनि वदति, मुदित शिव सादर ॥३॥
धन्य सती; मति; पावन वाड । रघुपति पदीं; प्रीति अति जाड ।
ऐक परम, पावन इतिहास । श्रवणें सकल, शोक-भ्रम-नाश ॥ ४ ॥
उपजे राम,-चरणिं विश्वास । नर तरती भव; विना प्रयास ॥ ५ ॥

दो०— प्रश्न असाचि विहंगपती, करि काका जाऊन ।
सांगु सकल तें सादर; ऐक चित्त लावून ॥ ५५ ॥

इति श्री उत्तर-कांडे श्रीराम वसिष्ठ संवादादि-शिव-पार्वती
संवादो नाम षष्ठोऽध्यायः ॥

अध्याय ७ वा

मी ऐकिली; कथा भवमोचनि । सुयोग तो श्रुणु; सुमुखि सुलोचनि ।
प्रथम दक्ष-गृहिं; तव अवतार । सती नाम तें; तुझें उदार ॥ १ ॥
दक्षमखीं; झाला अपमान । तंव अति कोपें; त्यजिले प्राण ।
मम अनुचर; करिती मखभंग । विदित सकल तो; तुला प्रसंग ॥ २ ॥
तैं अति शोक; होई मनिं माझें । प्रिये दुःख अति विरहें तूझें ।
सुंदर गिरि,-वन;-सरित तडागें-। निरखित निर्मळ; फिरूं विरागें ॥ ३ ॥
गिरि सुमेरु; दिशिं; उत्तर दूरीं । नील शैल त्या; सुंदर भूरी ।
हिरण्मयीं बहु; सुंदर शिखरीं-। मम मनिं रुचलीं; सुचारु चारी ॥ ४ ॥

---

१ गरुड. २ फार,

एकैकावरि; विटप विशाल । वट पिप्पल; पिंपरी रसाल ।
शैलावरि सर; सुंदर शोभे । मणिसोपान, बघुनि मन लोभे ॥ ५॥
दो०— शीतल निर्मळ मधुर जळ; जलज विपुल बहुरंग।
कूजति कलरव हंसगण; गुंजति मंजुल भृंग ॥ ५६ ॥
रुचिर गिरीवरी खग त्या वसतो । तया नाश कल्पांतिं न होतो ।
मायाकृत गुण;-दोष अनेक । मोह मनोज; आदि अविवेक ॥ १ ॥
समस्त जग; व्यापुनि वसताती । त्या गिरिसंनिध; कधीं न जाती ।
वसुनि तिथें हरि; भजतो काग । तें श्रुणु उमे, सहित अनुराग ॥ २ ॥
पिप्पल तळिं तो; ध्याना वसतो । जपयज्ञा; पिंपरि-तळिं करितो ।
रसाल-छाये; मानस पूजा । भजनाविण; व्यवसाय न दूजा ॥ ३ ॥
वट-तळिं करि; हरिकथा सुरंग । श्रवणा येति अनेक विहंग ।
रामचरित विधि, विचित्र नाना । प्रेम सहित करि; सादर गाना ॥४॥
ऐकति सब मति;-विमल मराल । वास करिति जे; सरीं विशाल ।
जें दिसलें तें; कौतुक जातां । अत्यानंदचि; उपजे चित्ता ॥ ५ ॥
दो०— कांहिं काळ मी हंस-तनू; धरुनी तत्र निवासि।
सादर ऐकुनि राम-गणां; मग आलो कैलासि ॥ ५७ ॥
गिरिजे वदलो; त्या इतिहासा । खगाकडे मी; गेलो कैसा ।
ऐक कथा; जो धरुनी हेतू । काका निकट; जाइ खगकेतू ॥ १ ॥
जैं रघुनाथ; करिति रण-क्रीडा । स्मरतां चरित; गमे मज व्रीडा ।
मेघनाद-करिं; स्वयें बांधिले । खगपतिला; नारदें धाडिलें ॥ २ ॥
खाउनि भुजग; जाइ उरगाद । उपजे चित्तीं; परम विषाद ।
प्रभु-बंधन; आठवि बहु रीतीं- । करी विचार; उरग-आराती ॥ ३ ॥
व्यापक, ब्रह्म, विरज वागीश्वर । मायामोह; पार, परमेश्वर- ।
म्हणती अवतरला जगिं पाहीं । बघतां तरि तो प्रभाव नाहीं ॥ ४ ॥
दो०— भवबंधांतुनि सुटति नर, जपतां ज्याचें नाम।
तुच्छ निशाचर बांधितो; नागपाशिं तो राम ! ॥
नाना परी; मना समजावी । ज्ञान न होइ; चित्त भ्रम भावी ।
खेद-खिन्न मन; करी कुतर्का । होइ मोहवश; तुझ्यासारखा ॥ १ ॥
व्याकुळ जाइ, नारदापासी । वद सकलजे, किंतु मनासी ।
ऐकुनि येइ दया मुनिराया । पहा प्रबल बहु प्रभुची माया ॥ २ ॥
ज्ञानी-चित्ता; जी अपहरते । बळेंचि जी, मन; मोहित करते ।

१ खगश्रेष्ठ-गरुड, २ लाज, ३ शंकर पार्वतीला म्हणतात, ४ संशय.

जी बहुवार; नाचवी मजला । खगपति गा ! ती; व्यापी तुजला ॥३॥
महा मोह मनिं; झाला तूझे । तो निरसेना; वचनें माझें ।
विधिसंनिध तूं; जाइ खगेशा । मग करि जैसें; देति निदेशा ॥ ४ ॥

दो०-- सांगुनि गेले देवऋषी, करित रामगुण-गान ।
हरिमाया-बल वर्णित; विविधा, परम सुजाण ॥ ५९ ॥

विधीकडे मग; खगपति गेले। निज संदेह; सांगते झाले ।
ऐकुनि शिर; रामाला नमिलें । बघुनि प्रताप; प्रेम अति भरलें ॥ १ ॥
करितो मनीं; विचार विधाता। मायावश कवि; कोविद ज्ञाता ।
हरि-मायेचा; प्रभाव फार । मलाहि नाचवि; जी बहु वार ॥ २ ॥
अग-जग-मय जग; ममकृत सगळें । नहि विस्मयः खगराज मोहले ।
मग वदले विधि; रम्य गिरेला । जाणति शंभु, प्रभू-प्रभुतेला ॥ ३ ॥
वैनतेय ! शिव,-संनिध जावें । अन्य कुणा न च; तात पुसावें ।
तिथें होइ तव; संशय-हानी । निघे विहग; ऐकुनि विधि वाणी ॥४॥

दो०-- परमातुर तो विहग-पती; येइ मजकडे खास ।
होतो जात कुबेर-गृहीं; तुम्हि बसला कैलास ॥ ६० ॥

ममपदिं सादर; नमुनि शिराला । निज संदेह; सर्व तो वदला ।
ऐकुनि त्याचि; विनति मृदुवाणी । प्रेमें वदलो; तदा भवानी[1] ॥ १ ॥
तुम्हीं मला; मार्गात भेटलां । कैसें मी; समजावुं तुम्हांला ।
जैं बहुकाळ, होय सत्संग । होय तदा सब; संशय-भंग ॥ २ ॥
तिथें श्रवण हरि-कथा उदार । नानाविध, मुनि-वर्णित फार ।
ज्यां मधिं, आदि-मध्य-अवसान । प्रभु प्रतिपाद्य; राम भगवान ॥ ३ ॥
सदा हरिकथा; जेथें भाई । धाडुं श्रवण; करी तूं जाई ।
श्रवणें जाइ; सकल संदेह । रामचरणिं; बहु उपजे स्नेह ॥ ४ ॥

दो०-- विण सत्संग न हरिकथा; त्याविण मोह न नाश ।
मोह असे, तों रामपदीं; प्रेम न दृढ अविनाश ॥ ६१ ॥

रघुपति-लाभ न, विण अनुरागा । करुनि योग तप; ज्ञान विरागा ।
उत्तरेसि गिरि; सुंदर नील । काक भुशुंडी; वसे सुशील ॥ १ ॥
रामभक्ति-पथिं महा प्रवीण । ज्ञानी, गुणगृह; बहु-कालीन ।
रामकथा तो, करी निरंतर । सादर ऐकति; विहंग सुंदर ॥ २ ॥
जाउनि ऐका; हरिगुण भूरी । मोह;-जनित भय होइल दूरी ।
यदा सकल मीं; वृत्त वर्णिलें । शिर पदिं नमुनी; हर्षित गेले ॥ ३ ॥

---

१ पार्वती.

उमे अम्हीं त्या; न हि समजावूं । रघुपति कृपें; मर्म सब पावूं ।
असेल केला; कधिं अभिमान । हरूं बघति तो; कृपानिधान ॥ ४ ॥
विशेष आम्हीं; ठेवुं न त्यासी । खगचि जाणती; खग-भाषेसी ।
प्रभुमाया; बलवंत भवानी । जया न मोहि; कवण तो ज्ञानी ॥ ५ ॥
दो०— ज्ञानी भक्त शिरोमणी; त्रिभुवन पतिचें यान ।
त्यासि मोहि माया, नर-पामर करिति[1] गुमान ॥ ६२ (क) ॥
इति श्री उत्तरकांडे; काकभुशुंडि-वर्णनादि-शिवपार्वती संवादे
गरुडमोहो नाम सप्तमोऽध्यायः
मास पारायणेऽष्टाविंशो विश्रामः

अध्याय ८ वा

दो०— शिव विरंचिनां मोहितें: कोण बापुडा आन ।
हें जाणुनि मनिं भजति मुनी; माया-पति भगवान ॥ ६२ (ख) ॥
जाइ गरुड मग; निकट भुशुंडा । मति अकुंठ; हरि भक्ति अकुंठा ।
बघुनि शैल मन; प्रसन्न झालें । माया मोह; शोक सब गेले ॥ १ ॥
करुनि जलाशयिं; मज्जन, पानां । वट-तळिं जाइ; मुदित-मन जाणां ।
वृद्ध वृद्ध बहु; जमले खगवर । श्रवण करिति हरि,-चरित्र सुंदर ॥२॥
कथारंभ ते; करूं पाहती । ठाकलेचि त्या; समयिं खगपती ।
येतां बघुनि; सकल-खग-राजा । हर्षे वायस; सहित समाजा ॥ ३ ॥
खगपतिचा अति: आदर केला । दिलें सुआसन; पुसूनि कुशाला ।
पूजा करूनि; सहित अनुराग । मधुर बचन मग; बोले काग ॥ ४ ॥
दो०— कृतार्थ झालो आज प्रभू; तव दर्शनि खगराज ।
आज्ञा व्हावि करीन तरी; कां येणें प्रभु आज ॥ ६३ (क) ॥
सदा कृतार्थ-स्वरूप तुम्हीं; मृदु वदले विहगेश ।
स्तुती जयांची सादर; स्वमुखें करिति महेश ॥ ६३ (ख) ॥
बघा तात ! ज्या कारण आलों । झालें दर्शन; सर्व पावलों ।
बघुनि परम तव; पावन आश्रम । विगत मोह संशय नाना भ्रम ॥ १ ॥
आतां रामकथा अति पावनि । सदा सुखद, दुख,-पुंज विनाशनि ।
सादर ताता ! सांगा मजला । प्रभु! बहुवार; विनवितों तुजला ॥२॥

[1] अभिमान.

ऐकुनि. गरुड-गिरा सुविनीता । प्रेमळ सरळ; सुखद सुपुनीता ।
परमोत्साह; तथा मनिं झाला । वदूं लागला; राम-गुणाला ॥ ३ ॥
अति अनुरागें; प्रथम भवानी । राम-चरित-सर; सुंदर वानी ।
पुढें नारदा; मोह अपार । वदे पुढें; रावण--अवतार ॥ ४ ॥
प्रभु-अवतार—कथा मग सांगे । मग शिशुलीला; अति अनुरागें ॥५॥

दो०— बाल-चरित मग; विविध बहु; मनीं परम उत्साह ।
ऋषि आगमना वदे मग, श्रीरघुबीर-विवाह ॥ ६४ ॥

पुढें राम—अभिषेक प्रसंगा । मग नृपवचें; राज्यरसभंगा ।
पुरवासी-जन; विरह-विषादा । वदे राम-लक्ष्मण,—संवादा ॥ १ ॥
विपिन-गमन; नाविक अनुरागा । गंगापार; निवास प्रयागा ।
वदे राम वाल्मिक-मीलना । चित्रकूटिं; वस्ती भगवाना ॥ २ ॥
सचिवागमन; नगरिं नृप-मरणा । -वदे, प्रेमबहु, भरतागमना ।
करुनि नृप-क्रिया; सह पुरवासी । भरत जाइ; जेथें सुखराशी ॥ ३ ॥
रघुपतिनें बहु; परी सांत्विलें । सह पादुका; अयोध्ये आले ।
भरत-रहणि; सुरपति-सुत-करणी । अत्री-राम;-भेट मग वर्णी ॥ ४ ॥

दो०— मग विराध-वध, त्यापुढें; देह त्यजी शरभंग ।
वर्णन सुतीक्ष्ण प्रीति मग; प्रभु-अगस्ति सत्संग ॥ ६५ ॥

मग दंडक वन; पावन करणें । जटायुमैत्री नंतर वदणें ।
पंचवटींत; पुढें प्रभु-वास । मुनि-वृंदांचा; हरला त्रास ॥ १ ॥
मग लक्ष्मण-उपदेश अनूप । शूर्पणखे जशि; केलि कुरूप ।
खर-दूषण-वध; पुढें वर्णिला । कळे मर्म सब; दशाननाला ॥ २ ॥
रावण-मारीचां संभापण-। कलें जाहलें; केलें वर्णन ।
मग माया-सीतेच हरणा । रघुवीराचे; विरह वर्णना ॥ ३ ॥
रामें गृध्र-क्रिया जशि केली । कवंध-वध; शबरी-गति कथिली ।
पुढें विरह वर्णित, रघुवीर-। पावे जसे; सरोवर तीर ॥ ४ ॥

दो०— प्रभु नारद संवाद मग, मारुति मिलन प्रसंग ।
सुकंठ मैत्री त्यापुढें; वाली जीवन भंग ॥ ६६ (क)॥

दो०— सुकंठासि अभिषेक मग, गिरीं प्रवर्षण वास ।
वर्णन वर्षा शरद मग; राम-रोष कपि-त्रास ॥ ६६ (ख) ॥

कपिपतिनें मग; कीश धाडिले । सीता-शोधा; सकल धावले ।
प्रवेश विवरिं; करिति ज्या रीतीं । पुढें कपींसि; भेट संपाती ॥ १ ॥
ऐकुनि कथा; समीर-कुमार । लंघुनि गेला; जलधि अपार ।

लंका-प्रवेश; कपिनें केला । कसा धीर; सीतेसी दिधला ॥ २ ॥
वन भंगुनि; रावणा प्रबोधी । जाळुनि पुर; लंघिला पयोधी ॥ ३ ॥
रामापाशीं; कपि मग आले । वैदेहीचें; कुशल बोलले ॥ ३ ॥
कटक समेत; यथा रघुवीर । पुढें पावले; जल-निधि-तीर ।
येउनि भेट; जसा बिभीषण । सागर-निग्रह; कथा सुवर्णन ॥ ४ ॥

दो०— सेतु-बंध; कपि-चमू जशी; उतरे सागर-पार ।
जाइ वकीलहि वीरवर; जैसा वालि-कुमार ॥ ६७ (क) ॥

दो०— निशिचर कीश लढाइ मग; वर्णी विविध प्रकार ।
कुंभकर्ण, घननाद मग; बल पौरुष संहार ॥ ६७ (ख) ॥

निशिचर-निकर; मरण मग नाना । पुढें समर; मग; राम-रावणा ।
रावण-वध; मंदोदरि शोक । भूप बिभीषण देव विशोक ॥ १ ॥
सीता-रघुपति; भेटहि नंतर । जोडुनि कर; करिती स्तुति सुर-वर।
बसुनि पुष्पकीं; कपीं समेत । निघति अयोध्ये; कृपानिकेत ॥ २ ॥
जसे राम निज; नगरा आले । वायस सर्वहि; विशद बोलले ।
वर्णन पुढें; राम अभिषेका । पुरवर्णन नृप-नीति अनेका ॥ ३ ॥
कथा समस्त; भुशुंडी वानी । आम्हीं वदलों; जशी भवानी ।
ऐकुनि राम-कथा खगभूप । वदे वचन; मनिं मोद अमूप ॥ ४ ॥

सो०— विगत सकल संदेह; श्रवण करुनि रघुपति-चरित ।
प्राप्त राम-पद-स्नेह; प्रसाद तव वायस-टिळक ! ॥६८ (क)॥

सो० — झाला मज बहु मोह; प्रभु बंधन समरीं बघुनि ।
चिदानंद संदोह; राम विकल कारण कवण ! ॥ ६८ (ख) ॥

बघुनि चरित अति; नर अनुकारी । झाला मम-मनिं; संशय भारी ।
तो भ्रम हितकर; आतां जाणें । कृपाब्धि केली; कृपा निधानें ॥ १ ॥
जो अति आतप-व्याकुळ होतो । छाया तरु-सुख; तोचि जाणतो ।
जरी न होता; मोहाब्धि मजला । कसा भेटतो; तात तूजला ॥ २ ॥
कशी ऐकतो; राम-कथा ही - । सुंदर; बहुविध; गानां तुम्हीं ही ।
पुराण-निगमागम मत हें हो । वदति सिद्ध मुनि; नहि संदेहो- ॥३॥
संत विशुद्ध; भेटती त्यासी । राम, कृपेनें बघती ज्यासी ।
राम-कृपें तव दर्शन झालें । अनुग्रहें तव संशय गेले ॥ ४ ॥
दो० — खगपति-वाणी ऐकुनी; सविनय युत-अनुराग ।
पुलकित तनु लोचन सजल; मनिं हर्षित अति काग ॥ ६९ क॥

दो०— श्रोता सुमति सुशील शुची; कथारसिक हरिदास।
भेटे तरि अति गोप्य उमे; सज्जन करी प्रकाश ॥ ६९ (ख) ॥

इतिश्री उत्तर कांडे; काकभुशुंडि गरुड संवादे-रामचरित्र
वर्णनं नामाष्टमोऽध्यायः।

अध्याय ९ वा

पुनरपि बोले; काक भुशुंडी । नभगे-पतीवरि; प्रीति न थोडी ।
नाथ ! सर्व परि; पूज्य आमुचे । कृपा-पात्र तुम्हि; रघुनाथाचे ॥ १ ॥
तुम्हां न संशय, मोह न माया । मजवरि केली; फार तुम्हि दया ।
धाडुनि मोह-मिसें प्रभु तुजला । रघुपति देती; महत्व मजला ॥ २ ॥
निजमोहा; वदलां खग-स्वामी । यांत न विस्मय; गणीं जरा मी ।
नारद विरंचि; भव, सनकादी । जे मुनिनायक, परार्थ, वादी ॥ ३ ॥
मोह न अंध; करी कवणाला । कोण, काम ना नाचवि ज्याला ।
तृष्णा कोणां; करि न वेडें । कोणां हृदयिं न; क्रोध धडधडे ॥ ४ ॥

दो०— ज्ञानी तापस शूर कवी; कोविद गुण-आगार।
लोभ कुणाची विडंबना; करी न या जगिं फार ॥ ७० (क ॥
,, श्रीमद् वक्र न कुणा करी; प्रभुता बधिर कुणास।
मृग-लोचनिचे नयन शर, कोण लागति न ज्यास ॥ ७० (ख) ॥

कुणा न गुणा-सन्निपात झाला । मान मदांनीं कोण सोडिला ।
यौवन ज्वर ना; कोणा भ्रमवी । ममता कवण न; यशा नाशवी ॥ १ ॥
कुणा न मत्सर; कलंक लावी । शोक समीर न, कुणा घोळवी ।
चिंता सापिणि; कुणास खाते । व्यापि न माया; जगिं कोणातें ॥ २ ॥
कीटं मनोरथ; दारु शरीर । खाइ न ज्यासि; कवण तो धीर ।
सुत; धन, लोक; एषणा तीन । कवण मतीस न; करिति मलीन ॥ ३ ॥
सकल हि; हा माया-परिवार । प्रबल अमित, किति वर्णु, अपार !।
शिव चतुरानन; जीतें डरती । कोण करी; इतरांची गणती ॥ ४ ॥

दो०— विश्वीं भरलें व्यापुनी; माया-कटक प्रचंड।
सेनापति कामादि; भट दंभ कपट पाखंड ॥ ७१ (क) ॥

---

१ पक्ष्यांचा राजा गरुड, त्यावर. २. मृगाक्षीचे नेत्रकटाक्षरूपी बाण.
३ वाळवी, उधई.

दो०— ती दासी रघुवीर-पदीं; यद्‌पि मृषा ज्ञानास।
राम-कृपेविण सुटे न ती; प्रतिज्ञाचि ही खास ॥ ७१ (ख) ॥

ज्या मायेनें; विश्व नाचतें । चरित्र जीचें; कुणा न कळतें ।
प्रभु-भृकुटीनें; ती खग-राजा । नटिसम नाचे; सहित समाजा ॥ १ ॥
चिदानंद घन; ते प्रभु रामचि । अज; विज्ञान;-रूप-बल-धामचि ।
व्यापक, व्याप्य, अखंड अनंत । अखिल; अमोघ;-शक्ति भगवंत ॥ २ ॥
अगुण, अदभ्र; गिरा-गोतीत । समदर्शी अनवद्य अजीत ।
निर्मम निराकार निर्मोह । नित्य निरंजन; सुख-संदोह ॥ ३ ॥
प्रकृति-पार प्रभु; जन-हृद्वासी । ब्रह्म निरीह; विरज; अविनाशी ।
मोहा येथें; ठावाचि नाहीं । रवि सन्मुख तम; जाइल कांहीं ॥ ४ ॥

दो०-- भक्तांस्तव भगवन्त प्रभू ; राम धरिति तनु भूप।
करिति चरित पावन परम; प्राकृत नर-अनुरूप ॥ ७२ (क) ॥
,, यथा बहुत वेषां धरुनी; नृत्य करी नट कोणि।
त्या त्या भावा दाखवी; स्वयें होइना प्राणि ॥ ७२ (ख) ॥

रघुपति-लीला अशि उरगारी । दनुज-विमोहनि; जन-सुख-कारी ।
जे मति-मलिन, विषय-वश कामी । प्रभुवरि मोह; लादिती; स्वामी ! ॥ १ ॥
नयन दोष; ज्याते प्रभु होतो । पीतवर्ण शशि; मग म्हणतो तो ।
यदा दिशाभ्रम; होइ खगेश । म्हणति पश्चिमे; उगे दिनेश ॥ २ ॥
नौकारूढ; पळत जग पाहे । अचल, मोहवश; मी म्हणताहे ।
बालक भ्रमति, न भ्रमति गृहादी । वदति परस्पर; मिथ्यावादी ॥ ३ ॥
असा मोह हरि-विषयिं विहंगा । ठाव नसे; अज्ञान-प्रसंगा ।
मायावश, मतिमंद अभागे । हृदयिं जवनिका; बहुविध लागे ॥ ४ ॥
ते शठ हठवश; संशय करिती । निज अज्ञान प्रभूवरि धरिती ॥ ५ ॥

दो०— काम कोप मद लोभरत; गृहासक्त दुखरुप।
केंवि जाणती रघुपतिसी; मूढ पतित तमकूप ॥ ७३ ॥ (क) ॥
,, निर्गुणरूप सुलभ अती; सगुण कळेना तात।
सुगम अगम नाना चरित; बघुनि मुनिहि भ्रमतात ॥७३(ख)

श्रुणु खगेश; रघुपतिची प्रभुता । सांगु यथामति; सुरम्य चरिता ।
झाला मोह; जसा प्रभू मजला । कथा सर्वती; सांगू तुजला ॥ १ ॥
राम कृपा-भाजन खगनाथा ! । हरि-गुण-रत; मजसी सुखदाता ।

१ भक्तांच्या अंतकरणांत राहणारे. २ पडदा.

म्हणुनी कांहिं न; तुम्हां लपवितो । परम रहस्य; मनोहर गातो ॥ २ ॥
ऐका प्रभुचा; सहज स्वभाव । जनअभिमाना; ठेवि न ठाव ।
संसृति-मूल: शूळप्रद नाना । सकल शोक-दायक अभिमाना-॥ ३ ॥
जाणुनि, करिती कृपानिधि दूरी । भक्तअंदरि हरि;-ममता भूरी ।
जसें बाळका; व्रण जैं होतो । जननी निर्दयसम चिरवी तो ॥ ४ ॥

दो०— प्रथम जरी दुख पावती; रडती बाल अधीर ।
रोग वारण्या, दुःख तें, गणी न माता धीर ॥ ७४ (क) ॥
निज-दासाचा तसा प्रभू; हरिति हिता अभिमान ।
अशा प्रभुसि कां भजसिना; तुलसि ! त्यजुनि अज्ञान ॥७४(ख)

रामकृपा, आणिक मम जडता । खगेश ऐका सावध-चित्तां ।
यदा यदा प्रभु; नर-तनु धरिती । भक्तांस्तव बहु; लीला करिती ॥ १ ॥
तदा अयोध्ये मी ही जातो । बाल-चरित्रा; बघुनि हर्षतो ।
इष्ट देव मम; बालक राम । तनु शोभा; शतकोटी काम ।
प्रभु-मुख सुंदर बघुनी भारी । करूं सफळ; लोचन उरगारी ॥ ३ ॥
लघु-वायस-वपु;-धर हरि-संगीं । पाहूं बाल;-चरित बहुरंगी ॥ ४ ॥

दो०— प्रभु बालक जेथें फिरती; मीही सवें उडून ।
अजिरीं उष्टें, जें पडे; खातो तें उचलून ॥ ७५ (क) ॥
,, एकवार अतिशय शुभ; चरित करिति रघुवीर ।
ती प्रभुलीला स्मरत मनीं; पुलकित होय शरीर ॥७५(ख)॥

म्हणे भुशुंडि, ऐक खगनायक । राम-चरित, सेवक-सुखदायक ।
नृपमंदिर; सुंदर सवरीतीं । खचित कनक-मणि; नाना जाती ॥१॥
वर्णूं तें किति: केविं आंगणें । चारि बंधुनीं; जेथ रांगणें ।
बाल-विनोद; करिति रघुनायक । विचरति अजिरिं; जननि सुखदायक
मृदुल कलेवर; मरकत शाम । प्रत्यंगीं; शोभा बहु-काम ।
नव-राजीव अरुण मृदु चरणें । पदजें-रुचिर; नख, शशि-द्युति हरणें ॥
ललित चिन्ह; कुलिशादिक चारी । नूपुर चारु; मधुर-रव-कारी ।
चारु कनकमणि-जडित बनविली ।-कटिं किंकिणि कल; मुखर शोभली ॥

दो०— त्रिवली युत सुंदर उदर; नाभी रुचिर गभीर ।
उरिं आयत; भ्राजति विविध; बाल विभूषण चीर ॥ ७६ ॥

---

१ आंगणात. २ पायाचीं बोटें.

अरुणपाणि नख, करंज मनोहर । बाहु विशाल; विभूषण सुंदर ।
स्कंद, बाल;-केसरि, दर-ग्रीवा । चारु, चिबुक; आनन छबि-सींवा ॥१॥
बोल बोबडे; अधरीं लाली । युग युग दंत; विशद वर खालीं ।
लाल गाल नासिका मनोहर । हास्य सुखदा बहु विमल चंद्रकर ॥२॥
नील-कंज-लोचन; भवमोचन । भ्राजे भाळिं: टिळक गोरोचन ।
भुकुटि वक्र, सम, सुंदर कान । कच काळे कुरळे; छबि छान ॥ ३ ॥
पातळ पीत; झगा तनुं शोभे । किंकाळत बघणें; मन लोभे ।
रूपराशि, नृप--आजिर-विहारी । नाचे; प्रतिबिंबा अनुसारी ॥ ४ ॥
मजसी विविध करी प्रभु क्रीडा । वर्णितांहि मज वाटे व्रीडा ।
किंकाळुनि मज, धरण्या धावति । पळतां मी, मज मोदक दाविति ॥५॥

दो०— संनिध जातां हसे प्रभु; उडतां मग रडतात ।
समीप जातां धरूं पद; फिरुनि फिरुनि पळतात ७७ (क) ॥

,, प्राकृत शिशु इव लीला; बघुनि होइ मज मोह ।
चरित्र कैसें करी प्रभू ! चिदानंद संदोह ॥ ७७ (ख) ॥

मनि येतां; इतकें खगराया । प्रभू प्रेरितां; व्यापी माया ।
ती माया न; भयद मज कांहीं । अन्य जीवसम; संसृति नाहीं ॥ १ ॥
नाथ इथें हें; कारण आन । सावधान; ऐका हरि-यान ।
ज्ञान, अखंड, एक सीतावर । माया-विवश जीव सचराचर ॥ २ ॥
ज्ञान एकरस; जरि सर्वांतें । भेद काय मग; जीव-शिवातें ।
मागा-विवश; जीव अभिमानी । ईश-वश्य; माया गुण-खाणी ॥ ३ ॥
परवश जीव; स्ववश भगवंत । जीव अनेक, एक मा-कान्त ।
मुधाभेद; यद्यपि कृत माया । हरिविण जाइन; कोटि उपायां ॥४॥

दो०— रघुवीराचे भजन-विना; वांछी पद निर्वाण ।
ज्ञानवंत जरि तो नर; पशु, विण पुच्छ विषाण ॥ ७८ (क) ॥

,, राकापति षोडश उगती तारागण समुदाय ।
दाव लाविला सकळ गिरी; रविविण रात्रि न जाय ॥ ७८ (ख) ॥

---

१ हाताची बोटें. २ शंख, ३ हनुवटि. ४ सौंदर्य-सीमा. ५ लाज, ६ समान, सारखे, ७ मिथ्या.

हरि भजनाविण; तसें खगेशा । नाश न होई; जीवन-क्लेशां ।
हरि सेवकां; न व्यापि अविद्या । प्रभू प्रेरित; व्यापी त्यां विद्या ॥१॥
म्हणुनी भक्त;-विनाश न होई । भेद भक्ति प्रभु ! वाढत जाई ।
भ्रमें चकित मज; पाहुनि राम । हसले, तें श्रुणु; चरित खगोत्तम ॥२॥
त्या लीलेचें; मर्म न कोणी-। जाणे अनुज न; पिता न जननी ।
रांगत धावे; प्रभु मज धरणा । शामल गात्र अरुण-कर-चरणां ॥ ३ ॥
तदा पळालो; मी उरगारी । राम, धराया; स्वभुजां पसरी ।
दूर जसे मग; उडूं अकाशीं । हरिभुज तिथें; दिसत मजपाशीं ॥४॥

दो०— ब्रह्म-लोक-वरि धावलो; बघतां उडत वळून ।
दोन अंगुळें अंतर ही; भुज-मजमधें असून ॥ ७९ (क) ॥
सप्तावरणां भेदुनी; जोंवर मम गति तात ! ।
जातां; प्रभुभुज पाहुनी; व्याकुळता विश्रांत ॥ ७९ (ख) ॥

मिटले नयन; त्रस्त जैं झालो । बघतो तों; कोसलपुरिं आलो ।
हसले प्रभु जैं मी त्यां दिसलो । हसतां त्वरित; मुखांतचि शिरलो ॥१॥
उदरांतचि बघ; अंडजराया[1] । बहु पाहूं; ब्रह्मांड-निकायां ।
तत्र[2], चित्र अति; लोक अनेकां-।-रचना एकाहुनि; बहु एका ॥ २ ॥
कोटी चतुरानन गौरीश । अगणित उडुगण; रवि-रजनीश ।
अगणित लोक,-पाल यम काल । अगणित भूधर; भूमि विशाल ॥ ३ ॥
सागर सरि सर; विपिन अपार । नाना विध सृष्टी विस्तार ।
सुर मुनि सिद्ध नाग नर किन्नर । चारि प्रकार जीव सचराचर॥ ४ ॥

दो०— जैं न दृष्ट वा नसे श्रुत; जें न मनांतहि येइ ।
तें अद्भुत सब पाहिलें; कैसें वर्णन होइ ॥ ८० (क) ॥
,, एकैका ब्रह्मांडिं[3] मग; राहुं वर्ष शत एक ।
फिरलो ऐसे बघत मी; अंड कटाह अनेक ।

इति श्री उत्तर कांडे; राममहिमा वर्णनादि; भुशुंडिमोह
वर्णनं नाम नवमोऽध्यायः ।

---

१ पक्षिराजा, २ तेथें, ३ ब्रह्मांडें.

अध्याय १० वा

प्रति लोकीं तो; भिन्न विधाता । भिन्न विष्णु शिव मनु दिक्पाता
नर गंधर्व; भूत बेताल । किन्नर निशिचर; पशु खग व्याळ ॥१॥
देव-दनुज-गण नाना जाती । सकल जीव ते; विभिन्न असती ।
महि, सागर, सरि, सर गिरि नाना । तिथें प्रपंच; सर्व आनाना ॥ २ ॥
प्रति ब्रह्मांडीं; मी निजरूपा । बघें वस्तु ही तशा अमूपा ।
कोशल पुर, प्रति-भुवनि विभिन्न । शरयू भिन्न; नारि नर भिन्न ॥ ३ ॥
दशरथ, कौसल्यादिक माता । विविधरूप भरतादिक, ताता ! ।
प्रति ब्रह्मांडिं; राम-अवतार--। पाहुं, बाल--विनोद अपार--॥ ४ ॥

दो०— भिन्न भिन्न मीं पाहिलें अति विचित्र हरियान ।
अगणित भुवनीं फिरत, प्रभू; राम न दिसले आन ॥ ८१ (क) ॥
,, ती शोभा तें शिशुपण; ते कृपालु रघुवीर ।
भुवनि भुवनि फिरलो बघत; प्रेरित मोह-समीर ॥ १ (ख)

भ्रमतां मी; ब्रह्मांडि अनेक । गेले जणूं; कल्प-शत एक ।
फिरत फिरत निज; आश्रमिं आलो । तेथें कांहीं; काळ राहिलो ॥ १ ॥
अयोध्येंत प्रभु;--जन्म ऐकिला । धावत गेलो; हर्ष जाहला ।
जन्म-महोत्सव, तिथें देखिला । जसा प्रथम मी; तुम्हां वर्णिला ॥२॥
राम-उदरिं जग; अनंत नाना । बघणें शक्य; न वर्णन जाणा ।
दिसले पुनरपि; राम सुजाण । कृपालु माया-पति भगवान ॥ ३ ॥
करूं विचारा; वारंवार । मोह--कलिल;-व्यापित मति फार ।
दोन घडींतचि; सर्व पाहिलें । विशेष मोहें; चित्तचि भ्रमलें ॥४॥

दो०— व्याकुळ बघुनि कृपालु मज; हसले श्री रघुवीर ।
हसतां आलो मुखांतुनी; गरुडा श्रुणु मतिधीर ॥ ८२ (क) ॥
ती शिशुलीला मजसि मग; करूं लागले राम ।
कोटि विधी समजावुं तरी; मन न लभे विश्राम ॥ ८२ (ख) ॥

पाहोनी त्या; सुंदर चरिता । देहभान ना; प्रभाव स्मरतां ।
पडलो धरणीं न; वदवे सम्यक । त्राहि त्राहि; शरणागत रक्षक ॥ १ ॥
प्रेमाकुल मग, पाहुनि मजला । आवरिती प्रभु निजमायेला ।

---

१ निरनिराळा

निजकर-कमळा; शिरीं ठेविलें । दीन-दयाळें; दुःखा हरिलें ॥ २ ॥
करिति राम मज; विगत-विमोह । सेवक-सुखद; कृपा संदोह ।
प्रभुता पूर्विल; स्मरतां सारी । होइ मनीं मम, हर्षेहि भारी ॥ ३ ॥
प्रभुची पाहुनि; जन-वत्सलता । प्रीती; फारचि उपजलि चित्ता ।
सजल नयन; पुलकित,कर जुळनी । केलि विनति; नाना, प्रभु-चरणीं ॥४॥

दो०— परिसुनि करुणा वचन मम; बघुनि दीन निज दास ।
वचन सुखद गंभीर मृदू; वदले रमा-निवास ॥ ८३ (क) ॥
,, काकभुशुंडी माग वरा, प्रसन्न मज अति जाण ।
अष्टसिद्धि अणि ऋद्धि सब; मोक्ष सकल सुख-खाण ॥८३(ख)॥

ज्ञान विवेक, विरति विज्ञाना । मुनिदुर्लभ गुण; जे जगिं नाना ।
आज देउं सब; संशय नाहीं । रुचेल मनि तें; मागचि कांहीं ॥ १ ॥
ऐकुनि वच अति; प्रेमें भरलो । मनीं विचारा; करूं लागलो ।
"देतो सौख्य, सकल,हरि म्हणती । भक्तीचें परि; नांव न वदती ॥ २ ॥
भक्तिहीन गुण; सब सुख कैसें । लवण विना बहु भोजन जैसें ।
भजन-हीन सुख; कवणे काजा" । चिंतुनि मग; वदलो खगराजा ! ॥३॥
" प्रसन्न होउनि; जरि वर देतां । मजवरि कृपा, स्नेह जर करितां ।
मन-वांछित वर; मागूं स्वामी । प्रभु उदार मम; अंतर्यामी ॥ ४ ॥

दो०— अविरल भक्ति विशुद्ध तव; वर्णित वेद-पुराण ।
जी शोधिति मुनि योगि; कृपें; प्रभुचे पावति जाण ॥८४ (क)॥
भक्त कल्पतरु प्रणत हित; कृपासिंधु सुखधाम ।
ती निज भक्ती द्यावि मज; करुनि कृपा प्रभु राम" ॥ ८४ (ख)॥

'एवमस्तु' मग; रघुकुल-नायक-। वदले वचन; परम सुखदायक ।
श्रुणु वायस तूं; सहज सुजाण । कां न मागसी; हें वरदान ॥ १ ॥
मागितलीं; भक्ती सुखखाणी । भाग्यवान तुज,-सम नहि कोणी ।
जी बहु यत्नें; मुनि ना पावति । जे जप योग;-अनलिं तनु जाळिति ।२।
प्रसन्न झालों; बघुनि चतुरता । भक्ति मागता; प्रिय मम चित्ता ।
श्रुणु विहगा कीं; कृपें माझिया । शुभ गुण सकल; वसति तव हृदया।३।
ज्ञान-भक्ति;-विज्ञान-विराग- ।-योग,-चरित्र-रहस्य-विभाग ।
जाणसि तूं, सर्वांचे भेद । प्रसाद मम; नहि; साधन-खेद ॥ ४ ॥

दो०— माया-संभव भ्रम सब; तुला न व्यापिति जाण ।
जाणसि ब्रह्म; अनादि अज; अगुण मला गुण-खाण ॥८५ (क)॥
मला भक्त प्रिय संतत; हें जाणुनि श्रुणु काग ।

तनु मन वचनें मम पदीं; करी अचळ अनुराग ॥ ८५ (ख) ॥

ऐक हि परम; विमल मम वाणी । सत्य सुगम; निगमादिक वानी ।
निज सिद्धांत; सांगतो तुजला । श्रुणु;मनिं धरि;सब त्यज;भज मजला ।१।
मम माया;-संभव संसार । जीव चराचर; विविध प्रकार ।
सब मम प्रिय, सब; माझे केले । इतरांहुनि नर; प्रिय बहु झाले ॥ २ ॥
त्यांतहि द्विज; त्यांतहि श्रुति-धारी । त्यांतहि निगम;-धर्म अनुसारी ।
त्यांत विरक्त; त्यांत प्रिय ज्ञानी । ज्ञान्याहुनि प्रिय अति विज्ञानी ॥ ३ ॥
त्यांतहि बहु प्रिय, मज निज दास । ज्यां गति माझी; दुजी न आस ।
सत्य सत्य वदतो तुज पाहीं । मज दासा सम; प्रिय कुणि नाहीं ॥४॥
भक्तिहीन जरि; विरंचि असला । इतरांहुनि प्रिय; अधिक न मजला ।
भक्तिमान अति; नीचहि प्राणी । प्राणप्रिय मज; ही मम वाणी ॥ ५ ॥

दो०— शुचि सुशील, सेवक सुमती: कोणा प्रिय ना सांग ।
वेद पुराणीं नीति अशी; सावधान श्रुणु काग—॥ ८६ ॥

एक पित्याचे; विपुल कुमार । होति भिन्न गुण-शील अचार ।
कुणि पंडित कुणि; तापस ज्ञाता । कुणि धनवंत; शूर कुणि दाता ॥ १ ॥
कुणि सर्वज्ञ; धर्मरत काहीं । प्रीति पित्याची; सम सर्वांही ।
कुणि पितृ-भक्त; कर्म मन वचनें । अन्य धर्म; स्वप्नींहि न जाणे ॥ २ ॥
तो सुत बापा; प्राण समान । यद्यपि तो; पूर्णचि अज्ञान ।
तैसे जीव; चराचर सर्व । देव असुर; नर पशु, गंधर्व ॥ ३ ॥
अखिल विश्व हें; मम-कृत आहे । दया माझि सम; सर्वीं राहे ।
त्यांत कोणि; सोडुनि मद माया । भजे मला मन; वच अणि काया ॥४॥

दो०— पुरुष नपूंसक नारि वा; जीव चराचर कोणि ।
निष्कपटें जो भजे मज; मजला प्रिय तो प्राणि ॥ ८७ (क) ॥
सो०— सत्य सांगु तुम्हांस; शुचि सेवक मम प्राण-प्रिय ।
जाणुनि भज आम्हांस; त्यजुनि भरोसा आस सब ॥ ८७ (ख) ॥

काळ कधीं ना; व्यापी तुजला । करी स्मरण; तूं मम भजनाला ।
वचनामृत; पिउनी नहि तृप्ती । मनीं हर्ष बहु; गात्र पुलकती ॥ १ ॥
तें सुख विदित; असे मन कानां । वर्णन करूं; शकेना रसना ।
प्रभु-शोभासुख; समजे नयनां । वदूं न शकती; तयां न रसना ॥ २ ॥
बहुविध बोधुनि; मज सुख दिधलें । त्या शिशुलीला; करूं लागले ।
सजल नयन; करुनी मुख रूक्ष-। बघति जननि-मुख जणुं अति-भूक ॥३॥
ऐकुनि जननी; धावत येई । बोलुनि मृदु वच; हृदयीं घेई

घेउनि अंकीं; दे स्तन पान । रघुपति-चरित; ललित करि गान ॥४॥

सो०— ज्या सुखार्थ त्रिपुरारि; अशुभवेषकृत; शिव सुखद ।
कोसलपुर-नर-नारि; त्या सुखांत संतत मग्न ॥ ८८ (क) ॥
,, तेंच सौख्य लवलेश; प्राप्त स्वप्निंही होय जरी ।
ते ना गणति खगेश; ब्रह्मसुखहि, सज्जन सुमति ॥ ८८(ख) ॥

अयोध्येंत मग; कांहीं काळ । पाहुं बाल; विनोद रसाळ ।
रामकृपेनें; भक्ति पावलो । प्रभु-पदिं नमुनि; निजा-श्रमिं आलो ॥१॥
तेव्हांपासुनि; व्यापि न माया । अपुला म्हणे; यदा रघुराया ।
गुप्त चरित; हें सर्व गाइलें । मायेनें मज; असें मोहिलें ॥ २ ॥
अनुभव निज; सांगतो खगेशा । हरिभजना-विण; नाश न क्लेशां ।
रामकृपे-विण, श्रृणु सुत विनता । समजेना; रामाची प्रभुता ॥ ३ ॥
ज्ञानाविण; बा नव्हे प्रतीती । विना प्रतीति, न; होते प्रीती ।
प्रीति-विणा नहि; भक्ती-दृढता । खगेश जैशी जल-चिक्कणता ! ॥ ४ ॥

सो०— गुरुविण होइ न ज्ञान; ज्ञान किं होइ विराग विण ।
गाती वेद पुराण; मिळे सुख किं हरि भक्ति विण ॥८९ (क)॥
,, कधि विश्रांतिसि ठाव; तात सहज संतोषाविण ।
जाय किं जलविण नाव; कोटि यत्न डोकें पिटुनि ॥८९(ख)॥

संतोषाविण, काम न नासे । काम तिथें सुख; स्वप्नीं कैसें ।
राम-भजन-विण; काम न जाती । स्थळावीण तरु; कधीं उगवती ? ॥१॥
विज्ञानाविण समता नाहीं । नभावीण; अवकाश जसाही ।
श्रद्धेविणा धर्म ना घडतो । महीवीण कीं गंध लाभतो ॥ २ ॥
तेज तपाविण; कीं संसारीं । जळावीण रस; जगीं कधि तरी ।
शील लाभ कीं; बुध-सेवेविण । रूप दिसेना कीं तेजाविण ॥ ३ ॥
स्वसुखाविण मन; होइ कधी स्थिर । स्पर्श होइ कीं; विना समीर ।
कवण सिद्धि कीं; विण विश्वास । विण हरिभजन न; भवभय नाश ॥४॥

दो०— विश्वासाविण भक्ति नहीं; ती विण द्रवति न राम ।
रामकृपेविण स्वप्निंही; जीवा नहि विश्राम ॥ ९० (क) ॥
सो०— हें जाणुनि मतिधीर ! त्यज कुतर्क; संशय सकळ ।
भजा राम रघुवीर; करुणाकर सुंदर सुखद ॥ ९० (ख) ॥

वदलो मी हा; नाथ यथामति ।–प्रभु प्रताप–महिमा कीं खगपति ! ।
युक्ति-विशेषें; कांहिं न कथिलें । सर्वांचि हें या; नयनिं पाहिलें ॥ १ ॥
महिमा, नाम, रूप, गुण-गाथा । अमित अनंत; सकल रघुनाथा ।

निज निज मति; मुनि, हरिगुण गाती । निगम शेष शिव; पार न जाती ॥२॥
तुम्हादीक खग; बहु मशकांत । गगनीं उडति, न पावति अंत ।
रघुपति महिमा; तसा अगाध । तात कोण कथि; पावे गाध ॥ ३ ॥
राम काम-शत कोटि सुभग-तन । दुर्गा अमित-कोटि अरिमर्दन ।
कोटि सुरेंद्र; समान विलास । नभ-शत कोटि; अमित अवकाश॥४॥
दो०— मरुत कोटि-शत विपुल बल; रविशत-कोटि प्रकाश ।
शशि-शत कोटि सुशीतल; शमन-सकल भवत्रास ॥९१ (क)॥
,, काल कोटि-शत सरिस अती; दुस्तर, दुर्ग, दुरंत ।
धूम-केतु शत-कोटि सम; दुराधर्ष भगवंत ॥ ९१ (ख)॥
अगाध कोटी-शत पाताळ । यम-कोटी-शत सरिस कराळ ।
अमित कोटि; तीर्थां-सम पावन । नाम अखिल अघ-पूंग-विनाशन ॥ १ ॥
हिम-गिरि-कोटि, अचळ रघुवीर । सिंधु कोटिशत; सम गंभीर ।
काम धेनु शत; कोटि समान । सकल काम-दायक भगवान ॥ २ ॥
अमित कोटि शारदा-चतुरता । विधि शत कोटी; सृष्टि निपुणता ।
विष्णु कोटिसम; पालन कर्ता । रुद्र कोटिशत; सम संहर्ता ॥ ३ ॥
धनद कोटिशत, सम धनवान । मायाकोटि; प्रपंच निधान ।
भार-धरण, शत;-कोटि अहीश । निरवधि, निरुपम; प्रभु जगदीश ॥४॥
छं०— निरुपम न उपमा; आन राम चि, राम सम वदती श्रुती ।
जशि कोटिशत; खद्योत सम रवि; वदत मति-लघुता अती ॥
या रीति निज निज, मति विलासें; हरिसि मुनिवर वर्णिती ।
प्रभु भाव-ग्राहक; अति कृपाळू; ऐकुनी सुख पावती ॥ १ ॥
दो०— राम अमित गुणसागर; ठाव कळे कोणास ।
संत संगतीं समजलें; तें वदलों तुम्हांस ॥ ९२ (क)॥
सो०— भाववश्य भगवान; सुखनिधान करुणायतन ।
त्यज ममता मद मान, प्रज्ञा ! भज सीतारमण ॥ ९२ (ख)॥

इति श्री उत्तरकांडे; काकभुशुंडि-मोहवर्णनादि, वरप्राप्ति;-
रामप्रभाव वर्णन नाम दशमोऽध्यायः ॥

अध्याय ११ वा

भुशुंडिचें शुभ, वचन ऐकिलें । गरुडें हर्षें; पंख फुलविले ।
नयनिं नीर, मन; अती हर्षलें । राम-प्रतापा, मनीं आणिलें ॥ १ ॥

१ पापाचा निधि.

पूर्वील मोहा; स्मरुनि तापले । ब्रह्म अनादी; मनुज मानिले ।
कितिदां, काक;-चरणिं शिर नमवी । मानी प्रभु-सम; प्रेम वाढवी ॥ २ ॥
गुरुविण भव-निधि; कोणि न तरती । जरि विरंचि शिव; समान असती ।
संशय-सर्प-दष्ट मी तात । दुखद लहरि बहु; कुतर्क-भ्रांत ॥ ३ ॥
तव-स्वरूप गारुंड रघुनायक-। जगवी मला दास-सुखदायक ।
तुझ्या प्रसादें; मोह नासले । राम रहस्य अनूपम कळलें ॥ ४ ॥

दो०— तया प्रशंसुनि विविध परी; वंदुनि, जोडुनि हात ।
प्रेमळ विनीत, वाक्य मृदू, गरुड पुन्हां वदतात ॥९३ (क)॥
,, अविवेकें निज, नाथ ! अती; पुसतो मी अपणांस ।
सादर सांगा कृपानिधी; समजुनि मज निज-दास ॥९३ (ख)॥

तुम्हि सर्वज्ञ; तज्ञ तमपार । सुमति सुशील; सरळ-आचार ।
ज्ञान-विरति;-विज्ञान-निवास । श्री रघुपतिचे; तुम्हि प्रिय दास ॥१॥
कारण कवण; देह हा पावां । तात सकळ हें; मज समजावा ।
रामचरित सर; सुंदर स्वामी । कैसें प्राप्त वदा नभ-गामी ॥ २ ॥
शिव वदले, मज, ऐसें कांहीं ।-महा प्रळयिं तव, विनाश नाहीं ।
मुधा वचन नहि; ईश्वर वदती । तदपि मनीं मम; संशय उठती ॥ ३ ॥
अग जग जीव, सुरादिक सकळ-।-विश्व; नाथ ! काळाचें कवळ ।
अंड कटाह; अमित लयकारी-। काळ सदा; दुरतिक्रम भारी ॥ ४ ॥

सो०— तुम्हां न व्यापी काळ; अति कराल; कारण कवण ।
सांगा मजसि कृपाळ; ज्ञान प्रभाव किं योगबळ ॥ ९४ (क) ॥

दो०— येतां तव आश्रमीं प्रभू; नष्ट सर्व भ्रम-भाग ।
सांगा कारण नाथ मज; सर्व सहित अनुराग ॥ ९४ (ख) ॥

गरुड गिरेनें, हर्षित काग । बोले उमे ! सहित अनुराग ।
धन्य धन्य तव; मति उरगारी । तुमचा प्रश्न; मला प्रिय भारी ॥ १ ॥
प्रेमळ प्रश्ना; परिसुनि तुमचे । स्मरण जाहलें; बहु जन्मांचें ।
वदतो माझ्या; सर्व कथेतें । ऐक तात; सादर मन-चित्तें ॥ २ ॥
जप-तप-मख-दम;-यम शम, दान-। विरति विवेक; योग विज्ञान ।
सर्वा फळ; रघुपतिपद-प्रेमा । त्याविण कोणि न; पावे क्षेमा ॥ ३ ॥

---

१ संशयरूपी सर्प चावलेला. २ समुदाय. ३ गारुडमंत्र. ४ असत्य.
५ ग्रास, घास. ६ ब्रह्मांडें.

या देहीं हरि भक्ती-आली । म्हणून त्यावरि अधिका प्रीती ।
ज्यानें अपुला; स्वार्थ साधतो । कुणीहि त्यावर; ममता करतो ॥ ४ ॥

सो०— पन्नगारि अशि नीति; श्रुति संमत सज्जन वदति ।
अति नीचावरि प्रीति;-योग्य; बघुनि निज परम हित ॥ ९५(क)

सो०— कीट रेशिमा देति; क्षौमें वसन त्याचें रुचिर ।
कृमि पाळाया घेति; परम अपावन; प्राण-सम ॥ ९५ (ख) ॥

खरा स्वार्थ, जीवाचा जगतीं । तनुमनवचें, रामपदिं भक्ती ।
तें पावन, तें; सुभग शरीर । जें पावुनि; भजती रघुवीर ॥ १ ॥
राम-विमुख तनु; विधिसम पावे । कवि कोविद ना; वानिति भावें ।
राम-भक्ति या; देहीं नामी । म्हणुनी प्रिय मज अति हा स्वामी ॥२॥
त्यजूं न तनु; जरि इच्छा-मरणी । तनु-विण भजन; वेद ना वर्णी ।
प्रथम मला बहु; मोहें छळलें । राम-विमुख; सुख; स्वप्निं न झालें ॥३॥
नाना जन्मिं; कर्म बहु नाना । बहुत योग जप; तप मख दानां[२]—।
योनि अशी; जगिं; एकहि नाहीं । जेथें भ्रमलो; नसेल पाहीं ॥ ४ ॥
सर्व कर्म प्रभु ! करुनि पाहिलें । आतां-सम सुख; कधीं न झालें ।
स्मृति मज नाथ; बहुत जन्मांची । शंभु कृपे, मति-मोह नसेची ॥ ५ ॥

दो०— प्रथम जन्मिचें चरित अतां वदूं एक विहगेश ।
श्रवणें प्रभुपदिं होय रती; जेणें हरतीं क्लेश ॥ ९६ (क) ॥

,, पूर्वी एके कल्पि प्रभू ; युग कलियुग मलमूल ॥
नारी पुरुष अधर्म-रत; सकल निगम-प्रतिकूल ॥ ९६ (ख) ॥

त्या कलियुगिं; कोशलपुरिं जाउनि । शूद्र जाहलो; जन्मा पावुनि ।
शिव सेवक, मन;-कर्मे वाणीं । अन्य देव, निंदक अभिमानी ॥ १ ॥
धनमद मत्त; परम वाचाळ । उग्रबुद्धि, मनिं; दंभ विशाल ।
यदपि राहिलो; प्रभु नृप-धानीं[२] । तदपि न महिमा; आला ध्यानीं ॥२॥
अतां जाणुं; कोशिला-प्रभावा । पुराण निगमा-गमांसि ठावा ।
कुण्याहि जन्मीं; तेथें वसती । राम-परायण; ते मग होती ॥ ३ ॥
पुर-महिमा तैं; जाणे प्राणी । यदा वसति मनिं; प्रभु धनु-पाणी ।
तो कळिकाळ; कठिण उरगारी । पाप-परायण; सब नर नारी ॥ ४ ॥

दो०— कळिकळ-ग्रसले धर्म सब; लुप्त सकल सद्‍ग्रंथ ।
दांभिक निज-मति-कल्पित; प्रगट करिति बहु पंथ ॥ ९७ (क) ॥

---

१ रेशमी. २ केलें भगवंताच्या राजधानींत ३ अयोध्येंत.

वर्ण धर्म नहि; आश्रम चारी । श्रुति-विरोध-रत; सब नर नारी ।
द्विज श्रुति-विक्रय; भूप प्रजाशैन । मानि न कोणि; निगम-अनुशासन ॥१॥
तोचि मार्ग, जो; ज्यासी रुचतो । पंडित तो जो; मौढि मिरवितो ।
मिथ्यारंभ; दंभ-रत असती-। संत तयांसी; सर्वहि म्हणती ॥ २ ॥
तोचि चतुर जो; परधन हारी । जो दांभिक तो; बहु आचारी ।
असत्य मस्करि बहुत जाणती । गुणवंतचि त्यां; कलियुगिं म्हणती । ३।
अनाचारि जो; श्रुति पथ त्यागी । तो ज्ञानी, तो; खरा विरागी ।
नखें जटा; ज्या ज्या हि विशाला । तो तापस; विश्रुत कलि-काला ॥ ४ ॥

दो०— अशुभ वेष-भूषण धरी; भक्ष्याभक्ष्य हि खाति ।
तेचि योगी ते सिद्ध नर; कलियुगिं पुजिले जाति ॥ ९८ (क) ॥

सो०— कौशल पर-अपकार, त्यां गौरव ते मान्य जगिं ।
तनु-मन-वच-शठ फार; तो वक्ता कलियुगिं धन्य ॥९८ (ख) ॥

नारि-विजित नर; सगळे स्वामी । नाचति नट;-मर्कट-सम नामी ।
द्विजां शूद्र, उपदेशी ज्ञानें । सूत्रं घालुनी; घेति कुदानें ॥ १ ॥
सब नर काम-लोभ-रत क्रोधी । देव - विप्र - श्रुति-संत-विरोधी ।
गुण-मंदिर पति; सुंदर त्यागुनि । भजति नारि पर;-पुरुष अभागिनि ॥२॥
सौभागिनीः विभूषण-हीना । विधवा-शृंगार;चि नव नाना ।
अन्ध बधिर; गुरु शिष्य वर्तती । एक न ऐके एक न बघती ॥ ३ ॥
हरिति शिष्य-धन; शोक न हरती । ते गुरु घोर; निरयिं बहु फिरती ।
माय-बाप; सुत निकटचि घेती । उदर भरे तो; धर्म शिकविती ॥४॥

दो०— ब्रह्मज्ञान विण नारिनर; वदति न दुसरी बात ।
कौडीलागी लोभवश; करिति विप्र-गुरु-घात ॥ ९९ (क) ॥

,, शूद्र भांडती द्विजांसवे; आम्ही कैसे न्यून ।
ब्रह्म विदित ज्या ब्राह्मण तो; वधे नेत्र वासून ॥ ९९ (ख) ॥

पर वधु लंपट; कपट-चतुरता । द्रोह मोह अति; ममता चित्ता ।
अभेद-वादी; ते ज्ञानी नर । कलियुग चरितहि दिसलें खगवर।१
आपण पडले; तयांहि पाडिति-। कोणि दुजे जे; सत्पथ पाळिति ।
कल्प कल्प; एकैका नर्का । पडति दूषिती; श्रुति जे तर्का ॥ २ ॥
वर्णाधम; तेली कुंभार । श्वपच किरात; कोळि कलवार ।
नारी मृत; गृह;-संपद्-नाश । मुंडन करुनि; घेति संन्यास ॥ ३ ॥

१ प्रजाभक्षक, २ जानवें. ३ चांडाल, ४ कलाल.

विप्रां-हस्तें; पूजन घेती । इहपर सुखा; तिलांजलि देती ।
विप्र निरक्षर; लोलुप, कामी । निराचार, शठ; वृषली-स्वामी ॥४॥
शूद्र करिति जप; व्रत, तप, नाना । बसुनि वरासनि, वदति पुराणां ।
नर करिती; कल्पित आचार । फार अवाच्य अनीति अपार ॥ ५ ॥

दो०— कलियुगिं संकर वर्ण बहु; भिन्न-सेतु सब लोक ।
करिति पाप, दुख पावती; भय रुजं वियोग शोक ॥ १००क॥
,, श्रुतिसंमत हरिभक्त-पथ; संयुत विरति-विवेक ।
तो न धरिति नर मोह-वश; कल्पिति पंथ अनेक ॥ १००(ख)॥

छं०-तोटक-बहु दाम चि, जोडिति; धाम यती । विषयीं, रमले; नुरली विरती ।
धनवंत, तपी हि;, दरिद्र गृही । कलिकौतुक, तात, वदूं किति ही ॥१॥
कुलवंत, हकालिति, नारि सती । गृहिं ठेविति, दासि, त्यजून गती ।
पितरां सुत, मानिति तोंवरि कीं । अबलानन, दृष्ट न, जोंवरि कीं ॥२॥
श्वशुरालय, गोड गमे जइं-तें । रिपुरूप, कुटुंब, गमे तइं-तें ।
नृप पाप,-परायण, धर्म नसे । अति दंड,-विडंबित, लोक असे ॥३॥
धनवंत, कुलीन; मलीन अपी, । द्विज चिन्हचि सूत्र, हि नग्न तपी ।
नर वेद पुराणहि मानिन जो । हरि-सेवक संत; खरा युगिं तो ॥४॥
कविवृंद उदार दिसे न कुणी । गुण-दूषक-संघ न, कोणि गुणी ।
कलि वार, अनेक, दुकाळ पडे । विण अन्न, दुखी जन, जेंवि मढे ५॥

दो०— श्रुणु खगेश कलि कपट हठ; द्वेष दंभ पाषांड ।
मान मोह मारादि मद;-व्याप्त सकल ब्रह्मांड ॥ १०१ (क) ॥
,, करिती तामस धर्म नर; व्रत जप, तप मख दान ।
इंद्र न वर्षे, धरणिवरी; उप्त न उगवे जाण ॥ १०१ (ख) ॥

छं०-तोटक-अबला कच भूषण भूरि क्षुधा । धनहीन, दुखीं ममता बहुधा ।
सुख वांछिति मूढ न धर्मरती । मति थोडि, कठोर न कोमल ती ॥ १ ॥
नर पीडित रोग; न भोग महीं । अभिमान, विरोध, अकारण ही ।
लघु जीवन, संवत पंच दहा । जणुं कल्पि, न नाश गुमान महा ॥ २ ॥
कलिकाल, वि-हाल करी मनुजां । नहि मानिति, हो ! अनुजां तनुजां ।
नहिं तोष, विचार न, शीतलता । सब जाति, कुजाति, हि याचिति हा ॥३॥
इरषा पुरुषाक्षर लोलुपता ।-भरपूर असे; समता विगता ।
सब लोक, वियोग,-विशोक हत । निज आश्रम धर्म अचार गत ॥४॥

१ व्यासपीठावर, उच्चासनावर, २ बोलूं नये अशी ३ रोग, ४ कवी पुष्कळ; ५ गुणानां नावें ठेवणारे पुष्कळ. ६ पेरलेले. ७ बहीण, ८ मुलगी. ९ ईर्षा.

दम दान दया नहि जाणपणा । जडता पर वंचन फार गणा ।
तनु-पोषक, लोक पहा सगळे । पर निंदक तेचि जगीं अगळे ॥५॥

दो०— भृणु व्यालारी काळ कली; अघ अवगुण आगार ।
गुणहि बहुत या कलियुगीं; प्रयास-विण उद्धार ॥१०२ (क)॥
,, कृतयुग त्रेता द्वापरीं पूजा-मख अणि योग—।
देति गती ती कलियुगीं; नामें पावति लोक ॥ १०२ (ख) ॥

कृतयुगिं सब; योगी विज्ञानी । ध्यान करुनि भव तरती प्राणी ।
त्रेतीं विविध; यज्ञ नर करती । समर्पुनी; हरिसी भव तरती ॥ १ ॥
द्वापरिं करुनि; राम-पद-पूजा । नर भव तरति; उपाय न दूजा ।
कलियुगिं केवळ; हरिगुण गाना-। -करितां विसरति, नर भवभाना ॥२॥
कलियुगिं योग न; यज्ञ न ज्ञान । एक अधार, राम-गुण-गान ।
त्यजुनीं आशा; भजती रामा । प्रेम-समेत; गाति गुण-ग्रामा ॥ ३ ॥
ते तरती भव; संशय नाहीं । नाम-प्रताप, प्रकट युगिं पाही ।
कलिचा एक; पुनीत प्रताप । मानस पुण्य, होय; नहिं पाप ॥ ४ ॥

दो०— कलियुग-सम युग अन्य नहीं; जो नर युत विश्वास ।
गाइ रामगुणगणाविमल; तरे भव न सायास । १०३ (क) ॥
,, प्रगट धर्मपद चार हा; एक कलींत प्रधान ।
येन केन विधि देतां; दान करी कल्याण ॥ १०३ (ख) ॥

होति सकल; युग-धर्म जनांचे । हृदयिं राम-मायेनें साचे ।
शुद्ध सत्व; समता विज्ञान । कृत-प्रभाव, मन; प्रसन्न जाण ॥ १ ॥
सत्व बहुत; रज लव; रति कर्मीं । बहुविध सुख; त्रेताचे धर्मीं ।
बहु रज; सत्व अल्प,लव तामस;। द्वापर धर्म; हर्ष-भय मानस ॥ २ ॥
बहुत तमोगुण; रजही थोडें । प्रभाव कलिचा; वैर चहुंकडे ।
बुध युग-धर्म; मनीं निज बघती । त्यजुनि अधर्म; धर्मरति धरिती ॥३॥
काल धर्म ना व्यापिति त्यासी । रघुपति पदीं; प्रीति अति ज्यासी ।
नटकृत विकट कपट खगराया । नट-सेवका न व्यापी माया ॥ ४ ॥

दो०— हरिमायाकृत दोषगुण; विण हरिभजन न जात ।
त्यजुनि काम सब, राम भज; करुनि विचार मनांत ॥१०४क

इतिश्री उत्तरकांडे; पूर्वजन्म कथनादि कलि महिमा
वर्णनं नामैकादशोऽध्याय. ॥

अध्याय १२ वा

दो०— त्या कळिकाळीं वर्षे बहु; कोसलवास खगेश ।
पडे दुकाळ, विपत्ति वश; गेलो तदा विदेश ॥ १०४ (ख) ॥
गेलो उज्जनिसी; उरगारी । दीन दरिद्री; दुःखी भारी ।
जातां काळ मिळे संपत्ती । करूं लागलो मी शिवभक्ती ॥१॥
विप्र एक; वैदिक शिव-पूजा । करि, व्यवसाय; नसे त्या दूजा ।
परमसाधु; परमार्था-विंदक । शंभु-उपासक; नहि हरि-निंदक॥२॥
मी सेवीं त्या; कपट समेत । द्विज दयाळु अति; नीति-निकेत ।
बाह्य नम्रता; दिसतां त्याला । द्विज, पुत्रासम; पढवी माला ॥ ३ ॥
शंभु-मंत्र मज; विप्रें दिधला । शुभ उपदेश; विविध-विध केला ।
जपूं मंत्र; शिव-मंदिरिं जाउनि । हृदयि दंभ, मी; मोठा' मानुनि ॥४॥
दो०— मी खळमळ-संकुल मनीं; नीच जाति वश मोह ।
हरिजन द्विज दिसतां जळतो; करूं विष्णुचा द्रोह ॥१०५(क)
सो०— गुरु मज करी प्रबोध; दुखे; बघुनि आचरण मम ।
मज अति उपजे क्रोध; दंभ्या नीति न रुचे कधिं ॥१०५(ख)
एकवार गुरु; हाक मारिती - । नीती बहुविध; मला शिकविती ।
शिव सेवेचें; सुत फळ हेंचि । अविरल भक्ति रामपदिं साची ॥ १ ॥
रामा भजति, तात ! शिव धाता । नर पामरां; काय ती वार्ता ।
ज्या चरणीं अज; शिव अनुरागी । त्यां द्रोहें सुख; बघसि अभागी ! ॥२॥
हरासि हरि-सेवक गुरु वदले । ऐकुनि नाथ ! हृदय मम जळलें ।
अधम जाति मज; विद्या मिळतां । होय जसें, अहि; पयासि गिळतां ॥३॥
मानी कुटिल; कुभाग्य कुजाती । गुरुचा द्रोह; करीं दिन-रातीं ।
अति दयाळु गुरु; अल्प न क्रोध । पुनः पुन्हां मज; करी सुबोध ॥ ४ ॥
ज्यानें नीचः महत्वा चढतो । प्रथमचि त्याचा; विनाश करतो ।
धूम अनल-संभव बघ भाई । विझवि तयातें; जैं घन. होई ॥ ५ ॥
रज पथिं पतित; अनादृत असते । सर्वांच्या पद;-लत्ता सहते ।
वायु उडवि; त्या, प्रथमचि भरते । मग नृप-नयनिं; किरिटीं चढते ॥ ६ ॥
श्रुणु खगपति या; बघुनि प्रसंगा । बुध नहि करिति; अधम-नर-संगा ।
कवि कोविद अशि; गाती नीती । न हि खल-कलह; बरा, ना' प्रीती ॥७॥
उदासीन प्रभु; नित्य रहावें । श्वाना-सम, खल; दूर करावे ।

१ त्याच्या द्रोहानें,

मी खल; हृदयीं; कपट, कुटिलता । गुरु हित वदती, रुचे न चित्ता ॥८॥

दो०— एकवार हर-मंदिरीं; जप करितां शिव नाम।
आले गुरु; मज गर्व अती; केला न, मी प्रणाम ॥१०६(क)॥
,, गुरु; दयाळ नाहीं वदले; मनिं न रोष लवलेश।
अति अघ, गुरु-अपमान हा; साहुं न शकति महेश ॥१०६(ख)॥

झाली मंदिरिं; मग नभ-वाणी । रे हतभाग्य; अज्ञ अभिमानी ।
यद्यपि तव; गुरुला ना क्रोध । अती कृपाळू; यथार्थ-बोध ॥ १ ॥
देतो शाप; तदपि शठ तुजला । नीति-विरोध न; रुचतो मजला ।
जरी न शासन; केलें तूझे । भ्रष्ट होति; श्रुति-मार्गचि माझे ॥ २ ॥
जे शठ गुरुशीं; ईर्षा करिती । रौरव नर्किं; कोटि युग पडती ।
तिर्यग्[1] योनीं; जन्मा जाती । अयुत-जन्म, बहु दुःख पावती ॥ ३ ॥
अजगर सम; बसलासी पापी । सर्प होसि खळ, अघ-मति-व्यापी ।
महा-विटप-कोटरांत जाउनि । राहासि, गति, अधमाधम पावुनि ॥४॥

दो०— हाहाकारहि करिति गुरु; दारुण ऐकुनि शाप।
कंपित मज पाहूनि अती; मनिं उपजे बहु ताप ॥ १०७ (क) ॥
,, प्रेमें नमन करूनि गुरू; शिवासि कर जोडून।
स्तुती करिति गद्गद रवें; घोर गती चिंतून ॥ १०७ (ख) ॥

छं०-भु. प्र.-नमामीश, मीशान निर्वाणरूपं। विभुं व्यापकं ब्रह्म-वेद-स्वरूपं।
निजं निर्गुणं; निर्विकल्पं निरीहं । चिदाकाशमाकाश-वासं भजेऽहम् ॥ १ ॥
निराकार मोंकारमूलं तुरीयं। गिराज्ञान-गोतीतमीशं गिरीशं ।
करालं, महाकाल-कालं कृपालं । गुणागार, संसार-पारं नतोऽहम् ॥ २ ॥
तुषाराद्रि[2]-संकाश-गौरं गभीरं । मनोभूत-कोटि प्रभा-श्री शरीरं ।
स्फुरन्मौलि कल्लोलिनी चारु गंगा । लसद्भाल-बालेन्दु कंठे भुजंगा ॥ ३ ॥
चलत्कुंडलं, भ्रू-सुनेत्रं विशालं । प्रसन्नाननं नीलकण्ठं दयालं ।
मृगाधीश चर्मांबरं मुंडमालं । प्रियं शंकरं सर्व नाथं भजामि ॥ ४ ॥
प्रचण्डं, प्रकृष्टं, प्रगल्भं परेशं । अखंडं अजं भानु-कोटि-प्रकाशं ।
त्रयः शूल-निर्मूलनं शूलपाणिं । भजेहं भवानी-पतिं भावगम्यम् ॥५॥
कलातीत, कल्याण-कल्पांतकारी । सदा सज्जनानंद-दाता पुरारी ।
चिदानंद-संदोह; मोहापहारी । प्रसीद, प्रसीद, प्रभो मन्मथारी ! ॥६॥
न यावद् उमानाथ पादारविंदं । भजंतीह, लोके परे, वा नराणां—।
न तावत्सुखं; शान्ति, संताप-नाशं । प्रसीद प्रभो; सर्व भूताधिवास ॥७॥

---

१ पशु वगैरे नीच योनीत. २ हिमालय.

न जानामि, योगं, जपं नैव पूजां । नतोऽहं सदा, सर्वदा शंभु तुभ्यं ।
जेरा जन्मु-दुःखौघ-तातप्यमानं । प्रभो पाहि, आपन्नमामीश शंभो ॥८॥
रुद्राष्टकमिदं प्रोक्तं विप्रेण हरशोन्तये ।
ये पठन्ति नराभक्त्या; तेषां शंभुः प्रसीदति ॥ ९ ॥
दो०— स्तव ऐकुनि सर्वज्ञ शिव; बघुनि विप्र-अनुराग ।
मग मंदिरिं नभ-गिरा वदे; "हे द्विजवर वरमाग" ॥ १०८ (क)
„ प्रसन्न झालां मजवरी; स्नेह नाथ जरि होइ ।
देउनि निजपद-भक्ति मज; मग दुसरा वर देइ ॥ १०८ (ख) ॥
„ तवमायावश जीव जड; संतत फिरति भ्रमांत ।
क्रोध न त्यांवरि करा प्रभू ; कृपासिंधु ! चित्तांत ॥ १०८(ग)॥
„ आतां शंभु दयाळु, बहु ; व्हावें यासि कृपाळ ।
शापानुग्रह होय जसा, नाथ अल्प ही काळ ॥ १०८ [घ] ॥
याचें होइ; परम कल्याण । तेंचि करावें कृपानिधान ।
द्विज-वच ऐकुनि; पर-हित-खाणी । एवमस्तु; झाली नभवाणी ॥ १ ॥
यदपि करी हा; दारुण पापा । कोपें मीं या; दिधले शापा ।
तुमची पाहुनि; तदपि साधुता । कृपा विशेषचि; करितो आतां ॥ २ ॥
क्षमाशील जे पर--उपकारी । द्विज ते प्रिय मज यथा खरारी ।
माझे शाप; मृषा ना होती । जन्म सहस्त्र; खास या घडती ॥ ३ ॥
जन्म मृत्यु, बहु; दुःसह असती । परि याला ते; दुःखद नव्हती ।
नष्ट होइना; कधिही ज्ञान । ऐक शूद्र मम; वचन प्रमाण ॥ ४ ॥
रघुपति नगरिं; जन्म तव झाला । लाविशि मम; सेवेंत मनाला ।
नगर प्रताप; अनुग्रह माझे । उपजे रामभक्ति मनिं तूझे ॥ ५ ॥
श्रुणु मम वचन; सत्य हें तात । हरि तोषाया द्विज--सेवा व्रत ।
न करीं आतां; द्विज--अपमान । मानी संत; अनंत, समान ॥ ६ ॥
इंद्र--कुलिश, मम; शूल विशाल । काल दंड, हरि--चक्र कराल ।
यांनीं मारुनि; जो ना मरतो । विप्ररोष; पावकिं, तो जळतो ॥ ७ ॥
विचार हा मनिं ठेवि सदाही । कांहीं दुर्लभ; मग तुज नाहीं ।
आणिक एक, आशिषा माझी । अप्रतिहत गति; होइल तूझी ॥ ८ ॥
दो०— ऐकुनि शिव वच मुदित गुरू; एवमस्तु बोलून ।

१ हें अष्टक मूळचेंच ठेविले आहे. २ मूळ ' हरतोषये ' आहे.

प्रबोधुनी मज जाति बहु; शिवपद हृदयिं धरून ॥१०९ [क]॥

दो०— काळे प्रेरित, विंध्यगिरीं जाउनि झालो व्यांळ[१]।
आयासाविण ती तनू; सोडूं जातां काळ ॥ १०९ (ख) ॥

,, धरूं देह तो त्यजूं मग; अनायास हरियान।
नव पट धारण करुनि जशीं; नर परिहरति[२] पुराण ॥१०९(ग)॥

,, शिव राखी श्रुति-नीति, मज; नाहीं अल्पहि क्लेश।
यापरि धरितां देह बहु; ज्ञान न नष्ट खगेश ॥ १०९ (घ) ॥

तिर्यक्सुर-नर; जी तनु धरितो । राम भजन तेथें अनुसरतों ।
एक शूल मज, विसर न झाला । गुरुचे कोमल स्वभाव-शीला ॥ १ ॥
विप्र-तनू; प्राप्त मज अंती । सुर दुर्लभः निगमागम गाती ।
खेळावें मग; बाळक-मेळीं । केल्या बहु; रघुनायक केली[३] ॥ २ ॥
होतां प्रौढ; पिता मज पढवी । ऐकुनि कळे; मनीं ना ठेवीं ।
मनो-वासना; एक न जागे । केवळ राम; चरणिं लय लागे ॥ ३ ॥
कवण असा वद, नाथ! अभागी। खरी[४] सेवि, सुर; धेनू त्यागी ।
प्रेम मग्न मन; कांहिं न रुचलें । मला पढवितां; तात हि थकले ॥ ४ ॥
मायबाप; काळाघरिं जातां । गेलो वनिं, हरि-भजना ताता ।
जिथें जिथें वनिं; मुनिवर दिसले। आश्रमिं जाउनि; चरण वंदिले ॥ ५ ॥
त्यानां पुसतों; हरि-गुण-गाथा । वदतां ऐकुं, मुदित, खगनाथा ।
ऐकत फिरुं; हरि-गुण अनुवादा । अव्याहत गति, शंभु-प्रसादा ॥ ६ ॥
गेल्या त्रिविध, एषणा गाढ । एक लालसे; मनिं अति वाढ ।
राम-चरण दर्शन जैं घ्यावें । सफल जन्म निज; तदा गणावें ॥७॥
ज्या पुसतो तो; मुनि मग सांगे । सर्वभूत-गत; ईश्वर वागे ।
निर्गुण मत मज; जरा रुचेना । सगुणाविण मनिं; कांहिं सुचेना ॥८॥

दो०— सद्गुरु वचनां स्मरुनि मन; राम-चरणिं आसक्त।
फिरूं रामयश वर्णित; घडि घडि मन अनुरक्त ॥ ११० (क)॥

इति श्री उत्तर-कांडे, गुर्वपमानादि विप्रजन्मकथा वर्णनं
नाम द्वादशोध्यायः ॥

---

१ सर्प. २ टाकतात. ३ लीला, क्रीडा. ४ गर्दभी; गाढवीण.

अध्याय १३ वा

दो०— मेरू शिखरिं वटछाये; लोमश मुनि आसीन।
बघुनि; चरणिं शिर वंदुनी ; वदलो वचनें दीन ॥ ११० (ख)॥
,, श्रवुनि वचन मम नम्र मृदु; कृपालु मुनि खगराज।
सादर मजला पुसति मग; द्विज येणें कां आज ॥ ११०(ग) ॥
,, मग वदलो कीं कृपानिधी; मुनि सर्वज्ञ सुजाण।
सगुण-ब्रह्म-आराधना; सांगा मज भगवान ॥ ११०(घ) ॥

मुनीश मग; रघुपति गुण-गाथा। सादर अल्प, वदति खगनाथा।
ब्रह्म-ज्ञान-रत; मुनि विज्ञानी। मजसि परम; अधिकारी मानी ॥१॥
लागे करूं; ब्रह्म उपदेश। अज, अद्वैत; अगुण; हृदयेश।
अकल अनीह, अनाम अरूप। अनुभव-गम्य, अखंड, अनूप ॥ २ ॥
मन-गोतीत; अमल अविनाशी। निर्विकार; निरवधि सुखराशी।
तो तूं त्यासि; तुजसि; नहि भेद। वारि-वीचि सम; म्हणती वेद ॥३॥
विविध परी मज; मुनि शिकवी तें-। निर्गुण मत; उतरे न गळीं तें।
मग वदलों मी; नमुनी शीस। सगुणोपासन; वदा मुनीश ॥ ४ ॥
रामभक्ति जाळिं; मम मन मीन। केविं विलग, मुनि ! करा प्रवीण।
तो उपदेश: करा मज सदया। या नयनीं पाहूं रघुराया ॥ ५ ॥
नेत्र भरूनि बघुं; हंस[१]-कुलेशा। ऐकूं मग; निर्गुण उपदेशा।
मुनि सांगुनि; हरि-कथा विलक्षण। सगुण खंडिती; अगुण निरूपण ॥६॥
मग मी निर्गुण; सारुनि दूरी। सगुण निरूपीं; हट्टें भूरी।
उत्तर प्रत्युत्तर मीं केलें। क्रोध-चिन्ह मुनि; देहिं उमटलें ॥ ३ ॥
श्रुणु प्रभु ! बहुत अवज्ञा करितां। क्रोध होइ बहु ज्ञानी-चित्ता।
अति संघर्षण; करितां कोणी। प्रकट होइ मग; चंदनिं अग्नी ॥ ४ ॥

दो०— वारंवार सकोप मुनी; करिति निरूपण ज्ञान।
बसुनी मी मग मम मुनीं; करीं विविध अनुमान ॥१११ (क)॥
,, द्वैत बुद्धिविण क्रोध नही; द्वैत न, विण अज्ञान।
मायावश, परिछिन्न जड; जीव किं ईश समान ॥ १११ (ख) ॥

सर्वां हितकर; दुःख न त्यासी। तया दरिद्र न; मणि ज्यापासी।
पर-द्रोही कीं; होति अ-शंक। राहति कीं; कामी अकलंक ? ॥ १ ॥
वंश टिके कां; द्विज-अहितानें। कर्म होय कीं; स्वरूप ज्ञानें ?

---

१ रविकुल-ईशाला श्रीरामाला. २ निर्गुण.

सुमति लाभ कधिं; खलसंगानें । सुगति मिळे कीं; पर-वधु-गमनें ? ॥२॥
पडे भवीं कधिं; परात्मविंदक । सुखी होय कधिं; कीं हरि-निंदक ? ।
राज्य टिके किं, नीति अज्ञानें । अघ राहिल कधिं; हरि-यश-गानें ?॥३॥
पावन यश किं; पुण्यविण होतें । अघविण अयश, जगीं कधि मिळतें ? ।
लाभ किं लव, हरि-भक्ति समान । जी गाती श्रुति; संत पुराण ? ॥ ४ ॥
या सम जगतिं; असे कीं हानी । राम न भजती; नर-तनु मिळुनी ? ।
अघ किं पिशुनतें; सम जगिं आन । धर्म किं दये-सरिस हरियान ? ॥ ५ ॥
यापरि अमित, तर्क मनिं केले । मुनिवचना नहिं; मनीं मानिलें ।
किंतिदां सगुण; पक्ष मी स्थापीं । वदले वच मग; मुनीश कोपी ॥ ६ ॥
मूढ ! परम उपदेश न मानिसि । उत्तर प्रत्युत्तर बहु अर्पिसि ! ।
सत्य वचनिं विश्वास न धरसी । वायस सम; सर्वांना डरसी ॥ ७ ॥
स्वपक्ष शठ तव; मनीं विशाल । सपदि होइं; पक्षी चांडाल ।
मुनीशाप मी; मस्तकें धरिला । नाहीं भय ना; दैन्य मनाला ॥ ९ ॥

दो०— त्वरित जाहलो काक मग; मुनि-पदिं शिर वंदून ।
स्मरत राम, रघुवंशमणी; हर्षित निघें उडून ॥ ११२ (क) ॥

दो०— राम चरणिं जे उमे रत; विगत-काम-मद-क्रोध ।
प्रभुमय निज बघती जगत; करिति कुणास विरोध ? ॥११२(ख)

खगेश बघ हें नहि ऋषि-दूषण । हृदयीं प्रेरक; रघुकुल-भूषण ।
कृपासिंधु, मुनि-मति भुलवीती । माझी प्रेम; परीक्षा घेती ॥ १ ॥
तनुमन वचनें; बघूनि निज जन । मुनि-मति फिरविति; मग भगवान ।
मुनि मम साधु-शीलता बघुनी । दृढ विश्वास, तसा हरि चरणी--॥२॥
अति विस्मित; परितप्त जाहला । बोलाविति मग; सादर मजला ।
मम परितोष; किती तरि केला । हर्षें, राम-मंत्र मज दिधला ॥ ३ ॥
बालक, श्री-रामाचें ध्यान । सांगे मुनि मज; कृपानिधान ।
सुंदर सुखद; मला अति रुचलें । जें मीं पूर्वी; तुम्हां वर्णिलें ॥ ४ ॥
कांहिं काळ मुनि; ठेवुनि घेती । राम-चरित-मानस मग देती ।
सांगुनि मजासि; कथा ही सादर । मग वदले; मुनि; वाणी सुंदर ॥ ५ ॥
राम-चरित सर; गुप्त सुरम्य । शंभु-प्रसादें मला सुगम्य ।
राम-भक्त तुज; खास जाणुनी । वदलों हें मीं; सर्व वर्णुनी ॥ ६ ॥
रामभक्ति मनिं; ज्यांचे नाहीं । वदसि न तात; तयांस कदाही ।
मुनिनें बहुविध; मला शिकविलें । प्रेमें मीं मुनि,-पदिं शिर नामिलें ॥७॥
मग निजकर; ठेवुनि मम शीर्षा । मुदित मुनीश; देति आशीषा ।
रामभक्ति दृढ; हृदयीं तूझे । सदा वसेल; कृपेनें माझे ॥ ८ ॥

दो०— सदा राम प्रिय व्हाल तुम्हीं; शुभ-गुण-भवन अमान ।
कामरूप इच्छामरणी; ज्ञान-विराग-निधान ॥ ११३ (क) ॥
,, ज्या आश्रमीं निवास तव; स्मरण करित भगवंत ।
तिथें अविद्या येइ ना; एक योजना आंत ॥ ११२ (ख) ॥

काल-कर्म-गुण-दोष-स्वभावें - । जनित दुःख तुज; विदित न मावें ।
राम-रहस्य; ललित विध नाना । प्रगटे गुप्त इतिहास पुराणां ॥ १ ॥
श्रवण विना; तुज सर्वहि येवो । प्रभू-प्रेम नव; नवीन होवो ॥
जी इच्छा; करिशी मनिं कांहीं । प्रभु-प्रसादें दुर्लभ नाहीं ॥ २ ॥
ऐकुनि मुनि-वर, श्रुणु मतिधीरा । ब्रह्मगिरा मग; नभिं गंभिरा ।
'एवमस्तु' तव वच मुनि ज्ञानी । हा मम भक्त; कर्म-मन-वाणीं ॥ ३ ॥
ऐकुनि गिरा; हर्षमज झाला । प्रेम-मग्न मी; संशय सरला ।
विनति करुनि; मुनि-आज्ञा घेउनि । पद-कमळीं शिर; कितिदां ठेवुनि ॥४
अति हर्षे या; आश्रमि आलो । प्रभु प्रसाद; दुर्लभ वर; घालो ।
येथें वसतां; श्रुणु पक्षीशा । गेले कल्प सात, अणि वीस ॥ ५ ॥
कारितों नित्य; राम-गुणगान । ऐकति सादर; विहग सुजाण ।
जैं जैं कोशल;-पुरिं रघुवीर । धरिति भक्तहित; मनुज-शरीर ॥ ६ ।
तदा रामपुरिं; जाउनि वसतो । शिशु-लीला; बघुनी सुख लुटतो ।
हृदयिं धरुनि मग;-प्रभु शिशुरूपा । आश्रमिं येतो; मी खगभूपा ॥ ७ ॥
कथा सकल मी; तुला वर्णिली । काक-तनू मज; कशी मिळाली ॥
प्रश्न तुझे वदलो या सारे । रामभक्ति-महिमा अति बारे ! ॥ ८ ॥

दो०— म्हणुनी ही तनू प्रिय मजला; प्राप्त रामपद-स्नेह ।
निज प्रभु दर्शन पावलो; विगत-सकल संदेह ११४ (क) ॥

इतिश्री उत्तरकाण्डे काकभुशुंडि लोमश-संवादो-नाम त्रयोदशोऽध्यायः
मास-पारायणे नवविंशति-तमो विश्रामः ॥

अध्याय १४ वा

दो०— भक्ति मार्गिं धरिला हट; झाला महर्षि शाप[१]
मुनि दुर्लभ वर पावलो; पाहे भजन-प्रताप ॥ ११४(ख) ॥

जाणुनि हें; भक्ती परिहरती । ज्ञाना;-स्तव चि वृथाश्रम करती

१ मुनीचा वर.

ते जड, काम-धेनु घरिं त्यजिती । पयालागिं; अर्कास शोधिती ॥ १ ॥
शृणु खगेश; हरि-भक्ति सोडुनी । जे सुख इच्छिति; अन्य साधनीं ।
ते शठ महा सिंधु; विण तरणी । पोहुनि तरुं बघती जड-करणीं ! ॥२॥
ऐकुनि भुशुंड;-वचन भवानी । बोले गरुड; मुदित मृदु वाणी !
नाथ-प्रसादें; मम मनिं कांहीं । संशय शोक, मोह भ्रम नाहीं ॥ ३ ॥
परिसुनि पावन; हरिगुण-ग्राम । तुम्हां-कृपें; झाला विश्राम ।
एक गोष्ट प्रभु; पुसतो तुजला । कृपा-निधे; सांगावें मजला ॥ ४ ॥
वदति संत मुनि वेद पुराण । कांहि न दुर्लभ; ज्ञान-समान ।
मुनिनें तेंचि; तुम्हांला दिधलें । भक्तीसम ना; प्रभु आदरिलें ॥ ५ ॥
भक्ती-ज्ञानां; कैसें अंतर । कृपाब्धि सांगा; सकल भक्तवर ! ।
गरुड वचन; ऐकुनि सुख मानी । सादर भुशुंडि; बोल ज्ञानी ॥ ६ ॥
भक्ती-ज्ञानां; नाही भेदहि । उभय हरिति; भव-संभव खेदहि
मुनीश वर्णिति; कांहीं अंतर । सावधान ते; ऐक विहगवर ॥ ७ ॥
ज्ञान विराग; योग, विज्ञान । हे सब पुरुष, ऐक हरि यान !
पुरुष-प्रताप; प्रबल सब रीतीं । अबला अबल; सहज जड-प्रीती ॥ ८ ॥

दो०— त्यजूं शकति नर नारिसी; जे विरक्त मतिधीर ।
न तु कामी विषयीं रत; विमुख, चरण रघुवीर ॥११५ क)॥

सो०— ते मुनि ज्ञान निधान; मृग-नयनी-विधुमुख बघुनि ।
विवश होति हरियान; नारि विष्णुमाया प्रगट ॥ ११५(ख)॥

पक्षपात मी; मुळीं न करतो । वेद, पुराण, संत मत वदतो ।
नारि न मोहे; नारी—रूपा । पन्नगारि ही; रीति अनूपा ॥ १ ॥
माया भक्ति, ऐक या दोन्ही । नारि वर्ग सब; जाणति कोणी ।
परि रामा भक्ती प्रिय भारी । माया खलु; नर्तकी बिचारी ॥ २ ॥
भक्तिस सानुकूल रघुराया । म्हणुनी तिज; डरत अति माया ।
रामभक्ति; निरुपम, निरुपाधी । शुद्ध हृदयिं ज्या; वसते आधीं ॥ ३ ॥
माया त्याला; बघुनि लाज । करूं शकेना; निज-बल मग ते ।
हें जाणुनि जे; मुनि विज्ञानी । याचिति भक्ति; सकल-गुण-खाणी ॥४॥

दो०— रघुनाथाचें रहस्य हें; सत्वर चित्तीं न येइ ।
जरि जाणिति रघुबीर कृपे; स्वप्निंहि मोह न होइ ॥११६ (क)॥

१६३ च ज्ञाड.

दो०— ज्ञान–भक्तिचा भेद श्रुणु; अन्य खगेश ! प्रवीण ।
ऐकुनि होई रामपदीं; प्रीति सदा अक्षीण ॥ ११६ (ख) ॥

ऐक तात ही; अकंथ कहाणी । शक्य संमजणें; वदे न वाणी ।
ईश्वर–अंश; जीव अविनाशी । चेतन, अमल; सहज-सुखराशी ॥ १ ॥
माया वश तो, नाथ ! जाहला । शुक मर्कट सम; बंध पावला ।
ग्रंथी पडली जड चैतन्या । यदपि मृषा तरि; कठीण सुटण्या ॥ २ ॥
म्हणुनी जीव; होइ संसारी । ग्रंथि सुटेना; सुख न तिळभरी ।
श्रुति पुराण, बहु; उपाय वदती । तरी सुटेना; अधिक घट्ट ती ॥ ३ ॥
जीव-हृदयिं तम; मोह, विशेष । ग्रंथि सुटे कशि ? दिसे न लेश ।
असा योग जैं; रघुवर देती । तदा कदाचित; गांठ सुटे ती ॥ ४ ॥
श्रद्धा; सात्विक धेनु शोभना । जरि हरिकृपे; हृदयिं करि सदना ।
व्रत जप, तप, यम; नियम अपार । वेद विदित; शुभ धर्माचार ॥ ५ ॥
हें तृण हरित; चरे जैं नाना । भाव वत्स; पाहुनि दे पान्हा ।
रज्जु निवृत्ति; पात्र विश्वास । निर्मळ मन; गौळी निजदास ॥ ६ ॥
परम धर्ममय; काढुनि दूध । तापवि अकाम-अनलीं शुद्ध ।
क्षमा तोष; पवनानें निववी । धृति, शम, विर्जण; तयांत मिळवी ॥ ७ ॥
विवेक रवि; मुदिता चि माथणी । दम अधाँर, गुणँ सत्य सुवाणी ।
काढुनि घे, मथुनी; नवनीत । विमल विराग; सुभग, सुपुनीत ॥ ८ ॥

दो०— योग अनल प्रगटूनि मग; कर्म शुभां लावून ।
बुद्धी झाकी, ज्ञान घृत; ममता मळ जाळून ॥ ११७ (क) ॥
,, मति विज्ञान–रूपिणी; विमल घृता पावून ।
चित्त–दिवा भरि; ठेवि दृढ; समता दिवँट करून ॥ ११७ (ख) ॥
,, तीन अवस्था तीन गुण; कापुस हा मग काढि ।
तूल तुरीयँा निवडुनी; वाती करी सुगांढि ॥ ११७ (ग) ॥
सो०— ऐसा लावी दीप; तेज राशि विज्ञान–मय ।
जातां जया समीप; जळति मदादि शलभ सब ॥ ११७ (घ) ॥

सोहमास्मि ही वृत्ति अखंडा । दीप-शिखा ती महा प्रचंडा ।
निजात्म–अनुभव,–सौख्य प्रकाश । तैं भवमूल; भेद–भ्रम,–नाश ॥ १ ॥
प्रबल अविद्येच्या परिवार – । मोह आदि तम; नासे पार ।

---

१ अनिर्वचनीय. २ ताक करण्याची. ३ घुसळ खांब. ४ रज्जु. ५ गोवऱ्या, शेणी. ६ दिवटणें. ७ तुरीयावस्था. ८ भक्रम. ९ गाईचे पाय बांधण्याची दोरी. १० दिव्याची ज्योत.

मग बुद्धिस त्या प्रकाश-जोडी । हृद्-गृहिं बसुनि; ग्रंथि तो सोडी ॥२
ग्रंथि भेद जैं; जीव पावतो । तदाचि तो जगिं; कृतार्थ होतो ।
सुटते ग्रंथि; बघुनि खगराया ! । विघ्न अनेक; करी तैं माया ॥ ३ ॥
ऋद्धि सिद्धि मग; धाडुनि देई । लोभ दाविती; मतीस भाई ! ।
कळीं, छळें-बळें; जाति समीप । पदर वायुनें विझविति दीप ॥ ४ ॥
होय बुद्धि जरि; परम शहाणी । बघे न त्यांसी; अनहित मानी ।
जरि हें विघ्न न: बुद्धिस बाधी । देवे करिति मग; बहुत उपाधी ॥ ५ ॥
गो-गोलकें; झरोके नाना । सुर बसले बहु; मांडुनि ठाणा ।
येतां बघुनि; विषय-पवनातें । बळें उघडिती; सुर दारातें ॥ ६ ॥
जैं तो वायु, हृदय-गृहिं शिरतो । तदा दीप; विज्ञान विझवितो ।
प्रकाश गेला; ग्रंथि न सुटली । विषय वायुनें मती विकळली ॥ ७॥
करण-सुरांनां; ज्ञान न प्रिय तें । सदाचि रुचिकर; विषय-भोग ते ।
विषय-समीरें; बुद्धि बावळी । पुन्हां दीप हा; कोण पाजळी ॥ ८ ॥

दो०— जीव पुन्हा; मग त्रिविध-विध; पावे संसृति क्लेश ।
हरिमाया अति दुस्तर; तरवेना विहगेश ॥ ११८ (क) ॥
वदत कठिण, समजत कठिण, साधन कठिण विवेक ।
होइ घुणाक्षर न्याय जरी तरि विघ्नेंहि अनेक ॥ ११८ (ख) ॥

ज्ञान मार्ग हा, प्रभु ! असिधार । पतन पावण्या; नलगे वार ।
जे निर्विघ्न; पंथ आक्रमिती । त्यां कैवल्य; परम-पद-प्राप्ती ॥ १ ॥
अति दुर्लभ; कैवल्य परम गति । संत पुराण; निगम ही वदती ।
राम भजत ती; मुक्ति चाकरी-। करण्या संनिध येते जबरीं ॥ २ ॥
स्थळ-विण जळ, कधिं रहात नसतें । अनंत करितां; यत्न विविध ते ॥
तथा मोक्ष-सुख; बघ खगराया । राहीना, हरि-भक्ति विना या ॥ ३ ॥
जाणुनि हें; हरिभक्त विवेकी । मुक्ति अनादरि भक्ति लुब्ध कीं ।
भक्तिबळें, चि · विना आयासें । संसृति-मूळ, अविद्या नासे ॥ ४ ॥
करिती भोजन; तृप्ती-लागी । अशना पचवि; जशी जठरागी ।
तशि हरि भक्ति; सुगम सुखदाई । कोण मूढ ज्या; प्रिय नहिं भाई ? ॥५॥

दो०— सेवक-सेव्य-भाव विणा; भव न तरति उरगारि ।
भजा राम-पद-पंकजा; हा सिद्धांतचि भारि ॥ ११९ (क) ॥

---

१ प्रकाशाची जोड, सहाय्य, २ अंतःकरणरूपी घरात, ३ युक्ती, ४ कपट, ५ इंद्रिय देवता, ६ इंद्रिय द्वारें, ७ व्याकुळ झाली ८ जबरीनें, ९ जठरांतील आग !

दो०— चेतनासि जो करी जड; जडा करी चैतन्य।
अशा समर्था; रघुपतिसी; भजति जीव ते धन्य ॥ ११९ (ख)॥

इति श्री उत्तरकांडे भक्तिज्ञानभेद निरूपणादि ज्ञानदीपको
नाम चतुर्दशोऽध्यायः ॥

अध्याय १५ वा

वदलो ज्ञानदीप सिद्धान्ता । ऐका भक्ति मणीची प्रभुता
रामभक्ति; चिंतामणि सुंदर । वसे गरुड; दृढ; ज्याचे अंतर ॥ १ ॥
परम-प्रकाशरूप; दिन-रातीं । कांहीं नको, दिवा घृत वाती ।
मोह दरिद्र; मुखा ना दावी । लोभ वात नहिं; तयासि विझवी ॥ २ ॥
प्रबल अविद्या; तम लय होय । पळतो सकळ; शलभ समुदाय ।
खल कामादि; निकट ना येती । वसे भक्तिमणि; ज्याचे चित्तीं ॥ ३ ॥
गरल सुधा सम; रिपु हित करिती । या मणि-विण सुख कुणी न वरिती।
व्यापिति मानस; रोग न भारी । ज्यां वश जीवां; दुःखें सारीं ॥ ४ ॥
रामभक्ति-मणि; चित्तीं ज्यांचे । नसे दुःख लव; स्वप्नींहि त्यांचे ।
चतुर-शिरोमणि; तेचि जगीं या । सुयत्न करिती; मण्या लागिं या ॥५॥
हा मणि जरी; प्रगट जगिं आहे । राम-कृपे-विण; न हि मिळताहे ।
सुगम उपाय; पावण्या यातें । नर हतभागी; उडविति लाथे ॥ ६ ॥
पावन गिरि; निगमागम नाना । राम-कथा; रुचिराकर नाना ।
मर्मी सज्जन; सुमति खनित्र । ज्ञान विरक्ती; नेत्र पवित्र ॥ ७ ॥
शोधिल जो; सद्भावें प्राणी । भक्ति-मणी पावे सुखदानी ।
माझे मनिं हा; दृढ विश्वास । अधिक हरीहुनि हरिचे दास ॥ ८ ॥
रामसिंधु; घन सज्जन, धीर, । चंदन तरु हरि; संत समीर, ।
सब-साधनशुभ; फळ हरिभक्ती । सत्संगाविण; कधि ना प्राप्ती ॥ ९ ॥
जाणुनि हें; धरिती सत्संगा । रामभक्ति त्यां; सुलभ विहंगा ॥१०॥

दो०— वेद पयोनिधि, मंदर; ज्ञान, संत, सुर, खास।
कथा सुधा, काढिति मथुनी; भक्ति-मधुरता, ज्यांस॥ १२० (क)॥

---

१ सुंदर खाणी, २ कुदळी, पावडें, पहार.

दो०— विरति ढाल; ज्ञानासिनें; लोभ मदादि अशेष ।
रिपु मारुनि देते विजय, ती हरिभक्ति खगेश ॥ १२० (ख)॥

प्रेमें[1] मग; बोले खगराया । कृपालु जरि मजवरि तव माया ।
नाथ मजसि निज; सेवकजाणुनि । प्रश्न सप्त मम; सांगा विवरुनि ॥ १ ॥
सांगा प्रथम, नाथ अति धीर । अतीव दुर्लभ; कवण शरीर ।
बहु दुख कवण; कवण सुख भारी । संक्षेपें; सांगा; सुविचारी ! ॥ २ ॥
संत असंत, मर्म तुम्हि जाणां । सहज लक्षणें; त्याचीं वाना ।
कवण पुण्य; श्रुति-विदित विशाल । वदा कवण अघ; परम कराल ॥ ३ ॥
मानस रोग; वदा मज सादर । प्रभु ! सर्वज्ञ; कृपा बहु मजवर ।
ऐक तात ! सादर; या प्रीतीं । संक्षेपें ही; सांगूं नीती ॥ ४ ॥
नर तनु सम नहि; अन्य शरीर । तेंचि याचिती; जीव चराचर ।
स्वर्ग नर्क; अपवर्ग निसरैणी[2] । ज्ञान विरक्ती; भक्ति वितरणी[3] ॥ ५ ॥
ती तनुधर, हरि भजति न जे नर । असति विषयरत; मंद मंदतर ।
फुटक्या काचा; बदला घेती । स्पर्श-मणी ते; फेकुनि देती ॥ ६ ॥
दुःख न, अज्ञाना[4] सम कांहीं । संत संग सम; सुख जगिं नाहीं ।
पर उपकार; वचन मन काया । संत-स्वभाव; सहज खगराया ॥ ७ ॥
संत सहति दुख; परहित-लागी । पर दुःखार्थ; असंत अभागी ।
भूर्ज-तरूसम; संत कृपाल । सहति परार्थ; विपत्ति विशाल ॥ ८ ॥
सणं[5] सम खल पर; बंधन करती । साल काढवुनि; दुःखें मरती ।
स्वार्थाविण खल; पर-अपकारी । अहि मूषक इव श्रुणु उरगारी ॥ ९ ॥
नासुनि पर;-संपदा, नासती । गारा नासुनि धान्य; वितळती ।
दुष्ट उदय जग;-दुःखा हेतु । यथा प्रसिद्ध; अधम ग्रह केतु[6] ॥ १० ॥
संत-उदय; संतत सुखकारी । विश्व सुखद सम; इंदु-तमारी[7] ।
परम धर्म, श्रुति; विदित अहिंसा । पर-निंदा-सम; अघ न खगेशा ॥ ११ ॥
हर-गुरु-निंदक; दर्दुर[8] होती । सहस्त्र जन्म हि; तेचि पावती ।
द्विज-निंदक बहु, निरय भोगुनी । जन्मति वायस-देह पावुनी ॥ ११२ ॥
श्रुति सुर निंदक; जे अभिमानी । रौरव नर्कि; पडति ते प्राणी ।
होति उलूक; संत-निंदा-रत । मोह निशा-प्रिय; ज्ञान-भानु-गत ॥ १३ ॥

१ प्रेम. २ सोपान परंपरा, शिडी. ३ देणारी. ४ मूळांत 'दरिद्र'—दारिद्य हा शब्द आहे. पण द्रारिद्य म्हणजेच अज्ञान, ॥ अज्ञान द्रारिद्य माझें सरेना ॥ (समर्थ) ५ ताग, अंबाडी. ६ धुमकेतु. ७ चंद्र सूर्य. ८ बेडूक.

सब-जन-निंदा; जे जड करती । वट-वाघुळ; होउनि अवतरती ।
आतां ऐका; मानस रोगां । जेणें भोगिति; सु-दुःख भोगां ॥ १४ ॥
मोह सकल; व्याधींचें मूळ । त्या पासुनि बहु; उपजति शूळ ।
काम वात; कफ लोभ; अपाड, । क्रोध पित्त उर; जाळी द्वाड ॥ १५ ॥
प्रीति करिति जरि; तीन्ही भाई । उपजे, सन्निपात दुखदाई ।
विषय मनोरथ; दुर्गम नाना । तेचि शूल; नहि; नामां गणना ॥ १६॥
ईर्षा कंडू; दद्रू ममता । हर्ष शोक; गल-रोग विपुलता ।
डबा दुःखकर; अहंकृती ते । दंभ, कपट, मद; मान, नारु ते ॥१७ ॥
तृष्णा उदर-वृद्धि अति घोरा । त्रिविध एषणा, प्रबल तिजारा ।
क्षय जळणें, पर-सौख्ये बघतां । कुष्ट दुष्टता, चित्त-कुटिलता ॥ १८ ॥
दोन्ही ज्वर; मत्सर अविवेक । सांगूं किती; कुरोग अनेक ! ॥ १९ ॥

दो०— एक रोगवश मरति नर; या असाध्य बहु व्याधि ।
जीवां पीडिति संततचि; पावे कशी समाधि ॥ १२९ (क) ॥
,, नेम धर्म आचार तप, ज्ञान यज्ञ जप दान ।
भेषज कोटी करुनि न हें; रोग जाति हरियान ॥ १२१ (ख)॥

ऐसे सकल, जीव, जगिं रोगी । शोक, हर्ष, भय, प्रीति वियोगीं ।
मानस रोग; कांहिं म्यां कथिले । असती सकळां विरळां कळले ॥१॥
जाणुनि; जरा क्षीण हे पापी । नाश न पावति; जन-परितापी ।
विषय कुपथ्यें; फुटती अंकुर । मुनि-चित्तीं; मग नर किति पामर !२
रामकृपें हे; नासति रोग । जरि ऐसा; येई संयोग ।
सद्गुरु-वैद्य,-वचनिं विश्वास । संयम हा चि, न; विषयीं आस ॥ ३॥
रघुवर भक्ति; मुळी संजीवन । श्रद्धा अनूपान अति पावन ।
अशा सुयोगें; रोग नासती । अनंत यत्नें; न तरि, न जाती ॥४॥
तदा निरामय; मन जाणावें । यदा विरक्तिस बहु पावावें ।
क्षुधा सुमति बहु; नित्य वाढते । विषयाशा, दुर्बलता उडते ॥ ५ ॥
ज्ञान विमळ जळिं; यदा नाहती । तैं वसते चित्तीं हरिभक्ती ।
शिव, अज, शुक सनकादिक नारद । मुनि जे ब्रह्म;-विचार विशारद ॥६॥
सर्वांचे, खग;-नायक हें मत । हरि-पद-पद्मीं; सदैव व्हा रत ।
पुराण; शास्त्रें; श्रुति वदती ही । रघुपति भक्ति-विना सुख नाहीं॥७॥
कमठ पृष्ठि जरि; उगती वाल । वंध्यासुत जरि; कोणि वधाल ।

---

१ शिरा-रोग. २ चातुर्थिक ज्वर. ३ समतावस्था, शान्ति. ४ निरोगी, ५ रोम, केस.

गगन फुले जरि; बहु-विध फूल। जीवा सुख नहिं;हरि, हरि-प्रतिकूल ॥८॥
तृषा-शान्ति जरि मृगजळ पानें । फुटती जरि शश-शिरीं विषाणें।
तिमिरें जरि; रविला पळवावें । राम-विमुख सुख, जीव न पावें ॥९॥
जरि हिम प्रगटवि; अनला आणा । राम-विमुख, सुख;-लाभ न कोणा१०

दो०— वारि मथुनि जरि मिळे घृत; सिकते पासुनि तेल ।
"विण हरिभजन न भव तरती;" वच कधिं हें न टळेल॥१२२॥
,, मशका करिति विरंचि प्रभू; विधि मशकाहुनि हीन।
हें जाणुनि संशय त्यजुनी; भज रघुवरा प्रवीण ? ॥ १२२ (ख) ॥

प्रमाणिकाः—विनिश्चितं वदामि ते न अन्यथा वचांसि मे ।
हरिं नरा भजंति येऽति दुस्तरं तरन्ति ते ॥ १२२ (ग) ॥

इति श्री उत्तरकांडे; भक्ति मणि;-सप्त प्रश्न -विवेचनं नाम
पंचदशोऽध्यायः ॥

अध्याय १६ वा

कथित नाथ; हरि चरित अनूप । व्यासें समासें; स्वमति अनुरूप ।
श्रुति सिद्धांत; हाचि उरगारी । सकल सांडुनी; भजा खरारी ॥ १ ॥
कोणा भजूं; त्यजुनि रघुपतिसी । मज मूढावरि; ममता ज्यासी ।
तुम्हि विज्ञानरूप नहि मोहो । केली मजवरि; नाथ ! कृपा हो ॥ २ ॥
पुसिली राम; कथा अति पावनि । शुक सनकादि; शंभु-मन-भावनि ।
सत्संगति जगिं; दुर्लभ फार । निमिष, घडीभर; एकहि वार ॥ ३ ॥
बघा गरुड निज;-मनीं विचारी । मी रघुवीर भजन अधिकारी ! ! ॥
शकुनाधम; अत्यंत अपावन । प्रभु मज करी; विदित जग-पावन ॥४॥

दो०— आज धन्य मी धन्य अती; यद्यपि हीन अपार ।
निज जन जाणुनि देति प्रभू ; संत-समागम फार ॥ १२३ (क)॥
,, वदलो नाथ यथामती, गुप्त ठेविलें नाहिं ।
चरित-सिंधु रघुनायक; ठाव किं लागे कांहिं ॥ १२३ (ख) ॥

स्मरतां रघुवर;-गुण-गण नाना । पुनरपि हर्षित भुसुंडि जाणा ।
नेति नेति महिमा श्रुति वदती । प्रताप अतुलित; प्रभुता बल तीं ॥ १ ॥
शिव-अज-पूज्य;-चरण रघुराय । मजवरि कृपा ! परम मृदु हृदय ।
असा स्वभाव न; ऐकूं देखूं । कुणा गरुड ! ; रघुपतिसम लेखूं ॥२॥

---

१ विस्तारानें; २ थोडक्यात. ३ नीच पक्षी.

साधक, सिद्ध; बिमुक्त, उदासी, । कवि, कोविद, कृतज्ञ, संन्यासी,-।
योगी, शूर, सुतापस, ज्ञानी, - । धर्म-निरत; पंडित विज्ञानी- ॥ ३ ॥
तरति न भजनाविण मम स्वामी । राम नमामि, नमामि नमामी ।
जाइ शरण; मजसा अघराशी । होइ शुद्ध, नमामि अविनाशी ॥ ४ ॥

दो०— भवभेषज यन्नाम शुभ; हरण घोर त्रय शूल ।
तो कृपाळु मज तुजवरी; सदा असो अनुकूल ॥ १२४ (क) ॥
,, ऐकुनि भुशुंडि वचन शुभ; बघुनि राम-पद-स्नेह ।
वदले प्रेमळ गिरा अती; गरुड विगत-संदेह ॥ १२४ (ख) ॥

मी कृतकृत्य; असें तव वाणी । ऐकुनि राम;-भक्ति रस-खाणी ।
राम चरणिं; नूतन रति झाली । माया जनित; विपत्ती गेली ॥ १ ॥
मोह-सागरीं; नाविक बनलां । सुखद अती मज; नाथ ! जाहलां ।
कांहि न होई; प्रत्युपकार । नमितो तव पद; वारंवार ॥ २ ॥
काम सुपूर्ण: राम अनुरागी । नाथ न तुज सम; कुणि बहु-भागी[2] ।
संत, विटप, सरिता, गिरि धरणी । यांची सब, पर-हितार्थ करणी ॥ ३ ॥
संत हृदय, नवनीत समान- । म्हणति कवी; त्यां नकळे जाण ।
निज परितापें; द्रव नव-नीता । द्रव पर-दुःखें; पुनीत संतां ॥ ४ ॥
जीवन, जन्म, सुफळ मम झाला । नाथ कृपेनें; संशय सरला ।
समजा मला; सदा निज-किंकर । कितिदां वदले: उमे विहगवर[3] ॥ ४ ॥

दो०— त्याचे चरणीं नमुनि शिर; प्रेम सहित, मति धीर ।
जाति गरुड वैकुंठि मग; हृदयिं धरुनि रघुवीर ॥ १२५(क)॥
दो०— गिरिजे संत-समागम, सम न लाभ लव आन ।
तो न मिळे प्रभु-कृपे-विण; गाती वेद पुराण ॥ १२५(ख) ॥

परम पुनीत; कथित इतिहास । करितां श्रवण; तुटति भव-पाश ।
प्रणत-कल्पतरु; करुणापुंजीं- । उपजे प्रीति; रामपद-कंजीं ॥ १ ॥
तनुमनवचन,-जनित अघ जातें । कथा श्रवण, करितां मन-चित्तें ।
तीर्थाटन, साधन समुदाय । योग विराग; ज्ञान-चातुर्य ॥ २ ॥
नाना धर्म कर्म व्रत दानां । संयम जप तप; दम मख नाना-।
द्विज,-गुरु-सेवा; भूत सदयता । विद्या विनय, विवेक महत्ता ॥ ३ ॥
-साधन, जितुकें श्रुति वाखाणी । सर्वां फळ, हरि-भक्ति भवानी ।
ती रघुनाथ,-भक्ति श्रुति-गीता । राम-कृपें; कोणा तरि प्राप्ता ॥ ४ ॥

दो०— मुनि दुर्लभ हरि-भक्ति नर; पावति विना प्रयास ।

१ ज्याचे नाम. २ महाभाग्यवान. ३ पक्षिश्रेष्ठ—गरुड.

जे ही कथा निरंतर; ऐकति युत विश्वास ॥ १२६ ॥
तो सर्वज्ञ; गुणी तो ज्ञाता । तो महि-मंडन; पंडित दाता ।
धर्म परायण; तो कुल-पाता । रामचरण-रति; ज्याचे चित्ता ॥ १ ॥
नीति-निपुण तो; संयुत ज्ञानें । श्रुति सिद्धांत; ठीक तो जाणे ।
तो कवि, कोविद; तो रणधीर । जो छलहीन; भजे रघुवीर ॥ ५ ॥
धन्य देश तो; जिथें सुरसरी । धन्य नारि जी; पति-व्रत-धारी।
धन्य भूप जो; नीती पाळी । धन्य विप्र निज; धर्म न टाळी ॥ ३ ॥
तें धन धन्य; प्रथमें गति ज्याची। धन्य, पुण्यरत: मति जी साची ।
धन्य घडी ती; जैं सत्संग । धन्य जन्म; द्विज-भक्ति अभंग ॥ ४ ॥
दो०— तें कुल धन्य उमे श्रुणू; जगत्पूज्य सुपुनीत ।
श्री रघुवीर-परायण; उपजे नर सुविनीत ॥ १२७ ॥
मति अनुरूप; कथा ही कथिली । प्रथम यद्यपि मीं; गुप्त ठेविली
प्रीती; तव मनिं बघुनि अपार । वदलो राम-कथा सुखसार ॥ १ ॥
सांगा ही न; शठा हठ-शीला । प्रेमें श्रवण न; करि हरि लीला ।
किंवा क्रोधी; लोभी, कामी । जे न भजति; सचराचर स्वामी ॥ २ ॥
ही न वदावी; द्विज-द्रोह्याला । सुरपति-सम तो: नृप जरि झाला ।
राम-कथेचे; ते अधिकारी । सत्संगति अति; ज्या प्रिय भारी ॥३॥
गुरुपदिं निरत; नीतिरत जे ही । द्विज सेवक; अधिकारी तेही ।
त्याना विशेष, ही सुखदायक । प्राणप्रिय ज्यां श्री रघुनायक ४ ॥
दो०— राम-चरणिं रति वांछि जो; अथवा पद निर्वाण ।
भाव सहित तो ही कथा; करो श्रवणपुटिं पान ॥ १२८ ॥
उमे हरिकथा; केली वर्णन । कलिमल-शमन; मनोमल-नाशन ।
संसृति-रोग-विनाशन चूर्ण-। रामकथा: गाती श्रुति पूर्ण ॥ १ ॥
या माधिं रुचिर; सप्त सोपान । रामभक्तिचे; शुभ पथ जाण
ज्यां वरि राम; कृपा बहु करिती । तेचि सुजन या; मार्गा धरिती ॥ २॥
मनें-कामना; सिद्धितें जाती । त्यजुनि कपट जरि; चरित्र गाती ।
श्रवण, कथन; अनुमोदन करिती । ते गोपद इव; भवनिधि तरती ॥ ३ ॥
ऐकुनि कथा; मनीं अति भरली । गिरिजा रम्य; वचन मग वदली ।
नाथ ! कृपेनें; गत संदेह । राम-चरणिं नव; झाला स्नेह ॥४॥
दो०— झालें मी कृत कृत्य अतां; प्रसाद तव विश्वेश ! ।
राम भक्ति दृढ उपजली; विगत सर्व ही क्लेश ॥ १२९ ॥

---

१ कुळांचा उद्धार करणारा. २ दान, भोग व नाश यातलि पहिली.

हा शुभ शंभु;–उमा संवाद। सुखसंपादन; शमन विषाद।
भव-भंजन, गंजन संदेहां। जन-रंजन; सज्जन-प्रिय तो हा॥ १॥
राम उपासक; जे जगिं कांहीं। या सम त्यां; कांहीं प्रिय नाहीं।
रघुपति कृपें; यथामति गायन-।-केलें सुंदर; चरित्र पावन॥ २॥
या कलियुगीं; अधार न दूजा। योग, यज्ञ जप; व्रत तप पूजा!
राम स्मरावा; गावा राम हि। संतत श्रवण; रामगुण-गान हि॥३॥
ज्यासि पतित; पावन हा बाणा। विदित, वेद कवि; संत पुराणां।
मना त्यासि भज; त्यजुनि कुटिलते। राम भजुनि गति कुणा न मिळते॥४॥

छं०— गति नाहि कोणा; पतित-पावन; राम; भजतां वद मना?।
गणिका अजामिळ; गृध्र गज खल; व्याध बहु तरलेचि ना?॥
आभीर श्वपचहि; खस किरातहि यवन अति अघरूप जे।
हरि नाम सकृदपि; वदत पावन; होति, राम नमामि ते॥ १॥
रघुवंश भूषण,–चरित हें, नर; वदति गाती ऐकती।
कलिमल, मनोमल; धुउनि श्रमविण; राम-धामा पावती॥
पांच् सात चौं पाई मनोहर; जाणुनी नर मनिं धरी।
दारुण अविद्या; पंच जनित, विकार तो रघुवर हरी॥ २॥
सुंदर सुजाण; कृपा निधानः अनाथवरि करि प्रीति जो।
तो एक राम; अकाम-हित; निर्वाणदायी नान्य तो॥
ज्याच्या कृपा लेशा–मुळें अति दास-तुलसी मंदधी।
पावे परम, विश्राम; राम-समान प्रभु नाही कधीं!॥ ३॥

दो०— मज सम दीन न, दीन-हित; तुजसम रघुकुल-ईश।
जाणुनि हें रघुवंश मणी; हरा विषम भव-भीस[1]॥ १३०(क)॥
,, कामीजन-प्रिय नारि जशी; लोभी जन-प्रिय दाम।
तेवीं रघुवर निरंतर; प्रिय वाटो मज राम॥ १३० (ख)॥

शा. वि०—यत्पूर्वं प्रभुणा कृतं सुकविना श्री शम्भुना दुर्गमं।
श्रीमद्रामपदाब्ज भक्तिमनिशं प्राप्त्यै तु रामायणम्॥
मत्वा तद्रघुनाथ-नाम-निरतं; स्वान्तस्तमःशान्तये।
भाषाबद्धमिदं चकार तुलसी–दास-स्तथा मानसम्॥ १॥
पुण्यं पापहरं; सदा शिवकरं; विज्ञान-भक्ति-प्रदं।
मायामोह–मलापहं सुविमलं प्रेमाम्बुपूरं शुभम्॥
श्रीमद्राम-चरित्र-मानस मिदं; भक्त्यावगाहन्ति ये।
ते संसार-पतङ्ग घोर किरणैर्दह्यन्ति नो मानवाः॥ २॥

१ भितीला

आ०-* श्री रामा तव नामीं; सुखदामीं[1] नित्य चित्त रंगावें
कोमल पद-कमलीं तव; मन-भृंगें नित्यची तरंगावें ॥ १ ॥
* गाथा गुण-गण-गरिमा; गमनाहुनि गहन, गोड, गंभीर।
तारी त्रिपाप-तरणी;– तापार्णव[2] दावि, चरण तव, तीरें[3] ॥२॥
* देवा प्रज्ञानाला द्यावें जों काय[4]–संघ निश्वासें[5]
सेवा विश्वाची या; तव रूपाची घडो सुविश्वासें ॥ ३ ॥
पृथ्वी-* नसे कुशल हा कवी, कुशल ना जना शीकवी।
परेश रघुनाथ जो, करि सनाथ या; तो कवी ॥
स्वयें चि करवी तरी मिरवुं कां वृथा थोरवी।
रवी-मणि जसा द्रवे, उगवतो यदा तो रवी ॥ ४ ॥
* न शब्द–पटुताऽथवा सुखद–काव्य–कौशल्यता।
परी तुलसिदास, सत्कवितरूवरी ही लता ॥
गुरूपदरजक्ष्मा[6]; जल कृपा; वरी घालता–॥
–विदेहतनयापती; फळलि बोलतां चालतां ॥ ५ ॥
* तृणासि करि वज्र जो; तृण–[7]लघू पवीते[8] करी।
मुर्खी वदवि वेद जो; जड अशा पशूच्या, हरी ॥
अशक्य किमपी नसे रघुवरा; करा ना स्मयं[9]।
सरोज–पद वंदुनी जयति बोलुं या जय् जय ॥ ६ ॥

इतिश्री उत्तरकांडे, रामायण माहात्म्यादि, राम–चरित मानस
फलश्रुति–वर्णनं नाम षोडशोऽध्यायः
मास पारायणे त्रिंशो विश्रामः
नवाह पारायणे नवमो विश्रामः

———

॥ इति श्री मद्रामचरितमानसे; सकल–कलि–कलुष–विध्वंसने ॥
॥ सप्तमः सोपानः ॥

॥ उत्तर काण्ड समाप्तम्

॥ इति श्री राम चरित–मानसं संपूर्णम् ॥
॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

---

१ सुखदाम, सुखांचा हार. २ त्रिविध तापरूपी सूर्याच्या तापाचा सागर. ३ तुझे चरणरूपी तीर. ४ देह–समुदाय, ५ श्वासोश्वास करीत आहे. ६ भूमी ७ तृणाहुनि लहान, हलका. ८ वज्राला. ९ आश्चर्य.

* अशी खूण केलेले श्लोक अनुवादकाचे स्वकृत आहेत.

* अनुवादकाची विनंति.

पृ०— * अजाण मति मंद मी; परि धरूनि हातीं मला ।
चरित्र अनुवाद हा, करविला हरीनें भला ॥
असें बघुनि जाति जे; शरण राघवा मानव ।
तयांसि सुखलाभ तो; प्रतिदिनीं; असे मो नव ॥ १ ॥
* सुसंगति धरूनि जे पठति या चरित्रा तव ।
स्वधर्म अवलंबुनी भजतिराम भक्ती-स्तव ॥
विवेक विरती सवें; जपति नाम जे राघव ।
जिवंत असतां वपू; सहज लंघिती ते भव ॥ २ ॥
* वसूनि तरणीमधें उतरती जलाब्धी जसे ।
तसा चि अनुवाद हा; मम कृती जरा ही नसे ॥
वसे हृदयिं राम जो; सकल तोचि हें बोलतो ।
शुका शिकविती जसें; नर, तसाचि तो डोलतो ॥ ३ ॥

***

आरती श्री रामचरित मानसाची

जय जय, जयजय; आरति सुखकर; रामचरित्रांतें ।
श्रवणें मननें; पठणें गानें; दे हरि-मित्रांतें ॥ धृ ॥
शंकर-मानसिं, रचिलें पावे; हिमगिरि-कन्या तें ।
काक-भुशुंडी;-याज्ञवल्क्य मुनि; लोमश-घटजातें ॥ १ ॥
नरहरि-तुलसी; दासा पाखुनि; गंगादासींतें; ।
कृपाळु होऊनि; तेणें दिधलें; ईश्वर-प्रज्ञांतें; ॥ २ ॥
भव-भय-हरणा; शान्ति-वितरणां; रघुवर-चरणांतें ।
पाप-विनाशन; पावन प्रेमळ, पाववुनी मातें ॥ ३ ॥
मातें सम मम; अहित निवारुनि; निज-पद दात्यांतें ।
सच्चित्सुखकर; रामकृपाकर;-भक्तिरसा-दातें ॥ ४ ॥
जन हितकारक; षड्रिपुमारक; भव-तारक पोतें ।
नाहीं साधन, नीती-शिक्षण; तुजविण जगतातें ॥५ ॥

---

१ लक्ष्मी, २ तुलसीदासांचे गुरु ३ ज्यांचें छायाचित्र आरंभी दिले आहे. ४ ईश्वरदास पूर्वाश्रमांचें रामदासी नांव ५ प्रज्ञानामानंद ६ रक्षण करणारें.

म्हणुनी रामें; आज्ञापुनि मज; या अनुवादातें ।
करवुनि, केलें; तीर्ण: कांहिसें; तव उपकरातें ॥ ६ ॥
अंग्लादिक पर, देश वानिती बहु महिमा, ज्यातें ।
वेद-शास्त्र-वर-मंथन उद्धृत; या नवनीतातें ॥ ७ ॥
नवनीताचा; स्वाद घेउनी; नवनीतचि व्हावें ।
राम-चरितवर, तुलसी वंदन; प्रज्ञा करि भावें ॥ ८ ॥

आरती श्री बाबा गंगादासाची

प्रेमें आरति ओवाळूं जय गंगादासातें ।
प्रेमाचा पुतळाचि भासला; जो जगतीं मातें ॥ ध्रु ॥
भक्ति-रसाची; खाण असुनि नहि; वैराग्या वाण ।
मान मोह मद मार नसोनी; पूर्ण असें ज्ञान ॥ १ ॥
उदास देहीं; सदा वसेही; कर्दलि-कौपीन ।
रसनेचा जय, पूर्ण असोनी; नाहीं तनु पीन ॥ २ ॥
रामरसाचा पाझर झरतो; नयनीं; नहि भान ।
सर्वभूतहित,-निरत; चरित्रा; रघुपतिचे गान ॥ ३ ॥
भक्तिरसाचा स्वाद चाखिला, ज्याच्या संगतिनें ।
किति उपकारां; वानूं त्याचे; अतर्क्य मन-मतिनें ॥ ४ ॥
केवळ आशीर्वादें ज्यानें; रहस्य हें दिधलें ।
प्रभुपदिं निष्ठा अचळ समर्पुनि; चित्त-मळां धुतले ॥ ५ ॥
हा अनुवाद तयासी अर्पूं; पुष्पांजलि हातें ।
प्रेम जयाचें, अखंड निर्मळ; प्राणांहुनि मातें ॥ ६ ॥
करूं दंडवत; अखंड नमुनी; त्यांचे चरणांतें ।
उपकारा उत्तीर्ण व्हावया; शक्ति न प्रज्ञातें ॥ ७ ॥

॥ श्री रामचन्द्रार्पितमस्तु ॥

ॐ तत्सत्

---

१ उत्तीर्णउतराई. २ केळीच्या सोप्याची लंगोटी

लेखकाचे खालील ग्रंथ प्रकाशनाची

वाट पहात आहेत.

१ श्री गुरुगीता प्रबोधिनी.
२ परमामृत प्रकाश.
३ श्री वेदस्तुति कीर्तन भास्कर.
४ भ. गीता कीर्तन तरंगिणी प्रथमोल्लास अध्याय १५ वा.
५ भगवद्‌गीता संगीत समश्लोकी.
६ वेदान्तसार अभंग रामायण.
७ नर्कुटक रामायण.
८ श्री ब्रह्मस्तुति. (चौपाई—दोहादि वृत्तांत)
९ पदें, अष्टकें.
१० इतर स्फुटकाव्य.

प्रकाशकांनीं खालील पत्त्यावर पत्रव्यवहार करावा.

प. प. स्वामी प्रज्ञानानन्द सरस्वती

मु. पो. } **चास (कमान)** जि. पुणें.